TEXT PROBLEM WITHIN THE BOOK ONLY

UNIVERSAL LIBRARY
OU_192257
UNIVERSAL LIBRARY

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M85 V78B Accession No. M5256

Author विनोबा

Title सिद्धान्तकोकन 1953

This book should be returned on or before the date last marked below.

# सिंहावलोकन

विनोबा

१९५३

किमत रु. १-२-०

प्रकाशक :

भाऊ पानसे

मंत्री,

ग्राम सेवा मंडळ, नालवाडी वर्धा

सर्व हक्क

प्रकाशकांचे स्वाधीन

प्रथम संस्करण प्रति ३१००

Checked 1963

मुद्रक :

गं. ना. सराफ

व्यवस्थापक,

श्रीकृष्ण प्रिंटिंग वर्क्स, वर्धा.

# प्रस्तावना

पूर्वीं निरनिराळ्या ठिकाणी छापल्या गेलेल्या पू० विनोबांच्या ५४ लेख-भाषणादींचें हें आज '५३ सालांत एकत्रित सुबद्ध स्वरुपांत प्रकाशन होत आहे. यांत १९२४ सालापासून १९४७ सालापर्यंतची-मध्यंतरीचीं कित्येक वर्षे एकूण १२-१३ वर्षे सोडून,—लेख-भाषणें दिलीं गेलीं आहेत. या अवधींत या संग्रहाच्या कितीतरी पट लेख-भाषणें झालेलीं आहेत. परंतु तीं सर्व देणे हा या प्रकाशनाचा हेतु नाहीं, मागें वळून केवळ अेका दृष्टीच्या फेकींत येईल, इतका च महत्वाचा आणि पूर्वीं पुस्तकाकारांत न आलेला भाग यांत दिला आहे. या दृष्टीनें या संग्रहाचें 'सिंहावलोकन' हें नांव लक्षांत घेण्याजोगे आहे. सिंहावलोकन म्हणजे सर्वावलोकन नव्हे, ईशावास्योपनिषद् नांव आद्याक्षरांनी बनले. आद्यशीर्षकावरून या संग्रहाच्या नांवासंबंधीं हि तशी च कल्पना करता येते.

कुराण उत्तरोत्तर कमी मजकुराचें होत गेलेलें आहे. त्याप्रमाणें यातल्या शेवटच्या शेवटच्या लेखांत उत्तरोत्तर कमी मजकूर आढळून येईल. लेखाच्या मानानें बहुतेक भाषणे विस्तृत स्वरूपाचीं आहेत. तरी एकंदरीत लेख-भाषणातील मोजकेपणा.

**आंगें सानें परिणामें थोर ।**<br>
**जैसें गुरुमुखींचें अक्षर ॥१॥**<br>
**तैसा अल्पीं जिहीं अपार ।**<br>
**तृप्ति लाहे ॥ (ज्ञाने० १७.१२९)**

या ज्ञानदेवांच्या वचनाप्रमाणें च असून त्यानें बोधग्रहणाला अतिशय सुलभता प्राप्त झालेली आहे.

बोधाचें मुख्य स्वरूप म्हणजे सत्यदर्शन. जीवनाच्या त्या त्या प्रांतांत त्या त्या परिस्थितींत, सत्याचें यथार्थ दर्शन होणें, ही अतिशय महत्वाची गोष्ट आहे. गाण्यांत सूर सात च. पण गाणीं अनंत. गणितांत संख्या १० च. पण गणित अगणित. मातृका ५२ च. पण वाङ्मय अफाट. त्यामुळें सात

सुरांनीं, दहा संख्यांनीं, बावन मातृकांनीं गाणीं, गणित किंवा भाषा यांचें आकलन होऊं शकत नाहीं. तसें च सत्य एक च. पण त्याचें त्या त्या परिस्थितींत, त्या त्या विषयांत, यथार्थ आकलन होणें ही गोष्ट सुलभ नाहीं. ती अत्यंत दुर्लभ वस्तु येथें सुलभ झालेली आहे, हा च या लेखसंग्रहाचा मोठा लाभ आहे.

उदा० १९४२ च्या शेवटच्या स्वातंत्र्य संग्रामाच्या संबंधीचें सुरवातीचें अवलोकन हें वास्तविक निष्कर्ष-दृष्टचा आणि कार्यदृष्टचा बिनचूक सत्य-दर्शन आहे. दुसऱ्या भाषणांत व्यक्ति-प्राधान्य आणि तत्व-प्रधानता या दोन गोष्टी मांडून बापूजींच्या युगपुरुषत्वाचें ऐतिहासिक मागणी, हें कारण दाखवून, युग बनविणारी आत्मप्रत्ययी सत्यदृष्टी यांत दिग्दर्शित केली आहे. विज्ञान आणि हिंसा जुळणार नाहीं; हें हि परमसत्य येथें नमूद झालें आहे. अशा रीतीनें प्रत्येक लेखाकडे काळजीपूर्वक या च सत्याच्या निर्णायक दृष्टीनें पाहिल्याशिवाय यांतील लेखांचा उपयोग होणार नाहीं. किंबहुना हें सिंहावलोकन सत्यावलोकनाच्या दृष्टीनें च पाहिलें पाहिजे.

तसें पहावयाचें तर, यांत केवळ ५२ लेख आहेत, असें समजून चालावयाचें नाहीं. तर ५२ लेखांच्या निमित्तानें अनेक महत्वाचे जीवन विषयक प्रश्न येथें सोडविलेले आहेत, हें लक्षांत घ्यावें लागेल. म्हणून च सर्व प्रश्नांचें अलग अलग मनन करून वाचकांनी या संग्रहाचा आपापल्या कार्यांत योग्य उपयोग करावा अशी विनंती करणें अवश्य वाटतें, तरी

**झडझडोनी वहिला निघ ।**
**इये भक्तीचिये वाटे लाग ॥**
**जिया पावसी अव्यंग ।**
**निजधाम माझें ॥ (ज्ञाने० ९-५१६)**

महादेव-मंदिर
२३-५-५३ धुळें

**शिवाजी न० भावे**

# अनुक्रमणिका

| | | पृष्ठ |
|---|---|---|
| | प्रस्तावना | |
| १ | '४२ च्या लढ्याचें सिंहावलोकन | १ |
| २ | अहिंसेचा अुदय | ९ |
| ३ | मजुरांचा सांभाळ | १५ |
| ४ | आमच्या धर्महीनतेचो खूण काळाबाजार | १७ |
| ५ | जनस्थानची चिंता | २१ |
| ६ | गो-सेवेची दृष्टि | २४ |
| ७ | स्वराज्याच्या स्वागताची तयारी | ३५ |
| ८ | ग्राम-सेवेच्या अडचणी | ३९ |
| ९ | सफाअीची मोहीम | ४३ |
| १० | जखमी तांदूळ बंद करा | ४६ |
| ११ | अस्पृश्यता-निवारणाची घोषणा | ४८ |
| १२ | शिक्षण-दृष्टि | ५० |
| १३ | समग्रतेची सुंदरता | ५४ |
| १४ | अचिन्त्यं ब्रह्म | ५९ |
| १५ | अयशाचा शक | ६१ |
| १६ | नित्याचीं कामें आणि संप | ६५ |
| १७ | ग्राम-सेवा आणि ग्राम धर्म | ६७ |
| १८ | शिक्षकांची अवहेलना | ७२ |
| १९ | श्रमजीविका | ७४ |
| २० | खरी स्वतंत्रता | ८८ |
| २१ | सीता तर प्रत्येकीला होता येअील | ९१ |
| २२ | लक्षचंडी होम | ९६ |
| २२ अ. | लक्षचंडी-यज्ञ: आक्षेप व निरास | ९८ |
| २३ | सुभाषबाबूंचें गुणस्मरण | १०१ |
| २४ | प्राज्य सत्तेची तयारी | १०७ |
| २५ | संधिकाळांतील कर्तव्य | ११० |
| २६ | लग्नाचा प्रश्न | ११३ |
| २७ | महारोगी-सेवा | ११५ |

२८ सेवकाची शिदोरी १२३
२९ रेखनाचीं अुपकरणें १२६
३० गोपालनाच्या व्यापक योजने बाबत सूचना १३१
३१ स्वच्छास्वच्छता व अस्पृश्यता १३४
३२ पजाबची विभागणी १४०
३३ साधन-विवेक १४३
३४ गीता आणि लोकशाही १४७
३५ तिळ-गूळ घ्या आणि गोड बोला १४८
३६ सर्वेषां अविरोधेन १५०
३७ रोज लिहीत चला १६०
३८ ग्राम सेवे बाबत प्रश्नोत्तरी १६२
३९ "धर्म ध्वजित्वं" १६५
४० प्रार्थनेंतील विवेक १६७
४१ अ. अभिज्ञा १७१
४१ ब. अभिज्ञा १७३
४२ सुट्टीची वेळ बदला १७६
४३ शाळेंतील सुट्टया १७७
४४ अनर्थकारी विद्या १७९
४५ गोऱ्या काळ्यांचा संबंध १८१
४६ अस्पृश्यता-निवारणाचें व्रत १८३
४७ सर्व धर्म हरिचे पाय १८४
४८ "सहनाववतु" चें विवरण १८६
४९ हिमालय विभूति कां ? १८८
५० गरिबांचे मुखत्यार १९०
५१ भ्याड व क्रूर अेक च १९१
५२ तरुणांनीं लक्ष द्यावें १९२
५३ अकरणात्मक त्याग १९३
५४ दास नवमी चिंतन १९४

# सिंहावलोकन

## : १ :

## ४२ च्या लढ्याचें सिंहावलोकन*

तीन-साडेतीन वर्षांनंतर तुम्हां मंडळींना आज पाहून मला फार आनंद होत आहे. हिंदुस्थानामध्यें इंग्रजांचें राज्य झाल्यापासून शाळांमधून सगळीकडे इतिहास शिकविले जातात. ते आम्ही लहानपणापासून वाचीत आलों. परंतु इतिहास वाचतांना माझ्या मनांत नेहमीं विचार येई, व तसा तो तुमच्या हि मनांत आला असेल, कीं आम्हीं असें इतिहास किती दिवस वाचीत रहायचें ? आम्ही स्वतः कांहीं इतिहास निर्माण करणार आहों कीं नाहीं ? असा इतिहास गेल्या तीन वर्षांच्या आंदोलना-मध्यें हिंदुस्थाननें निर्माण केला आहे, असें मला म्हणावयाचें आहे.

याचें सर्व श्रेय सर्व-सामान्य जनतेला व मुख्यतः विद्यार्थ्यांना आहे. ईश्वराच्या कृपेनें च जणूं सरकारनें सर्व पुढारी उचलून जेलमध्यें टाकले आणि त्यामुळें लोकांना स्वतंत्र बुद्धीनें वागता आलें. त्या वागण्यांत अनेकांनीं अनेक चुका हि केल्या. पण चुका करण्याचा अधिकार हा च मुळीं स्वराज्याचा अर्थ आहे. म्हणून मागें झालेल्या चुकींबद्दल खेद मानीत बसण्याचें कारण नाहीं. यापुढल्या युद्धामध्यें अधिक बिनचूकपणें लढूं. तथापि मागच्या तीन वर्षांत अगदीं मोकळेपणानें, पुढाऱ्यांचें मार्गदर्शन

---

*९ ऑगस्ट १९४५ रोजी वर्धा येथें ऑगस्ट-दिनानिमित्त दिलेलें भाषण.

नसतांना, लोकानीं जें केलें, तें सामग्र्यानें विचारांत घेतलें तर कौतुकास्पद व प्रशंसनीय आहे, असें च मला वाटतें. विशाल गंगेंत गढून पाण्याचे कांहीं ओहोळ किंवा नाले येऊन मिसळले तरी तेवढ्यानें ती मूळची पावन गंगा अपावन होत नाहीं. त्या प्रमाणें एवढ्या विशाल आंदोलनामध्यें, कीं ज्यात सर्व हिंदुस्थाननें भाग घेतला व एका प्रचंड सत्तेशीं लढा दिला त्यांत, कांहीं चुका झाल्या असल्या तरी एकूण सर्व विचारांत घेता इतिहासकारांना असें च म्हणावें लागेल कीं राष्ट्रानें जें केलें तें पुढच्या पिढ्याना देखील उत्साहकारक वाटावें असें च केलें.

सरकारनें कोणत्या हि प्रकारची दडपशाही करण्याचें बाकी ठेवलें नाहीं. पण बिचाऱ्या सरकारला तरी काय दोष द्यायचा ? घाबरलेले लोक नेहमीं च मर्यादा ओलांडतात असें आपण पहातों. सरकार जर धैर्यशाली असतें, तर त्याचें वागणें, झालें त्याहून वेगळया च प्रकारचें झालें असतें. परंतु भेदरलेलें सरकार, वागलें त्याहून वेगळया प्रकारें वागेल ही अपेक्षा तरी कशी करतां येईल ? म्हणून मी सरकारला दोष देत नाहीं. तथापि एवढी दडपशाही सहन करून हि लोकांचे चेहरे मला घाबरलेले दिसले नाहींत आणि म्हणून हिंदुस्थाननें गेल्या तीन वर्षांत पुष्कळ च कमाई केली असें माझें मत आहे.

डॉक्टर औषध देतो तेव्हां तें बाटलींत भरून देतो. घरीं आणल्यावर बाटलींत वर पाणी आणि खालीं औषध असें होतें. म्हणून डॉक्टर रोग्याला सूचना करून ठेवतो कीं औषध घेतांना बाटली हलवून घे. हलविल्यानें सबंध औषध ढवळलें जातें व औषधांतला गुण पदरीं पडतो. समाजाची हि अशी च स्थिति आहे. समाज जर मधून मधून ढवळला गेला नाहीं, तर वर पाणी सांचतें व समाजाची आरोग्यशक्ति कमी होते. या वेळीं सबंध समाज ढवळला गेला व म्हणून हिंदुस्थानची आरोग्यावस्था वाढली आहे. गेल्या तीन वर्षांत हिंदुस्थाननें जी प्रगति केली आहे ती

एरव्हीं पन्नास वर्षांत हि झाली नसती. या प्रगतीचें माप तीन गोष्टींवरून कळून येतें. पहिली गोष्ट ही कीं हिंदुस्थान हें मेलेलें राष्ट्र आहे ही जगाची भावना साफ गेली व जगांतले लोक खडबडून जागे झाले. हिंदुस्थान हा एक "मानव-समुदाय" आहे व तो जागृत झालेला आहे, ही गोष्ट जगाच्या पूर्णपणें लक्षात आली, हें कांहीं लहान कार्य नव्हे. या योगानें जगभर हिंदुस्थानची प्रतिष्ठा वाढली आहे. असें जरी असलें तरी इथल्या लोकांत मला जर तितकेंसें तेज दिसलें नसतें तर जगांत प्रतिष्ठा वाढून हि मला समाधान झालें नसतें. परंतु साडेतीन वर्षांपूर्वीं जो स्वाभिमान व जी क्रांति लोकामध्यें दिसत नव्हती ती आज दिसत आहे. विद्यार्थी पूर्वीपेक्षा पुष्कळ च निडरपणानें व स्वाभिमानानें वागतांना दिसतात. निर्भयता हा सर्व गुणांचा राजा आहे. निर्भयता जर समाजाच्या अंगीं बाणली तर मग दुसऱ्या कोणत्या हि शस्त्राची गरज नाहीं; आणि निर्भयता नसेल तर दुसरीं हजार शस्त्रें हि निरुपयोगी आहेत. गेल्या आंदोलनानें ही निर्भयता हिंदुस्थानच्या समाजात निर्माण केली, ही दुसरी गोष्ट होय. आणि तिसरी गोष्ट ही कीं थेट दूरदूरच्या खेड्यापाड्यापर्यंतचा समाज, जो इतर वाटेल तितक्या प्रचारानें हि जागा झाला नसता, तो सुद्धा यावेळीं जागा झाला. अशा या तीन वस्तु जमेस धरल्या तर तीन वर्षांचा झालेला इतिहास उत्साहकारक आहे असें दिसून येईल.

जेलमध्यें असतांना आम्ही विचार करीत असूं कीं आम्ही इथून बाहेर पडूं त्या वेळीं कोणत्या अवस्थेंत बाहेर पडूं? पण जसजसा काळ लोटत गेला तसतसें स्पष्ट होऊं लागलें कीं जेलमध्यें आलेले लोक अधिक टणक बनत चालले आहेत. जेलमधील लोक मनानें जर मऊ होऊन बाहेर आले असते तर सरकारचा तो एक मोठा विजय झाला असें मीं म्हटलें असतें; पण तसें झालें नाहीं. नेमकें याच्या उलट झालें. सरकारनें आम्हाला तीन वर्षें पर्यंत एकत्र ठेवून एक फार मोठी प्रचार-संस्था उभी केली. तिथें अनेक व्याख्यानें देतां आलीं, भरपूर अभ्यास करता आला व चांगली

संघटना निर्माण करतां आली. ही अगदीं नक्की गोष्ट आहे कीं तीन वर्षांपूर्वीं आम्ही सरकारला जितके भारी होतों त्याच्या पेक्षां आज दसपट भारी झालों आहोंत. हा हि परिणाम जमेस धरला पाहिजे. इतका मोठा परिणाम या आंदोलनाचा झाला असल्यामुळें आजचा हा दिवस मला आनंदाचा वाटतो.

१९४२ च्या ऑगस्टमध्यें कॉंग्रेसनें "क्विट् इंडिया" ठराव मुंबईला केला. तो एक मंत्र च कॉंग्रेस नें दिला. आणि मंत्राची खुबी अशी असते कीं त्यामुळें भक्तांना उत्साह चढतो व विरोधी लोकांना भूतबाधा होते. म्हणून सरकारची बावचळल्यासारखी स्थिति झाली आणि त्यानें दडपशाही केली, याचें मला नवल वाटत नाहीं. मंत्रानें "भुतें कांपती थरथरा" असा परिणाम होतो व भक्तांना धीर चढतो. हा मंत्र हि असा च होता. अजून त्या मंत्राची सिद्धि झालेली नाहीं. परंतु तो आपल्यासमोर आहे व म्हणून आपण त्याची उपासना केली पाहिजे आणि तो सिद्ध करण्याचा पुरेपूर प्रयत्न केला पाहिजे. मंत्र सहजासहजीं सिद्ध होत नसतात. त्याला तपस्या करावी लागते. त्या तपस्येंत भक्त तावून सुलाखून निघतात व त्यांचा कस लागतो आणि असें झाल्यानंतर च मंत्र फळतो.

मीं असें केव्हां च मानलें नव्हतें कीं "क्विट् इंडिया" मंत्र म्हटल्याबरोबर त्याची सिद्धि होईल. परंतु मंत्राचा उच्चार देखील श्रद्धे-शिवाय होऊं शकत नाहीं. मंत्राचा उच्चार होऊं शकणें ही सुद्धां कमी शक्ति नाहीं. एकदा एक भिकारी श्रीमंताच्या घरीं गेला. त्याला त्या श्रीमंतानें विचारलें, "बाबा, तुला काय पाहिजे ? जें मागशील तें देतों." भिकारी म्हणाला, "महाराज, मला भाजी द्या." बिचाऱ्याच्या तोंडून याहून अधिक निघालें च नाहीं. म्हणून मुखावाटे महान् शब्द उच्चारला जाणें ही एक मोठी शक्ति आहे. हिंदुस्थाननें "क्विट् इंडिया" हा महान् शब्द उच्चारला. "हिंदुस्थान सोडा" याचा अर्थ असा कीं आतांपर्यंत

तुम्ही येथें ज्याप्रमाणें राज्य करीत होतां, तसें यापुढें आम्ही तुम्हांला करूं देणार नाहीं. आम्ही काळे आणि तुम्ही गोरे म्हणून तुमच्या बद्दल आमच्या मनांत द्वेष नाहीं. तुम्ही खुशाल येथें रहा, पण प्रेमानें रहा. हिंदुस्थाननें प्राचीन कालापासून अनेक मानव-समाज जिरविले आहेत. इथें हूण आले, शक आले, पारसी आले, यवन आले, मुसलमान आले, असे अनेक समाज आजपर्यंत आले व यापुढें हि येतील. आम्हीं सर्वांना मुक्तद्वार ठेवलें आहे. भारतमाता सर्वांचा स्वीकार करते. परंतु आमचें म्हणणें असें कीं येथें प्रेमानें रहा. "क्विट् इंडिया" चा अर्थ तुम्ही व्यक्तिशः येथून निघून जा असा नाहीं, तर यापुढें तुमच्या गमजा येथें चालावयाच्या नाहींत असा आहे. इथल्या लोकांना पिळून त्यांच्या जिवावर जगण्याचें जें शास्त्र तुम्हीं बनविलें, व ज्यांत इथल्या कांहीं लोकांना हि शिकवून तयार केलें, तें आतां यापुढें चालणार नाहीं.

रामायणांत अशी एक कथा आहे कीं रामराजाच्या कारकीर्दीत एका गृहस्थाचा मुलगा अल्प वयांत वारला. त्या मेलेल्या मुलाला घेऊन तो गृहस्थ रामाच्या दरबारांत आला व रामापुढें ठेवून त्याला म्हणाला, "ही हत्या तुला लागली!" रामानें पुढें त्याचें काय केलें, तें मी येथें सांगत बसत नाहीं. मला सांगायचें हें आहे कीं आम्हा भोळया लोकांची समजूत अशी कीं प्रजेपैकीं कुणाचा मुलगा अल्प वयांत मेला, तर तो हि राजसत्तेचा दोष. आज तर आम्हीं आमच्या डोळयांदेखत दहा-पंधरा लाख लोक इथें उपाशी मरतांना पाहिले. आम्हां भोळया लोकांचें मत सोडून द्या, पण राज्यशास्त्रांतल्या निपुण लोकांचें याबाबत काय मत आहे तें मी जाणूं इच्छितों. मी या राज्यशास्त्र्यांस विचारतों, "तुमच्या राज्य-शास्त्राच्या तत्त्वाप्रमाणें सांगा कीं हे लाखों लोक मेले ह्याबद्दल ही राजसत्ता जबाबदार आहे कीं नाहीं? आणी ते जर "हो" म्हणतील तर मी त्यांना पुनः विचारीन कीं मग आम्ही 'क्विट् इंडिया' चा मंत्र

उच्चारला तो कुठें चुकला? या मंत्राची गरज नव्हती असें जर तुम्हीं गेल्या तीन वर्षांच्या अवधींत सिद्ध करून दाखविलें असतें, तरी आमचा मंत्र चुकला होता असें मी कबूल केलें असतें. परंतु तुमच्या हिंदुस्थानच्या आतांपर्यंतच्या कारकीर्दींत तुम्हीं जीं अनेक पापें केलीं, किंवा तुमच्या हातून झालीं म्हणा, त्यांवर गेल्या तीन वर्षांतील या घटनेनें तुम्हीं कळस चढविलात. हिंदुस्थानांत इतकी हत्या होऊन हि तिथें तो ॲमेरी काय बोलतो? म्हणतो, "याची जबाबदारी आमच्यावर नाहीं?" मग कुणावर आहे? तर म्हणे "बंगालमध्यें प्रॉव्हिन्शिअल ऑटॉनमी आहे तिच्यावर आहे." "प्रॉव्हिन्शिअल ऑटॉनमी" म्हणजे काय? तर प्रांतातील लोकांना मरणाचें स्वातंत्र्य! त्याना तें दिलें आहे व तें ते बजावीत आहेत, असें तो भला बोलतो. आतां यावर हंसावें का रडावें? म्हणून आम्ही म्हणतों कीं आमचा मंत्र खरा होता हें आतां हजार पटींनीं सिद्ध झालें आहे. तो सोडायची जरूर नाहीं, उलट तो पूर्ण करायची जरूर आहे.

मंत्र पूर्ण कसा करायचा याचा नीट विचार करायला पाहिजे. नद्यांना जेव्हां पूर येतो, तेव्हां त्याबरोबर पुष्कळ अमूल्य गाळ कांठावर सांचत असतो. पूर तर येतो तसा ओसरतो; पण हा सांचणारा गाळ फार मूल्यवान् असतो व त्याचा उपयोग करून शेती उत्तम पिकवता येते. गंगा व यमुना या नद्यांमधील दुआबाची भूमि भरपूर सुपीक आहे. याचें कारण त्या दोन्ही नद्यांच्या कांठीं पुरानंतर सांचणारा गाळ होय. असा गाळ वायां घालविणें करंट-लक्षण आहे. तो वापरून घेतल्यानें राष्ट्रांत नवनिर्मिति होऊन राष्ट्र लक्ष्मीवान् बनतें. तसें या गेल्या चळवळीचा जो मोठा पूर येऊन गेला त्याबरोबर बराचसा नवीन गाळ हि आला. या चळवळीमुळें असे अनेक नवीन कार्यकर्ते पुढें आलेत कीं ज्यांची किंमत राष्ट्राला पूर्वी कळली नव्हती किंवा ज्यांना पुढें येण्याची तशी संधि मिळाली नव्हती.

असे नवीन कार्यकर्ते राष्ट्राला या चळवळीनें मिळवून दिले. हा मी या चळवळीचा सर्वांत मोठा लाभ समजतों.

या नवीन माणसांतून आपण पीक काढलें पाहिजे, त्यांची संघटना केली पाहिजे, त्यांच्यांत परस्परांत ऐक्यभाव निर्माण केला पाहिजे व त्यांची कर्तृत्वशक्ति वाढविली पाहिजे. उत्साहाच्या भरांत क्षणिक त्याग करणें सोपें असतें, पण उत्साहाचा भांडवल म्हणून उपयोग करून त्याच्यां आधारावर उत्साहवृद्धीचा व्यापार करणें कठिण असतें. पण तें च आतां केलें पाहिजे. म्हणून चळवळीचा जर पुरेपूर लाभ पदरांत पाडून घ्यायचा असेल तर गांधींनीं सांगितलेल्या विधायक कार्याला जोरानें लागलें पाहिजे. या गोष्टीचा तुम्ही गंभीरपणें विचार करा, असें मला सांगायचें आहे. हा विधायक कार्यक्रम काय आहे ? हरिजनांशीं एकरूप होणें, हिंदु-मुसलमानांमध्यें प्रेमभाव वाढविणें, राष्ट्रांतील खेडोपाड्यामधील जनतेला स्वावलंबी बनविणें, सर्व लहान-थोर लोकांना राष्ट्रभावनेचें शिक्षण मिळेल अशी योजना करणें, राष्ट्रभाषा सर्वांना शिकविणें, मातृभाषेचें प्रेम वाढविणें, समाजांत आर्थिक समता रूढ करणें, साम्ययोग जनतेला शिकविणें, सर्वोदयाचें अर्थशास्त्र समजावून सांगणें, शेतकऱ्यांची, मजुरांची आणि विद्यार्थ्यांची संघटना करणें, स्त्रियांमध्यें चैतन्य निर्माण करणें हा सर्वव्यापी विधायक कार्यक्रम आहे. हें सर्व आता आपल्याला करायचें आहे. उत्साहाच्या पुरांतून जीं नवीं माणसें आपल्याला लाभलेलीं आहेत त्यांचा उपयोग करून या कार्याला भराभर लागलें पाहिजे. नाहीं तर ही शक्ति वायां घालविल्यासारखें होईल.

म्हणून माझें तुम्हांला सांगणें आहे कीं ज्या उत्साहानें तुम्हीं ऑगस्टच्या लढाईत भाग घेतला त्या च उत्साहानें विधायक कार्याला लागा. या कामीं माझी मदत तुम्हांला मिळूं शकते. माझ्याजवळ कांहीं माणसें आहेत त्यांची सेवा हि तुम्हांला मिळूं शकते. इतकी प्रचंड उठावणी ज्या उत्साहानें तुम्हीं केली तो च उत्साह तुम्ही या कामांत घाला. तसें कराल तर पुढें दुसरी

लढाई न लढतां हि स्वराज्य आपल्या पदरांत पडणार आहे. पण तसें न झालें आणि आणखी लढाई लढाची लागली तर पूर्वीपेक्षां शतपट जोरदार ती लढाई होऊं शकेल. म्हणून हृदयांत पेटलेल्या कुंडांतील जळता अग्नि व मस्तकावर हिमालयांतील थंडगार बर्फ ठेवून कामाला लागून तप कराल तर चळवळीचा पूर्ण लाभ मिळवला असें होईल आणि ईश्वराच्या कृपेनें हिंदुस्थान धन्य होईल, याबद्दल मला मुळीं च शंका नाहीं.

यापेक्षां अधिक व्याख्यान वाढविण्याची गरज मला वाटत नाहीं. तुम्हांला भेटल्याचा आनंद पुनः एकदां प्रकट करतों. आतां शेवटीं ज्या हुतात्म्यांनीं गेल्या चळवळींत बलिदान केलें त्यांना श्रद्धांजलि अर्पण करण्याचें कर्तव्य आपणांस करावयाचें आहे. तुमच्या या गांधी चौकांत च असें एक बलिदान दिलें गेलें आहे. अशा असंख्य आहुति पडल्या आहेत. या हुतात्म्यांच्या बलिदानानें हिंदुस्थानचा एक अद्भुत व रम्य इतिहास लिहिला जाणार आहे. एखाद्या कादंबरीकाराला अद्भुत रसाची कादंबरी लिहावीशी वाटल्यास त्याची हौस तृप्त होण्याइतका भरपूर मसाला त्याला या आंदोलनांत मिळणारा आहे. या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आज आपण जी प्रार्थना करावयाची ती त्यांना सद्गति मिळण्यासाठीं नव्हे. त्यांना ती मिळून च चुकली आहे. प्रश्न आहे आमच्या गतीचा. त्यांच्यासारखें बलिदान करण्याचें बळ ईश्वर आम्हांला देवो, ही प्रार्थना आतां करायची आहे.

: २ :

# अहिंसेचा उदय*

आज आम्ही गांधी-जयंतीनिमित्त जमलों आहोंत. गांधीजींनीं पूर्वी पुष्कळदा व आतां हि सांगितलें आहे कीं हिला चरखा-जयंती म्हणावें व त्याप्रमाणें उत्सव करण्यांत यावा. पण आज हिंदुस्थानांत अशी हवा वाहत आहे कीं विचारापेक्षां मनुष्य च अधिक मानला जातो. हा विशेष आजचा आहे, प्राचीनकाळचा नव्हे. हिंदुस्थानच्या लोकांवर असा आक्षेप आहे कीं त्यांनीं आपला कांहीं च इतिहास लिहून ठेवला नाहीं. हा आक्षेप खरा आहे. आमच्या पूर्वजांनीं भिन्नभिन्न विषयावर पुष्कळ शास्त्रीय ग्रंथ लिहून ठेवले पण इतिहासावर कांहीं च लिहिलें नाहीं. आमच्यांतील श्रेष्ठांतील श्रेष्ठ पुरुष केव्हां होऊन गेले ह्याचा आम्हांला पत्ता नाहीं. आमच्यांत उत्तम उत्तम ग्रंथकार होऊन गेले. पण त्यांच्या ग्रंथांत त्यांचें नांव सुद्धां नाहीं. आजकाल प्रस्तावनेंत च लेखक आपला परिचय करून देतो. जुने लोक विचार-प्रधान होते. आम्ही व्यक्ति-प्रधान बनलों आहों. व्यक्तींची पूजा होत राहते, पण विचार मागें पडतात. म्हणून गांधीजी म्हणतात कीं गांधी-जयंती नव्हे, चरखा-जयंती समजून जें कांहीं करावयाचें असेल तें करा.

गांधीजींनीं असें कां सांगितलें ? चरखा दिसण्यांत लहानशी वस्तु आहे, पण त्यामागील विचारसरणी क्रांतिकारक आहे. आज जगांत जें चाललें आहे तें बदलण्याची गोष्ट त्यांत आहे. ह्याला च क्रांति म्हणतात. मी चेतन

---

* ग्रामसेवक विद्यालय, मगनवाडी, वर्धा येथें दिलेलें भाषण.

आहे. युग अचेतन आहे. म्हणून माझें युग मी बनवीन. माझ्या भोंवतालचें वातावरण मी निर्माण करीन. हा विचार चरखा शिकवितो. लोक मला विचारतात, "काय, आजच्या विसाव्या शतकांत तुमचा चरखा चालेल?" मी त्यांना म्हणतों, " आजपर्यंत चालला, आज १ ऑक्टोबरला चालत आहे, उद्यां २ आक्टोबरला चालेल व मी इच्छीन तोंपर्यंत चालत राहील." लोक मला विचारतात, "ह्या विमानांच्या युगांत तुमची तुनाई पुनाई कशी चालेल?" मी म्हणतों, " खूप चांगली चालेल. विमानांत बसून मी मोठ्या ऐटींत पुनाई करीन व चरखा चालवीन." कां? तर माझ्या सृष्टीचा मी मालक आहे म्हणून. ह्याला च माणूसपण म्हणतात. मी ईश्वराची प्रतिमा आहे. त्या मालकाचा मी मुलगा आहें. ह्या जड दुनियेला मी आपला मालक मानीत नाहीं. माझ्या हातांत ही माती आहे. मी हिच्यातून सोनें निर्माण करणार आहें.

इतिहासांत युगाला नांव देण्याची पद्धत आहे. 'व्हिक्टोरियन पीरियड' इत्यादि पाहून मला हंसूं येतें. मी म्हणतों, " हा माझा पीरियड आहे, माझें युग आहे." लोक म्हणतात, दुनियेचा मध्यबिंदु इंग्लंड आहे. मी म्हणतों, "धाम नदीच्या काठचें पवनार हा तिचा मध्यबिंदु आहे. कारण मी जेव्हां आपल्या टेकडीवर उभा राहून पाहतों, तेव्हां चारी बाजूंची दुनिया मला दिसते."

कांहीं लोक ह्या विचार-सरणीला 'यंत्र विरुद्ध चरखा' असें समजतात. पण माझ्या मतें तो 'यंत्र विरुद्ध चैतन्य' असा आहे. दैववादी व पंगु लोकांच्या रूढिवादाच्या उर्फ जडवादाच्या विरुद्ध हा चैतन्यवाद आहे. मी जडवादी नाहीं. यंत्र जड आहे. मी पाहिजे त्या यंत्राना ठेवीन, जीं नको असतील त्यांना ठेवणार नाहीं. बिचारीं यंत्रें कांहीं च करूं शकत नाहींत. मी त्यांना चालविणारा आहें. हिंदुस्थानांत ४० कोटि लोक आहेत. इतका विशाल देश आपलें वातावरण स्वतः निर्माण करणार नाहीं तर दुसरा

कोण करील ? मंगळाभोंवतीं मंगळाचें व बुधाभोंवतीं बुधाचें वातावरण राहतें. मग आमच्या भोंवतीं आमचें वातावरण कां राहूं नये ?

आम्ही इतिहास पाहतों तेव्हां दिसतें कीं इतिहासाची एक मागणी असते व ती पुरी करण्यासाठीं कोणी पुरुष हि निर्माण होत असतो. त्याला च आपण युग-पुरुष म्हणतों. हिंदुस्थानच्या इतिहासाची मागणी—व आज तर सर्व जगाची हि—ही आहे कीं चरखा ज्या संस्कृतीचें प्रतीक आहे ती संस्कृति आम्हांला पाहिजे.

इंग्रजाच्या हातांत हिंदुस्थान आला तेव्हा कोणच्या हि देशात जें घडलें नाहीं तें ह्या विशाल देशात घडून आलें. काय घडून आलें ? एवढ्या मोठ्या राष्ट्राच्या हातचीं सर्व हत्यारें काढून घेण्यांत आलीं. जुन्या काळीं कोणाला हि हें सुचलें नव्हतें. किंबहुना, अशा प्रकारें लोकांना निःशस्त्र करून ठेवणें धोक्याचें आहे असें हि त्यांना वाटत होतें. पण इंग्रजांना सुचलें कीं ह्या ठिकाणीं राज्य करावयाचें असेल तर लोकांचीं शस्त्रें काढून घ्या. शस्त्रें गेल्याबरोबर हिंदुस्थानात एका गोष्टीची आवश्यकता उत्पन्न झाली. ही आवश्यकता कोणती ? हिंदुस्थानच्या लोकांनीं विचार केला कीं एक तर अनंतकाळपर्यंत गुलामगिरींत रहावयाचें किंवा ह्या निःशस्त्रीकरणाचा मुकाबला करूं शकेल अशी शक्ति उभी करावयाची. हिंदुस्थानांत ही आवश्यकता उत्पन्न झाली. म्हणून ह्या देशात असा एक युग-पुरुष निघाला कीं ज्यानें एक दर्शन हिंदुस्थानला दिलें. हिंसक शस्त्रांखेरीज सुद्धां अन्यायाचा प्रतिकार करता येतो, हें तें दर्शन होय.

हा एक योगायोग आहे कीं तो पुरुष गांधी झाला. गांधी नसता तर दुसरा कोणी झाला असता. कारण ती या युगाची मागणी होती. इतके लोक नेहमीं च गुलामगिरींत राहतील हें अशक्य होतें. गीतेचें वचन मला ह्या वेळीं आठवतें. भगवंतांनीं अर्जुनाला म्हटलें कीं मी तर ह्यांना केव्हां च ठार करून चुकलों आहें, तूं केवळ निमित्त-मात्र हो. गांधी सुद्धां असा च निमित्त-मात्र आहे. ती ऐतिहासिक आवश्यकता होती.

म्हणून उत्तम गोष्ट ही कीं आम्ही गांधीला विसरून जावें. त्याचे विचार समजून घ्यावे. व्यक्तीची पूजा करीत राहूं, तर तिचे विचार आम्ही विसरून जाऊ. एका गृहस्थानें मला गांधी-जयंतीला व्याख्यान देण्यासाठीं निमंत्रण देतांना लिहिलें कीं आम्ही त्या दिवशीं ७८ बैलांच्या रथावर गांधींच्या तसबिरीची मिरवणूक हि काढणार आहों. अशा तऱ्हेनें ७८ चा कायदा चालू झाला तर विचार निघून जाईल. ७८ चे पुढें ७९, व ७९ चे ८० होतील. अशा प्रकारें शरीराचा विचार च मुख्य होऊन बसेल. आत्म्याला कांहीं ७८ वर्षे नसतात. तीं शरीराला च असतात. म्हणून शेवटीं शारीरिक दृष्टि च शिल्लक राहील.

गांधीनें आम्हांला चरखा दिला. "निःशस्त्र जनता प्रतिकारासाठीं तयार होत आहे" हा चरख्याचा अर्थ आहे. आम्ही जसे निःशस्त्र आहोंत तसे दुनियेंत दुसरे लोक हि निःशस्त्र केले जात आहेत. आतां फक्त चार राष्ट्रांच्या हातांत शस्त्रें राहणार आहेत. बाकीचीं तमाम राष्ट्रें निःशस्त्र च राहतील. ह्याला च हे लोक नव-रचना किंवा न्यू आर्डर म्हणतात. जुनी व्यवस्था जाऊन नवी आली आहे व जुन्या व्यवस्थेंतील सर्व दोष वारशात घेऊन आली आहे. म्हणून जो सवाल आमच्या समोर उत्पन्न झाला होता तो च आज सर्व दुनियेसमोर आहे. चरखा सांगतो कीं ह्या सर्वांतून मार्ग काढणारें एक शस्त्र जगांत आहे. चरखा कांततां कांततां आमचें हें चिंतन चाललें पाहिजे कीं मोठ्यांतील-मोठ्या शक्तीला तोंड देणारी एक शक्ति आमच्याजवळ आहे व लहानांतील-लहान मूल हि तिच्या जोरावर त्या मोठ्या शक्तीचा प्रतिकार करूं शकेल. आणि ज्याअर्थी आज जगाला हा विचार हवा आहे, त्याअर्थी हिंदुस्थाननें हा प्रयोग न केला तर दुसरा कोणी देश तो करील.

लोक म्हणतात कीं नवीं नवीं शस्त्रें रोज निघत आहेत व आज तर ॲटम बॉंब हि निघाला आहे. मी त्यांना म्हणतों, "तुमचा ॲटम बॉंब असेल, तर माझा 'आतम बॉंब' आहे." पण ॲटम बॉंबसाठीं जितका परिश्रम

पडला नसेल त्याहून अधिक परिश्रम आतम बॉंबसाठीं करावा लागेल. आपल्यांतील एकटा माणूस सुद्धां ह्या अॅटम बॉंबचा मुकाबला करूं शकेल, असें शिक्षण जनतेला दिलें पाहिजे.

ह्या साठीं च गांधींनीं रचनात्मक कार्यक्रम काढला आहे. लोक म्हणतात, क्रांतीशीं रचनात्मक कार्यक्रमाचा काय संबंध? मी म्हणतों, क्रांति म्हणजे नव-रचना च ना? रचनात्मक कार्यक्रम हि नवरचनेचा आहे. आज दुनियेची जी अवस्था आहे ती बदलून तिच्या ठिकाणीं दुसरी रचना आम्हांला करावयाची आहे. ते दुसऱ्यांना गुलाम करून जगूं इच्छितात, आम्ही दुसऱ्यांना आझाद करून जगूं इच्छितों. ते दुसऱ्यांच्या श्रमाचें अन्न खातात, आम्ही आमच्या परिश्रमाचें अन्न खाऊं इच्छितों. असें नसेल तर आम्ही त्याच्यासारखे च एक्सप्लॉयटर्स, लुटून खाणारे, बनूं. मी रोज सुरगांवला जातों. एक दिवस एका गृहस्थाकडे गेलों तों त्याच्या घरीं पिंजऱ्यांत पोपट बद केलेला दिसला. त्याच दिवशीं दिल्लींत जवाहरलालचें राज्य सुरू झालें होतें. मीं त्याला म्हटलें, "दिल्लींत जवाहरलालचें राज्य सुरू झालें आहे तर तुम्ही सुद्धां तुमचें कर्तव्य बजावाल कीं नाहीं?" तो म्हणाला, "सांगा, कोणचे कर्तव्य?" तेव्हा त्या पोपटाला सोडून देण्याची गोष्ट मीं त्याला सांगितली. शेवटीं तो पोपट सोडून देण्यांत आला. ही घटना कमी महत्त्वाची नाहीं. कारण आम्हाला जर स्वातंत्र्य पाहिजे असेल तर दुसऱ्यांना हि आपण तें दिलें पाहिजे. शेंबड्या नाकाला आरशांत स्वच्छ नाक पहायची इच्छा असेल तर तें धुऊन नंतर पाहणें हा च एक रस्ता आहे. दुसरी कोणची हि किमया तें करूं शकणार नाहीं. लोक म्हणतात, हरिजन-चळवळीनें स्वातंत्र्य कसें मिळेल, तिला स्वातंत्र्याची चळवळ कसें म्हणता येईल? मी म्हणतों, तोंडात राम व बगलेंत सुरी अशानें काम चालणार नाहीं. रामनाम घ्यावयाचें असेल तर सुरी टाकली पाहिजे. आम्हांला स्वातंत्र्य पाहिजे असेल तर ज्याना आम्हीं गुलाम बनविलें त्यांना स्वतंत्र करावें लागेल. हरिजन.ना

मानव्याचे अधिकार द्यावे लागतील. ह्याला च विधायक कार्यक्रम म्हणतात. त्या शिवाय आत्मिक शक्ति निर्माण होणार नाहीं. ही च आमच्या प्रतिकार-शक्तीची तयारी आहे.

आणि एवढ्या प्रचंड प्रमाणांत होणारी हिंसेची तयारी पाहून माझी तर अशी खात्री झाली आहे कीं हा हिंसेचा राक्षस मरणार च मरणार. पूर्वी छोटया छोटया लढाया होत असत. संभव आहे, त्या लढायांनीं कांहीं फायदा होत असेल.पण हल्लीं 'टोटल वार' होतें. 'टोटल वार' म्हणजे काय ? तर इथल्या सर्व स्त्रियांचा तिथल्या सगळया स्त्रियांशीं विरोध, इथल्या सगळया पशूंचा तिथल्या तमाम पशूंशीं विरोध, इथल्या सर्व झाडांचा तिथल्या सगळया झाडांशीं विरोध, व इथल्या सर्व पिकांचा तेथील तमाम पिकांशीं विरोध ! आणि आम्ही सर्व मिळून त्यांच्या सर्व वस्तूंचा नाश करावयाचा ! म्हणजे ह्या 'टोटल वॉर' मध्यें सिव्हिल म्हणजे बिनलष्करी अशी वस्तु च शिल्लक राहत नाहीं. सर्व कांहीं लष्करी ! सायन्स–विज्ञान–आता इतकें काहीं वाढलें आहे कीं हिंसेचा राक्षस स्वतः होऊन मरून जाणार आहे व अहिंसा आपोआप वाढत जाणार आहे. म्हणून मोठ्या प्रमाणावर हिंसेची तयारी होते तेव्हां मला भय वाटत नाहीं. कारण, आतां हिंसेच्या जाण्याचा आणि माझ्या प्रवेशाचा काळ आला आहे. दिवा विझण्यापूर्वीं मोठा होतो. म्हणून दुनियेतून कायमची नष्ट होण्यापूर्वींची ही हिंसेची प्रचंड तयारी आहे. आता अहिंसेचा च उदय होणार आहे.

: ३ :

# मजुरांचा सांभाळ

गेल्या आठवड्यांत वर्ध्याला ज्वारी रुपयाला ८ पायल्या आणि डाळ ४ पायल्या विकली. पायली म्हणजे १०० तोळे. सामान्यतः ज्वारीचा भाव १६ पायल्या आणि डाळीचा ८ पायल्या असतो. म्हणजे नेहमींच्या दुप्पट महाग तीं विकलीं गेलीं.

हल्लीं युद्धकाळात लोकाना अडचण जाऊं नये म्हणून सरकारनें भाव-नियंत्रण चालविलें आहे. सरकारी भाव-नियंत्रण चालू असतांना ही दशा आहे. भाव-नियंत्रणाच्या ह्या कामांत सरकारनें जी अव्यवस्था आणि अबुद्धि दर्शविली आहे ती पाहिली म्हणजे आमचें सरकार कसें सर्व प्रकारें नालायक बनलें आहे, याचें दर्शन होतें.

पण ही सरकारची नालायकी शेंवटीं भोंवते आमच्या शेतीवरच्या मजुरांना. आपल्याकडे हल्लीं शेतीवरच्या मजुरांना पुरुषाला ४ आणे आणि बाईला २ आणे मजुरी दिली जाते. पण ज्वारी आणि डाळयांसारख्या अगदीं नित्याच्या गरजेच्या वस्तु दुप्पट महागल्या आणि अवांतर वस्तु तिपटीच्या घरात गेल्या. अशा स्थितींत ह्या मजुरीची वास्तविक किंमत २ आणे आणि १ आणा ह्यापेक्षा हि कमी आहे. मजुरांनीं आतां काय खावें आणि कसें जगावें ?

पण प्राप्त परिस्थितींत लोकांनीं आपली योजक-बुद्धि चालवून मजूर-वर्गाला सांभाळलें पाहिजे. तसें केल्यास आजच्या स्थितींत हि थोडें-फार सांत्वन मिळूं शकेल. शेतकऱ्यांनीं मजुरी पैशांत देणें बंद करून धान्यांत मजुरी ठरवून टाकली तर बाजारच्या हेलकाव्यांतून थोडी-फार मुक्ति लाभेल.

सालदारांना ज्याप्रमाणें कांहीं धान्य ठरावाप्रमाणें दिलें च जातें, त्याप्रमाणें मजुरांचें कां करतां येऊं नये ? सालदारांना दिलें जाणारें धान्य बाजारभावाकडे पाहून दर वर्षी बदलत नाहींत. तें ठरल्याप्रमाणें आमच्याकडे ६ कुडव म्हणजे ४८ पायल्या महिना देऊन टाकतात. ज्वारीचा भाव १६ पायल्या असतांना ह्या ६ कुडवांची किंमत ३ रुपये होते. आतां त्याची किंमत ६ रुपये होईल. पण ह्या किंमतींतला फरक सालदारांबाबत विचारांत येत नाहीं. तसें च मजुरांचें करावें.

सालदारांना, आणि आता माझ्या सूचनेप्रमाणें मजुरांना, धान्य द्यावयाचें तें केवळ ज्वारी देऊन चालणार नाहीं. गरिबांना पुष्कळांना डाळ मिळत च नाहीं. त्याला उपाय ज्वारीबरोबर डाळ हि देणें हा आहे. ६ कुडव ज्वारीबद्दल ५ कुडव ज्वारी आणि अर्धा कुडव डाळ दिली तर बरें होईल.

पण एवढ्यानें हि भागणार नाहीं. थोडा कापूस हि दिला पाहिजे. ह्या कापसातून जो तो आपापला कपडा करून घेईल.

शिवाय मजुराला थोडा अधिक कापूस मिळाला पाहिजे. म्हणजे आपले कपडे करून आणखी हि तो कातूं शकेल. ह्या सुताच्या बदल्यात त्याला लागणाऱ्या वस्तु मिळूं शकतील असें एक गावकरी लोकांनीं चालवलेलें उत्तम सहकारी दुकान पाहिजे.

एका माणसाच्या मजुरींत २॥ जणांचें पोषण व्हावयास पाहिजे, असें अर्थशास्त्र आहे.

म्हणून, एका माणसाची मजुरी = अडीच माणसापुरती ज्वारी
+ अडीच माणसापुरती डाळ
+ अडीच माणसाच्या कपड्यापुरता कापूस
+ अडीच माणसाच्या अवांतर गरजा

विकत घेण्यापुरतें सूत कांतण्याला जरूर तितका कापूस

अशी व्यवस्था झाली, तर मजूरवर्गाचा बचाव होऊं शकेल.

[ ग्राम-सेवा-वृत्त, १५ जून १९४२ ]

: ४ :

# आमच्या धर्महीनतेची खूण काळाबाजार

हिंदुस्थान धर्म-प्रधान देश आहे असें आम्ही म्हणत असतों. आमची ही पुण्य भूमि आहे असा वेळीं अवेळीं आम्ही अभिमान दर्शवीत असतों. बाहेरचे लोक हि आमच्याविषयीं असें च बोलतात. त्यांच्या प्रमाण-पत्रानें तर आम्ही अधिक च फुलून जातों. सुप्रसिद्ध चिनी लेखक लिन युटांग नें म्हटलें आहे कीं "हिंदुस्थान धर्मभावनेनें भारलेला, ईश्वरी मद्यानें झिंगलेला, 'गॉड-इंटॉक्सिकेटेड' देश आहे." या बाबतींत तो चीनचें हिंदुस्थानशीं वैषम्य दर्शवून म्हणतो, "चीन हें हिंदुस्थानचें विरुद्ध टोक आहे, चीन अति व्यावहारिक आहे. हिंदुस्थान अति धार्मिक आहे. दोन्ही राष्ट्रांनीं आपापला अतिरेक कमी करायला हवा आहे."

पण आज आमच्या देशात काय स्थिति आहे? आमच्यांत आज अतिधार्मिकता दिसत आहे, कीं बेताची धार्मिकता, कीं धर्म-हीनता? लाखों लोक उपाशी मेले, तरी आमचा काळा बाजार चालू च होता. आज "आमचीं सरकारें" आलीं आहेत, तरी त्यांत कांहीं म्हणण्यासारखा फरक दिसत नाहीं. परवां एक मजूर म्हणाला, "कंट्रोलचा भाव आहे रुपयास चार पायल्या ज्वारी, बाहेरचे व्यापारी येऊन गुपचुप घेऊन चालले तीन पायल्या ठोक भावानें, आम्हा मजुरांना चिल्लर घ्यावी लागते आहे अडीच पायल्या! आज आमचें स्वराज्य आहे म्हणतात. हें कसलें स्वराज्य?" ज्यांत काळा बाजार चालतो त्यांत स्वराज्य कसें असूं शकेल, अशी त्या अशिक्षित गावढळाची कल्पना. त्यावर आम्ही 'शिक्षित' लोक काय उत्तर देणार?

पण एकदा एका किरकोळ व्यापाऱ्याशीं बोलण्याचा प्रसंग आला. तो म्हणाला, "तुम्ही काळा बाजार, काळा बाजार म्हणतां, पण आमचा हा नेहमींचा च व्यवहार आहे. कमाई करण्याची संधि गमावून बसणारा तो व्यापारी च नाहीं. वस्तु स्वस्तांत-स्वस्त खरीदायची, तिचा भाव अधिकांत-अधिक वाढे पर्यंत ती राखून ठेवायची, आणि प्रत्यक्ष विक्रीच्या वेळीं जमेल तशी ती विकायची, ही आमची नेहमींची रीत च आहे. आजच्या स्थितींत तें लोकांच्या डोळयात अधिक भरतें इतकें च, आणि त्या हि बद्दल एकटा दुकटा व्यापारी कोणी जबाबदार आहे असें नाहीं. एकूण आजची व्यवस्था च त्याला जबाबदार आहे. ती व्यवस्था बदलणें सरकारचें काम आहे. त्याना तें नीटसें करतां येत नाहीं. तशा स्थितींत एकट्या-दुकट्यानें च तुम्ही म्हणता तसला सरळपणा करूं पाहणें हा आमच्या धंद्याच्या भाषे-प्रमाणें 'प्रामाणिकपणा' नसून 'मूर्खपणा' आहे.

हें त्या व्यापाऱ्याचें म्हणणें, त्याच्या दृष्टीनें त्यानें अगदीं शुद्ध बुद्धीनें मांडलें होतें. त्यानें मला विचार-प्रवृत्त केलें. आजचा काळा बजार सोडून नेहमींच्या ढवळया बाजाराचा मी विचार करूं लागलों. हिंदुस्था-नांतल्या कोणत्या हि शहरांतल्या आणि खेडेगावांतल्या ढवळया बाजारात काय चालत असतें? दुकानदार आणि गिऱ्हाईक हे एकमेकांकडे कोणच्या भावनेनें पाहतात? दुकानदारानें वस्तूची किंमत वाजवीपेक्षा अधिक मागायची. गिऱ्हाइकानें ती वाजवीपेक्षा कमी मागायची. थोडा वेळ चातुर्याची लढाई होऊन काहीं तरी भाव ठरायचा. ही च हिंदुस्थानची बाजाराची रीत नव्हे काय? इतरांचें असो, लहान मुलगा बाजारात गेला तर त्याला तरी फसवूं नये, असें दुकानदाराला वाटतें काय? उलट ही च आपली नफ्याची संधि आहे, असें च आमचे दुकानदार समजतात ना? आणि ही पद्धति भाजी विकणाऱ्या खेडवळ बाईपासून तों व्यवसाय-विशारद

व्यापाऱ्यापर्यंत सर्वांची आहे. खेडवळाला ती तितकी साधत नाहीं, नागराला साधते. प्रयत्न दोघाचा हि तो च असतो.

पंचवीस वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एकदा आम्ही नागपूरला विणकरांचे भाग पाहायला गेलों होतों. खादीची चळवळ नुकती च निघाली होती. आणि विणकराना एक प्रकारची प्रतिष्ठा आली होती. जरी ते विणकर विणीत होते मिलचें च सूत, तरी आपला ऊर्जित काळ आता आला आहे अशा आशेंत ते होते. शिंगाच्या बनविलेल्या गुळगुळीत धोटयांनीं ते विणीत होते. आम्हाला धोटे खरीदायचे होते. आम्ही भाव विचारला. त्यानीं पाहिलें, हे उत्साही शिकलेले लोक, देशभक्तीच्या हौसेनें विणकामात पडूं इच्छिणारे, याना धोटयाच्या किमतीची काय कल्पना असणार ? शिंगाचा धोटा दिसायला सुंदर दिसतो. भरपूर किंमत मागायला हरकत नाहीं." त्यानीं त्या धोट्याची किंमत सहा रुपये मागितली. आमच्यापैकीं एक जण थोडा जाणकार होता. त्यानें त्याची किमत आठ आणे देऊं केली. मला अशी अस्पष्ट आठवण आहे कीं तो धोटा काहीं आण्यात च खरीदला गेला.

मागें एकदा पायीं प्रवास करीत असता हलवायाच्या दुकानावर दूध खरीदायला गेलों. सहज म्हटलें, "दुधांत पाणी-बिणी तर घातलें नाहीं ना ?" तो म्हणाला, "हें काय बोलतां ? आज एकादशी आहे ना !" आम्हीं म्हटलें, "दुसऱ्या दिवशीं पाणी असतें तर मग ?" तो म्हणाला, "भाकरीच्या पिठात जसें थोडेंसें मीठ घालतात तसें व्यापारांत थोडें असत्य लागतें च. त्याशिवाय व्यापार व्हायचा च नाहीं." स्वतःला जे प्रामाणिकपणें धार्मिक समजतात त्याचें हि म्हणणें ऐकलें आहे कीं धर्म आणि व्यापार यांचा घोटाळा करतां येत नाहीं. धर्माच्या वेळीं धर्म आणि व्यापाराच्या वेळीं व्यापार. एरव्हीं ते दानधर्म हि करतील, प्रत्यक्ष कोणाचें दुःख समोर आलें तर दया-भाव हि दाखवतील, परंतु व्यवहारांत सत्याचा स्वीकार करण्याची त्याची तयारी नसते.

अशा प्रकारें नेहमींच्या व्यवहारांत असत्याचा उपयोग करण्याचा अभ्यास झालेल्या बुद्धीला काळेबाजाराचा काळेपणा विशेष भासत नाहीं. ज्या राष्ट्राच्या बाजारांत असत्य हें चलनी नाण्याप्रमाणें झालें त्याच्या पतनाला काय सीमा राहिली ? दोनशें वर्षें परक्या सत्तेखालीं राहून हिंदुस्थानचें सतत आर्थिक शोषण झाल्याचा हा परिणाम आहे हें कबूल, तथापि परिणाम कशाचा हि असला तरी त्यानें आमची झालेली नैतिक हानि विसरून थोडें च चालणार आहे ?

सारांश, आज आम्ही अत्यंत धर्म-हीन झालों आहोंत हें स्पष्टपणें लक्षांत घेऊन जी काय उपाय-योजना करायची ती आम्ही दीर्घ-दृष्टीनें केली पाहिजे. केवळ जरब बसविणारे तात्कालिक इलाज करून आमचे कार्य होणारें नाहीं. एकूण समाज-रचना च बदलून साम्याधिष्ठित अर्थ-व्यवस्था घडवून आणायला पाहिजे. इतकें च नव्हे तर धार्मिक कल्पनांचें हि संशोधन व्हायला हवें. केवळ भूतदयेला न आळविता सत्याची प्रतिष्ठा सिद्ध व्हायला हवी. आज व्यापार-व्यवहारात च नव्हे, तर साहित्याच्या, देश-सेवेच्या, आणि धर्माच्या क्षेत्रांत हि असत्य उजळ माथ्यानें वावरत आहे. तेथून त्याची हकालपट्टी झाली पाहिजे. एरव्हीं इतक्या सर्व क्षेत्रांत असत्याचा सर्रास उपयोग केला जात असतांना दंडाचें भय अथवा भूतदयेचा अनुनय याच्या जोरावर आमच्या राष्ट्रावर आलेली ही महान् आपत्ति टळण्यासारखी नाहीं. सर्व विचारकांनीं, समाज-सेवकांनीं, आणि धर्म-साधकांनीं, शिक्षण-वेत्त्यांनीं, कार्यकर्त्यांनीं, आणि व्यवस्थापकांनीं एकवटून हें काम करावयास हवें आहे.

[ मराठी हरिजन, १५ डिसेंबर १९४६ ]

: ५ :

# जन-स्थानची चिंता

घटना-समितींत दाखल व्हायचें कीं नाहीं, आता दाखल व्हायचें कीं उशिरा दाखल व्हायचें, ह्याविषयीं राजे-मंडळींत मतभेद झाला. मतभेद झाला ह्यांत नवल कांहीं च नाहीं. मतभेद नसता झाला तर च तें नवल होतें. काहीं राजांना राजकुमार-कॉलेजांत शिकवून ठेवलेल्या हिंदुस्थानच्या जुन्या इतिहासाची आता आठवण झाली आहे. त्यांना अशी आशा लागली आहे कीं इंग्रज निघून गेल्यानंतर आपण पुन्हां मागच्यासारखे वैभवशाली होऊं. "मागच्यासारखे वैभवशाली" म्हणजे आजच्या भाषेंत कपाळकरंटे, हें ज्यांना उमगतें ते म्हणतात, "शहाणे असूं तर घटना-समितींत आज च दाखल होऊं. घटनेला आकार देण्याचा आपला आजचा अधिकार गमावून, पुढें होणाऱ्या घबाड लाभाची आशा करण्यात सार नाहीं. आळसानें आणि आशाळभूतपणानें कुंपणावर बसून राहूं, तर सारें च शेत पाखरें खाणार आहेत."

परवा निजाम कडून उमरावतीच्या कॉलेजला देणगी मिळाली आहे. सर मिरझा, निजामचे दिवाण, म्हणाले, "वऱ्हाडच्या जनतेची निजामला काळजी वाटते. ती काळजी च ह्या देणगींत उतरली आहे. वऱ्हाडच्या आणि हैदराबादच्या जनतेचीं हितें समान आहेत." निजाम वऱ्हाडवर आपल्या काळजीची नजर टाकतो हें पाहून भोसले सरसावून म्हणतात, "वऱ्हाड मूळ आमचा आहे. वऱ्हाडची काळजी करण्यास आम्ही तयार आहोंत." जनता म्हणते, "बाबांनो, तुम्ही कुणी च आमच्यासाठीं तकलीफ घेऊं नका. आमची काळजी आम्ही च पाहून घेऊं."

तिरुविदांकूर (त्रावणकोर)चें टीचभर संस्थान, पण सर सी. पी. म्हणतात, "आम्ही निजाधीन राहणार आहोंत. आम्ही साऱ्या जगाशीं संबंध जोडूं, तसा हिंदुस्थानशीं हि जोडूं. आमचें संस्थान इंग्रजानीं कधीं च जिंकलेलें नाहीं. आम्हीं आपखुषीनें इंग्रजाशीं तह केला होता. ह्यापुढे हि आमचें आम्ही काय तें ठरवूं." तुम्ही कोण? राजे कीं जनता? ते म्हणतात, "अठरा वर्षांच्या खालचे बालक सोडून आम्हीं आमच्या राज्यात सगळ्या प्रौढ लोकांना मताधिकार दिला आहे." होय ना? मग ते प्रौढ लोक च ठरवतील, हिंदुस्थानात रहायचें कीं अलग व्हायचें. "नाही. तें तेवढे आम्ही च ठरवणार." ह्यांना एवढें कळत नाहीं, कीं ह्याना पुसणार आहे कोण? पण ह्यांच्या डोळ्यावर आहे पडदा जुन्या इतिहासाचा.

जी दशा संस्थानिकांची ती च पाकिस्तानवाल्याची. पाकिस्तानच्या जुलमाला कंटाळलेले हिंदु बंगालच्या विभागणीची मागणी करतात. त्यावर सुरावर्दी म्हणतात, "बंगाल दुभंगण्याची ही योजना कोणाच्या च लाभाची नाहीं. मी तर अभंग बंगाल आणि बृहत्-तर बंगाल वर निष्ठा राखतों." हिंदुस्थानचे तुकडे करणें ह्यांना लाभाचें वाटतें. पण त्या च विचारांतून बंगालचे तुकडे झाले तर ते रुचत नाहींत. आणि बृहत्तर बंगाल म्हणजे काय? आसाम आदि आसपासचा मुलूख गिळू पाहणारा बंगाल म्हणजे बृहत्तर बंगाल. जपानचें साम्राज्य धुळीस मिळालें. इंग्रजाचें हि लयास जात चाललें. पण ह्याना मोगल साम्राज्य आठवतें च आहे!

संस्थानिक काय आणि पाकिस्तानवाले काय, 'भूता' नें झपाटलेले आहेत. हिंदुसभावाल्याची हि ती च दशा आहे. आजच्या घटकेला जनता किती दुःखात आहे, तिचें दुःख-निवारण लवकरात लवकर कसें करता येईल, ही चिंता च नाहीं.

ह्याला उपाय जनता जागृत होणें हा च आहे. कुठें हि जनतेला जबाबदार सरकार रहायचें, तर जनता सवालदार असली पाहिजे. त्यासाठीं

खेडोपाडीं सेवक पसरले पाहिजेत आणि जनतेची सेवा करून आपल्या ताकतीची जाणीव तिला करून दिली पाहिजे. जनता सवालदार झाली कीं सरकारला जबाबदार बनणें भाग च आहे.

पण ह्या कामीं एक मोठी अडचण आज ही आहे कीं आमच्या कार्य-कर्त्यांत विचार-भेद माजले आहेत. त्याची शक्ति एकमेकांना तोडून पाडण्यांत खर्च होऊन राहिली आहे. एवढ्या मोठ्या देशात विचारभेद राहणार च. पण विचारात भेद असतो, तसा समानतेचा हि अंश असतो. जनसेवेची तळमळ असणाऱ्यानीं ह्या समान अंशावर जोर देऊन कामाला लागलें पाहिजे. कांहीं विचार-भेद शाब्दिक किंवा तात्त्विक असतात. काम करूं लागलें म्हणजे ते आपोआप मावळतात किंवा विरळतात. भूत-काळांत वावरण्याची जशी एक संवय असते, तशी दूरच्या भविष्य काळांत काय घडवून आणायचें आहे त्या विषयीं वाद घालण्याची हि एक वृत्ति असते. ती हि अंकुशांत राखली पाहिजे.

अशा रीतीनें भूत आणि भविष्य वगळून चालू काळात जर आपण सरळ सेवेला लागलों तर पाकि-स्थान, द्रविड-स्थान, राज-स्थान किंवा आणखी कोणचें हि स्थान विचारात घेण्याची कांहीं जरूर राहणार नाहीं. सगळीं स्थानें जन-स्थानात लीन होतील.

[ मराठी हरिजन, २०-४-१९४७ ]

: ६ :

# गो-सेवेची दृष्टि*

माझ्या प्रिय मित्रांनो,

तुम्हांला माहीत च आहे कीं आम्ही दीर्घ काळ जेलमध्यें राहून आलों आहोंत. ह्याचा अर्थ हा कीं आम्हांला अभ्यास वगैरे करण्यास बरा च वेळ मिळाला आहे. तेथें बऱ्या च विषयाचा अभ्यास होत असे. त्यांमध्यें हिंदुस्थानच्या अर्थशास्त्राचा हि अभ्यास झाला. हिंदुस्थानांतील प्रश्नाच्या प्रत्येक अंगावर विचार होत असे. त्यात गोसेवेबाबत वाचन व विचार होणें स्वाभाविक च होतें. त्या वेळीं एके ठिकाणीं असें वाचण्यात आलें कीं हिंदुस्थानांत माणशीं दुधाच्या खपाची सरासरी सात औंसा पर्यंत होती ती ३-४ वर्षांच्या युद्धानंतर सरासरी ५ औंसापर्यंत आली आहे. त्या पुस्तकांत हिंदुस्थानच्या प्रत्येक प्रांताची वेगवेगळी सरासरी दिलेली होती. मध्यप्रांताच्या एका विभागांत माणशीं एक औंस म्हणजे २॥ तोळे दुधाची सरासरी दिलेली होती. आम्ही लोक मध्यप्रांतांत राहतों. खेड्याची सेवा करतों व आम्हांला खेड्यांची पूर्ण स्थिति माहीत आहे असा आमचा दावा असतो. तरी हि १ औंसाची सरासरी वाचून माझा विश्वास च बसला नाहीं. पण अधिक चौकशी करतां असें आढळून आलें कीं तो प्रसिद्ध केलेला आकडा बरोबर होता व सरकारी रिपोर्टा वरून च घेण्यांत आला होता. जेल मधून सुटून आल्यावर विचार केला कीं आपल्या आसपास काय स्थिति आहे

* गो-सेवा-संघाच्या तृतीय अधिवेशनांत दिलेलें भाषण ता. १२-२-१९४६

ती प्रत्यक्ष पहावी. आम्ही सुरगावचे आंकडे गोळा केले. तेथील आंकडे गोळा करणें आवश्यक व सोपें होतें. कारण त्या गांवांत आम्ही काम करीत होतों. आकडे हिवाळयाच्या दिवसांतील गोळा केले. ह्या दिवसांत दूध अधिक प्रमाणांत होतें. उन्हाळयांत त्याच्या निम्यानें सुद्धा दूध राहत नाहीं. सरासरी ही तर वर्षभराची असते. हिवाळयांत त्या गावात दुधाचें उत्पादन माणशीं ४ औंस होतें. ह्या दिवसात जर माणशीं ४ औंस सरासरी येत असेल तर वर्षभराची सरासरी तीन औंस समजण्यास हरकत नाहीं. तरी हि सरकारच्या सरासरी १ औंसा पेक्षा ही सरासरी अधिक च झाली. मी आपल्या मनाशीं विचार करूं लागलों कीं ह्या च गांवाला हें भाग्य कसें लाभलें कीं सरासरी १ औंस दुधापेक्षा येथील लोकांना २ औंस दूध अधिक मिळतें ? विचार करतां माझ्या ध्यानात आलें, ह्या गावाला नदी असल्यामुळें येथें चारा-पाण्याची सोय आहे व त्यामुळें ह्या गावचा इतका उत्कर्ष झाला आहे कीं माणशीं ३ औंस दूध मिळतें. आतां तुम्ही च विचार करा कीं ज्या देशात दुधाची मोजणी औंसानीं केली जाते त्याची काय स्थिति असेल. लढाईच्या दिवसांत इंग्लंडला हि खाद्य पदार्थांची चण-चण भासत होती. तेथील अन्न-मंत्र्यानीं आपल्या जनतेला नाइलाजानें विनंती केली कीं 'आम्ही अधिक अन्नें मिळवण्याच्या खटपटींत आहोंत, पण हे लढाईचे दिवस असल्यानें पहिल्याइतकें प्रमाण देणें कठिण आहे, त्यामुळें कमींत च काम भागवलें पाहिजे. आम्ही आतांपर्यंत माणशीं ३ रत्तल दूध देत होतों, पण आता २॥ रतलांत च भागवावें लागेल. युद्धाच्या दिवसात इंग्लंडला २॥ रत्तल दुधावर भागवावें लागतें व हिंदुस्थानचें तर नेहमीं च पाच औंस दुधानें पोट भरतें. ही स्थिति त्या देशाची आहे, जेथें गाईला माता म्हणतात !

ह्यावरून कोणाच्या हि हें ध्यानात येईल कीं अशा स्थितींत आमच्या बाबतींत गो-सेवा किती महत्त्वाची आहे. माझ्यासारखे खादी-निष्ठ हि विशेष

परिस्थितींत अशा प्रकारच्या समाज-रचनेची कल्पना करूं शकतात, जीं सर्व शेतकऱ्याना दुसऱ्या कामात लावून आणि गिरण्याचें राष्ट्रीयीकरण करून कपड्याची गरज भागवता येईल. पण दुधाशिवाय चालवूं शकूं अशा स्थितीची आम्ही कल्पना हि करूं शकत नाही. म्हणून एका दृष्टीनें हिंदुस्थानला खादीपेक्षा दुधाचें महत्त्व अधिक आहे असें म्हणता येईल.

दुधाचा प्रश्न किती महत्त्वाचा आहे हें समजून घेतल्यावर आणखी एक गोष्ट समजून घेणें जरूर आहे. ती म्हणजे गो-सेवेची दृष्टि पहिल्यानें दृष्टि नीट समजून घेऊन काम केलें तर काम व्यवस्थित होईल, नाहीं तर सर्व काम अव्यवस्थित होईल. अव्यवस्थित कामात गति जास्त असली तरी त्यात धोका आहे. म्हणून आज मला गो-सेवेचें काम आम्हीं कोणत्या दृष्टीनें करावें एवढें च सांगावयाचें आहे. हा च माझ्या व्याख्यानाचा मुख्य विषय आहे. दृष्टि नीट समजून घेतल्यावर प्रत्यक्ष कामात ज्या अडचणी येतील त्याचा विचार तज्ञ लोक करतील आणि ते जे मार्ग सुचवतील त्याचा अंमल करण्याचा प्रयत्न गो-सेवा-संघा-सारख्या संस्था करतील.

गो-सेवेच्या कामात दोन दृष्टि असूं शकतात : पहिली दृष्टि हिंदूंच्या डोक्यांत, हृदयांत, वा रक्तात च आहे. ती दृष्टि म्हणजे गाईविषयीं पूज्य-बुद्धि. परंतु ह्या पूज्य-बुद्धीमुळें देशानें किती मजल मारली हें आपण पाहिलें आहे. गाईची करुणा-जनक स्थिति व आबाळ जितकी ह्या देशात आहे तितकी क्वचित च दुसऱ्या देशात असेल. पूज्य-बुद्धीच्या अभावामुळें असें होतें असें आपण म्हणूं शकत नाहीं. मग असें का होतें? मग ह्याचें कारण काय? ह्याचें कारण हें च कीं ती पूज्य-बुद्धि शास्त्रीय नाही. शास्त्र-रहित श्रद्धेनें काम होत नाहीं. भगवंतानीं आम्हाला गीतेंत सांगितलें आहे कीं श्रद्धा असणे ही च काहीं विशेष गोष्ट नाहीं. श्रद्धा तर कोणत्या-ना-कोणत्या प्रकारची प्रत्येकात असते च. पण सात्त्विक व शास्त्रीय

श्रद्धा ही च तारक आहे. ज्ञानरहित म्हणजे अशास्त्रीय श्रद्धेनें प्रगति होणार नाहीं. एका अस्पृश्याला शिवल्यामुळें जो विटाळ होतो तो गाईला शिवल्यानें नाहीसा होतो असे आम्हांला लहानपणीं शिकवलें होतें. जी जड बुद्धि एका मानवाला अपवित्र मानण्यास शिकवते ती च एका पशूला मानवापेक्षा हि पवित्र मानण्यास सांगते.

गाईंत सर्व देवतांचा वास आहे व इतर प्राण्यात देवतांचा अभाव आहे ही गोष्ट आजच्या काळीं मान्य होण्यासारखी नाहीं. अशा प्रकारची अतिरेकी मूर्ति-पूजा तर एक मूढ भाव च मानला जाईल.

दुसरी दृष्टि वैज्ञानिक रीतीने काम करण्याची होय. आमची गो-सेवा आर्थिक कसोटीवर पारखली पाहिजे. ह्या कसोटीवर जी गोष्ट उतरणार नाहीं ती जगाच्या व्यवहारात टिकणार नाहीं. म्हणून जर आर्थिक कसोटी-वर गो सेवा उतरत नसेल तर ती गोष्ट जुनी म्हणून तिला च चिकटून राहण्यापेक्षा ती सोडलेली च बरी. गाय मनुष्य-समाजाला उपयोगी आहे व आर्थिक दृष्टीनें चालण्यासारखी आहे असें आम्हीं सिद्ध केलें तर च गो-सेवा टिकूं शकते. ही च वैज्ञानिक दृष्टि आहे.

ह्या दोन्ही दृष्टींत नेहमीं भांडण असतें. भांडण ह्याकरिता कीं एका बाजूला मूढ भाव आहे तर दुसरीकडे केवळ आर्थिक दृष्टि आहे. केवळ आर्थिक दृष्टि असेल तर गाय जोंपर्यंत दूध देते तोंपर्यंत तिला पाळावें आणि जेव्हां ती दूध देणें बंद करील तेव्हां तिला मारून खाऊन टाकावें हें च आर्थिक दृष्टीने लाभदायी, असें सिद्ध होईल. चामड्याच्या दृष्टीनें हि अशा मारलेल्या गाईचें चामडें अधिक उपयुक्त ठरेल. गाईची उपयुक्तता संपली म्हणजे तिचें जिवन हि संपावें हा त्या केवळ आर्थिक दृष्टीचा परिणाम होय. मग गाईचें जीवन आपोआप संपत नसेल तर आम्हांला तें संपवलें पाहिजे. आणि ही च गोष्ट पाश्चात्त्य लोक करीत असतात. जोंपर्यंत गाय दूध देते तोपर्यंत

प्रेमानें तिला पाळतात, खायला घालतात, व तिच्यापासून दयाबुद्धीनें काम घेतात. आणि ती दूध देणें बंद करतां च तिला मारून टाकतात. ह्यांत हि ते आमचा दयाभाव आहे असें म्हणूं शकतात. इथपर्यंत त्यांची विचार-धारा आहे. ही केवळ आर्थिक दृष्टि झाली.

आता आम्हीं काय करायला पाहिजे ? वैज्ञानिक दृष्टीशिवाय हि आमच्या जवळ आणखी एक दृष्टि आहे. ती नीट समजून घेतली पाहिजे. ती आमच्या भारतीय समाजवादाची दृष्टि होय. गाईला आम्ही आमच्या कुटुंबांत स्थान दिलें आहे. तसें तें तिला देण्यापूर्वीं तिच्या उपयुक्ततेचा हि विचार केलेला आहे. समाजवाद सर्व मनुष्य-समाजाची काळजी वाहतो. समाजवादाचें असें म्हणणें आहे कीं प्रत्येकाला योग्य काम देऊन त्याच्या-कडून पूर्ण काम घेण्यात यावें व प्रत्येकाला पूर्ण रक्षण मिळावें. भारतीय समाजवाद म्हणतो कीं मनुष्य-समाजाबरोबर व गाईला हि आपल्या कुटुंबा-तील माना. म्हणजे च तिच्याकडून पूर्ण काम घ्या आणि तिला पूर्ण रक्षण द्या. आपण ज्याच्याकडून पूर्ण काम घेऊन ज्याला पूर्ण रक्षण देऊं शकतो असें जनावर हिंदुस्थानात फक्त गाय च आहे, आणि म्हणून मनुष्या-बरोबर च गाईला हि भारतीय समाजवादानें स्थान दिलें व तिला आपल्या समाजाचा एक भाग मानण्याचें निश्चित केलें. पण असें मानणारानीं एक मोठी जबाबदारी आपल्या डोक्यावर घेतली आहे. ती जबाबदारी काय आहे, ह्याचा हि विचार केला पाहिजे.

काल एका गृहस्थानीं सांगितलें कीं जर आम्ही गाई-बैलाचें रक्षण करणार नाहीं तर हिंदुस्थानात ट्रॅक्टर येतील. आणि तें येणें हितावह होणार नाहीं. त्यांनीं जे सांगितलें तें योग्य च आहे. पण मी विचारतों कीं आपण ट्रॅक्टर्सचा विरोध कां करीत आहों ? काय, जमिनीचे लहान लहान तुकडे असल्यानें आमच्याकडे ट्रॅक्टर चालणार नाहींत ? जर हें च कारण असेल तर आमच्यांत एवढी हि बुद्धि आणि पुरुषार्थ नाहीं काय कीं आम्ही

वेगवेगळ्या तुकड्यांना एकत्र करूं शकूं ? सर्व तुकडे नाहींसे होऊन सगळी शेतजमीन एक व्हावी हें जर आम्हांला इष्ट वाटत असेल तर त्याचा रस्ता हि सांपडूं शकेल. इंग्रजींत म्हण आहे ना, "इच्छा असली म्हणजे मार्ग हि सांपडतो च." ह्याबाबत अशी कोणती हि खास अडचण नाहीं जी आम्हाला दूर करतां येणार नाहीं. ग्रामीण लोक जर अशिक्षित असतील तर त्यांना शिक्षित करतां येईल. ही गोष्ट त्यांना लवकर ग्रहण झाली नाहीं तर कांहीं कालांतरानें होईल. "जमीनीचे लहान लहान तुकडे आहेत' म्हणून ट्रॅक्टर चालूं शकत नाहींत, ट्रॅक्टर चालूं शकत नाहींत म्हणून बैल पाहिजेत, आणि गोरक्षण केलें नाहीं तर बैल मिळणार नाहींत, म्हणून गो-रक्षण करा," हा युक्तिवाद निःसार आहे. विचाराच्या समोर तो टिकूं शकणार नाहीं.

आमचें म्हणणे ह्याच्या उलट असलें पाहिजे. आपला युक्तिवाद असा असला पाहिजे की "भारतीय समाजवादानें गाईला आपल्या कुटुंबात स्थान दिलें आहे, आणि गाईचा पूर्ण उपयोग केल्याशिवाय आम्ही तिला रक्षण देऊं शकत नाहीं, आणि ट्रॅक्टर आल्यास आम्ही बैलांना पूर्ण काम देऊं शकणार नाहीं, म्हणून गो-रक्षण करा" हा युक्तिवाद बरोबर आहे. आमच्या देशांत जमीनीचे लहान लहान तुकडे आहेत म्हणून ट्रॅक्टर चालूं शकत नाहींत हे म्हणणें दुर्बलतेचें आहे. ह्या युक्तिवादानें कदाचित् कांहीं दिवस ट्रॅक्टर येणें लांबणीवर पडेल, पण आमची दुर्बलता नाहींशी होतां च—आणि ही दुर्बलता नाहींशी झाली च पाहिजे—ट्रॅक्टर येतील. मी तर म्हणतों कीं खेड्यांतील जमीनीचे तुकडे एकत्र करून मग ती बैलांच्या कडून च नांगरली गेली पाहिजे. ट्रॅक्टरच्या भीतीनें जमीनीचे तुकडे वेगळे ठेवूं नयेत किंवा ट्रॅक्टरच्या लोभानें ते एकत्र करूं नयेत. खेड्याच्या हिताच्या दृष्टीनें च खेड्यांतील शेती एक व्हावी असें मी म्हणतों. आज आमच्या येथें प्रत्येक शेतांत एक एक मनुष्य जागतो. ह्याला आमच्याकडे 'जागल्या' म्हणतात. एका शेतकऱ्याला विचारलें कीं तूं का

जागतोस, तर तो म्हणतो कीं शेजाऱ्याचे बैल माझ्या शेतात येतील म्हणून. आणि दुसऱ्याला विचारलें कीं तूं का जागतोस, तर म्हणेल पहिल्याचे बैल माझे शेत खातील म्हणून. आणि अशा प्रकारें सर्व गांवचे लोक ४ महिने जागत राहतात. पण जर गावची सर्व जमीन एकत्र केली तर ह्या सर्व कटकटी च मिटतील. आज एका बैल-जोडीला २० एकर जमीन वहायला पाहिजे. परंतु पुष्कळाजवळ तर ४-५ एकर च जमीन आहे. त्यामुळें ते एका बैलाला हि पूर्ण काम देऊं शकत नाहींत. त्याना जर अर्धा बैल ठेवतां आला असता तर त्याचें काम भागलें असतें. पण ज्याच्या जवळ २॥ एकर जमीन असेल त्याची अडचण कायम च राहणार. पण गावची सर्व शेती एक केली तर ह्या सगळ्या अडचणी दूर होतील.

म्हणून ट्रॅक्टर येतील ह्या भीतीनें नव्हे, तर भारतीय समाजवादाच्या दृष्टीनें गो-सेवेचा विचार झाला पाहिजे. ज्या समाजवादानें गाईला कुटुंबात दाखल केलें त्यानें पाप केलें असें वाटत असेल तर मग बैलाना मोडून ट्रॅक्टर च आणले पाहिजेत आणि गाय दूध देणे बंद करील तेव्हा तिला खाललें पाहिजे. जितके सांड गोवंश-वृद्धिसाठीं हवे असतील तितके ठेवून बाकीचे बैल मारले पाहिजेत जर रूढीमुळें कोणी गाय खात नसेल तर तो भ्रम समजला पाहिजे. आणि हिंदु लोक जर ह्या अनादि काला-पासून चालत आलेल्या भ्रांत रूढीला सोडूं शकत नसतील तर गाय दुसऱ्याच्या हवालीं करावी. ते खातील. त्याना पाप लागेल व पुण्य हयाच्या कडे च राहील. आणि हें च आज होत हि आहे. आम्ही च आपल्या गाई खाटकाना विकतों. ते जर गाईला कापंत असतील तर आमची हिंदु-बुद्धि म्हणते कीं आम्हाला त्या पापाचा स्पर्श होत नाहीं. मीं एकाला विचारलें, "तूं आपली गाय खाटकाला विकलीस त्यात तूं पाप नाहीं केलेंस ?" 'पाप कसें' —तो म्हणाला. मीं म्हटलें, "तूं जी गाय विकली आहेस ती तर तो कापील, त्याचें पाप तुझ्या माथीं नाहीं येणार ?" तो म्हणाला, "मीं गाय

फुकट थोडी च दिली! फुकट दिली असती तर पाप लागलें असतें. मीं तर ती विकली आहे. विकलेल्या वस्तूचें काय होतें हें पाहण्याची जबाबदारी विकणारावर नसते.'' ह्या युक्तिवादामुळे चित्तावर आघात हि होत नाहीं.

शेती एकत्र न करण्यामागें काय कारण आहे, ह्याचा विचार करा. केवळ नाइलाज आहे हें कीं तें योग्य नाहीं? जर नाइलाज च कारण असेल तर तें थोड्या च दिवसाचें राहील. ती परिस्थिति बदलता च शेती एक झाल्याशिवाय राहणार नाहीं. जर शेती एकत्र करणें योग्य नसेल तर का नाहीं, ह्याचें कारण दिलें पाहिजे. पण कोणी कारण सागूं शकत नाहीं; कारण तसें कांहीं कारण च नाहीं मुळीं. आणि म्हणून शेती एकत्र होणार च आहे असें मानलें पाहिजे. कमींत-कमी माझ्या सारखीं माणसें तर हें च म्हणत राहतील कीं शेती एक करा. मी तर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात ग्रामीण समाजवादाला मानणारा आहें व त्या च दिशेनें प्रयत्न करीत आहें. पवनार मध्यें विणकर वेगवेगळे विणत असत व वेगवेगळी रोजी मिळवीत असत. मीं त्याना सागितलें कीं सर्व एकत्र च विणा व मजूरी हि एकसारखी वाटून घ्या. आणि आता ते तसें च करतात. शेतींत हि मला हे च करायचें आहे.

ह्या भारतीय समाजवादाचा नव्यानें विचार करावयाचा असेल तर करा. मग सर्व च जनावराना समान मानून गाईला हि खाण्याची तयारी केली पाहिजे. पण वरील समाजव्यवस्था मानायची असेल तर कुटुंबात गाईला हि समाविष्ट केलें आहे, असें मानलें पाहिजे. आणि असें मानल्या-मुळें एका वेगळ्या च प्रकारच्या समाज-रचनेची जबाबदारी आम्हीं आप-ल्यावर घेतली आहे असें समजलें पाहिजे. बैल खायचे ठरवाल तेव्हां च पाश्चात्त्यांप्रमाणें समाज-रचना करूं शकाल. जर बैल खायचे नसतील तर बैलांकडून च शेती करावी लागेल आणि त्याच आधारावर समाज-रचना करावी लागेल हें निश्चित आहे. आता कोणती समाज-रचना घ्याव-याची ह्याचा विचार करा. ही गोष्ट सोपी नाहीं, हें मला कबूल आहे. मी

फक्त कोणत्या दृष्टीनें गो-सेवेच्या प्रश्नाचा विचार केला पाहिजे ती दृष्टि तुमच्यासमोर ठेवली. हा सामान्य दयेचा प्रश्न नाहीं, तर व्यापक प्रश्न आहे.

ज्यानीं गाईनें दूध देणें बंद केल्यावर हि म्हातारपणीं तिला पाळण्याची जबाबदारी घेतली त्यानीं एक मोठी जबाबदारी घेतली आहे. हा एक विशाल ध्येयवाद आहे. वास्तवतेला सोडून तो नाहीं. पण तो एक ध्येयवाद च आहे. हा ध्येयवाद चालवायचा असेल तर आजच्यासारखें शिथिल जीवन चालणार नाहीं. आम्हाला गाईचें च दूध घेण्याचा निश्चय केला पाहिजे. मी तर असें म्हणेन कीं खादीचें कापड न वापरतां मिलचा कपडा वापरणें ह्यात इतका दोष नाहीं जितका गाईच्या दुधाची उपेक्षा करण्यात आहे. आम्ही जर पशुमात्राचें च दूध सोडणार असलों तर मात्र गोष्ट निराळी. ती तर पुढची गोष्ट आहे. पण त्याला आजचा काळ योग्य नाहीं. आज तर आम्हांला दूध प्यायचें च आहे. आणि जर दूध प्यायचें च असेल तर अशा च प्राण्याचें प्यावें कीं ज्याचा आम्ही पूर्ण उपयोग घेऊं शकतों आणि ज्याचें पूर्ण रक्षण करूं शकतों.

समाज-सेवकाना आणखी एक गोष्ट सांगावयाची आहे. जर एखाद्या कामात प्रगति करायची असेल किंवा काहीं शोध लावायचे असतील तर तें काम आपण स्वतः केलें पाहिजे. गो-सेवेचें काम करायचें असेल तर तिचें दूध काढणें, मळमूत्र साफ करणें, तिला खायला देणें आदि गोष्टी आपण स्वतः केल्या पाहिजेत. जोंपर्यंत आम्ही स्वतः कोणतें हि काम करीत नाहीं तोंपर्यंत आम्हांला त्यात काहीं सुचत च नाहीं. हें मी खादीकामाच्या माझ्या अनुभवावरून सांगतों. जेव्हां मी खादीकामाच्या क्रिया स्वतः करतों तेव्हा च मला त्यात कांहीं शोध सुचतात. जी खादीची ती च गो-सेवेची गोष्ट आहे.

पण मी हें शरीर-परिश्रमात्मक काम स्वतः करण्यासंबंधीं सांगत आहें त्यात दुसरा हि एक लोभ मला आहे. हिंदुस्थानांत क्रांति व्हावी

हा च तो लोभ होय. क्रांति तेव्हां च होईल जेव्हां आम्ही सुशिक्षित शहरी लोक खेड्यांतील लोकांशीं एकरूप होऊं. असें म्हणतात कीं रोमेंलला भेटण्याकरितां एक पत्रकार गेला. पुष्कळ शोध करून हि तो दिसला नाहीं. आणि सरते शेवटीं एका टँकची दुरुस्ती करतांना तो दिसला. हिंदुस्थानमध्यें तेव्हां च क्रांति होईल जेव्हां हिंदुस्थानांतील पुढारी दूध काढतांना, नांगर चालवतांना व सुतारकाम करतांना असे च दिसतील. कृष्णाचें मोठेपण आज पांच हजार वर्षांनंतर हि हिंदुस्थानचे लोक गात आहेत. कृष्णाची विशेषता काय होती? त्याची विशेषता ही च होती कीं तो पूर्ण ज्ञानी असून सुद्धां गोपालांबरोबर गोपाल बनून काम करीत असे. आमचे शिक्षित लोक अशिक्षितांपासून वेगळे राहतील तोंपर्यंत क्रांतीची आशा करतां येत नाहीं. इंग्रजांनीं हिंदुस्थानचें सर्वांत मोठें नुकसान हें च केलें कीं अशिक्षितांपासून शिक्षित लोक वेगळे पाडले. इंग्रजी शिक्षणामुळें दोघांच्या मध्यें जणूं एक भिंत उभी झाली. म्हणून मी तरुणांना हें च सांगतों कीं तुम्हांला क्रांति हवी असेल तर तुम्हीं मजूर बनलें पाहिजे.

आणखी एक सूचना आहे. "पूर्णमदः पूर्णमिदं", हें हि पूर्ण आहे तें हि पूर्ण आहे, हें आदर्श रचनेचें सूत्र आहे. जें काम करायचें असेल तें पूर्ण दृष्टीनें करा. खादी वापरणारे गाईच्या दुधाची पर्वा करीत नाहींत, गो-सेवक खादी वापरीत नाहींत, आणि दोघे हि ग्रामोद्योगाच्या वस्तु वापरीत नाहींत. असें कां? तर म्हणतात, महाग पडते! गाईच्या दूधवाल्याला ग्रामोद्योगाची ढेप महाग पडते, ग्रामोद्योगवाल्याला गाईचें दूध महाग पडतें, आणि दोघांना खादी महाग पडते. तात्पर्य आम्ही एकमेकांचें मित्र एकमेकांना महाग पडतों. म्हणून च कदाचित् इंग्रजींत "डियर फ्रेंड" म्हणत असावेत. पण ज्यांना मित्र महाग पडतात त्यांना शत्रु स्वस्त होतात! असें चालणार नाहीं. जरी आम्ही प्रत्येक जण सर्व कामें करूं शकणार नाहीं

च प्रत्येक आपआपल्या च हिश्शाचें काम करील, तरी जे समाज-सेवक आहेत त्या सर्वांनीं जेथें जेथें दुसऱ्याच्या उद्योगाशीं संबंध येतो तेथें तेथें एकमेकांशीं सहकार्य करावें. काम तर आपल्या वांट्याचें च करावें पण वृत्ति समग्र ठेवावी. असें केलें तर च प्रत्येक विभाग जिवंत राहील. अन्यथा स्वतंत्रपणें ग्रामोद्योग, खादी किंवा गो-सेवा कांहीं च जिवंत राहणार नाहीं. मनुष्य केव्हां जिवंत राहतो ? जेव्हां प्राण आणि मन एकमेकांना साथ देतात तेव्हां. ही च गोष्ट आमच्या प्रत्येक कामास लागू आहे.

[ खादी-जगत्, मार्च १९४६ ]

: ७ :

# स्वराज्याच्या स्वागताची तयारी

जेलमधून सुटलों तेव्हांपासून जो भेटला त्याला एक गोष्ट सतत सांगत आलों आहें. आमच्या समाजांतून अस्पृश्यता अजीबात काढून टाकण्याची ही वेळ आहे. हिंदु धर्मानें यापुढें अस्पृश्यता सहन करतां च कामा नये.

विचाराचा प्रचार केवळ उच्चारानें होत नसतो; पण माझा उच्चार जपाच्या स्वरूपाचा होता. अस्पृश्यता-निवारणासाठीं जरूर तो आचार गेलीं तीस वर्षें करीत च आलों आहें. पण आज तेवढ्यानें मनाचें समाधान होणारें नव्हतें. शेवटीं रोजच्या कार्यक्रमांत सूत्र-यज्ञाला स्थान दिलें आहे त्याप्रमाणें भंगीकामाला नित्य-यज्ञाचें स्थान देऊन मानसिक शांति मिळविली.

या लेखांत त्यासंबंधीं गोष्ट सांगण्याचा इरादा नाहीं, जरी ती कहाणी उद्बोधक आहे. पण तिचा इथें उल्लेख करण्याचा उद्देश दरेकानें आपापलें कर्तव्य आपापल्या शक्तीप्रमाणें केल्याशिवाय आज चालावयाचें नाहीं हें सुचविण्याचा आहे.

आज या प्रश्नाचें जितकें अगत्य आहे, तितकें कदाचित् दुसऱ्या कशाचें च नसेल. घटना-परिषद् स्वराज्याची घटना घडण्यासाठीं बसली आहे. एखादें वर्ष तिचें त्या कामांत जाईल. तेवढ्या अवधींत जर अस्पृश्यता इतिहासजमा करतां आली तर स्वराज्य-लक्ष्मीच्या आगमनाला तो केवढा शुभ शकून होईल ! काय आम्ही अस्पृश्यता कायम ठेवून च स्वरा-

ज्यांत प्रवेश करूं इच्छूं ? हें आमच्या खानदानीस शोभेल ? जे लोक असंख्य आपत्ति सहन करून शेंकडों वर्षें हिंदु-धर्माला चिकटून राहिले आहेत त्यांच्या आपत्ति तशा च चालू राखून स्वराज्य कसें साजरें होईल ?

मोठे पुढारी राज्य-कारभार पाहत आहेत, घटना बनवीत आहेत. दरम्यानच्या काळांत लोकांनीं काय करायचें ? घटना बनविल्यानंतर ती अमलांत आणण्यासाठीं शक्ति लागेल, ती कशी संपादन करावयाची ? केवळ राज्यकारभार चालविल्यानें का लोकशक्ति निर्माण होत असते ? राज्यकारभार भलत्यांच्या च हातांत असल्यानें होणारा अडथळा, आमच्या पुढाऱ्यांच्या हातांत तो कारभार असल्यामुळें होणार नाहीं. किंवा थोडीफार अनुकूलता हि होईल. पण प्रत्यक्ष लोकशक्ति लोकांतून च आणि लोकांनीं च कमावली पाहिजे ना ?

फैजपूरच्या कांग्रेसच्या वेळीं मी दोन-तीन महिने फैजपूरला होतों. आजारी असल्यामुळें पडून होतों. खानदेशच्या कार्यकर्त्यांशीं माझा परिचय. त्यांच्या आग्रहानें मला तेथें बसायला लावलें होतें. मधून मधून आसपासच्या गांवीं जाऊन येत असें. खेडेगांवच्या लोकांना मी म्हणें, "तुमच्या भेटीला कांग्रेस आली आहे. तिथें जाऊन पहा, सर्व जातीचे लोक कसे भेदभाव विसरून एकत्र राहतात तें. त्यापासून धडा घ्या." एक गृहस्थ मला भीत भीत म्हणाले, "तुमच्या अशा प्रचारानें कांग्रेसला निवडणुकींत खेडवळांची मतें कशीं मिळतील ? निवडणुकी जवळ च आलेल्या आहेत. आम्ही तर निवडणूक होऊन जाईपर्यंत अस्पृश्यता-निवारण आदि बाबतींत कांहीं च बोलायचें नाहीं असें ठरविलें आहे. मागून सावकाश प्रचार करूं !" मी म्हटलें, "त्यापेक्षां मी तर तत्त्वांचा स्पष्ट प्रचार करून त्यामुळें निवडणुकींत हरावें लागलें तर तो च महान् जय समजेन."

या गोष्टीला दहा वर्षें होऊन गेलीं. देशाचें वातावरण संपूर्ण पालटलें आहे. बेचाळीसच्या चळवळीनें खेडोपाड्यांची जनता हि जागृत झालेली

आहे. क्रांतीच्या हवेचा स्पर्श सर्वांना झाला आहे. क्रांति एकांगी नसते. सामाजिक जीवनांत फार मोठें शल्य सलत असतांना तिकडे दुर्लक्ष करणें क्रांतीच्या भावनेला शक्य नाहीं. म्हणून सामाजिक बुद्धीचा हा कार्यक्रम सर्वांनीं नेट लावून पूर्ण करण्याची आज वेळ आहे. आणि जनतेचें मन त्या साठीं तयार आहे, असें मी समजतों.

पण जनतेला केव्हां हि आणि कुठें हि चालना लागत असते. ती देण्याचें काम कार्यकर्त्यांचें असते. आणि जी काय अडचण आहे ती इथें च आहे. आमच्या पुष्कळशा कार्यकर्त्यांच्या बुद्धींत जडता आहे. राजकीय कार्यक्रम म्हटला म्हणजे त्यांना उत्साह वाटतो आणि सामाजिक कार्यक्रम त्यांना मिळमिळीत वाटतो. ते म्हणतात, "आम्ही तर अस्पृश्यता मानीत च नाहीं. आम्हीं आणखी काय करायचें?" त्यांना विचारावें, "तुमच्या घरांत?" ते म्हणतात, "आमच्या घरांत आमची सत्ता नाहीं. तिथें आमचें कांहीं चालत नाहीं." ज्यांचें आपल्या घरांत चालत नाहीं, त्यांच्या बाहेरच्या चळवळींना काय किंमत?

अशा कार्यकर्त्यांना अस्पृश्यता-निवारण हा कार्यक्रम राजकीय दृष्ट्या कसा महत्त्वाचा आहे हें समजावून सांगावें लागेल. वस्तुतः सामाजिक मानलीं गेलेलीं व्यंगें शेवटच्या आणीबाणीच्या वेळेला तीव्र राजकीय स्वरूप धारण करीत असतात, हें समजणें किंवा समजावणें कठिण नाहीं. पण मला त्या उद्योगाची मुळीं च गरज नाहीं. हिंदुस्थानसारखा विशाल आणि मिसळ देश अस्पृश्यतेसारखा खंजीर पोटांत खुपसून घेऊन जिवंत राहू च शकणार नाहीं, ही गोष्ट निःसंशय आहे.

आणि जी स्थिति हिंदुस्थानची, ती च हिंदु-धर्माची. सर्वत्र भेद असंख्य भरलेले असतांना, त्यांतून अभेद शोधून काढणें हें धर्माचें कार्य; तें करण्याऐवजीं धर्माच्या नांवानें जिथें भेद निर्माण केला जाईल, तिथें

धर्मानें आपलें प्रयोजन च गमावलें असें होईल. हिंदु-धर्म तर अद्वैताचा शोध केल्याचा दावा करतो. म्हणून मी श्रद्धा राखतों कीं अस्पृश्यतेसारख्या हीन रूढीचा आग्रह धरून तो आपलें अस्तित्व गमावण्याचें पत्करणार नाहीं. उलट दिव्यावरची काजळी सारून दिव्याची प्रभा जशी सरसावावी त्याप्रमाणें समाजांत रूढ झालेला उच्चनीच-भाव फेंकून देऊन तो आपल्या मूळच्या उज्ज्वल रूपानें प्रगटेल. हिंदु समाजांतील सर्व विचारी पुरुषांना आज ही प्रेरणा झालेली आहे, ही च त्याची खूण आहे.

म्हणून माझी कार्यकर्त्यांना सूचना आहे कीं त्यांनीं हा आत्मशुद्धीचा कार्यक्रम अविलंबें पार पाडावा. सामाजिक, राजकीय असल्या काल्पनिक भेदांच्या चर्चेंत पडूं नये, आणि सरळ कामास लागावें.

[ मराठी हरिजन, २२-११-१९४६ ]

: ८ :

# ग्राम-सेवेच्या अडचणी

एक जण लिहितात: "एक सेवक खेड्यांत जाऊन खेडेगांवची सेवा करूं इच्छितात. कुटुंबासह ते त्या गांवांत राहतील असें समजा. 'तेथें त्यांची कांहीं जमीन नाहीं, किंवा घर हि नाहीं. त्यांनीं आपली आजीविका तेथें कशी चालवावी ? कांतणें, विणणें त्यांना येतें. पण खेडेगांवांत खादी-पैदाशी-पेक्षां घरगुती खादीवर जोर दिला जातो. त्यांतून कमाई काय होणार ? शिवाय विणण्याच्या धंद्यांत इतकी मजुरी सुटत नाहीं कीं जिच्यांतून कुटुंबाचें भरण-पोषण होऊं शकेल. आजीविकेबरोबर च मुलांच्या शिक्षणाची सोय खेड्यांत काय करतां येईल ? पुस्तकें, वर्तमान-पत्रें इत्यादि साधनांच्या अभावीं आधुनिक जगाचें आणि त्यांतील समस्यांचें ज्ञान मुलांना देतां येईल असें आपण मानतां का ? या सर्व अडचणींतून यशस्वी रीतीनें मार्ग काढून खेडेगांवची सेवा करीत असलेल्या एका-दोघा सेवकांचीं उदाहरणें द्याल तर बरें होईल. खेडेगांवच्या सेवेबरोबर जीवन-निर्वाह आणि मानसिक विकास कसा साधतां येईल, हें समजावयास हवें आहे."

सेवकानें एखाद्या खेड्यांत सेवेसाठीं जाऊन बसावयाचें म्हणजे तेथें त्याला राहण्याची सोय आहे असें गृहीत धरलें पाहिजे. खेड्यावर सेवा लादावयाची तर नाहीं च. जे गांवकरी सेवकांची सेवा मागतात, त्यांनीं त्याला राहण्यासाठीं घर द्यायला पाहिजे. सेवकाला मालकीच्या जमिनीची गरज नाहीं. दुसऱ्यांच्या शेतांत तो इतर मजुरांबरोबर मजुरीला जाऊं शकेल. आणि खेडेगांवच्या मानानें त्याची आजीविका हि त्याला त्यांतून मिळून

जाईल. मजुरांच्या जीवनांत शिरकाव होऊन मजुरांची समस्या सोडविण्याला साह्य होईल. मजुरांची आणि मजुरीची प्रतिष्ठा वाढेल. मजूर बहुधा आंगचुकारपणानें काम करीत असतात. याच्या उदाहरणानें नीट काम करूं लागतील. त्यामुळें मजुरीचें मान हि वाढेल.

ज्याला विणकाम येत आहे त्याला जीवन-निर्वाहाची मुळीं च अडचण वाटूं नये. जरी खेड्यामध्यें खादीच्या उत्पत्ति-विक्रीचा धंदा करायचा नाहीं तरी धंदेवाईक विणकराला जागा आहे च. घरोघर कांतलें जाईल तसें घरोघर विणलें जाईल अशी कल्पना नाहीं. जरी वटीव सुताचा रिवाज पडला म्हणजे कांहीं शेतकरी आपलें कापड आपण च विणून घेऊं शकतील, असें मी मानतों. तथापि सगळे तसें करूं शकणार नाहींत. आणि विणकर वर्गाचें काम राहील च. पण आमचे कार्यकर्ते, जे विणकामाच्या परीक्षा ही पास झालेले आहेत ते, मी पुष्कळसे विणकामांत नापास च समजतों. विणकामांतून आजीविका संपादन करावयाची अशा दृष्टीनें ते विणकाम शिकलेले च नसतात. शिक्षक किंवा व्यवस्थापक होतां यावें एवढी च त्यांची अपेक्षा असते. यांत कल्पिलेली शिक्षकाची कल्पना हि मला मंजूर नाहीं. माझ्या दृष्टीनें शिक्षक किंवा व्यवस्थापक हा चांगला कारागीर असून अधिक कांहीं तरी असला पाहिजे. इतर योग्यता उत्तम असल्यास विणकामाची साधारण माहिती असणारा मनुष्य, शिक्षक किंवा व्यवस्थापक चालून जाईल ही गोष्ट वेगळी.

खेड्यांत जाणारा जर कुटुंबासकट जात आहे, तर ती अडचण न वाटतां सोडवण च वाटली पाहिजे. कारण तो एक सहधर्मी आणि पूरक सहकारी घेऊन कामाला लागत आहे, असा त्याचा अर्थ होतो. पण कुटुंब सहकारी नसेल तर मात्र ती अडचण होईल. तसे कार्यकर्ते खेड्याच्या कामाला तितकेसे उपयोगी होणार नाहींत, हें उघड आहे. पण अनेकांची अडचण आजीविकेपेक्षां मुलांच्या शिक्षणाची असते, हें मला माहीत आहे. त्यासाठीं

शिक्षणाच्या कल्पनेंत च बदल व्हायला हवा. कांहीं सेवक स्वतः खेडवळ बनायला तयार आहेत, पण ते हि आपल्या मुलांनीं खेडवळ बनावें अशी आकांक्षा राखीत नाहींत. खेडयांत पुस्तकें, वर्तमानपत्रें वगैरेंचा अभाव राहील, असें मानायचें कारण नाहीं. खेडयांत भाराभर साहित्य न जाता निवडक साहित्य जाणें इष्ट आहे. आणि तेवढी सोय समाज आणि सरकार करील. पण शिक्षण आणि मनोविकास हीं पुस्तकांवर अवलंबून आहेत ही समजूत चुकीची असून ती दुरुस्त व्हायला च पाहिजे. खेडें म्हणजे एक लहानसें जग च आहे. आणि जगांतील सर्व समस्या खेड्यांत मौजूद आहेत. समाज, सृष्टि, आणि मन तिहींचा पुरवठा खेडयांत कमी नाहीं. त्यामुळें शिक्षणाला आणि मनो-विकासाला खेडयांत पूर्ण वाव आहे. तुकारामाचा मनोविकास जर देहूसारख्या खेडयांत होऊं शकतो तर आमचा कां होणार नाहीं ? वैदिक मंत्र म्हणतो —

उपह्वरे गिरीणां संगथे च नदीनाम् ।
धिया विप्रः अजायत ॥

वांकडया-तिकडया डोंगरांत आणि नद्यांच्या संगतींत चिंतन करून विप्र जन्मास आला. इंद्रायणी नदी आणि भंडारा डोंगर का पुण्या-मुंबईला सांपडणार आहे ?

उपनिषदांत गोष्ट आहे. राजाला ज्ञानी पुरुषाचा शोध करायचा होता. त्यानें सारथ्याला त्यासाठीं पाठविलें. तो शहरभर हिंडून परत आला. म्हणाला, 'ज्ञानी कोठें सांपडला नाहीं.' राजा म्हणतो, 'अरे वेडया, शहरांत का ज्ञानी शोधायचा असतो ? योग्य जागीं शोध कर म्हणजे सांपडेल.' मग सारथी जंगलांत गेला आणि तेथें त्याला ज्ञानी सांपडला.

सारांश, खेडयांवच्या जीवनाशीं समरस होऊं शकणारे जे कोणी असतील त्यांनीं च खेडयांत जावयास पाहिजे. असे लोक खेडयांत गेल्यास

त्यांना तेथें कांहीं च अडचणी भासणार नाहींत. आज शेंकडों लोकांनीं खेड्यांत जाण्याची गरज हि आहे. पण सात लाख खेडयांत बाहेरचे लोक जाऊन खेड्याचा उद्धार करणार आहेत, असें मात्र मी मानलेलें नाहीं. शेवटीं आत्मोद्धाराशिवाय दुसरा उद्धार च नाहीं. खेडयांचा उद्धार खेडयांनीं च करायचा आहे. खेडयांत हि दुसऱ्याच्या सुखानें सुखी आणि दुसऱ्यांच्या दुःखानें दुःखी होणारे सहृदय असतात, असावयास पाहिजेत. नवशिक्षणाचा जसजसा फैलाव होईल तसतशी अशा माणसांची संख्या वाढेल. मग

> विरला जानन्ति गुणान्
>
> विरलाः कुर्वन्ति निर्धने स्नेहम् ।
>
> विरलाः परकार्य-रताः
>
> पर-दुःखेनापि दुःखिता विरलाः ॥

हें कुभाषित खोटें पडेल आणि ग्राम-निष्ठेचा उदय होऊन स्वराज्याचें दर्शन होईल. आजच्या घटकेला शहरच्या लोकानीं खेडेगांवाविषयीं कृतज्ञ सहानुभूति राखावी. ग्रामोद्योगाला उत्तेजन द्यावें. मन गावकरी बनवावें. आणि तळमळणारांनीं आंगमेहनतीवर उदार होऊन खेडेगांवांत खुशाल जावें.

[ मराठी हरिजन, ता. १३-४-१९४७ ]

: ९ :

# सफाईची मोहीम

एक सेवापरायण वैद्य लिहितात :

"हिंदुस्थानच्या अनेक योजनांना सध्यां सुरवात झालेली आहे, ही चांगली गोष्ट आहे. तथापि ज्या गोष्टी जनतेच्या मनांत तीव्रतेनें रुजणें आरोग्याच्या दृष्टीनें अवश्य आहे, त्या संबंधीं पुरस्कार आपल्यासारख्यांनीं केल्यास योग्य होईल, असें वाटल्यावरून लिहीत आहे. या गोष्टी म्हणजे जलाशयाचें पावित्र्य, भूमीचें पावित्र्य आणि खाद्य वस्तूंचें पावित्र्य.

१. असें दिसून आलें आहे कीं नद्या, ओढे आदि जलाशयाच्या काठाला किंवा जलाशयांत च मलमूत्र विधि करण्याची वाईट संवय जनतेला जडलेली आहे. शौचाला पाणी घेऊन सुद्धां अनेक जात नाहींत.

२. कोठें थुंकावें, हें तर कळत नाहीं च. परंतु घरांत कोठें हि थुंकावें, नाक शिंकरावें याची किळस हि लोकांना वाटत नाहीं, याचें आश्चर्य वाटतें. लहान मुलाप्रमाणें पुष्कळ लोक खोकल्यानंतर आलेला खाकरा खुशाल गिळतात.

३. खाद्य वस्तूंच्या बाबतींत तर कमाल च झाली आहे. गुळासारखा पदार्थ ज्या तापमानावर बनतो तें तापमान तो निर्जंतुक बनण्यास योग्य असतें. परंतु, तो निवाल्यापासून गिऱ्हाइकाला मिळेपर्यंत तो कशा कशा घाणेरड्या स्थितींतून जात असतो तें पाहिलें म्हणजे अंगावर कांटा उभा राहतो. त्याच्यावर रस्त्यावरून आलेले पाय दिले जातात. वाहतूक होतांना तो कोठें हि ठेवला जातो. हें सर्व अडत बाजारांत आणि इतर स्थळीं पहावयास सांपडतें.

हल्लींचा मूळ हा रोगबीजांचा टीप-कागद आहे म्हटलें तरी चालेल. तेव्हां सरकारनें व सुज्ञांनीं जनतेला याबद्दल कांहीं मार्ग-दर्शन केल्यास फार चांगलें होईल.

४. दरएक स्टेशनावर अलीकडे रेल्वेनें थुंक-पात्रें ठेवलीं आहेत. परंतु त्यांवर "स्पिटून्स" असें इंग्रजींत लिहिल्यानें देश-भाषेंत साक्षर झालेल्या जनतेला हि तें काय आहे हें कळत नाहीं. निरक्षरांची गोष्ट च कशाला ? शेवटीं असें मनांत येतें कीं इंग्रजी जाणणारांची थुंकी रोग पसरविणारी असल्याचें रेल्वे अधिकाऱ्यांना कळून आल्यामुळें त्यांनीं त्यासाठीं ही खबरदारी घेतली असावी !"

पत्र लेखकानें दर्शविलेले दोष इतके व्यापक स्वरूपाचे आणि आमच्यांत मुरलेले आहेत कीं त्यांविषयीं कोणीं कांहीं लिहून विशेष लाभ नाहीं. सफाईचें काम एका वर्गाकडे सोंपाविणें, ही एक चूक. आणि वर त्या वर्गाला अस्पृश्य लेखणें, ही दुसरी चूक. या दुहेरी चुकीचा हा परिणाम आहे. त्यासाठीं पत्र-लेखकासारख्या वैद्यांनीं, विद्वानांनीं आणि विचारकांनीं भंगी-कामाला आरंभ करून दिला पाहिजे. आमच्या शास्त्रकारांनीं जलाशयाच्या पवित्रतेसंबंधीं फार बारीक नियम घालून दिले आहेत. पण त्यांतला एक हि आज अमलांत नाहीं. गंगेपासून कावेरीपर्यंत अशी एक हि पवित्र नदी नाहीं कीं जिचा किनारा लोकांनी शौचासाठीं वापरला नाहीं. आणि वर पुनः श्रद्धा इतकी कीं चंद्र-सूर्याला ग्रहण लागलें कीं लोक नदीवर स्नानाला धांवले च ! अशा स्थितींत हरेक गांवच्या जाणत्या लोकांनीं झाडू हातांत घेतला पाहिजे. परशुरामाचा जसा परशू तसा कार्यकर्त्यांचा झाडू झाला पाहिजे. हें काम किती दिवस करीत रहायचें, असें मनांत आणायचें नाहीं. आपण देहाला किती दिवस आंघोळ घालतो ? देह रोज मळतो आणि रोज आपण त्याला धुतों. तसें हें आमचें नेहमीचें दैनिक काम आम्हीं समजलें पाहिजे. तर च तें आटोक्यांत येईल.

गुळाबाबत सरकारी इलाज होईल तो होईल च. पण मीं एक घरगुती इलाज शोधून काढला आहे. गुळाचें अमृत करून घ्यावें. त्याचा विधि असा :—गुळाचा भुका करून तो थंड पाण्यांत घालून ठेवायचा. विरघळला म्हणजे तें मिश्रण निर्मळ फडक्यांतून गाळून घ्यायचें. मग उकळून मधा-एवढें दाट, चमच्यानें घेतां येईल असें, करावयाचें. याला अमृत अशी संज्ञा आहे. असें अमृत बनविल्याशिवाय आजचा गूळ सेवन करणारा मनुष्य रुग्ण होऊन मरणाची तयारी करतो असें समजावें. इतकें असून लोक जगतांना दिसतात. कारण, त्याचें आयुष्य संपलेलें नसतें.

[ मराठी हरिजन, ता. १२ जानेवारी, १९४७ ]

: १० :

# जखमी तांदूळ बंद करा

मद्रास सरकारनें भात कुटण्याच्या नवीन गिरण्या काढायला संमति न देण्याचें ठरविलें आहे, याबद्दल मद्रास सरकारचें अभिनंदन केलें पाहिजे. वास्तविक आज ज्या भाताच्या गिरण्या चालू आहेत त्या हि बंद करण्याची गरज आहे. गिरणीचा तांदूळ ज्याला इंग्रजींत 'पॉलिश्‌ड राइस' म्हणतात, आणि ज्याला मी 'तासलेला तांदूळ' असें नांव दिलें आहे, खाद्य पदार्थ या नात्यानें निःसत्त्व, किंबहुना रोग-वर्धक आहे, याविषयीं कोविदांचें एक मत आहे. तांदूळ तासण्यांत बी व्हायटामिन निःशेष नाहीसें होतें. आणि केवळ पिष्ट पदरांत पडतें. त्यांतून बेरि-बेरीसारखे रोग उद्भवतात. म्हणून हिंदुस्थान सारख्या गरीब देशांत, जेथें करोडो लोक केवळ तांदुळावर दिवस काढतात तेथें, तांदूळ तासणें हा एक गुन्हा च समजला पाहिजे. आरोग्य-दृष्टि सोडून केवळ पोट भरण्याची दृष्टि ठेवली तरी असें दिसून येतें कीं चाळीस तोळे तासलेले तांदूळ खाऊन लाभणारें भुकेचें शमन पस्तीस तोळे शाबूत तांदूळ खाऊन होतें. मध्यंतरीं युद्धाच्या काळांत धान्याचा तुटवडा पडूं नये, कमी धान्यांत काम भागावें म्हणून "शाबूत धान्य खात चला" अशीं पत्रकें माजी सरकारनें काढलीं होतीं. जणूं काय शिफारसवजा पत्रकें काढणें एवढें च सरकारचें कार्य असतें ! पण तें सरकार आपल्या जेल-खात्याला तासलेले तांदूळ च पुरवीत होतें. ग्रामोद्योगाचे पुरस्कर्ते आम्ही सगळे जेल मधें असूं आणि सरकारी पत्रकें वाचून हसूं. गांधीनीं बिन-सडिक तांदुळाकडे लोकांचें आणि सरकारचें लक्ष आधीं च वेधलें होतें. पण गांधीचें

नांव नेस्तनाबूद करण्याचा त्या वेळीं सरकारला नाद लागला होता. आणि नाइलाजास्तव, असडिक तांदुळाचें नांव च तेवढें त्याला घ्यायचें होतें. तें ढोंगी सरकार आज शिल्लक नाहीं आणि दुष्काळी दशा अजून कायम आहे. मग तांदूळ जखमी करण्याच्या गिरण्या आम्हीं अजीबात च बंद कां करूं नयेत ? तांदूळ जखमी करणें ही भाषा मी नवीन काढलेली नाहीं. ती शास्त्रकाराची आहे. आम्ही ज्याला बगड, करड किंवा असडिक तांदूळ म्हणतों त्याला शास्त्रकार 'अक्षत' धान्य म्हणतात. अक्षत म्हणजे जखमी न झालेलें. तासलेल्या तांदुळानें होणारी हानि, जी वैज्ञानिकांनीं सिद्ध केली आहे ती, लक्षांत घेतां त्याला शास्त्रकारांनीं दिलेलें जखमी तांदूळ हें नांव सार्थ आहे.

आज आमच्या प्रान्तिक सरकारांच्या मागें अनेक वेध लागलले आहेत. आणि त्यामुळें राज्य-व्यवस्थेचा वेगानें पालट जड झाला आहे, हें खरें. पण तशा हि स्थितींत आम जनतेच्या पोषणाचा प्रश्न दुर्लक्षिला जाणें क्षम्य ठरणार नाहीं.

आमचीं सरकारें असतांना वास्तविक ग्रामोद्योग-संघासारख्या संघांची गरज राहूं नये. सरकारें च ग्रामोद्योग-संघ बनून जावींत. कॉंग्रेसनें ग्रामोद्योग-संघ हौशीसाठीं काढलेला नाहीं. कॉंग्रेसनें स्वीकारलेलें तें गरिबांच्या रक्षणाचें ब्रीद आहे. कॉंग्रेसी सरकारांना तें शिरोधार्य असलें पाहिजे. गरिबांच्या बाबतींत कॉंग्रेसी आणि लीगी सरकारें हा हि भेद व्हावयास नको. गरिबांची भूक तसला भेद जाणत नाहीं.

[ मराठी हरिजन, २३-२-१९४७ ]

: ११ :

# अस्पृश्यता-निवारणाची घोषणा *

आजचा हा हॉटेल उघडण्याचा समारंभ आधीं च व्हायला पाहिजे होता. पण उशिरा कां होईना, सद्‌बुद्धि सुचली हें योग्य झालें.

आज च वर्तमानपत्रांत जाहीर झालें आहे कीं जून १९४८ च्या आंत इंग्रज हिंदुस्थान सोडून जाणार आहेत. बेचाळीस सालीं हिंदुस्थान सोडून जा हा मंत्र बोलला गेला. देशानें त्यासाठीं एक मोठी चळवळ केली. तो मंत्र सिद्ध होणार, इंग्रज जाणार, आमच्या हातांत सत्ता येणार, हें सारें विधि लिखित च आहे.

पण परकीय सत्ता जाऊन इथल्या कांहीं लोकांची सत्ता येणें एवढा च स्वराज्याचा अर्थ नाहीं. स्वराज्य म्हणजे गरिबांचें, कामकऱ्यांचें, जनतेचें, सर्वांचें राज्य. उच्चनीच-भाव, सर्व प्रकारची विषमता नाहींशी झाल्याशिवाय स्वराज्यांत प्रवेश कोठून होणार ? तिकडे घटना-समिति भरली आहे. ती आपलें काम पूर्ण करणार च आहे. तें पूर्ण होण्याच्या आंत आम्हीं आमच्या देशांतून अस्पृश्यता नाहींशी केली पाहिजे. नुसतीं देवळें, हॉटेलें उघडून काय होणार, असें कधीं कधीं हरिजन विचारतात. मी म्हणतों, एवढें च करून आम्हांला गप बसायचें नाहीं. सर्वांना सारखे हक्क मिळवून दिल्याशिवाय ही चळवळ थांबत नाहीं. सारखे हक्क, जीवनांतील सर्व विभागांत. राजकीय सत्ता, सामाजिक सवलती, शिक्षणाची सोय, धर्मा-

---

*२१-२-४७ रोजीं वर्ध्याचीं हॉटेलें हरिजनांना मोकळीं करण्यांत आलीं त्या वेळचें भाषण.

विषयीं मोकळीक, आरोग्याची व्यवस्था, मान-सन्मान, प्रतिष्ठा सर्व च समान असणें याचें नांव लोक-सत्ता. अशी लोक-सत्ता आम्हांला स्थापावयाची आहे. हरेकाला वाटलें पाहिजे, "हें माझें राज्य आहे, तें चालविण्याची जबाबदारी माझ्यावर आहे." आम्ही चाळीस कोटि लोक जर बंधुभावनेनें व समतेनें राहूं तर आम्ही हिंदुस्थानांत स्वराज्य राखूं आणि जगाला हि तें मिळवून देऊं.

हें काम सर्वांचें च आहे. सर्व राजकीय पक्षांनीं एकवटून तें करावयाचें आहे. सर्वांनीं मिळून एखादी लहानशी गोष्ट हि सिद्ध करण्यानें शक्ति निर्माण होत असते. म्हणून आपण आज सारे अस्पृश्यता-निवारणाच्या कामावर एकवटूं या आणि घोषणा करूं या कीं जून १९४८ च्या आंत इंग्रज हिंदुस्थान सोडणार म्हणतो तर त्याच्या आधीं च अस्पृश्यता हिंदुस्थान सोडून जाणार आहे.

: १२ :

# शिक्षण-दृष्टि*

आतां शिक्षणाच्या दृष्टीनें कांहीं सांगतों. येथें तालीमी संघाचे विद्यार्थी हजर आहेत. परंतु शिक्षण केवळ तालीमी संघांत च आहे अशी गोष्ट नाहीं; किंवा चरखा केवळ चरखा-संघांत च आहे, अशी हि गोष्ट नाहीं. चरखा-संघांत हि शिक्षण आहे व तालीमी संघांत हि चरखा आहे. एका च कामाला वेगवेगळया दृष्टीनें नवनवीन नांवें दिलीं जातात. आतांपर्यंत देशांत जी शिक्षण-पद्धति चालत होती ती ज्ञान-प्रधान होती व आम्हांला जी 'नई तालीम' चालवायची आहे ती कर्म-प्रधान आहे असें म्हटलें जातें. हें विश्लेषण चुकीचें आहे. जुन्या शिक्षण-पद्धतीला ज्ञान-प्रधान म्हणणें चूक आहे आणि नवीन शिक्षण-पद्धतीला कर्म-प्रधान म्हणणें हें सुद्धां चूक आहे. आपण असें म्हणूं शकतों कीं जुनी शिक्षण-पद्धति ही पुस्तक-प्रधान होती व 'नई तालीम' उद्योग-प्रधान आहे. पण ही व्याख्या सुद्धां पूर्ण नाहीं. आमचा उद्देश फक्त कामासाठीं योग्य व्यक्ति तयार करणें असा नाहीं व ज्ञानयुक्त कारागीर तयार करणें असा हि नाहीं. आम्हांला तर मानवाचा पूर्ण गुणविकास पाहिजे आहे. जे शिक्षक व जे विद्यार्थी त्यांत भाग घेतात त्या दोघांना हि आपला पूर्ण गुण-विकास करावयाचा आहे. जर ते केवळ ज्ञान किंवा केवळ कर्म-कुशलता किंवा दोन्ही मिळवतील तर तें सुद्धा एकांगी आहे. कर्म-शक्ति आणि ज्ञान-शक्ति ह्या दोन्ही साध्य व्हायला पाहिजेत. पण हे तर अनेक गुणांपैकीं दोन गुण झाले. तेवढ्यानें च पूर्ण विकास होणार नाहीं. शिक्षणानें सर्व गुणांचा विकास झाला पाहिजे.

* ता० १५ ऑक्टोबर १९४७ला सेवाग्राम येथें दिलेल्या भाषणाचा उत्तरार्ध.

आम्ही मुलांना सूत कांतणें शिकवतों व त्याद्वारें ज्ञान देतों असें सांगण्यांत येतें. परंतु एवढें च आमचें कार्य नाहीं. आम्हांला तर ह्यायोगें त्यांचा आंतरिक विकास झाला किंवा नाहीं हें पहावयाचें आहे. काय त्यांचा आळस गेला आहे ? काय त्यांच्यांत उद्योगशीलता आली आहे ! काय ते सर्वप्रकारें निर्भय बनले आहेत ? काय ते सत्यवादी, संयमी, सेवा-भावी बनले आहेत ? हें सर्व आम्हांला पहायचें आहे.

जुन्या शिक्षण-पद्धतीवर इतके आक्षेप घेण्यांत आले आहेत कीं माझ्या-साठीं कांहीं शिल्लक ठेवण्यांत आलें नाहीं. पण त्याचें वाइटाहून वाईट चित्र माझ्या डोळ्यांसमोर तें उभें राहतें : जेव्हा आमच्या परीक्षा घेण्यांत येत असत त्यावेळीं आमच्यावर देखरेख करण्याकरितां निरीक्षक ठेवले जात. आणि तें ह्याकरितां कीं विद्यार्थ्यांनीं चोरून एकमेकांची नक्कल करूं नये. मला दुःख होत असे कीं जर विद्यार्थ्यांबद्दल सुरवातीपासून च अशी धारणा ठेवण्यात आली कीं आम्ही चोरी करूं शकतों, तर मग विद्यार्थी ह्या दृष्टीनें आम्ही पहिल्या प्रथम च नापास झालों. मग आमची आणखी परीक्षा घेण्याचें काय शिल्लक उरलें ?

जर आम्ही सुरवातीपासून जागृत राहिलों नाहीं तर गुण-विकासाची परवा न करण्याचा जुन्या शिक्षण-पद्धतीचा हा दोष नई तालीम मध्यें हि येऊं शकतो. इतक्या गुंड्या कांतावयाच्या आहेत, हें काम करावयाचें आहे, हें च जर आम्ही पाहूं तर जुने दोष दुसऱ्या प्रकारांनी ह्यांत हि येणार आहेत. आम्हांला तर हें च पाहिलें पाहिजे कीं मुलांची आत्म-शक्ति प्रगट होत आहे कीं नाहीं.

संस्कृतांत शिक्षणाला 'विनय' म्हणतात. कारण विनय सर्व गुणांचें प्रवेश-द्वार आहे. त्याच्याच्मुळें गुणांचा विकास होत असतो. जो नम्र आहे तो जेथें जो कांहीं गुण मिळेल, ज्ञान मिळेल, चांगली गोष्ट दिसेल ती

चटकन उचलून घेईल. ही गुणग्राहकता विनयाचें म्हणजे नम्रतेचें मुख्य लक्षण आहे. म्हणून च आमच्या पूर्वजांनीं आमचें लक्ष विनयावर केंद्रित केलें होतें. विनयामुळें सर्व गुणांचा विकास होऊन व्यक्ति परिपूर्ण बनूं शकते.

शिक्षक कोणती हि कृति केवळ बाह्य दृष्टीनें पाहणार नाहीं. प्रत्येक कृति अंतर्दृष्टीनें पाहील.

एका मुलानें चोरी करून फळ खाल्लें. मी त्याला म्हणालों, तुला फळ खाण्याचा हक्क होता. परंतु विचारून खाऊं शकत होतास किंवा खाल्ल्या-नंतर सांगू शकत होतास. नाहीं तर व्यवस्थेंत दोष निर्माण होतो. चोरी करून खाण्यांत स्वाद हि नाहीं व त्यामुळें आम्ही आपसांतली निर्भयता मात्र गमा-वून बसतों. घरांत चोरी कशी? आणि आम्ही जर समजूं तर हें जग आपलें घर च आहे. चोरी करायची होती तर आमचें हृदय चोरायचें होतें. भगवान् श्रीकृष्णाला हि 'चोर' म्हणत. पण तो 'चित्त-चोर' होता. त्याला समजलें होतें कीं येथें चोरी करणें व्यर्थ आहे. जर हा प्रयोग करायचा च असेल तर तो दुसरीकडे च केला पाहिजे.

कर्म तर एक आरसा आहे. त्याच्यांत आम्ही आपले गुण-दोष पाहूं शकतों. हा च त्याचा मुख्य उपकार होय. लाभ व हानि मोजण्याची वृत्ति प्रत्येकांत असते. कोणी पैशानें लाभ-हानि मोजतो तर कोणी विद्येनें. आम्हांला गुण-विकास आणि दोष-विनाश या दृष्टीनें लाभ-हानि मोजण्याचा अभ्यास केला पाहिजे.

मी देह नाहीं, मी देहाहून वेगळा आहें. आमचें सत्य स्वरूप तर सुंदर व परिशुद्ध आहे. तें अशुद्ध होत नाहीं, आणि त्याच्याकडून चुका हि होत नाहींत. चुका तर देहाकडून होतात. आमचें शरीर अस्वस्थ होतें, अस्वच्छ होतें, पण मी होत नाहीं. देह-भिन्न आत्म्याचें भान हें च शिक्षण

होय. जेथें देह-भिन्न आपल्या स्वरूपाचें भान नसतें तेथें ती शिक्षण-व्यवस्था नाहीं व शिक्षण-संस्था हि नाहीं. जर कोणी मुलगा अस्वच्छ असेल, तर मी त्याला 'तूं अस्वच्छ आहेस' असें म्हणणार नाहीं. मी त्याला म्हणेन, तूं तर स्वच्छ आहेस, पण तुझ्या शरीरावर अस्वच्छता आली आहे, तेव्हां तूं सांभाळ. एका मुलानें झोपेंत अंथरुणांत लघ्वी केली. त्याची तक्रार करण्यांत आली. तो लज्जित झाला आणि लाजेनें कबूल च करीत नव्हता. मी त्याला सांगितलें कीं ह्याच्याशीं तुझा संबंध नाहीं. हें तर शरीराकडून झालें आहे. आजारी इत्यादि न कळत अंथरुणांत लघ्वी करतात. कधीं कधीं झोपेंत हि असें होऊन जातें. त्यावेळीं त्याचें भान राहत नाहीं. येथें ही चर्चा ह्यासाठीं करायची आहे कीं शरीराकडून कांहीं दोष झाला असेल तर त्याचीं कारणें समजून घेतलीं पाहिजेत व त्यांचें निवारण केलें पाहिजे. नंतर त्यानें निःसंकोचपणें तो दोष कबूल केला.

आम्हांला आमचें मन घड्याळाप्रमाणें हातांत ठेवून पाहतां आलें पाहिजे. आणि कांहीं चूक दिसून आली तर ती दुरुस्त करतां आली पाहिजे. आम्हांला हें ओळखलें पाहिजे कीं आम्ही तर तें आहोंत जें कधीं बिघडत नाहीं, अस्वच्छ होत नाहीं; शरीर नादुरुस्त होतें, त्याला आम्ही सुधारणारे आहोंत. हा विचार जेव्हां आमच्यांत स्थिर होईल तेव्हां च खरी शिक्षण-दृष्टि येईल.

माझे हे विचार थोडक्यांत मीं तुमच्या समोर ठेवले आहेत.

[ खादी-जगत्, नोव्हेंबर १९४७]

: १३ :

# समग्रतेची सुंदरता*

माझ्या परम प्रिय मित्रांनो,

जेव्हां मला सुचविण्यांत आलें कीं ह्या विद्यालयाचें उद्घाटन मीं करावें तेव्हां मला त्या निमंत्रणाचा स्वीकार करतांना थोडासा संकोच वाटला. त्याचें कारण असें कीं उद्घाटन-समारंभ एक प्रकारें केवळ समारंभ च समजला जातो. उद्घाटन करणाऱ्यावर त्याची कांहीं हि जबाबदारी राहत नाहीं. परंतु माझी स्थिति तशी नाही. मी ह्या विद्यालयाचें उद्घाटन करणें ह्याचा अर्थ असा होतो कीं ह्या कामाची जबाबदारी हि उचलण्यांत मीं भाग घ्यावा. हा भार असा नाहीं कीं जो मी प्रेमपूर्वक स्वीकारणें नाकारूं शकेन. म्हणून मीं येथे येऊन च गेलों.

पण दुसरें सुद्धां एक कारण आहे माझ्या संकोचाचें. तें हें कीं मी दाक्षिणात्य आहें. दाक्षिणात्य लोकांचे बाबतींत एक प्रसिद्ध म्हण आहे कीं ते आरंभ-शूर असतात. परंतु मीं ही म्हण खोटी पाडण्याचा पूर्ण प्रयत्न केला आहे. बुद्धीच्या लक्षणांसंबंधीं आमच्या पूर्वजांनीं म्हटलें आहे :

अनारंभो हि कार्याणां प्रथमं बुद्धि-लक्षणम् ।
आरब्धस्यान्त-गमनं द्वितीयं बुद्धि-लक्षणम् ॥

परंतु ह्या कार्याचा आरंभ करून आम्हीं हें एक लक्षण तर मोडून टाकलें आहे. आतां दुसऱ्या लक्षणाचें तरी पालन करून दाखविलें पाहिजे. काम प्रारंभिलें आहे तर तें कसें हि करून पूर्ण केलें च पाहिजे.

---

*सेवाग्राम येथें ता. २-१०-४५ ला समग्र-ग्राम-सेवा-विद्यालयाच्या उद्घाटन-प्रसंगीं दिलेल्या भाषणाचा सारांश.

वास्तविक आम्हीं ह्या कामाला २५ वर्षांपूर्वीच प्रारंभ केलेला आहे. तसें तर कांग्रेसच्या स्थापनेपासून म्हणजे ६० वर्षांपासून च ह्या कामाची सुरवात झालेली आहे. पण २५ वर्षांपूर्वीं ह्या कामाला आकार मिळाला आहे. हें काम नवें नाहीं. आज ह्यांत फक्त संशोधनाचा दृष्टिकोन आहे. आम्ही सारे आतांपर्यंत तुकडे तुकडे घेऊन काम करीत राहिलों. परंतु आतां ते सर्व तुकडे अशा प्रकारें जुळवावयाचे आहेत कीं ते सर्व एकरूप होतील. अशा प्रकारें एकरूप व्हावेत कीं स्वराज्याची पूर्ण प्रतिमा त्यांपासून निर्माण व्हावी. स्वराज्य म्हणजे सर्व-राज्य अर्थात् रामराज्य. ते केवळ सामान्य भूत-दयेचें काम करून स्थापन होऊं शकत नाहीं. भूत-दयेचें कांहीं काम तर पर-राज्यांत हि होऊं शकतें ना? हिंसात्मक लढाईत हि दया-भावाच्या कामांना अवसर तर राहतो च. परंतु त्यांतून जीवन निर्माण होऊं शकत नाहीं. जीवन निर्माण तेव्हां च होतें कीं जेव्हां सेव्य-सेवक एक होऊन जातात. जोंपर्यंत सेवक व सेव्य वेगवेगळे आहेत, दोघांच्या जीवनांत भेद आहेत, भेदभाव कायम आहे, तोंपर्यंत आमचें कार्य होऊं शकत नाहीं. ज्यांची आम्ही सेवा करूं इच्छितों त्यांच्या आणि आम्ही जे सेवा करूं चाहतों त्यांच्या, दोघांच्या हि जीवनांत एकरूपता आली पाहिजे. ह्यासाठीं आम्हांला थोडें खालीं उतरलें पाहिजे. पण खालीं उतरण्याला हि एक मर्यादा असते. आमचे सेव्य इतके खालीं गेले आहेत कीं तितकें खालीं उतरणें शक्य नाहीं. म्हणून त्यांना च वर उचललें पाहिजे. तेव्हां च सर्वोदय होऊं शकेल; तेव्हां च अहिंसेचें दर्शन होईल. असें होत नाहीं तोंपर्यंत वरवर जरी शांति मिळाली तरी ती वंचनायुक्त राहील. ती खरी शांति होऊं शकणार नाहीं.

आतांपर्यंत जें काम झालें आहे त्यामुळें आम्हांला दृष्टि मिळाली आहे. दृष्टि फार कठोर देवता आहे. पहिल्यापासून दर्शन देत नाहीं. काम करतां करता तिचें दर्शन होतें. ज्यांनीं पर्वतावर चढण्याचा प्रयत्न केला आहे,

त्यांना माहीत आहे कीं जस-जसें वर चढत जातों तस-तशी दृष्टि विस्तृत बनत जाते. जस-जसे पाय वर चढतात तस-तशी दृष्टि हि विशाल बनत जाते. हें तिचें वैशिष्ट्य आहे.

म्हणून जो काळ निघून गेला आहे त्याची निंदा किंवा चर्चा करण्याची आवश्यकता नाहीं. जें कांहीं झालें तें अनिवार्य च होतें. आणि त्याशिवाय आज जें कांहीं लाभलें आहे तें सुद्धां लाभलें नसतें. म्हणून आतां सर्व विषयांचें सम्यक् ज्ञान प्राप्त करणें आवश्यक आहे, आणि ह्या च दृष्टीनें हें समग्र-ग्राम-सेवा-विद्यालय उघडलें जात आहे.

ह्या विद्यालयाला समग्र-ग्राम-सेवा-विद्यालय म्हटलें आहे. समग्रतेमध्यें सौंदर्य आहे.

एखाद्या सुंदर बालकाचा एक-एक अवयव पाहिला तर त्यांत सौंदर्य दिसणार नाहीं. उदाहरणार्थ जर आम्हीं त्याचें फक्त नाक च पाहिलें तर नाकाच्या नाकपुडींत आम्हांला गुहेसारखी भयंकरता दिसेल. परंतु संपूर्ण बालक सुंदर च वाटणार. गीतेमध्यें भगवंतानें सुद्धां समग्र दर्शनाची शिफारस केली आहे. थोड्या ज्ञानानें आम्ही निर्भय होऊं शकत नाहीं. म्हणून केवळ खादीच्या ज्ञानानें काम चालणार नाहीं. जीवनाच्या अन्य सर्व गोष्टींकडे लक्ष द्यावयास पाहिजे.

परंतु ह्या समग्र-दर्शनांत हि एक धोका आहे. ज्याला आम्हीं समग्र म्हणतों ती एक निर्गुणासारखी वस्तु होऊन जाते. मी हें अनुभवानें म्हणत आहें. मीं १०-१२ वर्षांपूर्वीं समग्र-ग्राम-सेवेच्या दृष्टीनें च कार्यकर्त्यांना खेड्यांत कार्य करण्यास पाठविलें होतें. ते विचारूं लागले कीं आम्हांला काय करावयास पाहिजे ? मी काय उत्तर देणार ? मी म्हणालों, बस फिरत जा. "कलिः शयानो भवति, संजिहानस्तु द्वापरः । उत्तिष्ठन् त्रेता भवति, कृतं संपद्यते चरन् ॥" म्हणून श्रुति सांगते कीं चालत रहा. फिरत च

जा. फक्त फिरत राहिलांत तरी सुद्धां सत्याचें दर्शन होईल. तेव्हां ते लोक फिरूं लागले.

कित्येक महिने फिरले. फिरण्याचे फायदे हि त्यांना स्पष्ट दिसूं लागले. चेहऱ्यावर तेज चमकूं लागलें. सत्ययुगाचा परिणाम दिसूं लागला. परंतु असें हि दिसून आलें कीं केवळ समग्रतेच्या अशा प्रकारच्या प्रयोगानें च कांहीं होत नाहीं. आमच्या पूर्वजांनीं सांगितलें आहे कीं "एक साधे सब सधे, सब साधे सब जाय." थोडे दिवस कताई, थोडे दिवस तेलघाणी, थोडे दिवस नई तालीम, या प्रकारें काम केलें तर सर्व विस्कळींत होईल; जसें आकाश. संस्कृतमध्यें आकाशाला शून्य म्हणतात. जो पूर्ण व्यापक बनण्याचा प्रयत्न करील तो शून्य बनेल. म्हणून च एक एक विषयाचें शिक्षण पूर्ण केलें पाहिजे.

आणखी एक गोष्ट अशी कीं श्री. नरहरि भाईंनीं आपल्या भाषणांत सांगितलें कीं येथें तर तुम्हांला दृष्टि मिळेल. पुढें तुम्ही जेव्हां स्वतः काम कराल तेव्हां अधिक अनुभव मिळवूं शकाल. हें बरोबर च आहे. परंतु ही दृष्टि हि तेव्हां च प्राप्त होईल कीं जेव्हा या विद्यालयामध्यें तुम्ही जें कांहीं कराल तें ज्यांची सेवा तुम्हांला करावयाची आहे त्यांच्याशीं एकरूप होऊन कराल. नाहींतर पाण्याबाहेर राहून पोहणें शिकण्यासारखी गोष्ट होईल. पोहण्याचा पूर्ण एनसायक्लोपीडिया, ज्ञानकोश, वाचून हि गंगेंत बुडण्यासारखें तें होईल. म्हणून आमच्या नई तालीम च्या सिद्धान्ताप्रमाणें आम्हांला काम करीत करीत च शिकलें पाहिजे. ज्याप्रमाणें प्रॅक्टिसिंगस्कूल शिवाय ट्रेनिंग कॉलेज चालूं शकत नाहीं, त्याचप्रमाणें प्रत्यक्ष दररोज कांहीं-ना-कांहीं ग्राम-सेवेचें कार्य केल्याशिवाय समग्र-ग्राम-सेवेचें शिक्षण मिळूं शकत नाहीं.

तिसरी गोष्ट एक लहानशी सूचना म्हणून तुम्हांला सांगावयाची आहे. ती ही कीं तुम्ही आज महाराष्ट्रांत येऊन राहिलेले

आहांत आणि येथील भाषा मराठी आहे. म्हणून तुम्हांला मराठी भाषा सुद्धां शिकून घेतली पाहिजे. उर्दू तर तुम्ही शिकाल च. कारण बापूजींनीं त्या बाबत बरें च सांगितलें आहे. हिंदी सुद्धां तुम्ही शिकाल. कारण ती राष्ट्रभाषा आहे. परंतु तुम्ही लोक मराठी शिकत नाहीं. येथें बऱ्या च अखिल भारतीय संस्था आहेत. तामील व केरळ चे लोक हि येथें येत असतात. पण लोकांची भाषा शिकल्याशिवाय इंग्रजांप्रमाणें सेवेच्या नांवावर फक्त मेवा च तुम्ही खाल, पण सेवा करूं शकणार नाहीं. म्हणून आमचें हें कर्तव्य आहे कीं आमच्या आसपासची सुद्धां भाषा आपण शिकावी.

[ खादी-जगत्, नोव्हेंबर १९४५ ]

: १४ :

# अचित्तं ब्रह्म*

श्री........,

तुमचा छापीलवजा अहवाल मिळाला. छापील-वजा म्हणजे छापील-सारखा सुंदर अक्षरांचा व ठराविक सांख्याचा. तुम्ही निरलसपणें दौरे काढत च जातां याबद्दल एखाद्या स्थाणूला हेवा वाटल्याशिवाय राहणार नाहीं. तुमच्या रिपोर्टातील गांवांचीं नावें संख्येच्या नांवाप्रमाणें तुम्हांला पाठ हि झालीं असतील ! जनतेशीं बरा च संपर्क आला म्हणतां, पण मुख्य प्रश्न जनतेच्या हृदयांत ठाव मिळाला का, हा आहे.

पण असा प्रश्न विचारणें सोपें आहे. त्याचें उत्तर होकारार्थी देणें कठिण आहे. तेलगू भाषेंत म्हण आहे, "प्रश्न विचारणारा केव्हां हि शिरजोर च आहे. उत्तर देणारा केव्हां हि कमजोर च आहे." कारण प्रश्न विचारणाराला शब्द पुरतात. उत्तर देणाऱ्याला कार्य लागतें.

अहिंसेचा प्रयोग करूं इच्छिणारांनीं आपल्या मनाचा एक चौकट करून किंचित् भिन्न विचार-प्रवाहांत सांपडलेल्या तरुण कार्यकर्त्यांना टाळून, किंवा त्यांची उपेक्षा करून, चालणार नाहीं. "ब्रह्म तं परादात् यो अन्यत्र आत्मनः ब्रह्म वेद" जो आपल्याहून ब्रह्माला अलग करील त्याला ब्रह्म-आपल्याहून अलग करतें. म्हणून अहिंसक माणूस इतर सर्वांना आपल्या पोटांत घेण्याचा आटोकाट प्रयत्न करील. हिंसक प्रतिपक्ष्यांशीं लढतांना हि तो त्यांना पोटांत घेण्याचा च विचार राखतो. मग इतरांबाबत तर प्रश्न च नाहीं.

माझें जबलपूरचें व्याख्यान 'खादी जगत्' मध्यें आलेलें तुम्हीं बहुधा वाचलें असेल. तरुणांविषयीं माझा विश्वास त्या व्याख्यानांत मीं

---

*एक पत्र

व्यक्त केला आहे. वेदांत एक वाक्य आहे : "अचित्तं ब्रह्म जुजुषुर् युवान:" ज्याचें चिंतन कोणीं केलेलें नाहीं तसलें ब्रह्म तरुणांना आवडतें. दुसऱ्यांनीं चिंतून ठेवलेलें ब्रह्म त्यांना आवडत नाहीं. त्यांना नवीन कल्पना पाहिजे. ठीक च आहे. त्यांचा जन्म नवा आहे. जुनी कल्पना त्यांना कशी चालणार ? पण या जगांत केवळ नवीन असें काय असतें ? सनातन सत्यें जुनीं च असतात. पण तीं च नवीन पोषाख, नवीन रूप, धारण करूं शकतात. आणि तसें झालें म्हणजे तीं नवीन होतात. नवरूपधारिणी शक्ति हें च सनातन सत्याचें सनातनत्व. तो च त्यांचा चिवटपणा. केवळ परिभाषा बदलतां न आल्यामुळें मोठमोठे विचारक मागासलेले जेव्हां मी पाहतों तेव्हां मला त्यांच्या बुद्धीच्या आडमुठेपणाची दया येते. साप कात टाकतो, पुन: ताजा होतो. ही कात टाकण्याची शक्ति ज्या विचारकांत नाहीं, तो विचारक कसला ? तो कर्मयोगी तरी कसला ? वाटल्यास आपण त्याला कर्मठ म्हणूं. कर्मठ चांगला लठ्ठ कर्म करतांना दिसतो, पण वस्तुत: तो कर्म-शून्य च असतो. "ठ" म्हणजे शून्य हें तर आपली वर्णमाला च सांगत आहे !

ज्ञानेश्वरीच्या आरंभीं ज्ञानदेवानें एक हर-गिरिजा-संवाद वर्णिला आहे. गिरिजा विचारते : "गीतेचें रूप कसें आहे ?" शंकर उत्तर देतात : "हे माया-स्वरूपिणी देवी ! जसें तुझें रूप अमुक च म्हणून निर्देशितां येत नाहीं तसें च गीतेचें आहे." "नित्य-नूतन हें देखिजे गीता-तत्त्व." सनातन सिद्धांतांचें असें स्वरूप असलें पाहिजे. अहिंसेला हि तो च न्याय लागू होईल ना !

तुमच्या अहवालाचें निमित्त करून त्याच्याशीं फारसा संबंध नसतांना हें सहज लिहिलें गेलें आहे. या वेळीं माझ्या मनांत चाललेल्या विचार-प्रवाहाचें थोडें दिग्दर्शन ह्यांतून तुम्हांला मिळेल.

[ मराठी हरिजन, ता. २९-१२-४६ ] विनोबाचे प्रणाम

: १५ :

# अयशाचा शक

"शत्रूवर प्रेम करा"–एकूणीसशें शेचाळीस वर्षांपूर्वी एक महात्मा बोलून गेला. मानवाच्या हृदयांत ते शब्द तीरासारखे घुसले. पण मानव ते पचवूं शकला नाहीं. त्यानें त्या महात्म्याच्या नांवानें एक शक च सुरू करून दिला. जो दुसऱ्या कोणावर हि सत्ता चालवूं इच्छीत नाहीं, आणि दुसऱ्या कोणाची सत्ता पत्करीत नाहीं, त्याहून मोठा सत्ताधारी कोण असूं शकेल ? पण हा शक त्या महात्म्याच्या आणि मानवाच्या स्वतःच्या अयशाचा एक मानदंड च झाला आहे.

येशूच्या हि पूर्वी बुद्धानें ही च गोष्ट हिंदुस्थानांत सांगितली : "वैरानें वैर शमत नाहीं. अवैरानें च तें शमूं शकेल." आमचे लोक म्हणाले, ही शिकवण नवीन नाहीं. "तितिक्षन्ते अभिशस्तिर् जनानाम्". सज्जन दुर्जनांचा हल्ला तितिक्षेनें परतवतात, असें वेदांत हि सांगितलें आहे. बुद्ध म्हणाला, "ठीक आहे. माझी शिकवण जुनी च असेल तर निष्ठेनें ती आचरणांत आणा. आणि नवी असेल तर उत्साहानें तिचा अंमल करा !" येशूनें तर साफ च सांगितलें, "मी जुनें मोडायला आलों नाहीं. मी केवळ जीर्णोद्धार करायला आलों आहे. भलेपणा जुना च आहे. त्याच्या जीर्णोद्धाराची मात्र गरज आहे."

"शत्रूवर प्रेम करा"—केवढी कुशल युक्ति ! तो माझा द्वेष करतो, मी त्याच्यावर प्रेम करतों. माझें ठाणें त्याच्या हृदयांत जाऊन बसतें आणि त्याचें माझ्या हृदयावर आक्रमण होत नाहीं. मग त्याच्या च हृदयांत

लढाई सुरू होते आणि माझें हृदय मोकळें राहतें. लढाई शत्रूच्या मुलखांत, आणि मी सुरक्षित ! शत्रूचा नायनाट झाल्याशिवाय गति च नाहीं. ज्ञानदेव विचारतो : "जरी मैत्रें चि वैरी मरे, तरी वायां का बांधावें कटारें ?"

"शत्रूवर प्रेम करा !" केवढें महान् शौर्य ! बळकट हृदयाशिवाय कोण एवढी हिंमत करणार ? पण आम्हांला वाटतें– जो तलवार उपशील तो बलवान्. अरे, जेव्हां तूं तलवार घेतलीस तेव्हां च तूं दुबळा पडलास ! तुकारामानें विनोद केला आहे– "ढाल-तलवारें गुंतले हे कर, म्हणे मी झुंझार कैसा झुंजूं ?"

शस्त्रानें मनुष्य निःशस्त्रावर जोर चालविणार; आपल्याहून मोटा शस्त्रधारी भेटला म्हणजे गळून पडणार ! यांत कोणचें शौर्य ? आपण या महायुद्धांत पाहिलें च ना, कीं ज्या लाखों लोकांनीं शस्त्रें उचललीं, ते च लाखो, शस्त्रें टाकून शरण गेले ! का शरण गेले ? गणितामुळें. समोरच्याच्या पाशीं युद्ध-सामग्री अधिक पाहिली आणि हत्यारें खालीं टेवलीं. आधीं शौर्याचा बाणा धरला, आणि शेवटीं तो सोडून शहाणपणाचा आश्रय केला ! शत्रूवर प्रेम करणारा च शौर्याचा बाणा शेवटपर्यंत टिकवूं शकतो.

"शत्रूवर प्रेम करा" ही विरोधानें विकास करण्याची खरी पद्धति आहे. तो माझा द्वेष करतो, मी त्याचा प्रेमानें प्रतिवाद करतों. त्यातून एकत्वाचा सुसंवाद निर्माण होतो. हा च वेदान्त. कुराणांत म्हटलें आहे, "ज्याच्याशीं तुझी अदालत किंवा दुश्मनी आहे, त्याच्यावर हा मैत्रीचा प्रयोग तूं करून पहा. तुला अनुभव येईल, तो तुझा वैरी नसून प्राण-सखा झाला आहे."

"शत्रूवर प्रेम करायचें, म्हणजे काय पापाचा प्रतिकार च करायचा नाहीं ?" पृच्छा करणाऱ्यानें हें गृहीत धरल्याचें दिसतें कीं पाप नेमकें त्याच्या शत्रूच्या ठिकाणीं आहे, आणि पुण्याची वस्ती त्याच्यापाशीं आहे !

हें खरें नाहीं. पापाचा प्रतिकार जिथें जिथें तें असेल तिथें तिथें अवश्य करावयाचा आहे. त्याचा आरंभ स्वत:पासून; शेवट शत्रूपर्यंत. रोग्यावर प्रेम करायचें म्हणजे रोगावर प्रेम करायचें नसते. रोगनिवारणाचा यत्न हें च रोग्यावरील प्रेमाचें लक्षण.

हें विचारानें पटतें तर खरें, आणि म्हणून च ख्रिस्त्यांनीं येशूचा शक चालविला आहे. म्हणून च कुराणाची मुसलमानांवर सत्ता आहे. म्हणून च हिंदुस्थानांत वेदान्त गाजतो आहे. म्हणून च चिनी जपानी आपणाला बुद्धाचे अनुयायी म्हणवीत आहेत. पण या शिकवणीचा अंमल मात्र कुठें च नाहीं. असें का ?

याच्या कारणाचें नीट शोधन झालें पाहिजे. इतक्या सर्व धर्मांचे लोक अहिंसेची शिकवण देणाऱ्या त्या त्या धर्म-पुरुषांविषयीं पूज्य-भाव राखतात, त्या त्या धर्मांचे अनुयायी आपणास म्हणवतात, आणि त्या प्रमाणें व्यवहार करतांना दिसत नाहींत. तर काय हे सारे च लोक ढोंगी म्हणावयाचे ? मानव-समाजाविषयीं अशी कल्पना करणें योग्य नाहीं. म्हणून या चमत्काराची कारण-मीमांसा झाली पाहिजे.

कारणे अनेक सांपडतील, पण मुख्य कारण मला हें वाटतें कीं ही सारी शिकवण व्यक्तीपुरती ठीक असली तरी समाजाला ती लागू होऊं शकत नाहीं अशी लोकांची समजूत आहे. "व्यक्तीपुरती ठीक म्हणता, तर व्यक्तिगत जीवनांत तरी तसें आचरण होत आहे का ?" असें कोणी विचारील ? त्याचें उत्तर असें दिलें जाईल कीं तसा प्रयत्न मनुष्याचा थोडा-फार असतो. तो नीट साधत नाहीं हा त्याचा दुबळेपणा आहे. हा त्याचा दुबळेपणा तो कबूल करील. पण सामाजिक जीवनांत मात्र ही शिकवण त्याच्या बुद्धीला च अजून तितकीशी पटलेली नाहीं. सामाजिक विनियोगाविषयीं अजून त्याला शंका आहे.

"एका त्रिकोणांत सिद्धान्त सिद्ध झाला खरा, पण तो सर्व च त्रिकोणांना कसा लागू होईल ?" अशी शंका भूमितीच्या विद्यार्थ्याला येत नाहीं. पण अहिंसेच्या बाबतींत अशी शंका धर्म-निष्ठाला हि अजून येते. ती शंका निवृत्त झाल्याशिवाय, सत्पुरुषांचें आम्ही अनुवर्तन करणार नाहीं. आदर करूं. त्यांचा जन्मोत्सव करूं. त्यांचा शक चालवूं. त्यांच्या नांवाचा जयजयकार करूं. त्यांचे अनुयायी म्हणवून घेऊं. पण त्यांचे अनुयायी होणार नाहीं. त्यांच्या नांवानें मारामाऱ्या हि करूं. आणि यांत कांहीं विसंगति हि आम्हांला वाटणार नाहीं.

[ मराठी हरिजन, ५ जानेवारी १९४७ ]

: १६ :

# नित्याचीं कामें आणि संप

बनारसचे एक विद्यार्थी लिहितात :

"काशी हिंदु विश्व-विद्यालयांतील मजुरांचा एक संघ आहे. गेल्या वर्षीं या संघानें मजुरांचा एक संप घडवून आणला होता—वेतनवाढ आदि कारणासाठीं. मजुरांच्या संपामुळें छात्रालय आणि अध्यापक-निवास यांतील पायखान्यांची सफाई होऊं शकली नाहीं. इतर हि आवश्यक कार्यें अटकून पडलीं. घाण पसरूं लागली. शेवटीं विद्यार्थ्यांनीं सफाई आदि काम आपल्या हातीं घेतलें. विद्यार्थी-काँग्रेसनें त्या वेळीं संपाशीं सहकार्य न केल्यामुळें पुढें संप बंद पडला. या वर्षीं पुन: १४ फेब्रुवारीपासून संपाची तयारी चालली आहे असें कळतें. संप पुष्कळ दिवस चालेल अशी कल्पना असून तो सफल होईल अशी आशा हि केली जाते; कारण विद्यार्थी-काँग्रेसचें यावेळीं संपाला पूर्ण सहकार्य लाभलें आहे. संप म्हटला म्हणजे पूर्वींप्रमाणें च पायखाना सफाई इत्यादि कामें अडकून पडतील आणि रोग हि फैलावण्याचा संभव राहील. प्लेग तर इथें आधींचा च आहे. आता गेल्या वर्षींप्रमाणें जर विद्यार्थी कामें करूं लागतील तर संपाला अडथळा आणण्यासारखें होईल. विद्यार्थ्यांनीं कामें न केलीं तर आरोग्य-हानि होईल. अशा वेळीं काय कर्तव्य ?"

कर्तव्य उघड च आहे. स्वच्छता आदि आवश्यक कार्यें विद्यार्थ्यांनीं करायला च पाहिजेत. विद्यार्थी नेहमीं च हीं कामें करीत जातील तर विद्यालयाचें वातावरण उंच होईल. पण नेहमीं अशीं कामें विद्यार्थी,

शिक्षणाची योग्य दृष्टि न लाभल्यामुळें, करीत नाहींत, तर निदान अशा अडचणीच्या वेळीं तरी ती करायला च पाहिजेत. संप योग्य कारणांसाठीं असेल तर त्याशीं सहानुभूति दाखवण्याचे दुसरे अनेक मार्ग मोकळे आहेत. विचारानें ते सुचण्यासारखे आहेत. शिक्षण-संस्थेंतील मजुरांना संप करण्याची पाळी च येतां कामा नये. विद्यार्थ्यांनीं मजुरांच्या जीवनाशीं थोडी हि समरसता दाखविल्यास अशी स्थिति निर्माण करणें त्यांना अशक्य नाहीं.

[ मराठी हरिजन, ता. १६-२-४७ ]

: १७ :

# ग्राम-सेवा आणि ग्राम-धर्म

जेव्हां आम्ही सेवा करण्याच्या उद्देशानें खेड्यांत जातों तेव्हां आम्हांला हें सुचत नाहीं कीं कार्य कशा प्रकारें सुरू करावें. आम्हांला शहरांत रहायची संवय लागली आहे. खेड्यांची सेवा करण्याची इच्छा हें च आमचें भांडवल, आमची पुंजी असते. आतां प्रश्न असा उपस्थित होतो कीं एवढ्या थोड्या भांडवलावर व्यापार कशा तऱ्हेनें सुरू करावा. माझी सल्ला म्हणाल तर अशी आहे कीं आम्हीं खेड्यांत जाऊन तेथील लोकांची व्यक्तिशः सेवा करण्याकडे लक्ष दिलें पाहिजे, सर्व समाजावर लक्ष ठेवूं नये. सर्व समाजाजवळ पोचणें संभव हि नाहीं. रणभूमीवर लढणाऱ्या सैनिकांस जर आम्हीं विचारलें कीं तूं कोणाबरोबर लढतोस, तर तो म्हणेल कीं 'शत्रूबरोबर;' परंतु प्रत्यक्ष लढतांना तो आपला नेम कुणा एका विशिष्ट व्यक्तीवर धरतो. अगदीं अशा च प्रकारें आम्हांला सेवाकार्य केलें पाहिजे. समाज अव्यक्त आहे, पण त्यातील व्यक्ति व्यक्त आणि स्पष्ट आहेत. त्यांची सेवा आपण करूं शकतों. डॉक्टरजवळ जितके रोगी जातात, त्या सर्वांना तो औषध देतो. पण प्रत्येक रोग्याकडे त्याचें लक्ष नसतें. प्रोफेसर सर्व वर्गाला शिकवतो, पण प्रत्येक विद्यार्थ्याकडे त्याचें लक्ष नसतें. अशा प्रकारच्या सेवेनें फारसा लाभ होऊं शकत नाहीं. हा डॉक्टर जेव्हां कांहीं रोग्यांच्या वैयक्तिक संपर्कांत येईल, किंवा प्रोफेसर जेव्हां कांहीं निवडक विद्यार्थ्यांवर च आपलें लक्ष केंद्रित करील, तेव्हां च वास्तविक लाभ होऊं शकेल. होय, आम्हांला हें जरूर लक्षांत ठेवलें पाहिजे कीं व्यक्तीची सेवा करतांना अन्य व्यक्तीची हिंसा नाश किंवा हानि होऊं नये. खेड्यांत जाऊन अशा प्रकारें जर कोणी कार्यकर्ता फक्त २५ व्यक्तींची सेवा करूं शकला, तर त्यानें समजावें कीं आपण

पुष्कळ काम केलें. ग्राम-जीवनामध्यें प्रवेश करण्याचा हा च सुलभ आणि सफल मार्ग आहे. मला स्वतःला अनुभव आहे कीं ज्यांनीं माझी व्यक्तिगत सेवा केली आहे, त्यांनीं माझ्या जीवनावर अधिक प्रभाव टाकला आहे. बापूजींचे लेख मला कमी च आठवतात, परंतु त्यांनीं आपल्या हातानें वाढलेल्या भोजनाची मला नित्य आठवण येते. आणि मी असें मानतों कीं त्यामुळें माझ्या जीवनांत बरें च परिवर्तन झालें आहे. हा वैयक्तिक सेवेचा प्रभाव होय. व्यक्तींच्या सेवेमध्यें सामाजिक सेवेचा निषेध नाहीं. गीतेच्या भाषेंत समाज अनिर्देश्य आहे, निर्गुण आहे; व्यक्ति सगुण आणि साकार आहेत. म्हणून व्यक्तींची सेवा करणें सोपें आहे.

आणखी एक दुसरी सूचना मला करावयाची आहे. आम्हाला खेडुतांच्या समोर राष्ट्र-धर्माची कल्पना न ठेवतां ग्राम-सेवेची कल्पना ठेवली पाहिजे. त्यांच्या पुढें राष्ट्रधर्माच्या गोष्टी केल्यानें लाभ होणार नाहीं. ग्राम-धर्म त्यांना जितका स्वाभाविक व सहज आहे, तितका राष्ट्र-धर्म नाही. म्हणून आम्हांला त्यांच्या समोर ग्राम-धर्म च ठेवला पाहिजे, राष्ट्र-धर्म नव्हे. वर सांगितली आहे ती च गोष्ट येथें लागू आहे. ग्राम-धर्म सगुण साकार व प्रत्यक्ष असतो. राष्ट्र-धर्म निर्गुण निराकार व परोक्ष असतो. मुलांसाठीं त्याग करणें आईला शिकावें लागत नाहीं. आपसांतील भांडणें मिटविणें, गांवची स्वच्छता व स्वास्थ्य यांकडे ध्यान देणें, आयात-निर्यातीच्या वस्तु आणि खेड्यांतील ग्रामीण जुने उद्योग यांचें परीक्षण करणें, नवीन उद्योग शोधून काढणें वगैरें गांवच्या जीवन-व्यवहाराशीं संबंध ठेवणारी प्रत्येक गोष्ट ग्राम-धर्मांत येते. जुनी पंचायत-पद्धति नष्ट झाल्यानें खेड्यांची फार हानि झाली आहे. भांडण-तंटे मिटवण्यांत पंचायतीचा अधिक उपयोग होत होता. आतां ह्या असेंब्लीच्या निवडणुकीमुळें आम्हांला कळून आलें आहे कीं खेडूतांना राष्ट्र-धर्म समजाविणें किती कठिण झालें आहे. सरदार वल्लभभाई पटेल आणि पंडित मालवीयजी यांच्यांत मतभेद झाला !

आतां यांत बिचारा खेडूत समजणार तर काय समजणार ? त्याच्या मनांत दोन्ही हि नेते समान पूज्य आहेत. त्यांनीं कोणास मानावें आणि कोणास सोडावें ? याकरितां ग्रामसेवेंत आम्हांला ग्राम-धर्म च आपल्या समोर ठेवला पाहिजे. वैदिक ऋषींच्याप्रमाणें आमची हि प्रार्थना ही च असावयास पाहिजे कीं "ग्रामे अस्मिन् अनातुरम्" आमच्या गांवांत आजार न होवो !

तिसरी गोष्ट जी मला सांगावयाची आहे ती सेवकांचे वागणुकी-संबंधीं होय. सेवकाच्या आवश्यकता खेड्यांतील लोकांपेक्षां अधिक असल्या तरी तो ग्राम-सेवा करूं शकतो. पण त्याच्या त्या आवश्यकता सजातीय असल्या पाहिजेत, विजातीय नसाव्यात. एखाद्या सेवकाला दुधाची आवश्यकता आहे व दुधाशिवाय त्याचें काम चालूं शकत नाहीं, आणि खेड्यांतील लोकांना तर दूध-तूप आजकाल मिळत नाहीं. तरी सुद्धां खेडयांत राहून तो दूध घेऊं शकेल. कारण दूध हें सजातीय म्हणजे खेडयांत च उत्पन्न होणारी वस्तु आहे. परंतु सुगंधित साबण खेड्यात तयार होणारी वस्तु नाहीं, म्हणून साबण ही विजातीय आवश्यकता समजली पाहिजे आणि सेवकांनीं त्याचा उपयोग करूं नये. कपडे स्वच्छ ठेवण्याची च गोष्ट घ्या. खेडयातील लोक आपले कपडे मळके ठेवतात, परंतु सेवकानें तर त्यांना कपडे साफ ठेवण्यास सांगितलें पाहिजे. याकरितां बाहेरून साबण मागवणें व प्रचार करणें मला योग्य वाटत नाहीं. खेड्यांमध्यें कपडे साफ ठेवण्याकरितां जीं साधनें उपलब्ध आहेत किंवा होऊं शकत असतील त्यांचा च उपयोग करून कपडे साफ ठेवणें व लोकांना त्या विषयासंबंधीं समजावून सांगणें हा सेवकाचा धर्म होतो. खेड्यांत मिळूं शकणाऱ्या साधनांपासून च जीवनाच्या आवश्यकतेची पूर्ति करण्याकडे त्याची नित्य दृष्टि असली पाहिजे. सजातीय वस्तूंचा उपयोग करण्यांत हि सेवकाला विवेक आणि संयम यांची आवश्यकता तर राहते च. वृत्त-पत्राची हौस खेड्यांत पूर्ण होऊं शकणार नाहीं.

मला ज्या खास गोष्टी येथें सांगावयाच्या होत्या त्या मीं सांगून टाकल्या आहेत. आतां आणखी दोन-तीन गोष्टी सांगून मी आपलें भाषण संपविणार.

खादी-प्रचाराच्या कार्यांत आतां पावेतों चरख्याचा च उपयोग झाला आहे. एक लाख बक्षीस असणाऱ्या चरख्याचें संशोधन होत आहे. मी तर त्याला लाखाचा चरखा म्हणतों. पण माझ्या जवळ एक सव्वा लाखाचा चरखा आहे, आणि तो म्हणजे तकली. मी खरोखर च तिला सव्वा लाखाचा चरखा मानतों. खादी-उत्पत्तीकरितां चरखा उत्तम आहे, पण सार्वजनिक वस्त्र-स्वावलंबनाकरितां तकली च उपयोगी आहे. नदीचें पात्र किती हि मोठें कां असेना, तें पावसाचें काम करूं शकत नाहीं. नदीचा उपयोग तर नदीच्या कांठावर राहणारे लोक करूं शकतात. पण पाऊस सर्वांसाठीं आहे. तकली पावसासारखी आहे. जेथें ती चालेल, तेथें वस्त्र-स्वावलंबनाचें कार्य चांगल्या प्रकारें चालेल. मला बिहारचे एक गृहस्थ सांगत होते कीं तेथें मजूरीकरितां ही तकलीचा उपयोग करण्यांत येत आहे. तकलीवर सूत कांतणाऱ्याला तेथें आठवड्यास ३-४ पैसे मिळूं शकतात. परंतु त्यांची कांतण्याची जी गति आहे ती तीन किंवा चार गुंड्यांपर्यंत वाढूं शकते. गति वाढविल्यानें मजूरी हि तीन किंवा चार अथवा पांच पटी पर्यंत मिळूं शकेल. ही कांही सामान्य गोष्ट नाहीं. आपल्या देशांत एका व्यक्तीस १४-१५ वार कापडाची गरज असते. ह्याकरितां दररोज फक्त १०० तार कांतण्याची आवश्यकता आहे ! हें काम तकलीवर अर्ध्या तासांत होऊं शकतें. चरखा बिघडत हि राहतो, पण ही तकली तर नेहमीं च तुमच्या सेवेस हजर राहते. म्हणून च मी तिला सव्वा लाखाचा चरखा म्हणतों.

खेड्यांत सफाईचें काम करणारे सेवक म्हणतात कीं खेड्यांत कित्येक दिवसपर्यंत हें च सफाईचें काम करीत राहिलों तरी हि तेथील लोक आम्हांला मदत करीत नाहींत. ही तक्रार बरोबर नाहीं. स्वधर्म समजून च जर आम्हीं

हें काम करीत राहिलों असतां एकटे च राहिलों तरी त्याचें दुःख आम्हांला होणार नाहीं. सूर्य एकटा च असतो ना? हें माझें काम आहे, दुसरे करोत किंवा न करोत, मला तर आपलें काम केलें च पाहिजे—असें समजून जो सेवक कार्याचा आरंभ करील त्याला सिंहावलोकन करण्याची म्हणजे हें पाहण्याची कीं माझ्यामागें मदतीकरितां कोणी दुसरा आहे किंवा नाहीं, याची गरज च राहणार नाहीं. सफाईसंबंधीं सेवा ही अशी वस्तु आहे कीं तिनें व्यक्तीपेक्षां समाजाची च अधिक सेवा होईल व व्हावी. परंतु सेवकाची दृष्टि अशी असली पाहिजे कीं दुसरे लोक आपआपली जबाबदारी ओळखत नाहींत, म्हणून ती पूर्ण करणें हें आपलें कर्तव्य ठरतें. त्यांत सेवकाचा स्वार्थ हि आहे; कारण रस्त्यांतील घाणीचा परिणाम त्याच्या स्वास्थ्यावर हि अवश्य पडत असतो. औषधि-वितरणांत एका गोष्टीचें नित्य ध्यान ठेवावयास पाहिजे कीं आम्ही आपल्या कार्यानें खेड्यांतील लोकांना पंगु तर बनवीत नाहीं ना? त्यांना तर स्वावलंबी करायचें आहे. त्यांना स्वाभाविक व संयमशील जीवन आणि नैसर्गिक उपचार शिकविले पाहिजेत. रोगांवर औषधि देण्याऐवजीं रोग च होऊं नयेत अशी खबरदारी घेतली पाहिजे. हें कार्य खेडुतांना चांगल्या व स्वच्छ सवई लावण्यानें च होऊं शकतें.

[ विनोबा के विचार भाग १ ]

## : १८ :

# शिक्षकांची अवहेलना

आमच्या प्रांतांतील प्राथमिक शिक्षकांची चाललेली दैना पाहून एक मित्र तळमळून लिहितात :

" पुढाऱ्यांनीं दिलेल्या आश्वासनावर विश्वसून शिक्षकांनीं संप बिनशर्त मागें घेतला. त्यानंतर सर्व शिक्षक कामावर गेले. त्या गोष्टीला तीन महिने होऊन गेले. ठरल्याप्रमाणें सर्व व्यवस्थेशीर व्हायला पाहिजे होतें, पण चालू प्रकार पाहतां शिक्षकांचे हालहाल करण्याचा जणूं योजनापूर्वक प्रयत्न चालू आहे, असें वाटूं लागतें. सर्व शिक्षकांना अजून कामावर घेतलें नाहीं. सर्वांचा पगार देण्यांत आला नाहीं. पुढील नोकरीची त्यांना शाश्वती नाहीं. अजून कांहींना संपापूर्वींचा, म्हणजे फेब्रुवारीचा हि, पगार मिळाला नाहीं. विचार करा, एवढी महागाई असतांना चार महिन्यांपासून ज्यांना पगार नाहीं त्याना काय वेदना होत असतील ? शिक्षकांवर होत असलेल्या या अन्यायाबद्दल आपण कांहीं च बोलणार नाहीं काय ? आपल्या मौनानें आपण या सर्वाला संमति दिल्यासारखें होत नाहीं काय ? "

एका विस्तृत पत्राचा हा संक्षिप्त व अतिसौम्य सारांश आहे. सदर मित्रानें यापूर्वी दोन-तीन पत्रें लिहून माझा अभिप्राय मीं प्रगट करावा अशी मागणी केली होती. मी सबूरी राखून होतों. कारण गाऱ्हाणें लवकर दूर होईल अशी माझी अपेक्षा होती. दरम्यान अगदीं जवळचें कर्तव्य म्हणून माझी नेहमींची तटस्थता बाजूस सारून हि वर्धा डिस्ट्रिक्ट कौंसिल कडून या बाबतींतील त्यांची बाजू समजून घेण्याचा मीं प्रयत्न केला. पण दुर्दैवानें त्यांत मला यश आलें नाहीं. म्हणून या पत्राला मी आज प्रसिद्धि

देत आहें. मला जी कांहीं माहिती मिळाली आहे, तीवरून शिक्षकांच्या बाबतींत जें वर्तन केलें जात आहे तें अन्यायाचें, बेदरकारीचें आणि अधिकार-मदाचें सूचक आहे, असें माझें मत झालें आहे. प्रांतिक सरकारचा निर्णय डिस्ट्रिक्ट कौंसिलांनीं निरुपयोगी करून टाकला आहे. या बाबतींत डिस्ट्रिक्ट कौंसिलें स्वतंत्र आहेत असें म्हणून प्रांतिक सरकारनें स्वस्थ बसण्यासारखी ही बाब नाहीं.

देशांत हिंसेचा वणवा पेटला तरी शिक्षकांनीं मनावर घेतल्यास ते तो शमवूं शकतात, असे उद्गार नुकते च एका प्रसंगीं गांधीजींनीं काढले. गोष्ट खरी आहे. शिक्षकांचा खेडोपाडीं प्रवेश आहे आणि एकेका खेड्यांत ते अहिंसेचें राज्य, म्हणजे लोकराज्य, स्थापूं शकतात. पण एवढी अपेक्षा ज्यांच्यापासून करायची त्यांची अशी उपेक्षा केलेली कशी चालेल? समाजाचा सर्वोत्तम ठेवा म्हणजे लहान मुलें. हीं ज्यांना आपण सोंपवितों, त्यांना विपन्नावस्थेंत ठेवणें, अपमानित करणें, म्हणजे स्वराज्याचा पाया च उखडून टाकण्यासारखें आहे. मला अशी आशा आहे कीं हा अक्षम्य अन्याय लवकरांत लवकर दूर केला जाईल.

[ मराठी हरिजन, १-६-१९४७ ]

: १९ :

# श्रमजीविका

"ब्रेड-लेबर" म्हणजे "भाकरीसाठीं मजूरी" हा शब्द आपल्या-पैकीं पुष्कळांनीं नव्यानें च ऐकला असेल. पण हा नवीन नाहीं. टॉल्-स्टायनें या शब्दाचा उपयोग केला आहे. त्यांनीं हि हा शब्द बादरेसा नांवाच्या एका लेखकाच्या निबंधांतून घेतला आणि आपल्या उत्तम लेखन-शैलीनें तो जगासमोर ठेवला. मीं हा विषय जाणूनबुजून निवडला. शिक्षण-शास्त्राचा अभ्यास करीत असून हि या विषयाचा तुम्हीं कदाचित् विचार केला नसेल. म्हणून या विषयावर बोलण्याचें मीं ठरविलें. या विषयावर केवळ विचार च नव्हे पण त्याप्रमाणें च आचार करण्याचा प्रयत्न मी वीस वर्षांपासून करीत आलों आहें. कारण जीवनांत आणि त्याबरोबर च शिक्षणांत हि शरीर-श्रमाला मी प्रथम स्थान देतों.

आपल्याला माहीत आहे कीं हिंदुस्थानची लोकसंख्या पस्तीस कोट आहे आणि चीनची चाळीस-पंचेचाळीस. हे दोन्ही देश प्राचीन आहेत. हे दोन्ही मिळविले तर एकूण लोकसंख्या ८० कोट पर्यंत होते. ही इतकी लोकसंख्या जगांतील सर्वांत मोठा आणि महत्त्वाचा भाग होतो. आणि हें हि आम्ही पाहतों कीं दोन्ही देश आज जगांत सर्वांत जास्त दुःखी, पीडलेले आणि दीन आहेत. याचें कारण असें आहे कीं या दोन्ही देशांनीं वृत्तीचा जो आदर्श आपल्या समोर ठेवला होता तो त्यांनीं पूर्णपणें अमलांत आणला नाहीं. आणि बाहेरच्या देशांनीं त्या वृत्तीचा स्वीकार च केला नाहीं. माझ्या म्हणण्याचा आशय असा कीं हिंदुस्थानांत शरीर-श्रमाला प्रथम स्थान दिलें होतें. आणि त्या बरोबर च असें ठरविलें होतें कीं ते श्रम कसा हि प्रकारचे

असोत—कांतण्याचें, सुतारीचें, स्वयंपाकाचें—सर्व समान आहेत. भगवद्-गीतेंत ही गोष्ट स्पष्ट शब्दांत सांगितली आहे. ब्राह्मण असो, क्षत्रिय असो, वैश्य असो अथवा शूद्र असो, कोणाला कसें हि लहान अथवा मोठें काम मिळालें असेल, परंतु जर त्यानें तें काम चांगल्या प्रकारें केलें असेल तर त्या व्यक्तीला संपूर्ण मोक्ष मिळतो. आतां यापेक्षां जास्त कांहीं सांगायचें उरत नाहीं. तात्पर्य हें कीं प्रत्येक उपयोगी श्रमाचें नैतिक, सामाजिक आणि आर्थिक मूल्य एक च आहे. या प्राचीन धर्माचें आचरण तर आम्हीं केलें च नाहीं पण एक मोठा शूद्रवर्ग निर्माण केला. शूद्रवर्ग म्हणजे मजूरी करणारा वर्ग. येथें जितका मोठा शूद्र वर्ग आहे तितका मोठा क्वचित् च दुसरीकडे असेल. आम्ही त्यांच्याकडून जास्तींत जास्त मजूरी घेतली आणि त्याला कमींत कमी खायला दिलें. त्याचा सामाजिक दर्जा हि लक्षांत घेतला नाहीं. त्याला कांहीं च शिक्षण दिलें नाहीं. इतकें च नाहीं, पण त्याला अस्पृश्य हि ठरविलें. परिणाम असा झाला कीं कारागीर-वर्गांत ज्ञानाचा पूर्ण अभाव राहिला. तो पशूंप्रमाणें केवळ मजूरी च करीत राहिला.

प्राचीन काळीं आमच्या येथें कला कमी नव्हती. पण पूर्वजांपासून मिळणारी कला एक गोष्ट आणि तींत दररोज प्रगति करणें दुसरी गोष्ट. आज हि पुष्कळ प्राचीन कौशल्य दिसून येतें. तें पाहून आम्हांला आश्चर्य वाटतें. आपली प्राचीन कला पाहून आम्हाला आश्चर्य वाटतें, हें च सर्वांत मोठें आश्चर्य आहे. आश्चर्य करण्याचा प्रसंग आमच्या समोर कां यावा? त्याच पूर्वजांचे आम्ही वंशज आहोंत ना! तर मग त्यांच्यापेक्षां श्रेष्ठ आमची कला असायला पाहिजे. परंतु आज आश्चर्य करण्याशिवाय आमच्या हातांत कांहीं च राहिलें नाहीं. हें कसें झालें? कारागिरांत ज्ञानाचा अभाव आणि आमच्यांत श्रमाच्याप्रतिष्ठेचा अभाव च याचें कारण आहे.

प्राचीन काळीं ब्राह्मण आणि शूद्र यांची समान प्रतिष्ठा होती. जो ब्राह्मण होता तो विचार-प्रवर्तक, तत्त्वज्ञानी आणि तपश्चर्या करणारा होता.

जो शेतकरी होता तो प्रामाणिकपणें मजूरी करीत होता. सकाळीं उठून देवाचें स्मरण करून सूर्योदयाबरोबर शेतांत कामाला लागत असे आणि संध्याकाळीं सूर्यदेव जेव्हा आपल्या किरणांना काढून घेत तेव्हां त्यांना नमस्कार करून घरीं येत असे. ब्राह्मण आणि शेतकरी यांत कांहीं च सामाजिक, आर्थिक अथवा नैतिक भेद मानला जात नव्हता.

आम्हांला माहीत आहे कीं पूर्वींचे ब्राह्मण "उदर-पात्र" होते, म्हणजे तितकें च संचय करीत जितकें पोटाला लागतें.

इतकें त्यांचें अपरिग्रही आचरण होतें. आजच्या भाषेंत सांगायचें झाल्यास ते जास्तींत जास्त काम देत आणि त्याच्या मोबदल्यांत कमींत कमी वेतन घेत. ही गोष्ट आम्हांला प्राचीन इतिहासावरून कळून येते. परंतु नंतर उंच-नीच हा भेद निर्माण झाला. कमींत कमी मजूरी करणारा उच्च दर्जाचा आणि कोणत्या हि प्रकारची मजूरी करणारा हलक्या दर्जाचा मानला गेला. त्याची योग्यता कमी, त्याला खाण्याकरितां कमी आणि त्याची प्रगति व ज्ञान मिळवायची व्यवस्था हि कमी.

प्राचीन काळीं न्यायशास्त्र, व्याकरणशास्त्र, वेदांतशास्त्र इत्यादि अध्ययनाचा उल्लेख आम्ही ऐकतों. गणितशास्त्र वैद्यकशास्त्र, ज्योतिषशास्त्र इत्यादि शास्त्रांच्या पाठशाळेचा उल्लेख हि दिसतो. पण उद्योगशाळेचा उल्लेख कुठें च दिसत नाही. याचें कारण हें आहे कीं आम्ही वर्णाश्रम-धर्म मानणारे होतों, म्हणून प्रत्येक जातीचा धंदा त्या त्या जातीच्या घराघरांत चालत होता आणि अशा प्रकारें प्रत्येक घर उद्योगशाळा होतें. कुंभार असो अथवा सुतार, त्याच्या घरांत मुलांना बालपणापासून च त्या धंद्याचें शिक्षण त्याच्या वडिलाकडून मिळत असे. त्याकरितां अलग व्यवस्था करण्याची गरज नव्हती. परंतु पुढें झालें काय कीं एकीकडे आम्हीं मान्य केलें कीं वडिलांचा च धंदा मुलानें केला पाहिजे, आणि दुसरीकडे बाहेरून आलेला माल स्वस्त मिळूं लागला आम्ही म्हणून तो च विकत घेऊं लागलों. मला कधीं कधीं

सनातनी बंधूंशीं चर्चा करण्याची संधि मिळते. मी त्यांना म्हणतों कीं वर्णाश्रम-धर्म नष्ट होत आहे याचें जर तुम्हांला दुःख होत असेल तर कमींत-कमी स्वदेशी धर्माचें पालन करा. विणकराला तर मी म्हणेन कीं तुझ्या वडिलाचा धंदा करणें तुझा धर्म आहे, पण त्यानें बनविलेला कपडा मी घेणार नाहीं तर वर्णाश्रम-धर्म कसा जिवंत राहूं शकेल ? आमच्या या वृत्तीमुळें उद्योग गेला आणि उद्योगाबरोबर च उद्योगशाळा हि गेल्या. याचें कारण हें च कीं आम्हीं शरीर-श्रमाला नीच मानलें. जो मनुष्य कमींत-कमी श्रम करतो तो च आज सर्वांत अधिक बुद्धिमान् आणि नीतिमान् समजला जातो.

आज च सकाळीं गोष्टी झाल्या. कोणीसें म्हटलें, "आतां विनोबाजी शेतकऱ्यासारखे दिसतात." तर दुसरा म्हणतो, "पण जोंवर त्यांचें धोतर पांढरें आहे तोंवर ते पूर्ण शेतकरी नाहींत." या विधानात एक दंश होता. शेती आणि स्वच्छ धोतर यांचें उभें वैर आहे, या धारणेंत दंश आहे. जे आपल्याला वरच्या दर्जाचे समजतात त्याना हा अभिमान असतो कीं आपण फार स्वच्छ राहतों, आपले कपडे अगदीं शुभ्र, बगळ्याच्या पंखासारखे असतात. त्यांचा हा सफाईचा अभिमान खोटा आणि कृत्रिम आहे. त्यांच्या शरीराची डॉक्टरी परीक्षा—मी मानसिक परीक्षेची गोष्ट तर सोडून च देतों—केली जावी आणि आमच्या श्रमिकांच्या शरीरांची हि परीक्षा केली जावी आणि दोन्ही परीक्षांचा निकाल डॉक्टरनें द्यावा आणि सांगावें कीं कोण जास्त स्वच्छ आहे. आम्ही लोटा घासतों तर तो बाहेरून च. त्यांत आपलें तोंड पाहून घ्यावें. पण आतून घासण्याची आम्हांला गरज च भासत नाही. आम्हांला आंतल्या गोष्टीची कांहीं किंमत च नसते. आपली स्वच्छता केवळ बाह्यांगी आणि दिखाऊ असते. आम्हांला शंका येते कीं शेतांत राबणारा शेतकरी कसा स्वच्छ राहूं शकतो. परंतु मातींत अथवा शेतांत काम करणाऱ्या शेतकऱ्याच्या कपड्यावर जो मातीचा रंग लागतो तो मळ नसतो. पांढऱ्या सदऱ्या ऐवजीं एखाद्यानें लाल सदरा

घातला तर त्याला रंगीत कपडा समजतात. तसा च मातीचा हि एक रंग असतो. रंग आणि मळ यांत बराच फरक आहे. मळांत जंतु असतात, घाम असतो, त्याचा दुर्गंध येतो. माती तर 'पुण्यगंध' असते. गीतेंत लिहिलें आहे, "पुण्यो गंधः पृथिव्यां च." मातीचें च शरीर आहे आणि मातींत च मिळणारें आहे. त्याच मातीचा रंग शेतकऱ्याच्या कपड्यावर आहे. तर तो मळ कसा ? परंतु आम्हांला तर अति शुभ्र, कापूस जितका शुभ्र असतो त्यापेक्षां हि जास्त शुभ्र कपडे वापरण्याची संवय झालेली आहे. जणूं कांहीं 'व्हाइट वॉश' च केला. त्याला आम्ही स्वच्छ म्हणतों. आमची भाषा च विकृत झाली आहे.

आमच्या उच्चार-पद्धतीचा हि असा च खोटा च अभिमान आम्हांला वाटतो. खेडवळ लोक जे उच्चार करतात त्याला आम्ही अशुद्ध म्हणतों. परंतु पाणिनि म्हणतो कीं सर्वसामान्य जनता जो बोली बोलते तें च व्याकरण आहे. तुलसीदासांनीं रामायण सर्व जनतेसाठीं लिहिलें. त्याना माहीत होतें कीं खेडवळ लोक 'ष', 'श', आणि 'स' च्या उच्चारांत फरक करीत नाहींत. सर्वसाधारण लोकांच्या बोलींत लिहिण्यासाठीं रामायणात त्यांनीं सर्व ठिकाणीं 'स' च लिहिला. ते नम्र झाले. त्यांना तर सर्वसामान्य जनतेला रामायण शिकवायचें होतें. तर मग उच्चार हि त्यांचे च हवेत. परंतु आजच्या शिकल्या सवरल्या लोकांनीं तर मजूरांना बदनाम करण्याचा निश्चय केला आहे.

आमच्या पैकीं कोणी गीता-पाठ भजन आणि जप करतो, अथवा कोणी उपनिषद्-पाठ करतो, तर तो मोठा महात्मा समजला जातो. जप, संध्या, पूजा च धर्म मानला जातो. परंतु दया सत्य आणि श्रम यांवर आमची श्रद्धा नसते. जो धर्म बेकार टाकाऊ व अनुत्पादक असतो, तो च आम्ही खरा धर्म समजतों. ज्यामुळें उत्पादन होतें, तो कसा खरें धर्म असूं शकतो ? भक्ति आणि उत्पत्ति यांचा मेळ कधीं बसूं शकतो ? परंतु आम्ही वेदांत वाचतों— "विश्वाची निर्मिति करणाऱ्याला कांही कृति

अर्पण करा. त्यानें सृष्टीचा मार्ग दाखविला, त्याचें अनुसरण करा." परंतु आमची साधुत्वाची कल्पना याच्या उलट आहे. एक ब्राह्मण शेतांत खोदण्याचें काम करीत आहे अथवा नांगर चालवीत आहे, असा फोटो जर कोणीं काढला तर तो फोटोग्राफर पागल समजला जाईल. "काय, ब्राह्मण देखील मजूरासारखा काम करतो ? हा प्रश्न आमचे येथें निर्माण होऊं शकतो ?" "काय तत्त्वज्ञानी हि खातो ? असा प्रश्न केला जात नाहीं. तो आनंदानें खाऊं शकतो. ब्राह्मणाला भोजन देणें च आम्ही आमचा धर्म समजतों, तें च पुण्य मानतों.

हिंदुस्थानची संस्कृति इथपर्यंत खालावली म्हणून परदेशीय लोकांनीं या वरच्या लोकांना बाजूला सारून हिंदुस्थान जिंकलें. परदेशीय लोकांनीं आक्रमण कां केलें ? श्रमापासून सुटका मिळावी म्हणून. याचसाठीं त्यांनीं मोटमोठ्या यंत्रांचा शोध लावला. शरीरश्रम कमींत कमी करून उरलेल्या वेळीं मौज आणि आनंद करण्याची त्यांची दृष्टि आहे. याचा परिणाम आज असा झाला आहे कीं प्रत्येक राष्ट्र यंत्रांचा उपयोग करण्यांत गुंतलें आहे. प्रथम ज्यांनीं मशीन शोधून काढलें त्यांची सत्ता तोंवर च चालली जोंवर दुसऱ्याजवळ मशीन नव्हतें. मशीनमुळें संपत्ति आणि सुख तों पर्यंत च मिळालें जों पर्यंत दुसऱ्यांनीं मशीनचा उपयोग केला नव्हता. प्रत्येकापाशीं मशीन आल्यावर स्पर्धा सुरू झाली.

आज युरोप एक "प्राणि-संग्रहालय" च बनलें आहे. जनावराप्रमाणें प्रत्येकजण आपापल्या पिंजऱ्यांत पडलेला आहे. आणि पडल्या पडल्या विचार करतो आहे कीं एकमेकाला कसें खावें ? कारण तो आपल्या हातानें कांहीं काम करूं इच्छीत नाहीं. आमचे सुधारक लोक म्हणतात— हातानें काम करणें फार कष्टकारक आहे. त्यापासून युक्ति-प्रयुक्तीनें सुटूं शकलों तर फारच चांगलें. जर दोन तास काम करून पोट

भरत असलें तर तीन तास कां करावें ? जर आठ तास काम केलें तर साहित्य केव्हां वाचायचें आणि संगीत केव्हां व्हायचें ? कलेसाठीं वेळ च उरत नाहीं. ”

भर्तृहरीनें लिहिलें आहे— “ साहित्य संगीत-कलाविहीन: साक्षात् पशु: पुच्छ-विपाण-हीन:” जो साहित्य संगीत आणि कला या विषयीं कोरा आहे तो शेपटी आणि शिंगें यांशिवाय असलेला पशु होय. मी म्हणतों—“ठीक आहे, साहित्य-संगीत-कला-विहीन जर शेपटी आणि शिंगें नसलेला पशु आहे तर साहित्य-संगीत-कलावान् शेपटी आणि शिंगे यांनीं युक्त असा असेल. ” भर्तृहरीच्या लिहिण्याचा उद्देश काय होता हें मी सांगूं शकत नाहीं, परंतु सहज च मला हा अर्थ सुचलेला आहे. दुसऱ्या एका पंडितानें लिहिलें आहे—“काव्य-शास्त्र विनोदेन कालो गच्छति धीमताम्” बुद्धिमान् लोकांचा काळ काव्यशास्त्रविनोदाने जातो. जणूं कांहीं त्यांचा काळ च जात नाहीं, जसा कांहीं तो त्यांना खाण्यासाठीं त्यांच्या दरवाजावर च उभा आहे ! काळ तर जाणारा च आहे. त्याच्या जाण्याची चिंता कां करतां ? तो सार्थकीं कसा लागेल हें पहा. शरीर-श्रमाला दु:ख कां मानलें आहे, हें मला समजत नाहीं. आनंदाचें आणि सुखाचें जें साधन आहे, त्याला कष्ट मानलें जातें !

एका अमेरिकन सद्गृहस्थाला कुणींसें विचारलें आहे—“जगांत सर्वांत जास्त श्रीमंत कोण आहे ?” तो उत्तरला, “ज्याचें पचनेंद्रियें चांगलीं आहेत तो.” त्याचें म्हणणें बरोबर आहे. संपत्ति खूप आहे पण दूध देखील पचविण्याची शक्ति ज्यांत नाहीं त्याला त्या संपत्तीचा काय लाभ ? आणि पचनेंद्रियें मजबूत कशीं होतात ? काव्यशास्त्रानें तर ‘कालो गच्छति’, त्यामुळें पचनेंद्रियें थोडीं च मजबूत होणार आहेत. पचनेंद्रियें तर व्यायामानें, श्रमानें मजबूत होतात. परंतु आजकाल व्यायाम हि पंधरा मिनिटांचा निघाला आहे. मीं एक पुस्तक पाहिलें—“फिफ्टीन मिनिट्स एक्झरसाईझ”

अशा व्यायामामुळें दीर्घायुषी बनूं कीं अल्पायुषी याची चिंता च नाहीं. सँडो हि लवकर च मेला. या लोकांनीं व्यायामाचें शास्त्र हि हिंसक बनवून ठेवलें आहे. तीन मिनिटांत एकदम व्यायाम झाला पाहिजे. लवकरांत लवकर आटोपून त्यांतून मोकळें होऊन काव्यशास्त्र-विनोदांत कसें लागतां येईल ही च चिंता. थोड्या च वेळांत एकदम व्यायाम करण्याची जी पद्धति आहे तीमुळें स्नायु (मसल्स) बनतात, मज्जातंतु (नर्व्हज) बनत नाहींत. आणि अमरवेल ज्याप्रमाणें झाडाला खाऊन टाकते, तसे च स्नायु आरोग्याला खाऊन टाकतात. नसा आरोग्याला वाढवितात. हळूंहळूं आणि दररोज जो व्यायाम मिळतो त्यामुळें मज्जातंतु बनतात आणि पचनेंद्रियें मजबूत होतात. चोवीस तास एकसारखे आम्ही हवा घेतों, पण जर आम्हीं असा विचार केला कीं दिवसभर हवा घेण्याचा हा त्रास कां घ्यावा, दोन तासांत च दिवसभर पुरणारी हवा मिळाल्यास ठीक, तर असें च म्हणावें लागेल कीं आमची संस्कृति मरणाच्या पंथाला लागली आहे. आमची बुद्धि याप्रमाणें च चालते. शिकतां शिकतां डोळे बिघडतात, तर आम्ही चष्मा लावतों. पण डोळे बिघडूं नयेत ह्यासाठीं कांहीं युक्ति शोधत नाहीं.

आमचें स्वास्थ्य बिघडलें, भेदभाव वाढला आणि आमच्यावर बाहेरच्या लोकांचें आक्रमण झालें या सगळ्याचें कारण हें च आहे कीं आम्हीं श्रम सोडले.

हें जीवनाच्या दृष्टीनें झालें. आतां शिक्षणाच्या दृष्टीनें श्रमाचा विचार करावयाचा आहे.

आम्हीं शिक्षणाची जी नवी प्रणालि काढली तिचा आधार उद्योग आहे; कारण आम्ही मानतों कीं शरीराचा मनाशीं निकट संबंध आहे. सध्यां मानसशास्त्राचा अभ्यास करणारे आपल्याला पुष्कळ दिसतात. पण बिचाऱ्यांना स्वतःचें काम-क्रोध कसे जिंकावे हें माहीत नाहीं. मनाच्या

बाबतींत इकडच्चीं-तिकडच्चीं पुस्तकें वाचून दोन-चार गप्पा ते मारूं शकतात. चौदाव्या वर्षानंतर मनुष्याच्या मनांत एकाएकीं परिवर्तन होतें, म्हणून सोळाव्या वर्षापर्यंत मुलांचें शिक्षण झालें पाहिजे, हा सिद्धांत एका मानसशास्त्रज्ञानें मला सांगितला. ऐकून मला आश्चर्य वाटलें. मीं म्हटलें, "मनांत परिवर्तन होण्याचें हि पर्व असतें काय ? आम्ही पाहतों कीं शरीर हळूंहळूं वाढतें. एखाद्या दिवशीं एकदम दोन फूट ऊंच झालें, असें होत नाहीं. तर मग मनांत एकदम परिवर्तन कसें होऊं शकतें ?" त्यानंतर मीं त्यांना समजावून सांगितलें कीं चौदाव्या वर्षानंतर हाडें जरा जलद वाढूं लागतात आणि मनाचा शरीराशीं संबंध असल्यामुळें बुद्धि हि त्या च हिशोबानें जलद वाढते. शरीर आणि मन एका च प्रकृतींत, एका च कोटींत येतात.

कार्लाइल हा एक मोठा तत्त्ववेत्ता आणि विचारक होऊन गेला. त्याचे ग्रंथ वाचतां वाचतां पुष्कळ ठिकाणीं कांहीं असे विचार येतात कीं जे माझ्या विचारांशीं जुळत नाहींत. शंकराचार्यांचा जसा सरळ विचार-प्रवाह दिसतो तसा त्याच्या लेखांत दिसत नाहीं. त्याचें चरित्र नंतर माझ्या वाचनांत आलें. त्यावरून मला दिसून आलें कीं कार्लाइलला डोकेदुखीचा आजार होता. तेव्हां मला त्याच्या लेखन-दोषाचें कारण सांपडलें. मीं विचार केला कीं ज्यावेळीं त्याचें डोकें दुखूं लागत असेल त्यावेळीं त्याचें लेखन कांहींसें वेडें-वाकडें होत असलें पाहिजे. योगशास्त्रांत तर मन:शुद्धीसाठीं प्रथम शरीरशुद्धि सांगितली आहे. आमच्या शिक्षण-शास्त्राचा हि तो च आधार आहे. शरीर-वृद्धीबरोबर च मनोवृद्धि होते. मुलांचा मानसिक विकास करायचा असेल त्यांना शिक्षण द्यायचें असेल, तर शारीरिक श्रम करवून घेऊन त्यांची भूक जागृत केली पाहिजे.

श्रमानें त्यांची भूक वाढेल. ज्याला दिवसभरांत तीनदां चांगली भूक लागते तो चांगला धार्मिक समजला पाहिजे. भूक लागणें जिवंत माणसाचा धर्म आहे. ज्याला दिवसभरांत एकदां च भूक लागते त्याचें जीवन

अनीतीचें असण्याचा संभव आहे. भूक तर देवाचा संदेश आहे. भूक जर नसती तर जग अगदीं च अनीतिमान् आणि अधार्मिक झालें असतें. मग नैतिक प्रेरणा च आमच्यांत राहिली नसती. कोणाला च जर भूक-तहान लागली नसती तर आम्हांला अतिथि-सत्काराची संधि कशी मिळाली असती ? समोर हा खांब आहे. याचा आम्ही काय सत्कार करणार ? याला नाहीं भूक, नाहीं तहान. आम्हांला भूक लागते, म्हणून आम्हांला धर्म आहे.

विद्यार्थ्यांपासून काम घ्यायचें असेल तर शिक्षकाला हि त्यांच्या बरोबर काम केलें पाहिजे. वर्ग झाडावा लागतो तर त्यासाठीं नोकर ठेवले जातात, अथवा तो विद्यार्थी झाडतात. शिक्षक वर्ग-खोली झाडतांना आम्ही पाहत नाहीं. विद्यार्थी जर प्रथम वर्गांत आले तर त्यांनीं झाडावें, कधीं शिक्षक आधीं आले तर त्यांनीं झाडावें, असें व्हायला पाहिजे. परंतु झाडायचें काम आम्हीं नीच मानलें आहेना ! मग शिक्षक तें कसें बरें करतील ? आम्ही विद्यार्थ्यांना झाडण्याचें हि काम दिलें तरी शिक्षणाच्या दृष्टीनें जे परिश्रम विद्यार्थ्यांकडून करून घ्यायचे असतील ते शिक्षकानें प्रथम शिकावे आणि विद्यार्थ्यांबरोबर करावे. मीं एक झाडू तयार केला आहे. एके दिवशीं दोन-तीन मुली तेथें आल्या होत्या. तेव्हां त्यांना मीं तो दाखविला आणि त्यांत किती गोष्टी भरलेल्या आहेत तें समजावून सांगितलें. समजावून सांगितल्यानंतर जितक्या गोष्टी मी सांगितल्या त्या सर्व त्यांच्याकडून एक-दोन-तीन करून म्हणवून घेतल्या. पण हें मी तेव्हांच करूं शकलों जेव्हा झाडू मीं स्वतः बनविला होता.

याप्रमाणें प्रत्येक गोष्ट शिक्षणाच्या दृष्टीनें विद्यार्थ्यांना शिकवायला पाहिजे. एक गृहस्थ मला म्हणाले, "गांधीजींनें दळणें, कातणें, जोडे बनविणें वगैरे कामें करून श्रमाची प्रतिष्ठा वाढविली." मीं म्हटलें, "मी असें मानत नाहीं. श्रमाची प्रतिष्ठा कुठल्या एखाद्या महात्म्यानें वाढविली नाहीं.

श्रमाची मूळचीच इतकी प्रतिष्ठा आहे कीं त्यानें महात्म्याला प्रतिष्ठा दिली." आज हिंदुस्थानांत गो-पाल कृष्णाची जी इतकी प्रतिष्ठा आहे ती त्यांच्या गो-पालनानें त्यांना दिली. उद्योग आमचा गुरुदेव आहे.

जगांतील प्रत्येक गोष्ट आम्हांला शिक्षण देते. एक दिवस मी उन्हांत फिरत होतों. चहूंकडे मोठमोठे हिरवे वृक्ष दिसत होते. मी विचार करूं लागलों कीं वरून इतकें कडक ऊन लागत आहे, तरी हे वृक्ष इतके हिरवेगार कसे दिसतात ? ते वृक्ष माझे गुरु बनले. माझ्या लक्षांत आलें कीं जे वृक्ष वरून इतके हिरवेगार दिसत आहेत त्यांचीं मूळें जमिनींत अति खोल गेलीं आहेत आणि तेथून ते पाणी घेतात. याप्रमाणें वरून ऊन आणि खालून पाणी या दोहोंच्या कृपेमुळें हा सुंदर हिरवा रंग त्यांना मिळाला आहे. याप्रमाणें आम्हांला आंतून भक्तीचें पाणी आणि बाहेरून तपश्चर्येचें ऊन मिळेल तर आम्ही उंच वृक्षांप्रमाणे हिरवेगार होऊं. आम्ही ज्ञानाच्या दृष्टीनें श्रमाकडे पाहत नाहीं, म्हणून त्यांत कष्ट वाटतात. अशा लोकांना देवाचा हा शाप आहे कीं त्यांना आरोग्य आणि ज्ञान कधीं मिळायचें च नाहीं.

पुस्तकें वाचून ज्ञान मिळतें हा विचार चुकीचा आहे. वाचतां वाचतां बुद्धि अशी होते कीं ज्यावेळीं जें वाचाले तें च बरोबर वाटतें. एक सद्गृहस्थ मला एकदां म्हणाले, "मीं समाजवादाचें पुस्तक वाचलें तर ते विचार मला आवडले. त्यानंतर गांधी-सिद्धांताचें पुस्तक वाचलें तर ते देखील पटले." मीं विनोदानें त्यांना म्हटलें, "पहिलें पुस्तक दोन वाजता वाचलें असेल आणि दुसरें चार वाजतां" माझ्या म्हणण्याचा अर्थ असा कीं अति वाचनामुळें आमची बुद्धि स्वतंत्रपणें विचार करीनाशी होते. स्वतः विचार करण्याची शक्ति च नष्ट होते. माझें कांहींसें असें म्हणणें आहे कीं जेव्हांपासून हीं पुस्तकें निघालीं तेव्हांपासून स्वतंत्र विचार करणें नष्ट झालें. कुराणांत एक संवाद आला आहे. महंमदाला कांहीं विद्वान् लोकांनीं विचार

"तुमच्यापूर्वी जितके पैगंबर होऊन गेले त्यांनीं चमत्कार करून दाखविले. तुम्ही तर कोणता च चमत्कार करून दाखवीत नाहीं, तर मग तुम्ही पैगंबर कसे झालांत?" ते उत्तरले, "तुम्हाला कोणता चमत्कार पाहिजे? एक रोपटें लावलें असतां त्यांतून मोठा वृक्ष निर्माण होतो, त्याला फुलें लागतात आणि त्याला फळें येतात. हा काय चमत्कार नव्हे?" हें तर एक उत्तर झालें. दुसरें उत्तर त्यांनीं असें दिलें कीं "माझ्यासारखा अडाणी मनुष्य देखील तुम्हांला ज्ञान देऊं शकतो, हा काय लहान चमत्कार आहे? तुम्हाला आणखी कोणता चमत्कार पाहिजे?" आमच्यासमोरील निसर्ग ज्ञानानें परिपूर्ण आहे. आम्ही त्याचें खरेंखुरें मर्म जाणून घेत नाहीं म्हणून त्यात जो आनंद भरलेला आहे तो आम्हांला मिळत नाहीं.

स्वयंपाक आई करते. आईचा आम्ही गौरव करतों. परंतु मातेचें मातृत्व त्या स्वयंपाक करण्यांत च आहे. चांगला स्वयंपाक करणें, मुलांना प्रेमानें खाऊं घालणें यांत केवढें ज्ञान आणि प्रेम-भावना भरलेली आहे! स्वयंपाकाचें काम जर आईच्या हातून काढून घेतलें तर तिचें प्रेम-साधन नष्ट होईल. प्रेम-भाव प्रगट करण्याची ही संधि कोणती च आइ सोडायला तयार होणार नाहीं. त्या च आधारावर ती जगत असते. माझ्या म्हणण्याचा अर्थ कोणीं असा घेऊं नये कीं या-ना-त्या युक्ति-प्रयुक्तीनें मी स्त्रियांवर स्वयंपाकाचें काम लादूं इच्छितों. मी तर त्यांचें ओझें हलकें करूं इच्छितों. म्हणून च आम्ही आश्रमांत स्वयंपाकाचें काम मुख्यतः पुरुषांकडून च करून घेतों. माझा आशय इतका च होता कीं जसें आई स्वयंपाकाचें काम सोडून देईल तर तिचें ज्ञान-साधन आणि प्रेम-साधन निघून जाईल, तसें च जर आम्ही श्रमाची अवहेलना करूं तर ज्ञान-साधन गमावून बसूं.

लोक मला म्हणतात, "तुम्ही मुलांकडून मजूरी करवून घेऊं इच्छितो. त्यांचें वय तर गुलाबाच्या फुलाप्रमाणें हंसाचें आणि खेळायकुदायचें आहे." मी म्हणतों, "अगदीं बरोबर. पण तें गुलाबाचें फूल कशा प्रकारें

फुलतें तें तर पहा. तें पूर्णपणें स्वावलंबी आहे. तें जमिनीतून सर्व सत्त्व शोषून घेतें. मोकळ्या हवेंत एकटें उभें राहून ऊन, पाऊस आणि वारा सहन करतें. मुलांना हि तसें च ठेवा. मी हें पसंत करतों. त्यांना च विचारून पहा. फुलांना पाणी देण्यांत, चंद्रकलेला लहान-मोठी होतांना पाहण्यांत आनंद येतो, कीं पुस्तकात व्याकरणाचे नियम घोकत राहण्यांत? सुरगांव (वर्धा) चें एक उदाहरण मला माहीत आहे. तेथें एक प्राथमिक पाठशाळा आहे. सुमारें ७ ते ११ वर्षांपर्यंतचीं मुलें तेथें शिकतात. गांवकऱ्यांचें म्हणणें असें आहे कीं तेथील शिक्षक चांगला शिकवतो. परीक्षेला एक कीं दोन महिने उरले होते, तेव्हां त्यानें सकाळीं ७ पासून १०॥ पर्यंत आणि दुपारीं २ पासून ५॥ पर्यंत, आणि रात्रीं पुनः ७ ते ९ वाजेपर्यंत—म्हणजे एकूण नऊ तास शिकविणें सुरू केलें. कोण जाणे, इतके तास तो काय शिकवीत होता आणि विद्यार्थी काय शिकत होते? जर मुलें पास झालीं तर आम्ही समजतों कीं शिक्षकानें चांगलें शिकविलें. याप्रमाणें ९।९ तास शिकविणारा शिक्षक लोकप्रिय होऊं शकतो. पण मी तीन तास कांतण्याची गोष्ट सांगितली तर म्हणतात, "हा मुलांना सतावूं इच्छितों!" ठीक च आहे. जेथें मोठे च कामापासून अलिप्त राहण्याच्या फिकिरींत आहेत तेथें लहान मुलांना काम देण्याची गोष्ट कोणीं करावी?

नंतर लोक हें विचारतात कीं, "उद्योग इष्ट आहे, हें तर मानलें. पण त्यापासून इतकें उत्पादन झालें पाहिजे, असा आग्रह कां?" माझें उत्तर असें आहे, "मुलांना तर जेव्हां एखादी वस्तु तयार होते तेव्हां च आनंद होतो. बिचाऱ्यांनीं कष्ट करावे आणि त्यांतून कांहीं निर्माण होऊं नये, यांत त्यांना आनंद काय वाटणार? कोणाला जर म्हटलें कीं "जातें फिरवा पण त्यांत गहूं टाकूं नका, आणि कणिक पडूं देऊं नका, तर तो विचारील, "हें व्यर्थ जातें फिरवायचें कशासाठीं? तर काय आपण म्हणूं कीं दंड आणि छाती मजबूत करण्यासाठीं! अशा उद्योगांत का कांहीं आनंद येऊं शकतो? ती तर फुकट मेहनत होईल. म्हणून उत्पादनांत च आनंद आहे."

म्हणून मुख्य दृष्टि ही कीं शरीर-श्रमाचा महिमा आम्हीं ओळखावा. प्राथमिक शाळेंत आम्ही उद्योगाच्या आधारें शिक्षण देणार नाहींत तर शिक्षण सक्तीचें करूं शकणार नाहीं.

आज गांवकरी म्हणतात कीं "मुलगा शाळेंत शिकायला जातो तर त्याच्या मनांत कामाविषयीं तिरस्कार निर्माण होतो आणि आमच्या तो कामाचा राहत नाहीं. मग त्याला शाळेंत कां पाठवावें ?" पण आमच्य । पाठशाळेंत जर उद्योग सुरू झाला तर आई-बाप आनंदानें आपल्या मुलांन। शाळेंत पाठवतील. मुलगा काय शिकतो, हें हि पहायला येतील. आज तर मुलाचा काय अभ्यास चालला आहे हें हि पहायला आई-बाप येत नाहींत. त्यांना त्यांत रस च वाटत नाहीं. शिक्षणांत उद्योग दाखल झाल्यावर यांत फरक पडेल. गांवकऱ्याजवळ पुष्कळ ज्ञान आहे. आमचा शिक्षक सर्वज्ञ असूं शकत नाहीं. तो गांवकऱ्यांजवळ जाईल आणि आपल्या अडचणी त्यांन सागील. शाळेच्या बगीच्यांत चांगल्या पपया येत नसल्या तर तो त्याचें कारण गांवकऱ्यांना विचारील. मग ते सांगतील कीं या या प्रकारचें खत टाका, खत खराब असल्यामुळें पपईला कीड लागते. आम्ही समजतों कीं शेतकी कॉलेजांत शिकलों आहोंत, यामुळें आमच्या च पाशीं ज्ञान आहे. पण आमचें ज्ञान पुस्तकी असतें. तें आम्ही व्यवहारांत आणीत नाहीं. जोंवर आम्ही प्रत्यक्ष उद्योग करीत नाहीं तोंवर त्यांत प्रगति आणि वृद्धि होत नाहीं. जर आम्हांला गांवकऱ्यांचें सहकार्य हवें असेल. त्यांच्या ज्ञानाचा जर आम्हांला लाभ घ्यायचा असेल, तर शाळेंत उद्योग सुरू करावा लागेल आमच्या आणि त्यांच्या सहकार्यानें त्या ज्ञानांत सुधारणा हि होईल.

हें सर्व तेव्हां च होईल जेव्हां आमच्या शिक्षकांत प्रेम, आनंद आणि श्रमाविषयीं आदर उत्पन्न होईल. आमची नवी शिक्षण-प्रणालि याच आधारावर तयार करण्यांत आली आहे.

: २० :

# खरी स्वतंत्रता

एकोणीसशें सहा सालीं दादाभाई नौरोजींनीं आमच्या देशाला 'स्वराज्य' हा शब्द दिला. त्या वेळच्या तरुणांची तळमळ च ती गुरु-मुखानें बाहेर पडली. आम्ही लहान मुलें स्वतंत्रतेचीं गाणीं गात असूं. एक गाणें आमच्या तोंडांत असें असे : "भू जपानची नटवीली, स्वातंत्र्यें। इटली हि कशी हंसवीली, स्वातंत्र्यें". जपाननें रशियाच्या चढाईला तोंड देऊन जय मिळविला. गुलामगिरींत खितपत पडलेल्या सबंध आशिया खंडाची जणूं त्यानें बाजू राखली. जणूं पूर्व दिशेकडे स्वराज्य-रवि उगवला, असें आम्हांस वाटलें. आमचे लोक जपानच्या मर्दुमकीचे पोवाडे कौतुकानें गाऊं लागले. गुलाम-गिरीच्या शृंखला तोडून मुक्त झालेल्या देशांचे इतिहास शोधले गेले. ऑस्ट्रियाची सत्ता झुगारून इटलीदेश स्वतंत्र झाला होता. तिकडे आमच्या लोकांचें लक्ष सहज च वेधलें. हिंदुस्थानच्या सर्व भाषांत मॅझिनी आणि गॅरिबॉल्डी यांचीं चरित्रें लिहिलीं गेलीं.

पण आतां आम्ही काय चमत्कार पहात आहोंत? ज्या जपानमध्यें स्वराज्य-रवि उगवल्याचा भास झाला होता, त्यानें च चीनला चिरडण्याचा यत्न चालविला. हिंदुस्थानची सहानुतिभूति जपानमधून उठली, चीनमधें जाऊन बसली. ज्या इटलींत मॅझिनीसारखा स्वतंत्रतेचा पुजारी जन्मास आला तिनें च संधि साधून ॲबिसीनियावर आक्रमण केलें. हिंदुस्थानची सहानुभूति इटलींतून उठली, ॲबिसीनियांत जाऊन बसली.

हा काय चमत्कार आहे? आमच्या इतिहासांत हि असा च चमत्कार पहावयास सांपडतो. जे मराठे अन्यायाची चीड घेऊन उठले, ते च पुढें

रजपुतांना रगडूं लागले, आणि उडिसाला तुडवूं लागले. हिंदवी स्वराज्याची शिवाजीची भाषा जाऊन मराठेशाहीची भाषा सुरू झाली. मराठ्यांत हि आपापसांत यादवी माजून मराठेशाहीची भाषा पुढें हवेंत जिरून गेली, ही गोष्ट वेगळी.

यांत चमत्कार काहीं च नाहीं. दुसऱ्याची सत्ता आपल्यावर चालूं नये एवढ्यापुरती स्वतंत्रतेची प्रीति हा मोठासा गुण च नाहीं; परंतु हि तो आढळणारा आहे. आपली हि सत्ता दुसऱ्यावर चालूं नये असें ज्याला वाटत असेल, तो स्वतंत्रतेचा खरा उपासक आहे. आणि त्याचा तो एक मोठा गुण म्हणतां येईल.

पण हा गुण अजून मानवात रुजलेला नाहीं. किंबहुना याच्या उलट गुण रुजलेला आहे, असें म्हणावें लागतें. दुसऱ्याची सत्ता माझ्यावर चालूं नये आणि शक्य तर माझी सत्ता दुसऱ्यावर चालावी, अशी च अजून मानवाची वृत्ति आहे. मानव-हृदयाला ती पटणारी आहे, असा अर्थ नाहीं. कारण आपली सत्ता कोणावर हि न चालविणाऱ्या थोर पुरुषांविषयीं, माणसाला आदर वाटतो. पण तो 'थोर' पुरुष म्हणविला जातो, 'सामान्य' पुरुष म्हणविला जात नाहीं. सामान्य पुरुष च तो, असें व्हायला हवें आहे. ती स्थिति आज नाहीं.

माझ्यावर कोणाची सत्ता असूं नये, आणि शक्य तर माझी दुसऱ्यावर असावी, ही आजची स्वतंत्रतेची वृत्ति आहे. त्या वृत्तीचा पूर्वार्ध सिद्ध करण्याचा कोणाचा कार्यक्रम चालू असतो, तेव्हां त्याविषयीं लोकांना साहजिक च सहानुभूति वाटते. सदर वृत्तीच्या उत्तरार्धाचा कार्यक्रम सुरू होतो, तेव्हां ती सहानुभूति निघून जाते.

स्वतंत्रतेचा शुद्ध अर्थ खरोखर आपणास किती प्रिय आहे, हें दरेकानें आंतून तपासून घेतलें पाहिजे. किती आई-बापांना असें मनापासून वाटतें कीं आपली सत्ता आपल्या मुलांवर हि चालूं नये, त्यांनीं निजबुद्धीनें

वागावें, आपली सल्ला विचारांत घ्यावी, पटली तर च ती मान्य करावी, न पटली तर अवश्य सोडून द्यावी ? लहानपणीं मुलांवर थोडी-फार सत्ता चालवावी लागते. ती हि दुःखाची गोष्ट आहे, होईल तितक्या लौकर मुलांना सर्व प्रकारें निजावलंबी करावयास पाहिजे, अशी तळमळ किती आई-बापांना वाटते ? लहान मुलांवर हि सत्ता चालविल्याचा आभास न होऊं देता त्याला समजावून सांगून, त्याच्या बुद्धीला जागृत करून आणि चालना देऊन, त्याची संमति मिळविल्यासारखें करून वागावयाचें, अशी काळजी किती आई-बाप घेतात ? 'आमचीं मुलें आमची सत्ता मानीत नाहींत', असें किती आई-बाप गौरवानें आणि संतोषानें बोलतात ?

शाळेंत हि किती शिक्षक आपला महिमा मुलांवर लादत नाहींत ? 'मुलांनो, मला भीत जाऊं नका. माझें म्हणणें पटलें तर च घेत जा. माझ्या वागण्यांत दोष दिसतील तर त्याचें अनुकरण करूं नका. उलट ते दोष मला नम्रपणें सांगतां न आले तर जसे सांगतां येतील तसे सांगा, पण केव्हां हि दबून राहूं नका'. असें शिक्षण किती शिक्षक मुलांना देतात ? प्रेमळ आई-बापांना हि जर मुलांवर सत्ता पाहिजे, आणि दयाळु शिक्षकांना हि जर विद्यार्थ्यांवर सत्ता पाहिजे, तर स्वतंत्रतेचा उदय कसा होणार ?

माझी कुणावर हि सत्ता चालूं नये, चालली तर ती दुःखाची गोष्ट होईल, असें जेव्हां मानवाला वाटेल, तेव्हां च स्वतंत्रतेचा उदय होईल.

[ मराठी हरिजन, ता. २३ मार्च १९४७ ]

: २१ :

# सीता तर प्रत्येकीला होतां येईल.*

स्त्रियांच्या रक्षणाचा भार पुरुषांवर आहे अशी समजूत शेंकडों वर्षां-पासून चालत आली आहे. परंतु जोंपर्यंत ही समजूत कायम राहील तोंपर्यंत स्त्रियांचें खऱ्या अर्थानें रक्षण होणें असंभव आहे. स्त्रीला रक्षणाची आवश्यकता आहे असें मानण्याची मुळांत जरूर नाहीं. परंतु असें मानलें गेलें आहे. असें कां मानलें गेलें? एवढया च मुळें कीं तिच्याजवळ हिंसेचीं पुरेशीं साधनें नाहींत. हिंसेच्या क्षेत्रांत तुलनेनें ती पुरुषापेक्षां कमजोर पडते. ह्यामुळें च ती पुरुषाच्या द्वारें रक्ष्य समजली गेली. अर्थात् ह्यांत हिंसेची प्रतिष्ठा मान्य करण्यांत आली आहे. पण आजची परिस्थिति आपल्याला स्पष्टपणें बजावून सांगत आहे कीं हिंसेची नव्हे तर अहिंसेची प्रतिष्ठा स्थापन केली पाहिजे.

आम्हीं ही गोष्ट साफ समजून घेतली पाहिजे कीं वाटेल त्या परिस्थितींत आत्म्याच्या बलावर स्त्री आपलें रक्षण करण्यास समर्थ आहे. शरीराच्या बळावर अवलंबून राहण्याचेऐवजीं आत्म्याच्या बळावर जगण्याची कला आपण सगळयांनीं च शिकायला हवी. मी तर असें मानतों कीं ज्याला सतत जन्मभर निष्ठापूर्वक सेवा करावयाची आहे त्याला आत्मज्ञान ही वस्तु समजून घेतली च पाहिजे. आज आपल्याला हा आत्मज्ञान शब्द फार च मोठा वाटतो. परंतु ही गोष्ट इतकी सरळ व सोपी आहे कीं एखाद्या लहान मुलाला देखील समजावी. गणित शिकणें कदाचित् अवघड वाटणें शक्य आहे, परंतु आत्मज्ञान गणितापेक्षां हि सोपें आहे. वर्ड्स्वर्थची "वुई आर सेव्हन्" (आम्ही सात आहोंत) ही कविता प्रसिद्ध

[ *महिलाश्रम, वर्धा येथें ता. ११-५-४६ रोजीं दिलेलें व्याख्यान ]

च आहे. कवितेमधील ती मुलगी आपला मृत भाऊ हि जमेस धरून सांगते कीं "आम्ही सात आहोंत." आत्म्याच्या अमरतेचें भान तिला सहज प्राप्त होतें.

ही वस्तु समजणें कठिण नाहीं. परंतु त्याप्रमाणें वर्तन करणें कठिण वाटतें. कारण आज आमचें झाडून सारें जीवन शरीर-प्रधान होऊन गेलें आहे. सौंदर्यासंबंधीं असो, बलासंबंधीं असो—आमची दृष्टि शरीर-प्रधान च असते. जोंपर्यंत ही शरीर-परायणता चालू राहील तोंपर्यंत स्त्रियांच्या मनात भीति हि घर करून राहणार च. जुलूम करणाऱ्यानीं लोकांच्या ह्या शरीर-परायणतेपासून खूप लाभ करून घेतला आहे. ह्यांतून च भय निर्माण होतें.

आमचे एक शिक्षक-मित्र छडीचा महिमा वर्णन करून सांगत होते. एक मुलगा शाळेंत रोज उशिरां येत असे. किती समजावून सांगितलें पण व्यर्थ, पण छडी दाखवितां च समजला व शाळेंत वेळेवर येऊं लागला! पण त्यामुळें निष्पन्न काय झालें? शिक्षकानें त्याला नियमित बनविलें, पण त्याबरोबर च भय हि शिकविलें. भित्रा होण्यापेक्षां तो उशिरां येत राहिला असता तरी बेहत्तर झालें असतें. निर्भयता घालवून इतर दुसरा कोणता हि गुण स्वीकारण्यास मी तयार नाहीं. चिंतामणि देऊन कांच कोण खरीदणार?

मनुष्याच्या मनाला भय शिवलें नाहीं तेथपर्यंत तो पाप करीत नाहीं. म्हणून मुलांना निर्भय बनण्याचें शिक्षण देणें हें आईबाप व शिक्षक ह्यांचें कर्तव्य आहे. त्यांनीं स्वतः कधीं मुलांना मारूं नये आणि त्याचबरोबर मुलाच्या मनांत एक गोष्ट स्पष्टपणें ठसवावी कीं कोणीं किती हि त्यांना मारलें तरी माराच्या भीतीनें कोणाचें कांहीं ऐकूं नये. आमच्या घरांतून व आश्रम-संस्थांतून ह्या पुढें अशा च तऱ्हेचें शिक्षण दिलें गेलें पाहिजे. असें करण्यानें च आमच्या मनांत अहिंसेचा विकास होईल. रामायणांत सीतेचें वर्णन आपण वाचतों. रावण तिच्याशीं चीड येण्यासारख्या गोष्टी बोलत असे. ती त्याच्याशीं उलट एक अक्षर हि बोलत नसे. एक वेळ बोलली ती फक्त गवताची काडी समोर धरून. असें करून

सीतेनें रावणाला हें दर्शविण्याचा प्रयत्न केला कीं. "हे रावणा, मी तुला ह्या गवताच्या काडीप्रमाणें समजतें." रावण तिला कांहीं करूं शकला नाहीं. सीतेचें उदाहरण असामान्य आहे असें आपण समजूं नये. असें असतें तर तिचें उदाहरण आमच्यापुढें कशाला ठेवलें गेलें असतें ? कांग्रेसचा अध्यक्ष वाटेल त्या स्त्रीला होता येणार नाहीं. परंतु सीता मात्र प्रत्येकीला होता येईल. कारण हा आत्म्याचा विषय आहे. आत्मबलावर निर्धास्त राहणाऱ्या व्यक्तीच्या नेत्रांत जें तेज असतें त्याचा प्रभाव दुसऱ्यावर पडल्याशिवाय रहात च नाहीं. पशुसुद्धा हें तेज पारखतात.

वाल्मीकि आणि नारद ह्याची कथा तर सर्व जाणतात. वाल्मीकीनें इतक्या लोकांची हत्या केली, परंतु नारदासारखा निर्भय मनुष्य आतापर्यंत त्याला भेटला नव्हता. त्याला आतापर्यंत जे लोक भेटले होते ते एक भिऊन तरी पळून जात, किंवा त्याचेवर उलट हल्ला तरी करीत. नारदासारखा हंसून शहाणपणाच्या दोन गोष्टी सांगणारा उभ्या आयुष्यात पहिला च माणूस त्यानें पाहिला. परिणाम असा झाला कीं वाल्मीकि आधीं जो एक हिंसक भिल्ल होता तो एक महान् ऋषि बनला. या कथेंत जीवनाचा सिद्धांत भरलेला आहे. जर आपण निर्भय व शांत राहूं तर आपल्यावर शस्त्र उगारणाऱ्याचा हात तेथल्या तेथें थिजून जाईल.

एका गृहस्थानें मला विचारलें कीं महिलाश्रमासारख्या संस्थेवर गुंडांनीं हल्ला केला तर काय करावें ? ह्याचें उत्तर अगदीं सरळ आहे.जर सर्वांना ही गोष्ट पटत असेल तर हल्ला होता च बिगुल वाजवून एकत्र जमावें व ईश्वराचें भजन सुरू करून द्यावें. परंतु असें करण्यासाठीं श्रद्धेची आवश्यकता आहे.

ह्याच्या उलट असें समजा कीं आपण आश्रम-भगिनींच्या हातीं तलवारी दिल्या. परंतु हल्ला करणाऱ्याच्या जवळ तलवारीपेक्षां हि परिणामकारक हत्यारें असण्याची शक्यता आहे. मग आमची तलवार निरुपयोगी

ठरणार. ह्या महायुद्धांत शारीरिक शक्तींच्या विफलतेचें आम्हांला चांगलें दर्शन झालें आहे. एका बाजूला दहा-दहा वीस-वीस लाखांची सैन्यें आक्रमण करीत चालल्याचीं दृश्यें दिसलीं. त्या च प्रमाणें दुसऱ्या बाजूला तितकीं च मोठीं सैन्यें हतबल होऊन शस्त्रें टाकून शरण गेल्याचीं दृश्यें हि दिसलीं. प्रतिपक्षी आपल्यापेक्षां बलवान् आहे असें दिसून आलें कीं ते हत्यारें खालीं ठेवून शरण जातात. शेवटपर्यंत लढत राहण्याच्या गोष्टी मात्र तोंडानें पुष्कळ बोलतात. अशा स्थितींत पूर्व बंगाल मधील शेंकडां वीस टक्के हिंदु किंवा बिहार मधील शेंकडां पंधरा टक्के मुसलमान आपल्या प्रतिपक्षाच्या समोर शरीरबलाचा प्रयोग कसा बरें करूं शकतील ?

ह्यासाठीं प्रारंभीं मीं सांगितलें कीं आपण आत्मशक्तीवर निर्भर असलें पाहिजे. स्त्रियांत हि आत्म-शक्तीची कोणच्या हि प्रकारें उणीव नाहीं. परंतु ती प्रगट करण्यासाठीं जीवन तदनुकूल बनविलें पाहिजे. खाण्यासाठीं जगतां कामा नये, जगण्यासाठीं खाल्लें पाहिजे. ज्याप्रमाणें आम्ही घराचें भाडें भरतों किंवा चरख्याकडून काम करून घेण्यासाठीं त्यांत तेल घालतों, तद्वत् च शरीराकडून काम करून घेण्यासाठीं त्याला जरूर तितकीं पोषक तत्त्वें दिलीं पाहिजेत. दिवाळी आली म्हणून चरख्यामधें आपण कांहीं चमेलीचें तेल घालत नाहीं. त्या च प्रमाणें चैन किंवा विलासा-साठीं नव्हे तर नितान्त आवश्यकतेच्या हिशोबानें च आपण शरीराला खुराक दिला पाहिजे. कारण तो एक शास्त्रीय प्रयोग आहे. त्यांत भोग-विलासाला स्थान नाहीं. भोग-विलासानें भरलेलें जीवन प्रसंग येऊन पडतां च खचून जातें, तग धरूं शकत नाहीं.

ज्यावेळीं एकजण दुसऱ्याला म्हणूं लागतो कीं "तुम्हांला मुसलमान व्हावें च लागेल, नाहीं तर मारून टाकूं," त्यावेळीं आम्हीं त्याला उलट असें स्पष्ट समजावून सांगायला हवें कीं "भल्या माणसा, मुसलमान बनणें ही हि एक विशेष प्रकारची श्रद्धा आहे. आणि श्रद्धा कधीं जबरदस्तीनें येऊं

शकत नाहीं." ह्यावर हि जर म्हणणारा मूर्ख च असेल व म्हणेल कीं "तें कांहीं नाहीं. एक तर कलमा तरी म्हणा, नाहीं तर मरायला तरी तयार व्हा" तर शांतपणें त्याला असें सांगतां आलें पाहिजे कीं "अरे बाबा, मरायचें तर सगळयांना च केव्हां-ना-केव्हां तरी आहे. ठीक आहे. मारून टाकूं म्हणतोस ? घे, मारून टाक." परंतु ह्याच्या उलट समोरच्या माणसाचें म्हणणें आम्ही गुपचुप कबूल करून टाकूं तर आमच्या शरीराचें रक्षण कसें तरी होईल बिचारें, परंतु आम्ही आमच्या आत्म्याला जास्तींत जास्त अपमानित केलेलें असेल. अपमानित होऊन जगण्यापेक्षां मरून मुक्त होण्याची शक्ति जर आमच्यांत असेल तर एखादें लहान मूल हि निर्भयतेनें संकटाचा सामना करूं शकेल.

व्यवस्थित राहण्याचें शिक्षण तर आपण अवश्य संपादन करायला हवें. कोठें आग लागली तर ती विझविण्यासाठीं सर्वांनीं मिळून पद्धतशीर-पणें कसें काम करावें ह्याचें शिक्षण आम्हीं जरूर घ्यावें. कवायतीनें व लाठीच्या खेळानें व्यवस्थितपणाचें शिक्षण मिळूं शकतें. परंतु एवढयानें आमचा कार्यभाग होईल असें मानूं नये. शरीर व आत्मा ह्यांतील भेदाचें ज्ञान आम्हांला झालें पाहिजे. हें ज्ञान जर आम्हीं प्राप्त केलें असेल तर हे खेळ शरीराविषयीं बेदरकार राहून हंसत-हंसत मृत्यूला कवटाळण्याचे कामीं आम्हांला मदतरूप होऊं शकतील.

महिलाश्रमसारखी संस्था, कीं जेथें देशाच्या सर्व भागांतून भगिनी येतात व सुंदर संस्कार आणि शिक्षण प्राप्त करतात, तेथील तुम्ही मंडळी अशा प्रकारें निर्भय जगणें व मरणें शिकून घ्याल तर आजच्या नाजुक परिस्थितींत तुम्ही देशाची फार मोठी सेवा करूं शकाल व परम श्रेय प्राप्त करून घ्याल.

[ मराठी हरिजन, २६ जानेवारी १९४७ ]

: २२ :

# लक्षचंडी-होम

एक गुजराथी बंधु लिहितात :

आज नोआखली जिल्ह्यांत आणि दुसरीकडे हि निराश्रितांना मदतीची अतिशय गरज आहे. पुष्कळ ठिकाणीं दुष्काळासारखी दशा आहे. आणि इकडे मुंबईला करपात्री नांवाचे एक संन्यासी तेराशें ब्राह्मणांकडून लक्षचंडी-होम वगैरे करवून राहिले आहेत. हें धर्माला कितपत धरून आहे ? अशा यज्ञाविषयीं आपला अभिप्राय काय आहे, तें कळवाल तर बरें होईल."

यज्ञाची कल्पना दरेक धर्मांत आहे च. हिंदुधर्मांत जुन्या काळीं यज्ञाचा संबंध अग्नीशीं जोडला गेला होता. अग्नि निर्माण करण्याची युक्ति मानवाला जेव्हां लाभली तेव्हां त्याच्या आनंदाला सीमा राहिली नाहीं. सूर्य आदि देव निसर्गानें च लाभलेले आहेत. हा देव आम्हीं आमच्या कृतीनें संपादिला, अशी त्याला धन्यता वाटली.

अग्नीकडे तो आदर-युक्त आध्यात्मिक दृष्टीनें पाहूं लागला. अग्नि अन्न शिजविणारा 'गृहपति', कचरा जाळून टाकणारा 'पावक', शीत निवारण करणारा आणि रोग बरें करणारा 'भिषज'(वैद्य), आहार पचवणारा 'वैश्वानर', वसतिस्थानाची देवता, कर्मयोगाची प्रतिमा, प्रतिज्ञांचा साक्षी, वैराग्याची मूर्ति इत्यादि अनेक भावनांनीं अग्नीला त्यानें गौरविलें. अग्नीची ज्वाला सारखी वर जात असते. जीवात्म्याची ईश्वराला भेटण्याची धडपड मानवाला त्यांत दिसून आली. त्या काळची दाट जंगलें जाळून वसाहत करणारा अग्नि हा अग्र-गामी, अग्रणी झाला. हें सर्व अग्नि-दर्शन वेदांत पहावयास सांपडतें.

आज अग्नि पूर्वीसारखा दुर्लभ नाहीं. जंगलें जाळायचीं शिल्लक नाहींत. उलट कुठें कुठें तर जंगलें वाढविण्याची गरज आहे. देशांत आहार-पदार्थांचा तुटवडा आहे. या सर्व गोष्टी लक्षांत न घेतां जुन्या काळच्या कृतीचें अनुकरण करूं पाहणें वस्तुतः धर्म-हीनतेचें लक्षण आहे. पण तें च धर्म-कार्य वाटतें. ही तामस बुद्धि आहे.

धर्म मानी अधर्मास अंधारें भरली असे ।
अर्थ जी उलटा देखे बुद्धि तामस ओळख ।।

अशी तामस बुद्धीची ओळख गीतेंत सांगितली आहे.

हिंदुस्थानांत आज जी धर्म-बुद्धि आहे ती पुष्कळशी अशी बुद्धि आहे. समाजाचें हित, आणि चित्ताची शुद्धि, हें धर्माचें कार्य. दोन्ही इथल्या इथें अनुभवास येणाऱ्या वस्तु. दोन्हीकडे दुर्लक्ष करून आजची धर्म-बुद्धि धर्माचा घात करीत आहे. धर्म अनुभवाची वस्तु आहे, कल्पनेची नाहीं. शुद्ध-बुद्धि हा धर्माचा आधार आहे, अंध-विश्वास नव्हे. लाखों गरीब लोकांच्या सेवेला वाहून घेणें, हा खरा लक्षचंडी-यज्ञ आहे; "तीळ, तांदूळ, तूप" जाळणें नव्हे. तो कळत न कळत दंभ आहे. आणि अशा दंभांत सहकार करणें पाप आहे, असें आम्हीं निश्चित समजलें पाहिजे.

[ मराठी हरिजन, ता. १२-१-४७ ]

## : २२ : अ

# लक्षचंडी-यज्ञ : आक्षेप व निरास

लक्षचंडी-होमाबद्दल मीं प्रगट केलेल्या अभिप्रायाचा निषेध करणारीं पत्रें माझ्याकडे आलीं आहेत. तीं पुष्कळशीं संताप दर्शविणारीं आणि कांहीं तर केवळ शिव्या-गाळींनीं भरलेलीं आहेत. त्यांतील एका पत्रांत थोडा युक्तिवाद केला असल्यामुळें त्याची दखल घेणें योग्य आहे. त्या पत्राचा थोडक्यांत सारांश असा आहे :

"मुंबईतील लक्षचंडी-होमाबद्दल "हरिजन" मध्यें आलेला लेख पाहून सखेद आश्चर्य वाटलें. त्यावरून यज्ञ-संस्थेंतील रहस्याचें नीट आकलन झालेलें नाहीं असें दिसतें. त्यांत लावलेली उपपत्ति केवळ भौतिक दृष्ट्या केलेली आहे. यज्ञ ही संस्था फार प्राचीन असून तिचें महत्त्व गीतेंत हि वर्णिलें आहे. लेखांत म्हटलें आहे, 'समाजाचें हित आणि चित्ताची शुद्धि, हें धर्माचें कार्य. दोन्ही इथल्या इथें अनुभवास येणाऱ्या वस्तु'. पण धर्माची व्याख्या शास्त्र-कारांनीं 'अभ्युदय आणि निःश्रेयस करणारा तो धर्म' अशी केलेली आहे. अभ्युदय अर्थात् ऐहिक असून निःश्रेयस हें पारलौकिक असतें. आर्य-संस्कृतींत वर्णिलेलीं सर्व धर्मकृत्यें या दोन्ही तत्त्वांस धरून असतात. केवळ ऐहिक जीवनाकडे च दृष्टि असली तर ती एकांगी आहे, असें म्हटल्या-शिवाय राहवत नाहीं."

परलोकाच्या अस्तित्वाबद्दल वाद नाहीं. पण देशांत दुष्काळ असतांना खाद्य पदार्थ जाळण्यानें परलोक साध्य होतो, या कल्पनेबद्दल वाद आहे कॉलेजमध्यें जाण्यासाठीं मॅट्रिकच्या परीक्षेंत नापास व्हावें लागतें, अशासारखी ही कल्पना आहे. ज्ञानदेवानें आपल्या निरुपम वाणीनें हा अर्थ असा मांडला

आहे : "ज्याचें ऐहिक धड नाहीं, त्याचें परत्र पुससी काई ?" इहलोकांतील जीवन-शुद्धि हें च परलोक-सिद्धीचें साधन आहे, हें ओळखावयास हवें.

परलोक-साधनाच्या नांवावर मूढ विश्वासाला जागा देणें म्हणजे इहलोक आणि परलोक दोहींचा हि एकदम च छेद करणें आहे. एका काळीं यज्ञांत बोकड मारीत. त्यानें याज्ञिक आणि बोकड दोघांचा हि परलोक साधतो असें मानीत. पुढें लक्षांत आलें कीं त्यांत एकाचा बुद्धिनाश आणि दुसऱ्याचा प्राण-नाश याशिवाय कांहीं च साधत नाहीं. मग पिष्ट-पशु करून मारूं लागले. जुनें अयोग्य ठरलें तरी एकाएकीं सोडवत नाहीं, एवढा च त्याचा अर्थ. पिठाचा पशु कापण्याची ही कल्पना सात्त्विक बुद्धीला सहन होणारी नाहीं. गीतेंत यज्ञाचें महत्त्व वर्णिलें आहे, पण तेथें यज्ञाचा सूक्ष्म आणि व्यापक अर्थ केला आहे. वेदांत हि म्हटलें आहे---

स्वादु-क्षद्मा यो वसतौ स्योन-कृत् ।
जीवयाजं यजते, सोपमा दिवः ॥

भुकेल्या माणसाला जो उत्तम अन्न शिजवून घालतो, आणि घरादारावाचून निराश्रित झालेल्याला जो "सुख-वसति" करून देतो, त्यानें महान् "जीव-यज्ञ" केला आणि तो स्वर्गाची उपमा झाला. म्हणजे त्याचें जीवन च स्वर्गमय आहे. त्यानें इहलोकीं स्वर्ग आणला आणि मेल्यानंतर पहि तो साधला.

"लाखों गरीब लोकांच्या सेवेला वाहून घेणें हा खरा लक्षचंडी-यज्ञ आहे" या माझ्या वाक्यांत मीं हा च वेदार्थ सुचवला होता.

अभ्युदय-निःश्रेयसकारी तो धर्म, हें धर्माचें लक्षण उत्तम आणि परिपूर्ण आहे. 'अभ्युदय म्हणजे ऐहिक उन्नति' हा पत्रकाराचा अर्थ मी मान्य करतों. "सर्वांचा अविरोध साधणारी" एवढी माझी त्याला पुस्ती आहे. 'निःश्रेयस पारलौकिक असतें हें पत्रकाराचें म्हणणें मी मान्य करीत नाहीं.

शास्त्राला तें धरून नाहीं. निःश्रेयस म्हणजे परम कल्याण-मोक्ष-असा शास्त्रीय अर्थ आहे. गीतेंत हि हा शब्द या च अर्थानें आलेला आहे. मोक्ष पारलौकिक नाहीं. तो चित्त-शुद्धि द्वारा "या च देहीं या च डोळां" अनुभवावयाचा विषय आहे. धर्माचें हें दुहेरी लक्षण च मीं "समाजाचें हित आणि चित्त-शुद्धि" या शब्दांनीं साध्या भाषेंत मांडलें.

मग परलोक उरला कुठें? वेदाच्या वकील वर्गाला च तें विचारा. मी तर तुलसीदासांच्या शब्दांत म्हणेन—

"को जाने, को जैहै जमपुर, को सुरपुर, परधाम को।

तुलसिहि बहुत भलो लागत जग जीवन राम-गुलाम को॥"

कुणाला माहीत, मेल्यानंतर कोण जातो नरकाला, कोण जातो स्वर्गाला, नि कोण जातो वैकुंठाला! या जगांत इथल्या इथें रामाचा गुलाम होऊन जगणें—राम-दास्य अनुभविणें—हें तुलसीदासाला गोड वाटतें.

[मराठी हरिजन, २ फेब्रुवारी १९४७]

: २३ :

# सुभाषबाबूंचें गुणस्मरण*

## तुम्ही हि मराठी शिका

माझ्या परमप्रिय मित्रांनों !

माझे व्याख्यान सुरु होण्यापूर्वी एक चिट्ठी आली आहे. तिचा मला खुलासा केला पाहिजे. चिट्ठी अशी आहे:—"कृपया हिन्दी में बोलिये, ऐसी प्रार्थना है।" आता अशी प्रार्थना मला एकदां इथे वर्ध्याला च करण्यांत आली होती. तो प्रसंग मला येथें आठवला. हिन्दी आमची राष्ट्र-भाषा आहे म्हणून तिच्या विषयी आम्हाला आदर आहे. परंतु प्रत्येक गोष्टीची कांही मर्यादा असते. वर्ध्याला काही विशेष कारणाशिवाय सार्व-जनिक सभेत मराठीमध्ये च बोललें पाहिजे अशी मी मर्यादा मानतों. म्हणून ज्यांनी मला हिंदींत बोलण्याची प्रार्थना केली आहे, ते मला क्षमा करतील अशी मी आशा करतो. या गांवांत येणारे लोक मराठी थोडे फार जाण-तात च. परंतु ज्यांना मराठी मुळीं च समजत नाही, त्यांनी आजच्या माझ्या व्याख्यानापासून च मराठी शिकण्यास सुरुवात करावी. आजचा च पहिला धडा समजावा.

## तो माझा कर्मयोग होता

ही झाली माझी प्रस्तावना. या तुमच्या वर्ध्याला साडेचार महिन्यां-पूर्वी माझें एक भाषण झाले होतें. पण ९ ऑगस्टला भाषण देण्या विषयी जितका उत्साह मला होता, तितका आज नाही. याचे कारण त्यावेळीं सभाबंदी होती. म्हणून त्यावेळीं भाषण देणें हें एक महत्त्वाचें

---

★ वर्धा येथें ता. २३ जानेवारी १९४६ रोजीं सुभाष-जयंती निमित्त झालेलें व्याख्यान.

कार्य होतें. गावांत तमाशा असावा व आम्ही सर्वांनीं चूप बसावें हें बरोबर नव्हते. म्हणून तेव्हां भाषण देणें हा माझ्या दृष्टीनें एक कर्मयोग च होता. आजचें हें व्याख्यान तसा कर्मयोग नाही. अशा स्थितींत आजच्या प्रसंगीं मला तितका उत्साह नसणें स्वाभाविक आहे. परंतु मी संयोजकाच्या विनंतीला वश झालों. वश झालों तो केवळ या एका च भावनेनें कीं आपण सर्व तरुण लोक इथें जमणार आहांत. तरुणांमध्यें एक प्रकारचा उत्साह असतो. आणि म्हणून तरुणांच्या हृदयाशी माझा संबंध एकदम येतो. त्यांच्याविषयीं मला फार प्रीति वाटते. म्हणून मी येथें आलों आहे.

## गुणस्मरण कां ?

आजचा प्रसंग एका थोर पुरुषाच्या जन्म दिवसाचा आहे, म्हणजे त्यांच्या गुणस्मरणाचा आहे. कुणाचें हि गुणस्मरण पावन असतें. मनुष्य म्हटला म्हणजे त्यांत गुण-दोष दोन्हीं असायचे. पण गुण आठवावे, दोष विसरून जावे, असा सज्जनांचा रिवाज आहे. ईश्वराची खुबी च अशी आहे कीं, तो प्रत्येकांत कांहीं ना कांहीं गुण आणि कांहीं ना कांही दोष ठेवतो च. तो मनुष्याला अहंकारी होऊं देत नाहीं. जर त्यानें मनुष्याला फक्त सर्वगुणसंपन्न निर्मिलें असतें, तर मनुष्याचा अहंकार जगांत मावता ना ! तो च ईश्वराची जागा घेऊन बसता ! म्हणून ईश्वर गुणांबरोबर दोषांची हि जोड लावतो च. पण आपण दोष सोडून गुण घेतले पाहिजेत या पद्धतीनें च विकास होत असतो. दोष कां सोडावे ? व गुण च कां घ्यावें ? दोष हे देहाच्या अंगानें आलेले असतात. गुण आत्म्याच्या अंगानें येतात. देह टिकणारा नाहीं, म्हणून दोष सोडून द्यावयाचे. आत्मा शाश्वत आहे, म्हणून गुण घ्यावयाचे.

## सुभाष बाबूंची वैराग्यशीलता

आज आपण सुभाषबाबूंच्या गुणाचें स्मरण करण्याकारितां एकत्रित झालों आहोंत. त्यांचे गुण तर पुष्कळ च आहेत, परंतु त्यांच्या जीवनांत

जो एक विशेष गुण दिसून येतो, तो म्हणजे विषय सुखाविषयींची त्यांची वैराग्यशीलता. तरुणांमध्ये उत्साह पुष्कळ असतो. परंतु उत्साहाला जर वैराग्यशीलतेची जोड नसली, तर मनुष्य उत्साहपूर्वक विषयासक्त बनतो. ही स्थिति अनेकांची होते. परंतु सुभाषबाबूंच्या जीवनांत वैराग्यशीलता होती. मला त्यांचा हा गुण फार आकर्षक वाटतो. तरुणांमध्यें जर हा गुण असला तर ते फार काम करूं शकतील. मी पाहतों आहें कीं हिंदुस्थानमध्यें फार प्राचीन काळापासून वैराग्याची शिकवण आहे. परंतु तरुणांना त्याविषयीं आकर्षण नाहीं. त्यांत तरुणांचा दोष नाहीं. वैराग्याचा चुकीचा अर्थ रूढ झाल्यामुळे त्याचें त्यांना आकर्षण वाटत नाहीं. खऱ्या अर्थानें वैराग्य लाभल्यास मनुष्याचें जीवन पराक्रमी होतें. स्वार ज्याप्रमाणें घोड्यावर अंकुश राखतो, त्याप्रमाणें जो इंद्रियांवर अंकुश राखतो, तो त्या इंद्रियांच्या साहाय्यानें आपलें जीवन सफल करूं शकतो. सुभाषबाबूंनीं एवढी संघटना केली ती या च गुणामुळे. हा गुण नसता तर त्यांना हें काम करतां आलें नसतें.

## मतभेद व्हावयाचे च !

सुभाषबाबूंच्या चालू कार्याकडे पाहिल्याबरोबर अनेकांची अनेक मतें दिसून येतात. कोणी म्हणतात, त्यांनीं केलें तें बरोबर केलें. कोणी म्हणतात, चूक केली. मला वाटतें, हा मुद्दा कांहीं महत्त्वाचा नाहीं. त्यांनीं जो मार्ग पत्करला, तो त्यांनीं एका विशेष परिस्थितींत पत्करला होता. महाभारतांत द्रौपदीवस्त्र-हरणाचे वेळीं "भीष्म, द्रोण, विदुर भये विहिनत" जीवनांत कांहीं प्रसंग असे च असतात कीं, त्यावेळीं मोठमोठ्यांच्या विचारांत मतभेद दिसून येतात. हें महायुद्ध हि एक असा च प्रसंग होता. यावेळीं इंग्रजांना मदत करावयाची कीं नाहीं, याविषयीं थोर थोर पुरुषांमध्यें हि फार मतभेद दिसून आले. गांधीजींना एक वाटलें, जवाहरलालना दुसरें वाटलें, सुभाषबाबूंना वेगळें वाटलें, तर अरविंदांना निराळें च वाटलें. आतां हें ओळखायला पाहिजे कीं, अरविंद बाबू सारखा योगी, एकान्तांत बसलेला असतांना

सरकारच्या मदतीला पैसे पाठवावयाची त्याला काय गरज पडली होती ! पण तशी त्याला गरज वाटते, याचा अर्थ त्याला कांहीं वेड लागलें आहे असें नाहीं. असें च इतरांच्या विषयीं. अशा प्रकारें सगळें जग युद्धांत सांपडलें असतां असे मतभेद होणें सहज च आहे. ज्याला जी बाजू दिसते, त्याला ती च खरी वाटते. आजचीं मुलें सुद्धां भीष्म-द्रोणांविषयीं म्हणतात कीं, यांना द्रौपदी-वस्त्र हरणाचे वेळीं एवढें कोडें तें काय पडलें ? पांचशें वर्षांनंतरचीं पोरें हि कदाचित् असें च म्हणतील कीं, या युद्धांत मदत करण्याबाबत गांधीजी आणि अरविंद घोष यांच्या सारख्यांचा एवढा मतभेद कसा झाला ?

## कम्युनिस्टांना देशद्रोही म्हणणें योग्य नाहीं

या च प्रसंगीं कम्युनिस्टांनीं स्वीकारलेल्या धोरणाबाबत जी भाषा आज बोलली जाते, ती हि मला बरी वाटत नाहीं, हें मला सांगितलें पाहिजे. आंतर्राष्ट्रीय दृष्टीनें विचार करण्याची ज्यांना दृष्टि आहे, अथवा अशी शक्ति आपणांस आहे असें ज्यांना वाटतें, त्यानीं त्यांच्या दृष्टीनें कांहीं विशिष्ट धोरण स्वीकारल्याबद्दल त्यांना देशद्रोही म्हणणें योग्य नाहीं. सर्वांना विचार-स्वातंत्र्य असलें पाहिजे आणि प्रामाणिक विचारभेदाविषयीं सर्वांनीं आदर राखला पाहिजे. म्हणून सुभाषबाबूंचा मार्ग कुणास पटतो कीं नाहीं, हा मुद्दा गौण आहे. सुभाषबाबूंना च जर विचारलें कीं, तुमचें स्मरण करावयाचें म्हणजे काय करावयाचें तर ते म्हणतील कीं, "माझें स्वातंत्र्यप्राप्तीचें जें कार्य अपूर्ण राहिलें आहे, तें तुम्ही पुढें चालवा."

## हिंदुस्थानची विशिष्ट परिस्थिति

आज हिंदुस्थानांत अशी स्थिति आहे कीं, एक लहानशी गोष्ट करून आम्ही स्वातंत्र्य मिळवूं शकतो, किंवा थोड्याशा चुकीनें स्वातंत्र्या-पासून फार दूर हि जाऊं शकतो. आज जगाच्या राजकारणांत हिंदुस्थानला एक विशेष स्थान आहे. अशा स्थितींत जर हिंदुस्थाननें कांहीं विशेष साधन वापरलें तर थोडक्यांत त्याचें काम होणार आहे.

## उत्साह वाया घालवूं नका

तुमच्यामध्यें उत्साह खूप आहे. परवां लोकांनीं मला विचारलें, " तरुणांत उत्साह फार आहे म्हणतां, पण ते प्रत्यक्ष काय काम करतात ?" तुमच्या वतीनें मीं त्यांना सांगितलें, "लहान मुलें आधीं बोलतात, मग काम करतात. त्यांना बोलायची संवय होऊं द्या" मग मीं त्यांना विचारलें, "परवा कलकत्याला जी घटना झाली, तशी पूर्वी कधीं झाली होती काय ? साधारणपणें गोळीबार झाला म्हणजे पळून जावयाचें ही च पद्धति आजवर होती, पण कलकत्याला तरुण लोक कांहीं पळाले नाहींत." पण असें जरी मी तुमच्या वतीनें बोललों असलों, तरी तेवढ्यानें माझें समाधान झालें असें नाहीं, तुमच्या समोर बोलायचें म्हणजे हें च कीं, जो उत्साह आपणा-मध्यें आहे, त्याचा उपयोग झाला पाहिजे. या उत्साहाला वाया जाऊं न देतां, वाफेप्रमाणें कोंडून ठेऊन काम घेतलें पाहिजे.

## प्रेमशक्तीचा प्रभाव

मी आतां च हिंदुस्थानच्या विशेष परिस्थितीचा उल्लेख करून सांगितलें कीं, एक लहानशी गोष्ट करून आपण स्वातंत्र्य मिळवूं शकतो. ती गोष्ट कोणती ? एकमेकांवर प्रेम करणें ही च ती गोष्ट. हें प्रेम करणें फार कठिण नाहीं. त्यानें मोठें कार्य होणार आहे. हिंदुस्थानांत अफाट शक्ति आहे. जगांत ती शक्ति सहज काम करूं शकणार आहे. चाळीस कोटी लोक जागृत झाल्यावर काय करूं शकणार नाहींत ? परंतु आमच्या-मध्यें फूट आहे, झगडे आहेत. तेव्हां केवळ प्रेम करण्यामुळें च ही फूट, हे झगडे, सर्व दूर होणार आहेत. व स्वराज्य निश्चित मिळणार आहे.

## आझाद हिंद सेनेची शिकवणूक

आझाद हिंद सेनेंत हिंदु-मुसलमान सर्व एक होऊन लढले हें कांहीं लहानसहान दृश्य नाहीं. पण हें केवळ प्रेमामुळें च साधूं शकलें. प्रत्येक

हिंदूनें पहावें की आपल्या मित्र मंडळींत मुसलमान किती आहेत. प्रत्येक मुसलमानानें हि आपल्या हिंदु मित्रांची संख्या वाढविण्याचा प्रयत्न करावा. म्हणजे मैत्रीचें व प्रेमाचें वातावरण निर्माण होऊं शकेल अजून खेड्यांत हें दुहीचें भूत तितकें नाहीं, आणि शहरांत पसरलें असलें तरी प्रेमाच्या मंत्रापुढें तें टिकूं शकणार नाहीं. जोंपर्यंत इंग्रज आहेत तोंपर्यंत तें दूर होऊं शकणार नाहीं, असें नेहमीं म्हणत राहणें योग्य नाहीं.''

: २४ :

# प्राज्य सत्तेची तयारी

हिंदुस्थानांत हजार पांचशें संस्थानें विद्यमान असून तेवढे च राजे महाराजे आणि त्यांचीं राजकुलें विराजमान आहेत. कांहीं अंगठीवरच्या खड्या एवढीं आहेत, तर कांहीं यूरोपांतल्या छोटे-खानी राष्ट्रां-एवढीं आहेत. कांहीं अलीकडचीं म्हणजे दोन-चार-शें वर्षांतलीं आहेत, तर कांहीं आपली परंपरा हजार बाराशें वर्षे दूर पर्यंत भिडवतात. कुठें प्रजा मुसलमान आणि राजे हिंदु आहेत. आणि कुठें प्रजा हिंदु तर बादशहा मुसलमान आहेत. कुठें राजा आणि प्रजा समान-धर्मा आहेत. कुणी राजे प्रजेला हक्क देण्यापूर्वीं तिची कसोटी करण्याच्या बेतांत आहेत. कुणी कुरकुरत कंजूषपणानें थोडे फार हक्क देत आहेत. कुणी हात तंग राखून वाणी उदार दाखवीत आहेत. या राजे लोकांचें एक मंडळ बनलें आहे. आणि त्याची एक समस्या खडी करण्यांत आली आहे.

पण काळाची खूण ओळखण्याचें शहाणपण असल्यास समस्या कांहीं च नाहीं. सगळें सोपें आणि सरळ आहे. ज्याच्या साम्राज्यावर सूर्य कधीं च मावळत नव्हता तो इंग्रज आज हिंदुस्थानच्या लोकांच्या हातांत सत्ता सोंपविण्यास तयार झाला आहे. तर ज्यांच्या राज्यावर सूर्य रोजचा च मावळतो, आणि आडमुठेपणा केल्यास कायमचा च मावळणार आहे, त्यांनीं लोकांच्या हातांत सत्ता सोंपविण्याचा समंजसपणा कां दाखवूं नये ? "लोकांना राजी राखाल तर तुम्ही सनदशीर राजे राहू शकाल. लोकांना नाराज कराल तर नांवा-सकट नाहींसे होऊन जाल" असें कालात्मा बोलून राहिला आहे. ती वाणी का यांच्या कानांवर जात नसेल ?

पृ. १०७

घटना-समितींत यांना जागा मिळाली आहे. दहा लाख जनसंख्येला एक प्रतिनिधि. म्हणजे हिशेब यांच्या जनतेचा आहे. यांना हिशेब च नाही. आणि यांत राजे-लोकांना नामोशी कांहीं च नसून मोठेपणा च आहे. पण ओळखतील तर ! राजा म्हणजे लोकांना रिझवणारा लोक–सेवक, असें त्याचें लक्षण कवींनीं केलें आहे. आणि रामचंद्रासारखे राजे तें च लक्षण मिरवीत असत. लोक-सेवक म्हणवण्यांत त्यांना भूषण वाटे. "लोकाराधन हें माझें व्रत आहे" हें रामाचें वचन जग-जाहीर आहे. म्हणून च राजा-राम हा शब्द आज तागायत या देशांत गाजून राहिला आहे.

हिंदुस्थानचे लोक जुन्या गोष्टी विसरणारे, मना चे उदार, आणि हाडाचे कृतज्ञ आहेत. राजे लोक जर आज त्यांच्या हातांत सत्ता सोपवतील तर त्यांनीं आज पर्यंत केलेला जुलूम देखील कोणी आठवणार नाहीं. त्यांची मान-प्रतिष्ठा वाढेल. ते कांहीं च गमावणार नाहींत. हिंदुस्थानांत सगळीकडे लोक–सत्ता चालून संस्थानिकां ची हद्द लागल्याबरोबर ती थांबेल असें होण्याचा संभव नाहीं. तिला जर राजे लोक निज-संतोषानें वाव देतील तर जो मान कांग्रेसच्या सेवा-परायण पुढाऱ्यांना जनतेंत आहे तो च त्यांना ही मिळेल. जनतेला सेवकांची या वेळीं अतिशय गरज आहे. संस्थानिक जर सेवक लाभले तर लोकांना आज ते हवे च आहेत.

निरनिराळ्या काळांत निर-निराळ्या विचाराचें राज्य असतें. एका जमान्यांत राजाची वंशावळ लोकांनीं पत्करली. राज्य भूतदयेनें चालले म्हणजे बस, मग कुणी का राजा होईना, असे त्या वेळचे लोक मानीत. आज ती परिस्थिति नाहीं. आजचा विचार साम्य-योगाचा आहे. केवळ भूत-दयेनें आज भागणार नाहीं. साम्य-योगाच्या पोटांत भूतदया येऊन च जाते. भूत-दयेचा पूर्ण विकास झाला म्हणजे तिच्यांतून साम्य-योग सहज च निष्पन्न होतो. दोहोंत विरोध कुठें च नाहीं. पण साम्य-योग ही पुढची पायरी आहे,

आणि आजच्या जमान्याची ती मागणी आहे. म्हणून दयाळू-राज्य चालवून हि आज लोकांचें पूर्वी सारखें समाधान होणार नाहीं. सर्वांना समान अधिकार असलेलें, प्रजेनें चालवलेलें, "प्राज्य" आज हवें आहे.

मग राजे-लोकांना जागा काय उरली? जागा ही च उरली कीं हा संधि-काळ आहे या संधि-काळांत त्यांनीं लोक-सेवक बनून निमित्तमात्र राजा रहावें. आपल्या मुलांना राज-कुमार कॉलेजांत नव्हे पण किसान-मजूर शाळेंत शिक्षण द्यावें. आणि दयाळू राज्य-संस्थेचें रूपांतर साम्य-योगी प्राज्य-संस्थेंत होण्याला साह्य करावें हा मधला काळ जितका लांबेल तितकें त्यांनीं तें आपलें अपयश समजावें. तो जितका आखुड होईल तितकें यश समजावें.

[मराठी हरिजन, ता. २ मार्च १९४७]

: २५ :

# संधिकाळांतील कर्तव्य

जून एकोणीसशे अठ्ठेचाळीस, हिंदुस्थान सोडून जाण्याची तारीख इंग्रजांनीं जाहीर केली आहे. काँग्रेसची आणि देशाची ही च मागणी होती. ती मान्य झाल्यानंतर आता आमची जबाबदारी वाढली आहे. तदनुसार आमच्या वृत्तींत पालट होण्याची गरज आहे.

जनतेला तिच्या दुःखाची जाणीव करून देऊन, चालू अवस्थेविषयीं असंतोष निर्माण हें आरंभाचें काम गांधीजी येण्यापूर्वीं च होऊन गेलें. गांधींनीं असंतोषाला संघटित कृतीचें रूप दिलें. सरकारविरोधी बळ कमाल लागलें. पंचवीस वर्षांचा लढा आता शेवटाला आल्या सारखा आहे. ह्या पुढें इंग्रज गेल्या नंतर समग्र देशाचें बांधकाम सुरू होईल. मधला जो चौदा-पंधरा महिन्यांचा संधिकाळ, तो शक्ति आवरण्याचा, चित्त एकाग्र करण्याचा ध्यानाचा काळ आहे. अनुभवी पुरुषांचें वचन आहे "ज्यांना कुणाला मोठेपण मिळालें आहे, त्यांना तें एकाग्र ध्यानामुळें च मिळालें आहे." आतां चारी बाजूंनी खळबळ शांत झाली पाहिजे.

कांग्रेसची सरकारें प्रांतांत आलीं असलीं तरी लोकांचीं दुःखें शमलीं आहेत असें नाहीं. दिवाळें आलेलें दुकान हातांत घेतलेलें आहे. घडी नीट जमविण्याला वेळ लागणार आहे. यत्न चालू आहेत. त्यांत हि उणीवा नाहींत असें नाहीं. तरी पण या वेळीं सबूरी राखली पाहिजे. लोकांचीं सरकारें

आहेत. त्यांना तीं केव्हां हि सुधारतां येतील, बदलतां येतील. आज त्यांना लोकांच्या एक-मुखी पाठबळाची गरज आहे.

'संधि-काळ आहे. या दंगल उठवून. या च वेळीं फावलें तर फावलें.' अशी एक संधि-साधक दृष्टि अशा वेळीं काम करीत असते. पण विशाल आणि दूरदृष्टि असणारांनीं अशा लोकांना समजावून सांगून आवरलें पाहिजे. गंभीर चिंतनाच्या वेळीं आरडाओरड करण्यांत संधि-साधन नसतें, विघ्न साधन असतें.

कौंसिल बाहेरील कांग्रेसवाल्यांनी मंत्री-मंडळावर टीका करण्यात वेळ न घालवितां, पुरवणी सेवा-कार्य खेडोपाडीं आरंभलें पाहिजे. वर्किंग कमिटीनें त्यांना तसा आदेश हि दिला आहे. त्यांनीं त्या कामात मग्न होऊन जावें. आपणाला लोक-राज्य हवें आहे. दरेक खेड्याचें राज्य त्या त्या खेड्यानें च करावयाचें आहे. या दृष्टिनें खेड्यांची क्रियाशील शांतिमय संघटना करण्याकडे त्यांनीं आपली शक्ति लावावी.

कांग्रेसशीं सहानुभूति असलेले पण अग्रगामी विचाराचे जे तरुण कार्यकर्ते आहेत. त्यांनीं या वेळीं वाद माजवूं नये. सगळ्यांना च मान्य असलेलीं जीं सेवाकार्यें आहेत, त्यांतील च आपल्या आवडीच्या एखाद्या कामांत विरघळून जावें. समाजवादाची त्यांनीं चिंता करूं नये. अहिंसेवरील निष्ठा दृढ झाल्यास हिंदुस्थानांत सर्वोदयकारी समाजवाद च चालणार आहे असें माझें त्यांना आश्वासन आहे. हिंदुमुसलमानांमध्यें पंजाबादि प्रांतांत दंगे होऊन राहिले आहेत. त्याचे पडसाद इतर विभागांत उमटूं नयेत या विषयीं सावधगिरी राखावी. दोन्ही मिळून एका च हाडमांसाची जमात आहे. दोघांचीं सुखदुःखें समान आहेत. दोघांचें भविष्य एकत्र सांधलेलें आहे. याची जाणीव जाणत्यांनीं सगळीकडे फैलावली पाहिजे. असुरक्षितता च मळ लवकरांत लवकर धुवून निघायला पाहिजे.

हिंदुस्थानची राज्यघटना विधान समिति रचणार च आहे. पण देशाचा विविध अंगांनीं विकास कसा करतां येईल याचें पद्धतशीर चिंतन करणारीं अभ्यास-मंडळें ठिकठिकाणीं निघावीं. असा अभ्यास करून ठेवला असल्यास पुढील काम अविलंबानें होईल.

सारांश, या वेळीं देशांत सगळीकडे आत्मविश्वासयुक्त संयमाचें, चिंतनाचें, आणि एकतेचें निदर्शन झालें पाहिजे.

[ मराठी हरिजन २३ मार्च १९४७ ]

: २६ :

# लग्नाचा प्रश्न

(एक पत्र)

श्री......तुमचें पत्र पुष्कळ दिवसांपूर्वीं च मिळालें. तुमची मनः-स्थिति साफ नाहीं त्यामुळें मन संशयाकुल झालेलें आहे.

लग्नाच्या बाबतींत आईबाप सूचना करूं शकतात. सल्ला देऊं शकतात. मदत करूं शकतात. पण निर्णय तर मुलीचा च प्रमाण मानला पाहिजे. आई-बापाची सूचना सहजगत्या मुलीला पटली तर प्रश्न च नाहीं. पण पटली नाहीं तर आई-बापांना दुःख होण्याचें कारण नाहीं. ह्या ऊपर हि ते दुःखी होत असतील तर त्यांत मुलीकडे दोष आहे असें मी मानणार नाहीं. केवळ आई-बापांच्या संतोषासाठीं, जिचा स्वीकार हृदय करीत नाहीं अशी गोष्ट, मान्य करू नये. कारण हृदयाला जें पटत नाहीं तें आपण करूं तर हृदयाला धोका दिल्यासारखें होईल. आणि हृदयाला धोका देणें अधर्म आहे. त्यांत आईबापाना हि धोका दिल्यासारखें होतें.

ज्याच्याविषयीं तुमच्या मनांत विशेष अनुराग आहे, पण तो तुम्हांला चाहत नाहीं असें निश्चित तुम्हांला माहीत आहे, त्याच्याशीं लग्न करण्याची कल्पना तुम्हीं सोडून दिली पाहिजे. ज्या प्रमाणें सर्वांविषयीं आपल्या मनांत सर्व सामान्य सद्भाव पाहिजे तसा त्यांच्याविषयीं हि ठेवावा. पण असा तटस्थ भाव राखणें अशक्य असेल, व तीव्र प्रेमाचा अनुभव येत असेल, आणि इतक्या उपर हि त्याच्याकडून अनुकूल उत्तर मिळत नसेल, तर शारीरिक लग्नाचा विचार सोडून त्या व्यक्तीला परमात्म्याचें प्रतीक

मानून, त्याला मानसिक रीतीनें वरावें. व ब्रह्मचर्यव्रतानें राहून आयुष्य कंठावें. हें सर्व तुम्हांला कितपत लागू पडतें हें मला माहीत नाहीं. तें आत्मपरीक्षण करून तुम्हीं च ठरविलें पाहिजे. मीं परिपूर्ण उत्तर दिलें आहे. प्रत्येकानें आपली परिस्थिति पाहून त्याचा विनियोग आपल्यापुरता करून घ्यावा.

आणखी एक सूचना देऊं इच्छितों. आपल्या मनःस्थितीचें वास्तविक ज्ञान पुष्कळदा मनुष्याला होत नाहीं. वस्तूचें यथार्थ दर्शन अति जवळून होत नाहीं, व दूरून तर तें नाहींसें च होतें. थोड्या अंतरावरून ठीक दर्शन होतें. जवळ राहून पुष्कळ चिंता व चिंतन करून सुद्धां जी गोष्ट ध्यानांत येत नाहीं. ती च थोड्या काळानंतर आपोआप लक्षांत येते. म्हणून मानसिक व्याकुळता तर सोडून च दिली पाहिजे.

आई सहज मिळते, निवडून घ्यावी लागत नाही. त्याप्रमाणें च ईश्वराच्या योजनेंत पति हि सहज-प्राप्त असतो, अशी श्रद्धा राखली तर व्याकुळता कमी होईल. कारण परमेश्वर कांहीं शारीरिक वस्तु नाहीं, मानसिक आहे. सर्व विश्वाला परिपूर्ण प्रेमानें पाहण्याचें शिकण्यासाठीं च लग्न आदि प्रयोग आहेत.

हृदयाच्या विरुद्ध कांहीं च करूं नका. धैर्यानें काम घ्या व ईश्वरावर श्रद्धा राखा. जेव्हां जेव्हां कांहीं विचारावेंसें वाटेल तेव्हां खुशाल विचारा.

तुमचा व्यक्तिगत परिचय मला नाहीं. असण्याची खास गरज हि नाहीं. कारण शरीराला विसरावयाचें च आहे.

[ मराठी हरिजन, ता. २० आक्टोबर १९४६ ]

: २७ :

# *महारोगी-सेवा

## आरंभिक

महारोग-निवारणाचें काम करणाऱ्या सेवकांचें हें संमेलन आहे. येथें चार शब्द सांगण्याची जबाबदारी माझ्याकडे आली आहे. वास्तविक हें कोविदांचें काम आहे. मी या विषयाचा कोविद नाहीं. आणि कोविद या नात्यानें बोलण्याची माझ्या कडून अपेक्षा हि नाहीं. मी बोलायचें म्हणजे या कामा विषयीं प्रेम असलेला, त्याच्याशीं संबंध असलेला, हितेच्छु या नात्यानें बोलायचें. ऐकणारांनीं त्या च अपेक्षेनें ऐकायचें.

## समग्र ग्राम-सेवेचें अपत्य

महारोग्यांच्या सेवेचें काम करणारी एक लहानशी संस्था येथें आज चार वर्षें चालली आहे. हें आपणांस माहीत च आहे. हें काम चालविण्याची आमच्या मनांत कांहीं च पूर्व-योजना किंवा कल्पना हि नव्हती. १९३२ सालापासून आम्ही मंडळींनीं खेड्याच्या सेवेसाठीं खेडोपाडीं सतत फिरण्याचा कार्यक्रम दोन-तीन वर्षें चालवला. त्यानंतर कांहीं गांवें निवडून तेथें आमच्या कल्पने प्रमाणें खादी, हरिजन-सेवा, इत्यादि लोक-सेवेचीं कामें आरंभिलीं. खेडोपाडीं हिंडत असतांना खेड्यांच्या गरजांचें निरीक्षण आणि त्यावर उपाय-योजना यांची चर्चा नियमित चालत असायची. सदर निरी-

*(ता. ३०-१०-१९४७ ला वर्धा येथें हिंदुस्थानांतील कुष्ठकार्यकर्त्यांची परिषद झाली. त्या परिषदेसाठीं पाठविलेलें लेखी भाषण. विनोबांना परिषदेंत हजर राहणें शक्य नव्हतें म्हणून तें परिषदेंत वाचून दाखविण्यांत आलें.)

क्षणांत इकडे महारोगाचा किती भयानक संचार आहे याची पूर्वी कधीं च नसलेली कल्पना आली. सरकारी आंकडे हि जाहीर झालेले आहेत च. पण आम्हांला असें दिसून आलें कीं, सरकारी आंकड्यांना निदान चारानें गुणल्या शिवाय वस्तु-स्थितीचें दर्शन होणार नाहीं. मग काय करायचें, हा प्रश्न निघाला. आणि हें काम हातीं घेतल्या शिवाय इलाज च नाहीं असें ठरून माझे मित्र श्री. मनोहरजी यांच्या तळमळीनें या कामाचा आरंभ झाला. तळमळ असली तरी ज्ञानाचा अभाव होता. ज्ञानाशिवाय काम कसें चालणार ! ज्ञान मिळविण्याचा मार्ग हि तळमळीनें च दाखवून दिला. विधायक कार्यक्रमाच्या परिगणनेंत आजच्या प्रमाणें गांधीजींनीं त्यावेळीं महारोगी-सेवेचें नांव घेतलेलें नव्हतें. तरी समग्र ग्राम-सेवेची कल्पना डोळ्या-पुढें असल्यामुळें तींतून तें सहज च निष्पन्न झालें.

इथल्या कामांत तशी कांहीं च विशेषता नाहीं. नवीन शोध नाहीं, कार्य-विस्तार हि नाहीं; पण "समग्र ग्राम-सेवेचें अपत्य" ही च इथल्या कामाची, मला वाटतें, विशेषता म्हणतां येईल. शिवाय। खिस्ती मिशनऱ्यांच्या बाहेर इतर लोकांनीं चालविलेल्या अशा संस्था हिंदुस्थानांत फार थोड्या त्यामुळें आमच्या ह्या संस्थेला फुकटांत लाभलेली विशेषता मोजायची असल्यास मोजावी !

## महारोगाची प्राचीनता

साऱ्या जगांत हा रोग सारखा नाहीं. कोठें मुळीं च नाहीं, कोठें अतिरिक्त आहे. अतिरिक्त विभागांत आमच्या या देशाची गणना आहे. येथें तो फार जुन्या काळापासून आहे. वेदांत हि त्याचें सूचन आहे. एक वैदिक ऋषि देवाला म्हणत आहे, " देवा, माझें रडगाणें मी तुझ्या पुढें रडत आहे. माझ्यासाठीं तूं धावून ये. जशी ती ब्रह्म-वादिनी घोषा आपल्या कुष्ठ-रोगाच्या निवारणासाठीं तुझा धावा करीत होती, आणि तूं तिला पावलास, तसा च तूं मला हि पाव." ऋषीला कोणत्या रोगाचें दुःख होतें

माहीत नाहीं. कदाचित् त्याचें तें दुःख आध्यात्मिक असेल. मनो-विकाररूपी महारोगाच्या निवारणासाठीं तो तळमळत असेल. ब्रह्म-वादिनी घोषेचा रोग श्वेत-कुष्ठ कीं महारोग हें हि सांगता येणार नाहीं. शब्द श्वेत-कुष्ठ सुचवणारा आहे. भाव महारोगाला अधिक जुळणारा आहे: तें कसें हि असो, हा रोग हिंदुस्थानांत फार जुना आहे यांत संशय नाहीं. ब्रह्म-वादिनी घोषेचा तो रोग "ईश्वर-भर्तानें बरा झाला, असें वेद नमूद करीत आहे. आणि तशी एक श्रद्धा आमच्या येथील भाविक समाजांत प्राचीन काळापासून आजतागायत चालू आहे.

## कारणें

सदर रोगावर छालमोगऱ्याचा उपयोग येथल्या लोकांना पूर्वी पासून माहीत आहे, आणि रोग्याला समाजापासून दूर ठेवण्याची कल्पना हि आहे, जरी सदर कल्पनेचा व्यवहारांत विनियोग, बहिष्कार आणि तिरस्कार, या पलीकडे झालेला नाहीं, असें दुर्दैवानें म्हणावें लागतें. येथील अस्पृश्यतेच्या मुळाशीं जीं कांहीं ऐतिहासिक कारणें आहेत त्यांत माहारोग्यांना दूर ठेवण्याच्या कल्पनेचा हि समावेश असेल असें मानण्यास जागा आहे. महारोगाची कारण-मीमांसा करण्याचें माझें काम नाहीं. तशी गरज हि नाहीं. अनेक कोविदांनीं ती केली आहे. भावार्थ इतका च निघाला आहे कीं निश्चित असें कारण सांगतां येत नाहीं. आमच्या कडील भोळे लोक, ज्यांत मी माझी हि गणना करतो, पूर्व जन्मांतील दोषाचें हि कारण दाखवतात. "कारण तर असलें च पाहिजे, पण निश्चित सांगतां येत नाहीं" एवढा च याचा वैज्ञानिक भाषेत अर्थ आहे. व्यक्ति-गत रोगाचें विशेष कारण जरी व्यक्ति-गत असावें लागतें, तरी सामाजिक कारणें हि व्यक्तीला भोगावीं लागत असतात. शिथिल नीति, अस्वच्छ राहणी, पोषण-हीन आहार इत्यादि सर्व-साधारण कारणें हि आपलें काम करीत च असतात. आणि म्हणून महारोग सारख्या "गूढ" रोगाच्या निवारणाच्या कार्य-क्रमांत हीं सर्व-सामान्य सामाजिक कारणें दूर करण्याचा हि कार्य-क्रम अंतर्भूत समजला पाहिजे.

## ख्रिस्ती धर्माची देणगी

हा रोग जरी हिंदुस्थानचा हक्काचा असला तरी हिंदी लोकांकडून त्याच्या निवारणाचा फारसा यत्न झालेला नाहीं, हें जाहीर च आहे. ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं या संबंधीं फार कळकळीनें काम केलें आहे. किंबहुना त्यांनीं दिलेला सेवेचा धडा ही ख्रिस्ती धर्माची हिंदुस्थानला फार मोठी देणगी आहे. तिचा आम्हीं साभार स्वीकार केला पाहिजे, आणि कृतज्ञता-पूर्वक तो धडा आम्हीं गिरवला पाहिजे. भूतदया हा विशाल शब्द आम्हीं काढला आणि जीव-हिंसा-निषेध, निर्मांसाहार इत्यादि प्रयोग केले. पण भूत-दयेंत मानव-सेवा गृहीत च आहे हें आम्ही विसरलो. भूत-दया शब्द फार च व्यापक पडला, आणि त्यामुळें निकटच्या कर्तव्याचें हि भान राहिलें नाही. उलट ह्युमॅनिटी अथवा मानव-सेवा असा मर्यादित शब्द उच्चारल्यामुळें त्या शब्दाचें चिंतन करणारांना मानव-सेवेची गोडी सहज च वाटली आणि निर्मांसाहार आदि प्रयोग उशीरा सुचले. असा हा शब्दाचा महिमा आहे. शब्द-शक्ति केव्हां हि मर्यादित च. म्हणून शब्द बदलण्याची गरज नाहीं. आपापला-शब्द कायम राखून ज्यानें त्यानें त्यांत राहून गेलेला अर्थ आपल्या आचरणानें भरावा.

## आमची उपेक्षा-बुद्धि

आतां पर्यंत आमच्या कार्य-कर्त्यांची बहुतेक शक्ति परकीय सत्ता येथून काढून टाकण्याच्या कामीं खर्च पडली. त्या साठीं अहिंसक साधनें वापरण्याचें धोरण आमच्या पुढाऱ्यांनीं ठरवल्यामुळें विधायक कार्य हि देशांत थोडें-फार केलें गेलें. तथापि कार्य-कर्त्यांची दृष्टि राजकीय राहिल्या-मुळें तें सारें विधायक कार्य कसें-बसें आणि अर्ध्या दिलानें झालें. त्यांतून जें स्वराज्य लाभलें त्याची दशा आज आपण पाहत च आहों. जर पूर्ण श्रद्धेनें व एकाग्र मनानें रचनात्मक कार्य केलें गेलें असतें तर आजच्या स्वराज्याचें तेज कांहीं वेगळें च झालें असतें. तथापि जें कांहीं झालें त्याबद्दल

कोणाला दोष देण्याची गरज नाहीं. निषेधक ध्येय डोळ्यापुढें ठेवून केलेलें विधायक कार्य जसें होणें शक्य होतें तसें च तें झालें. विधायक कार्यांतून सुद्धां सरकार वर दाब आणण्याच्या कामीं, किंवा जन-शक्ति संघटित करण्याच्या कामीं, जीं विधायक कार्यें सरळ किंवा आडून उपयोगी भासलीं, त्यांकडे कार्य-कर्त्यांनीं थोडें-फार लक्ष दिलें. तशा स्थितींत महारोग्यांच्या सेवे सारख्या निरुपद्रवी, किंवा केवळ मानव-सेवेच्या कामाकडे कुणाचें लक्ष जाणार होतें ?

## सेवेसाठीं सज्ज व्हा

पण आता ती स्थिति पालटली पाहिजे. परकीय सत्ता आतां येथून गेलेली आहे. निषेधक ध्येयानें या पुढें कांहीं च लब्धि होणारी नाहीं. स्वराज्याची इमारत आतां खालपासून वर पर्यंत बांधायची आहे. आमचें स्वराज्य, राम-राज्य, ईश्वराचें राज्य, बनवायचें आहे. स्वराज्य म्हणजे परकियांची सत्ता जाऊन आमच्यांतल्या मूठभर लोकांची सत्ता, एवढा च अर्थ राहिला तर तें स्वराज्य रावण-राज्य किंवा सैतानाचें राज्य हि होऊं शकेल. आम्हांला तसें नको असेल तर या पुढें दीनांच्या, दुःखितांच्या, उपेक्षितांच्या, परित्यक्तांच्या, तिरस्कृतांच्या सेवे साठीं आम्हीं कंबर कसली पाहिजे.

## दया-दक्ष कर्म-वीरांची गरज

कोणी ढिले विचार करणारे म्हणतात, "आतां आमचें च सरकार आलें आहे तर अशा गोष्टी तें सरकार च पाहून घेईल." या सारखा मूर्ख विचार क्वचित् च असूं शकेल. महारोगी-सेवे सारखें कार्य निष्काम सेवकांच्या उठावणी शिवाय सरकारच्या हातून कधीं च होणें शक्य नाहीं. सरकार थोडी-फार मदत करूं शकेल, आणि त्यानें केली हि पाहिजे. पण मी ती मदत या कार्यांत नगण्य समजतों. जन-सेवेच्या भावनेनें भारलेल्या कर्म-वीरांचें हें काम आहे. असे दया-दक्ष कर्म-वीर या वेळीं मोठ्या

प्रमाणांत पुढें आले पाहिजेत. त्या कामीं जर आमचें हें संमेलन उपयोगी पडलें तर त्याचें सार्थक होणार आहे. असे सेवक पुढे आल्यास सरकार कडून मिळू शकणारें साह्य मिळेल आणि जनतेंतील दानवृत्तीचा ओघ हि इष्ट दिशेनें बदलतां येईल.

## सरकारी मदत गौण

सरकार कडून अपेक्षा कोणती करायची हें हि पाहिलें पाहिजे. सरकार कडून धन-साह्याची अपेक्षा मी विशेषशी करणार नाहीं. आमची सेवा सफल होण्याला कांहीं सामाजिक नियंत्रणाची किंवा नियमाची गरज राहणार आहे. तेवढी मी सरकार कडून अपेक्षा करीन. बाकी धन-साह्य मी लोकां कडून च अपेक्षीन. आमच्या लोकांत दान-वृत्ति कमी आहे, असें नाहीं. पण ती पुष्कळशी मूढ आहे. दान म्हणजे कोठें हि कसें हि फेंकून देणें नव्हे. सत्कारणीं लागलें तर तें दान होतें. याची जाणीव लोकांना करून दिली पाहिजे.

## भ्रम-निरसन झालें पाहिजे

पण तें कांहीं कठिण काम मी समजत नाहीं. मुख्य गोष्ट सेवक पुढें आले पाहिजेत, ही च आहे. महारोगी-सेवे बाबत कांहीं भ्रम-निरास होण्याची हि गरज आहे. महारोग्यांच्या सेवेंत पडणें म्हणजे आपल्या वर फार मोठा धोका किंवा खतरा ओढवून घेणें अशी लोकांत समजूत आहे. ही समजूत तितकीशी खरी नाहीं, ही गोष्ट लक्षांत आणून द्यायला पाहिजे आहे. खतरा थोडा–फार जरूर आहे. पण कोणता च खतरा उचलायचा नाहीं, अशी ज्यानें शपथ घेतली, त्याला या जगांत कोणता हि पुरुषार्थ साधणें शक्य नाहीं. खतरा थोडा-फार पत्करावा लागतो. तथापि शास्त्रीय पध्दतीनें सेवा करणाराला फार भयाचें कारण नाहीं,' या ज्ञानाचा प्रचार झाला पाहिजे.

## सेवकाचा रोग ईश्वरी प्रसाद

पण कार्यकर्त्ता केव्हां हि ईश्वर-शरण असला च पाहिजे. योग्य काळजी घेऊन हि संसर्गानें रोग लागू झाला च तर त्याची परवा न करतां तो एक ईश्वर-प्रसाद आहे, असें मानण्याची मनःस्थिति असली पाहिजे. तशी मनस्थिति असलेल्या सेवकाला रोग हि लाभदायक होऊं शकतो. आमच्या कुष्ठ निवासांतील रोग्यांच्या समोर एकदां बोलण्याचा प्रसंग आला असतां, मी त्यांना असें सांत्वन देण्याची हिंमत केली होती कीं, "बाबांनो, रोग तर तुम्हांला होऊन चुकला. प्रारब्ध टळणारें नसतें. पण तो च ईश्वर–प्रसाद समजाल तर तुमचा रोग च तुम्हांला तारक होऊ शकेल. ज्ञानी माणसांनीं आम्हांला शिकविलें आहे कीं, आम्ही देहाहून भिन्न आहोंत. आत्म-स्वरूप आहोंत. या गोष्टीचा साक्षात्कार करण्याला हा रोग मददगार होऊ शकतो. त्या दिशेने चिंतन करून पहा." माझें भाषण ऐकणाऱ्या रोग्यापैकीं एका नें कांहीं दिवसां नंतर मला कळवलें कीं, "तुम्हीं सुचविल्या प्रमाणें मी चिंतन करीत असतों, आणि त्यानें मला सांत्वन मिळालें आहे." जें सांत्वन एका सामान्य रोग्याला मिळूं शकतें, तें निष्काम भावनेनें सेवा करणाऱ्या सेवकास रोग लागू झाल्यावर कां लाभू शकणार नाहीं?

## रुग्ण-वसाहतीचा आदर्श

महारोग्यांची सेवा ठिकठिकाणीं उपचार-केन्द्रें काढून, आणि कांहीं ठिकाणीं रुग्ण-वसाहती चालवून, अशा दोन्ही रीतींनी करावी लागते. दोहोंत अधिक गरज कशाची इत्यादि चर्चेत मला पडायचें नाहीं. पण वसाहती चालवावयाच्या त्या बाबत एक विचार सुचविण्याची इच्छा होते. तो हि नवीन आहे असें नाहीं, पण मला तो ज्या परीनें सुचतो त्या परीनें मी थोडक्यांत सांगून टाकतों. वसाहतींतील रोग्यांची, आम्ही समाजाच्या दयेचे विषय आहोंत, अशी दीनवाणी दशा नसावी. दयेचे तर ते विषय

आहेत. पण आमच्या नव्हे, ईश्वराच्या. ईश्वराच्या दयेचे विषय तर आम्ही सर्व च आहोंत. आम्हा रोग्यांची सेवा करणारांत आम्ही दुसऱ्या कोणावर उपकार करीत नसून आमचा आमच्या वर च उपकार करीत आहोंत, अशी भावना असावी. आणि रोग्यांना आम्हाला हि कांहीं पुरुषार्थ आहे अशी श्रद्धा वाटण्या सारखें वातावरण असावें. जमेल तितका कर्म-योग, स्वावलंबनाचा यत्न, परस्पर सहकार्य, जपज्ञानादि प्रवृत्ति या सर्वांचें वातावरण वसाहतींत निर्माण करतां आलें पाहिजे.

## प्रार्थना

सांगायचें होतें तें सांगून झालें. शेवटीं, गीतेच्या शब्दांत, मानवरूपांत प्रगट झालेल्या परमेश्वराचा आमच्या कडून अवमान न होवो एवढी च प्रार्थना करून संपवितों.

[ सेवक, वर्धा ता. १९ जानेवारी १९४८ ]

: २८ :

# सेवकाची शिदोरी

ग्रामसेवा मंडळ वर्धा, ही संस्था वर्धा तालुक्यांत ग्रामसेवेच्या कार्याचा अगदीं लहानसा प्रमाणांत, पण व्यवस्थितपणें प्रयोग करीत आहे. ह्या संस्थेतर्फे वर्धा तालुक्यांत बारा खेड्यांत काम चाललें आहे. तिनें यंदाच्या वार्षिक सभेंत पुष्कळ चर्चेअंतीं खालील ठराव केले आहेत :—

ग्रामसेवा मंडळातर्फे खेडेगांवांत काम करणारा प्रत्येक मनुष्य—

(१) रोज कमींत कमी आठ तास शरीरश्रम करण्याची व रोजीं चार आण्यांच्या आंत आजीविका चालविण्याची तयारी असलेला, आणि

(२) कोणत्या हि परिस्थितींत, कोठून हि कुटुंबासकट पूर्ण काम देणाऱ्या प्रत्येक व्यक्तिगणिक रोजीं आठ आण्यापेक्षां अधिक अपेक्षा न राखणारा असावा.

१ नोव्हेंबर १९३५ पासून एक वर्षासाठीं जो ग्रामसेवक चरखा मघांच्या भावानें कांतून जितकी मजुरी मिळवील तितकी च मदत त्याला अधिक घेण्याचा अधिकार राहील.

सदर ठरावावर माझें भाष्य लोकांना मिळावें अशी इच्छा प्रगट केली गेली आहे. हे ठराव इतके क्रांतिकारक स्वरूपाचे आहेत, कीं तत्संबंधीं भाष्याची अपेक्षा राहणें स्वाभाविक आहे. त्यांचें भाष्य वास्तविक आचरणानें व्हायचें आहे, शब्दांनीं व्हायचें नाहीं. तथापि वाङ्मयाला हि करभार मिळाला च पाहिजे म्हणून थोडें लिहितों.

पृ. १२३

ठरावाच्या पहिल्या भागांत शरीरपरिश्रमाचें आणि ऐच्छिक गरीबीचें तत्व नमूद केलें आहे. नाना कारणें उभीं करून शरीरपरिश्रम टाळण्याचा आम्ही आज पर्यंत प्रयत्न करीत आलों. जगांतील विषमता, उच्चनीचभाव गुलामगिरी, हिंसा हीं मुख्यतः शरीरपरिश्रम टाळण्याच्या ह्या आर्थिक पापांतून उद्भवलीं आहेत. मुलांनीं आणि म्हाताऱ्यांनीं शरीरपरिश्रम करूं नये, विद्यार्थ्यांनीं आणि अध्यापकांनीं शरीरपरिश्रम करूं नये, रोग्यांनीं आणि भोग्यांनीं तो करूं च नये, निरुपयोग्यांनीं आणि उद्योग्यांनीं तो करूं नये, संन्याशांनीं आणि देशभक्तांनीं तो करूं नये, विचारकांनीं, प्रचारकांनीं आणि व्यवस्थापकांनीं करूं नये, मग तो करावा कोणी ? अज्ञांनीं आणि लाचारांनीं ? ह्या भयानक स्थितींतून बाहेर पडल्याशिवाय अन्य कोणत्या हि उपपत्तीनें, वादानें, शाहीनें, व्यवस्थेनें, रचनेनें सुटका होणें नाहीं, ह्या वस्तूची ओळख ठरावाच्या पहिल्या भागांत आहे. मनूच्या भाषेंत हा अर्थशुचित्वाचा प्रयत्न आहे.

ठरावाच्या दुसऱ्या भागाला "कामशुचित्वाचा प्रयत्न" असें नांव देतां येईल. स्त्रियांविषयीं भोग्यबुद्धि राखून, त्यांच्यापासून व्यक्तिगत सेवा भरपूर करवून घेऊन, वर आणखी त्यांचा आपल्यावर भार च करवून घ्यायचा, आणि तो भार समाज सेवेवर टाकायचा, अशा वृत्तीनें सेवेचें केवळ नांव च हातांत राहतें. स्त्रियांच्या अद्भुत शक्तीला वाव मिळत नाहीं आणि समाजसेवेचें कार्य एकांगी आणि महाग पडतें. कुटुंब म्हणजे समाजसेवेसाठीं निर्माण झालेला स्वाभाविक, स्वयंपूर्ण, सहकारी मठ, ही व्याख्या अमलांत आणल्यास, समाजाला कुटुंबाचा भार वाटणार नाहीं, उपकार च वाटेल.

अर्थशुचित्व आणि कामशुचित्व हें सेवाधर्माचें खरें साधन आहे. आणि साध्य हि तें च आहे.

ह्या गरीब आणि गांजलेल्या देशाची जे कळकळीनें सेवा करूं इच्छिणारे आहेत त्यांच्या जर हें लक्षांत आलें कीं, अर्थशुचित्वाशिवाय आणि कामशुचित्वाशिवाय सेवा होत च नाहीं, तर ते त्या दोन्ही वस्तु साधण्यासाठीं—मग त्या किती हि कठिण भासोत—पूर्ण प्रयत्न केल्याशिवाय राहणार नाहींत, अशी मला उमेद आहे.

ठरावाचा शेवटचा भाग म्हणजे ग्रामसेवेमध्यें प्रवेश करूं इच्छिणाऱ्या किंवा नवीन प्रविष्ट झालेल्या सेवकांना पुरवणीमदत आहे. महाराष्ट्र चरखा-संघानें प्रेमपूर्वक, साहसपूर्वक आणि संकोचपूर्वक कांतणारांची मजुरी वाढवून ९ तासांत त्याना ३ आणे मिळतील अशी व्यवस्था केली आहे. ही मजुरी पुरेशी तर नाहीं च. माझ्या गेल्या ४॥ महिन्यांच्या कांतण्याच्या सतत अनुभवावरून मी म्हणू शकतों कीं, ह्या वाढलेल्या दराप्रमाणें हि ९ तासांत ३ आणे मिळविणें सामान्यतः जड च जाणार आहे. हें कथन तपशील देऊन मी सिद्ध करीत बसत नाहीं; जरी तपशील माझ्यापाशीं तयार आहे. पण अशा हि स्थितींत गरीब बापड्या बायांच्या स्थितींत सेवकानें आपल्याला घालून घेतलें च पाहिजे. तथापि ग्रामसेवाकार्याचें सर्व सुचूं लागेपर्यंत सेवासंशोधनार्थ चिंतनासाठीं प्राथमिक अवस्थेंत सेवकापाशीं कांहीं स्वतंत्र वेळ उरला पाहिजे. त्यासाठीं ही पुरवणीमदत आहे. पुढें चिंतनांत तो तरबेज झाल्यानंतर तुकोबाप्रमाणें तो हि म्हणूं लागेल "चिंतनासी न लगे वेळ। सर्व काळ करावें."

[ महाराष्ट्र खादी-पत्रिकेंतील निवड लेखसंग्रहमधून १९३६ ] ( पृष्ठ-३ )

: २९ :

# रेखनाचीं उपकरणें

मूलोद्योगी शाळांना सामान कोणकोणचें पुरवावें लागेल ह्याची एकदां यादी केली जात होती. कांतण्याचा मूलोद्योग घेतला तर त्याला औजारें इत्यादि काय काय लागतात त्याची यादी तर पाठ्यक्रमाला जोडलेली आहे च. त्यामुळें ती यादी करण्याचा प्रश्न नव्हता. पण मूलोद्योगाबरोबर आणि तद्वारा इतर विषय शिकवावे लागतात त्यांना लागणाऱ्या सामानाचा प्रश्न होता.

"ड्रॉइंग" उर्फ "रेखन" हा एक विषय मूलोद्योगी पाठ्यक्रमांत आहे आणि त्याला स्थान हि महत्त्वाचें दिलेलें आहे. कारण उद्योगाशीं तो विषय तसा च निगडित आहे. पण त्या रेखनासाठीं लागणाऱ्या साधनांची नामावली निघाली तेव्हां मात्र मी घाबरलो. रंगाच्या वड्या, ब्रश, रेखन-कागद इत्यादि प्रत्येक विद्यार्थ्यागणिक लागणारें उपयोगी सामान कुणीं घ्यायचें ? विद्यार्थ्यांनीं घ्यायचें तर खेड्यांतल्या गरीब विद्यार्थ्यांना तें शक्य नाहीं. आणि सरकारनें घ्यायचें तर योजना महाग होते. मग काय करायचें ?

मला स्पष्ट सांगावें लागलें कीं हें असलें सामान कोणी च विकत घ्यायचें नाहीं: सरकारनें हि नाहीं आणि विद्यार्थ्यांनीं हि नाहीं. मग रेखनाच्या पाठ्यक्रमाची योजना कशी करायची ?

हा मुद्दा नीट समजून घेण्याजोगा आहे. ड्रॉइंग, उर्फ रेखन, उर्फ चित्रकला दोन प्रकारची आहे. एक सौंदर्याची आणि दुसरी उद्योगाची. किंवा अधिक चांगल्या भाषेत, एक भक्तीची आणि दुसरी कर्मयोगाची.

दोहोंचा हि समावेश पाठ्यक्रमांत केलेला आहे. पण त्यांत हि माझ्या दृष्टीनें तारतम्य गृहीत आहे. जीवनांत—आणि म्हणून शिक्षणांत—कर्म-योग प्रधान आहे हें विसरून चालणार नाहीं. भक्ति ही त्या कर्म-योगाची शोभा आहे, आणि ज्ञान ही त्याची च प्रभा आहे. मूलोद्योगी शिक्षण पद्धतीची एकंदर विचार-सरणी च ही आहे, आणि रेखनाला हि ती तशी लागू आहे.

कांतणें, विणणें, सुतारी, गवंडीकाम इत्यादि सर्व उद्योग आणि लेखनादि कला ज्या रेखनाची मदत मागतात तें मुख्यतः कर्म-योगी रेखन होय. भिन्न भिन्न आलेख तयार करणें, नकाशाबरहुकूम अमुक पट आकाराचा नकाशा तयार करणें, एखादा नवीन मोढिया पाहण्यांत आला तो प्रत्यक्ष किंवा स्मरणानें रेखणें, किंवा तत्संबंधीं आपल्याला एखादी कल्पना सुचली तर ती चित्रांत उमटवणें इत्यादि लेखीव, आंखीव, देखीव, स्मरीव, आणि कल्पीव रेखनाचा ह्यांत समावेश होतो.

हें कर्म योगी रेखन विशेष साधनें मागत नाहीं; पुष्कळसें साध्या पाटी-पेन्सिलीनें होऊं शकते आणि करावें. कांहींसाठीं कागद लागेल. तो कमींत कमी वापरावा. ज्याला "रेखन-कागद" म्हणतात त्याची प्रायः मुळीं च गरज नाहीं. रबर वापरणें ह्या सारखें गचाळ काम नाहीं. म्हणून तो सर्वथा वर्ज्य समजायचा. आधीं पाटीवर हात पूर्ण सरावून मग च कागद—अगदीं जरूरीपुरता—हातीं घ्यायचा. आंखीव कागद आलेखासाठीं आणि अन्य चित्रणासाठीं कांहीं लागतात; ते आयते विकत घ्यायचे नाहींत. विद्यार्थ्यांनीं आंखून घ्यावयाचें. हें हि रेखन-कलेचें एक अंग समजायचें. अशी दृष्टि ठेवली म्हणजे उद्योग, कला, ज्ञान, आनंद आणि स्वावलंबन, एकत्र साधून साधनांच्या जंजाळांत पडावें लागणार नाहीं.

"पण हें कर्म-योगी रेखन मुख्य समजलें तरी त्यांच्या अनुषंगानें सौंदर्याचें रेखन हि हवें च. आणि तें पाठ्यक्रमांत दाखल हि आहे.

कर्मयोगाच्या शोभेला त्याची गरज आहे असें तुम्हीं हि म्हणता; त्याला तऱ्हेतऱ्हेचीं उपकरणें लागणार च. त्याचें काय करायचें, हा प्रश्न उरतो च. " होय. त्याच्या उत्तरासाठीं च हा लेख आहे. आणि तेंच आतां पाहूं. मध्यंतरीं थोडें तारतम्य पाहून घेतलें.

इतर गांवांत होते तशी आमच्या पवनारला हि रंग-पंचमी झाली. आमच्या परिश्रमालयांतील मुलांनी हि गांवच्या रीतीप्रमाणें त्यात भाग घेतला. बाजारांतून रंग विकत आणून एकमेकांचे कपडे खराब केले. आणि मागून साबू लावून—साबू हि बाजारची च खरेदी—ते कपडे धुवावे लागले.पण तो रंग जातां जाईना. गांवच्या इतर लोकांना ही धुण्याची पंचाईत नव्हती; कारण परिश्रमालयांतील मुलांना लाभलेलें स्वच्छतेचें इंद्रिय त्यांना नव्हतें. मी त्या मुलांना म्हणालो, "रंग-पंचमीच्या खेळांत वेळ घालवला त्याबद्दल मी कांहीं बोलत नाहीं पण रंगात आणि साबूंत पैसा घालवला त्याचें काय? आणि इतकें करून साधलें काय? खरा आनंद तर लाभला च नाहीं. नुसता आयत्यावर कोयता केला. त्याऐवजीं तुमचें काम आटोपल्यावर संध्याकाळीं तुम्हांला वेळ मिळतो त्यांत तुम्ही ह्या नदीकाठानें दोन मैल वर गेला असतां तर पळसाचीं, जणूं तुमच्यासाठीं फुललेलीं, झाडें तुम्हांला सांपडलीं असतीं. त्यांच्या फुलांचा रंग तुम्हांला बनवतां आला असता. आणि आयत्या भुकटीच्या रंगापेक्षा तो पुष्कळ सौम्य आणि आल्हाद-दायक होऊन धुण्याला हि अडचण पडली नसती. आतां तुम्ही च सांगा कीं मी म्हणतो हा उद्योग अधिक आनंदाचा झाला असता कां तुम्हीं केला तो? मुलांनीं एकमतानें माझें म्हणणें पास केलें.

सौंदर्य-चित्रणाच्या प्रश्नाचें रंग-पंचमीच्या या कहाणींत उत्तर मिळणारें आहे. विद्यार्थ्यांच्या भोंवतीं निसर्ग उभा आहे. त्या निसर्गाशीं एकरूप होऊन त्यांतून आनंद-लब्धि आणि आनंद-शुद्धि साधणें हा ह्या सौंदर्याच्या

रेखनाचा उद्देश आहे. विद्यार्थ्यांच्या आसपासचा निसर्ग जो ह्या सौंदर्य-चित्रणाला विषय पुरवणार, तो च त्याचीं साधनें पुरवण्याला असमर्थ ठरला तर ईश्वराची कला च काय उरली? बालकांच्या पोटांत भूक तर आईच्या स्तनांत दूध, ही त्याची योजना आमच्या कशी लक्षांत येत नाहीं? आसपासचीं झाडें आपल्याला उत्तम ब्रश आणि उत्तम रंग पुरवूं शकतात. आणि चित्रणाचा विषय हि त्यांच्यांत भरलेला आहे. निसर्ग काम-धेनूसारखा आहे. ती दूध तर देते च. पण प्यायला वाटी हि देते. मागायचा च अवकाश आहे.

"आनंद-लब्धि आणि आनंद-शुद्धि हा दुहेरी हेतु लक्षांत घेण्या-सारखा आहे. आनंद तर प्राणि-मात्राला उपलब्ध आहे. किंबहुना आत्म्या-चें तें स्वरूप च आहे. मुख्य प्रश्न आनंद विशुद्ध करण्याचा आहे.

माझें बाळपण कोंकणच्या डोंगरांनीं वेढलेल्या एका खेडेगांवांत गेलें आहे. तिथें आम्ही दिवाळीची दिवे-लावणी कशी करीत असूं त्याचें स्मरण मला प्रायः दरेक दिवाळीला होत असतें. पणतीसाठीं कोरांटीचीं फळें जीं सहज च गोल असतात तीं जंगलांतून आणून अर्धीं चिरायचीं. आंतील बलक काढून टाकला कीं सुंदर पणती तयार झाली. पण ती मारवाडी लोट्याप्रमाणें बिनबुडाची. मारवाडी लोट्याला मारवाडच्या रेतीची बैठक आयती च असते. आमच्या पणतीसाठीं चिकणमातीची बैठक तयार करायची. त्यावर ती पणती विराजमान झाली म्हणजे तिच्यांत कोंकणांतलें शुद्ध स्वदेशी खोबरेल तेल भरायचें. कापूस जरी कोंकणांत दुर्मिळ तरी देवकापूस आम्हांला वाती पुरवायला समर्थ होता च. अशा रीतीनें आमचे दिवे तयार व्हायचे. मग ते चौकोनांत, तिकोनांत, वर्तुळांत, सुरेखेंत बसवा-यचे. झाली आमची दिवाळी. दिवाळी म्हणजे चार महिन्यांच्या पावसाळ्या-नंतरची पहिली निरभ्र अमावास्या. रजनीदेवी आपल्या दिव्य वैभव सह

परिपूर्ण प्रगट झालेली. चंद्राची साम्राज्यसत्ता लोपून लहान मोठ्या स्वायत्त तारका परस्पर-सहकार्याने सौंदर्य-निर्मिति करण्यास सजलेल्या. त्यांच्या आकृति जर ह्या आमच्या दिव्यांनीं आम्ही नटवल्या असत्या तर आमचें स्वराज्य अधिक च रंगलें असतें. पण ही कल्पना त्यावेळीं सुचलेली नव्हती, म्हणून तेवढा उणेपणा राहून गेला होता.

ही झाली चाळीस वर्षांपूर्वीची जुनी खेडवळ आठवण. आता दुसरी नवी "सुधारलेल्या" खेड्यांतली. सावलीचें खादी-कार्य पाहण्यासाठीं एकदा मी गेलों होतों. दिवस दिवाळीचे होते. सावलीच्या मुलांनीं रॉकेलच्या चिमण्या (दिवालगिऱ्या) जस्ती पत्र्याच्या बिनकांचवाल्या रांगेनें मांडून दिवाळी साजरी केली होती. गिरणीच्या धुराड्यातून किंवा सिगारेट फुंकणाऱ्यांच्या तोंडांतून जसे धुराचे ओंगळ लोट वाहत असतात तसे ह्या रांगेनें मांडलेल्या चिमण्यांतून धुराचे समांतर लोट वाहत होते. बिचाऱ्या मुलांना दिवाळीचा आनंद लाभत च होता. त्यांत त्यांचा काय दोष होता ? इंग्रजी सुधारणेची किमया काय सामान्य आहे? लोक म्हणतात च–"देवाची करणी नारळांत पाणी; इंग्रजाची करणी बंबांत पाणी."

पण शिक्षक म्हणतात "आनंद-शुद्धीची ही मीमांसा ठीक आहे. पण तुम्ही म्हणता तसे कुंचले तयार करायचे, फुलांचे पानांचे रंग बनवायचे म्हणजे उद्योग आणखी च वाढला. मग बाकीच्या ज्ञानाचें कसें व्हायचें ?" हा आक्षेप समवाय–पद्धतीचें स्वरूप न समजल्यामुळें निघत आहे. "अन्न-समृद्धि वाढली, मग भुकेचें कसें व्हायचें ?" अशासारखा हा प्रश्न आहे. तो इतका सोपा आहे कीं त्याचें उत्तर देण्याची गरज नाहीं. आणि इतका कठिण आहे कीं त्यासाठीं प्रत्यक्ष शाळा च चालवायला हवी.

तूर्त मूलोद्योगी पाठ्यक्रमांतील दोन हेतु उद्योग-सिद्धि आणि आनंद-शुद्धि सुचवायचे होते. उपकरण-चिंतेच्या निमित्तानें ते सुचवले.

[ ग्राम-सेवा-वृत्त, जुलै १९४७ ]

: ३० :

# गोपालनाच्या व्यापक योजनेबाबत सूचना

अकरा फेब्रुवारी जमनालालजींचा मरण दिन. दर साल येतो आणि गो-सेवेच्या कामा ची आठवण देऊन जातो. पांच वर्षे हें असें चालले आहे. सुमरे देश पंच-वार्षिक योजना करतात आणि तेवढ्यात देशाचा कायापालट होतो. आम्ही या पांच वर्षात गोसेवेसंबंधानें विशेष कांहीं करूं शकलों आहोंत असें म्हणण्यासारखी स्थिति नाहीं. पण या च काळा त देशानें स्वराज्याचा एक मोठा लढा दिला आहे. आणि गो-सेवेला देश-व्यापी चालना देतां येईल अशी थोडी फार सत्ता मिळवली आहे. ही गोष्ट लहान सहान नाहीं. गेल्या पांच वर्षांपुरतें हें समाधान होऊं शकतें. पण पुढील पांच वर्षांना तें पुरणार नाही. त्यासाठीं विधायक योजना करून ती पार पाडावी लागेल. पुढील पांच वर्षांची तशी मागणी आहे.

गो-सेवा-संघा नें या धामधुमीच्या काळांत हि आपल्या लहानशा सीमेंत कांहीं भरीव कार्य दाखवले आहे. फार थोडें आहे पण तितकें च तें मोलाचें आहे. आणि भावी योजनेचें दिशा-सूचन देशाला त्यांतून मिळण्यासारखें आहे. सेवाग्राम आणि गो-पुरी येथील प्रयोग शाळांनीं एवढें दाखवून दिलें आहे कीं, जवळपासच्या च गाई घेऊन त्यांचें दूध वाढवतां येतें. त्यांतून चांगले बैल निर्माण करतां येतात. जागेवरच्या गायींची जात सुधारणें, हें गो-सेवेचें मोठें कार्य आहे. आणि तें फार पैसा खर्च न करतां आणि गवगवा न करतां त्यांनीं सिद्ध केलें आहे. त्या कामांत पुष्कळ उणीवा आहेत. आणि आदर्शापासून तर तें फार च दूर आहे. पण प्रयोग या नात्यानें तें विचारांत घेण्यासारखें आहे असें म्हटलें च पाहिजे.

प्रांतिक सरकारें हातीं आल्यामुळें गायी-बैलांच्या जोपासनेची मोठी जबाबदारी आतां येऊन पडली आहे. आणि त्या संबंधीं योग्य दिशा ठरवण्याची जरूरी उत्पन्न झाली आहे. शहरांना भरपूर आणि चांगलें दूध पुरवण्याकडे साहजिक च लक्ष वेधलें गेलें आहे. त्या विषयीं आणि एकूण गोपालनाच्या समग्र प्रश्नाविषयीं कांहीं सूचना मला करायच्या आहेत.

१. दूध पुरवायचें म्हणजे दुधाळ गायीकडे लक्ष सहज च जातें. पण दुधाळ गायी होतां होईल तों आसपासच्या च निवडाव्यात, असें माझें म्हणणें आहे. दूर-दृष्टीनें पाहिलें म्हणजे यांतला हेतु लक्षांत येईल. जवळच्या जातीची उपेक्षा करून चालणार नाहीं. तसें करणें हा शेतकऱ्यांचा द्रोह ठरेल. शेतकऱ्यांच्या जवळ असलेल्या गायींच्या सुधारणेचा रस्ता दाखवून देणें ही सर्वांत मोठी गरज आहे. आणि शहरांना दूध पुरविण्याच्या उत्साहात तिकडे दुर्लक्ष करणें अनुचित होईल.

२. केवळ गायीचा दुधाळपणा तेवढा पाहून तिच्या पासून बैल कसे होतात ह्याचा विचार न करणें हि चूक होईल. शेतीसाठीं बैल हा गोरक्षणाचा एक पंख आहे. दुधासाठीं गाय हा दुसरा पंख आहे. हे दोन्हीं पंख शाबूत राहिले पाहिजेत. अति दुधाचा हव्यास धरून चालणार नाहीं. अगदीं च कमी दूध परवडणार नाहीं हें उघड च आहे. कृषि-समर्थ बैल आणि पुरेशा प्रमाणांत दूध याचा मेळ साधला पाहिजे. बैल कमताकद निघाला तरी चालेल, दूध भरपूर असलें म्हणजे झालें; ही दृष्टि त्या देशांत चालूं शकेल, ज्या देशांत शेती बैलावर अवलंबून नाहीं; आणि बैलाची खाद्य पदार्थांत गणना आहे. एका च गायींतून पुरतें दूध आणि चांगला बैल निघाला तर च हिंदुस्थानला परवडणार आहे.

३. शहरांना दूध पुरविणें एवढें च खेडयांचें काम नाहीं. गावकऱ्यांनीं स्वतः दूध प्यायलें पाहिजे आणि उरलेलें विकलें पाहिजे, हें आमचें उद्दिष्ट

असलें पाहिजे. म्हणून त्या त्या खेड्यांत मुबलक दूध पैदा होईल आणि तें पिणें गावकऱ्यांना परवडेल असें आम्हांला करावयाचें आहे.

४. शेती, गोपालन, तेलघाणी, चामड्याचा धंदा आणि खताची योजना, मिळून एक गट आहे. या समग्र गटाचा एकत्र प्रयोग झाला तर च शेतकऱ्याचीं मुलें दूध पिऊं शकतील. म्हणून गो-सेवेच्या सरकारी प्रयोगालयांत असे समग्र प्रयोग चालले पाहिजेत.

५. गो-सेवेला ग्रामोद्योगापासून फोडतां येणार नाहीं. ग्रामोद्योगाच्या अभावीं शेतकऱ्याला गरजा खरीदायला पैसा लागेल. ही स्थिति कायम असतांना त्याला गो-रस चाखणें शक्य नाहीं.

६. गांवकऱ्यांनीं बाहेरून बैल विकत घ्यायचा नाहीं. उत्तम बैल गावात च तयार झाला पाहिजे. त्यासाटीं गावो गाव योग्य वळूची सेवा सरकारनें पुरवायची आहे. हें काम अगदीं मूल–ग्राही आणि म्हणून सर्वांत अधिक महत्त्वाचें समजलें पाहिजे.

या सूचना कमींत कमी केल्या आहेत. तपशिलात गेलों नाहीं, भावी योजना यातील दृष्टि लक्षांत घेऊन झाली तर देशाचें भलें होईल. दृष्टि चुकली तर परिश्रम आणि पैसा खर्च होऊन हि इष्ट लाभ होणार नाहीं, असें मला वाटतें.

व्यापक योजना करणाऱ्यांनीं या सूचनांचा विचार करावा.

[ मराठी हरिजन, ९-२-१९४७ ]

## : ३१ :

# स्वच्छास्वच्छता व अस्पृश्यता

( मातंग परिषदेंतील व्याख्यान )

माझ्या प्रिय मित्रांनों,

### अंत्यजांची गांवा बाहेरील वस्ती

ह्या परिषदेचें जाहीरपत्रक व आमंत्रण मला २०।२५ मिनिटांपूर्वीं च मिळालें. फार आनंद झाला. मला जागा व रस्ता माहीत नव्हता. असा गांवातून हिंडत हिंडत इकडे आलों. शेवटीं ही जागा सांपडली. पुष्कळ वेळां मी सकाळच्या वेळीं दूर गावाबाहेर फिरायला जातों. १–२ मैल गेल्यावर रस्त्याच्या बाजूला एखादा छोटासा गाव लागतो. इथें कोण लोक राहतात असें विचारलें तर येथें महार किंवा मांग लोक आहेत असें सांगतात. गांवाच्या बाहेर शहरांपासून दूर, मोकळया हवेंत, त्यांचीं तीं घरें पाहिलीं म्हणजे पुष्कळ वेळां मला वाटतें कीं मी महार असतों तर कशी बहार झाली असती ! आतां मी शहरांतून येत होतों. अशी धूळ उडत होती ! नाकांत, तोंडांत, डोळयांत, धूळ च धूळ जात होती. शेवटीं हें तुमचें स्थान पाहून 'सुटलों' असें वाटून आनंद झाला. ज्याप्रमाणें पूर्वींचे ऋषि शहरापासून दूर, आश्रमांत रहात असत. त्याप्रमाणें अंत्यजांना राहतांना पाहून मला पूर्वींच्या ऋषींची आठवण होते. मात्र ऋषींत आणि अंत्यजांत एक फरक आहे. ऋषि गांवाबाहेर हेतुपूर्वक आनंदानें राहत असत. आणि अंत्यजांना जबरदस्तीनें व जुलमानें बाहेर रहावें लागतें, असा दोहोंत फार मोठा फरक आहे. एक माणूस ब्रह्मचर्याचें व्रत स्वीकारून

आनंदानें ब्रह्मचारी राहतो, दुसऱ्याला बायको मिळत नाहीं म्हणून ब्रह्मचारी राहावें लागतें.

## हीन मानून स्पर्श टाळणें अन्याय

आज अंत्यजावर सामाजिक जुलूम होतो आहे. मला जर कोणी म्हटलें कीं मी तुझ्या शरीराला स्पर्श करणार नाहीं, तर मी म्हणेन फार चांगली गोष्ट आहे. तुला स्पर्श करून माझा ओंगळपणा तुला दाखविण्याची माझी मुळीं च इच्छा नाहीं. माझ्या शरीरापासून तूं चार हात दूर राहिलास तर त्यांत च मला आनंद आहे. थर्डक्लासच्या डब्याचा अनुभव आपल्याला आहे च. जवळ जवळ बसण्यात फार आनंद आहे असें नाहीं. परंतु दुसरा जेव्हा मला हलका लेखून मुद्दाम दूर राखतो, मला स्पर्श करण्यांत पाप आहे असें मानतो, तेव्हा तो माझ्या बाबतींत अन्याय करतो.

## स्वच्छतेची मर्यादा

वास्तविक पाहता मनुष्यदेह च घाणेरडा आहे. पण मी त्याचा विटाळ मानीत नाहीं. मेहतराचा दाखला घ्या. मेहतर जोंपर्यंत घाण साफ करण्याचें काम करीत आहे तों पर्यंत त्याला स्पर्श करणें बरोबर नाहीं. परंतु काम आटोपल्यावर हातपाय धुऊन आंघोळ करून तो स्वच्छ झाल्या-वर त्याला शिवायला काय हरकत असावी? माझी आई मेहतर च होती. कारण ती लहानपणीं माझा मळ साफ करीत असे. सगळ्यांच्या च आया मेहतर असतात. आमचे वडील, आमची आई मळ साफ करीत असतां तिचा विटाळ मानीत असतील. कदाचित् ती च "मला शिवूं नका" म्हणून सांगत असेल. आई विटाळशी झाली म्हणजे आम्ही तिला शिवत नाहीं च. हा जुलूम नव्हता. परंतु आंघोळ करून साफ झाल्यावर हि आमच्या वडिलांनीं किंवा आम्ही तिचा विटाळ मानला असता तर तो जुलूम झाला नसता काय? मळ काढल्यानंतर आंघोळ करून स्वच्छ झाल्या-

वर आम्ही आमच्या आईला शिवतो. स्वच्छतेची इतकी मर्यादा पाळणें कांहीं चूक नाहीं. मेहतराचें काम करीत असतां शिवणें आरोग्याच्या दृष्टीनें सुद्धां बरोबर नाहीं. मेहतर, चांभार, महार, मांग वगैरे चामड्यांचा व्यापार करणारीं–किंवा अशीं च 'घाणेरडीं, समजलीं गेलेलीं, पण आमच्या "जरुरीचीं" कामें करणारीं माणसें ह्यांच्याकडून आधीं हीं कामें करून घ्यावयाचीं, व मग त्यांना अस्पृश्य म्हणून दूर राखायचें, हें बरोबर नाहीं. समजा मी माझ्या खोलींत बसलों आहे. कचरा काढलेला नाहीं. मला भेटायला एक सभ्य गृहस्थ आला. त्याबरोबर मीं जमिनीवर जाजम टाकलें. त्या योगानें काय होईल ? वरवर स्वच्छता दिसेल. पण खालीं घाण च राहील. "त्यापेक्षां दोन मिनिटें थांबा, झाडून साफ करतों," असें म्हणून केर काढून खोली साफ करणें अधिक चांगलें नाहीं काय ? असें करण्यानें मी थोडासा अस्वच्छ होईन. परंतु दोन मिनिटें अस्वच्छ झाल्याशिवाय स्वच्छता होत नाहीं, हा सृष्टीचा न्याय आहे. मी धोतर धुवूं लागलों कीं माझ्या अंगावर शिंतोडे उडतात च. स्वच्छता करण्यासाठीं आधीं थोडीशी अस्वच्छता स्वीकारावी च लागते. पायखाना साफ करतांना मी घाणेरडा होतो, पण तेवढ्या वेळेपुरता घाणेरडा. ती च गोष्ट अस्पृश्यांच्या बाबतींत असायला पाहिजे.

### उच्च-नीच भाव चुकीचा–कृष्णाचें उदाहरण.

लहानपणापासून ही गोष्ट माझ्या मनांत मुरली आहे. समाजांत उच्च नीच सर्वांची सारखी जरूर आहे. मुंबईच्या मेहतरांनीं संप केला म्हणजे मग मेहतरांचे आपल्यावर किती उपकार आहेत, तें समजेल. कृष्णाची गोष्ट आपल्याला माहीत आहे कां ? धर्मराजाच्या यज्ञांत कृष्ण आले. यज्ञात अनेक कामें असतात. कृष्ण म्हणाले मला काम पाहिजे. धर्म म्हणाले तुम्हांला देण्याजोगतें माझ्या जवळ काम नाहीं. कृष्ण म्हणाले, बा, असें कसें होईल, माझ्यासाठीं काम आहे तर ! सर्व मंडळी जेवल्यानंतर उष्टीं खरकटीं काढण्याचें काम मी करीन, पुढें युद्धाच्या वेळेस अर्जुनाला सारथी

कोणी मिळेना. कृष्ण म्हणाले मी सारथी होतो. व सारथी होऊन कृष्णांनीं घोड्याला खरारा देण्याचें, त्याला पाणी पाजण्याचें वगैरे कामें केलीं. कृष्ण बालपणीं गुराखी होते. पुढें मथुरा-द्वारकेचे राजे झाले. तरी पण घरीं गेल्यावर गाई बैल घेऊन रानात जात असत. असा आपला देव होता.

## वारी संकट हरि दामाजींचें

दामाजीपंतांची गोष्ट आपणांस माहीत असेल च. आमची आई गाणें गात असे तें नेहमीं मला आठवतें. दामाजीपंत मुसलमानाच्या दरबारीं कारभारी होता. एकदां दुष्काळ पडला व गरीब लोक अन्नावांचून मरूं लागले. तेव्हां दामाजीपंतांनीं आपल्या ताब्यांत असलेलीं कोठारें लुटविलीं. पुढें बादशहाला कळलें तेव्हां बादशहा रागावला. दामाजीपंत म्हणाले, 'मी दिवाण आहे, माझी जबाबदारी मला समजते. माणसें मरूं लागल्यावर, अन्नाचीं कोठारें ठेऊन काय करायचें ?, पण बादशहाचें समाधान झालें नाहीं. तेव्हा प्रत्यक्ष विठोबांनीं महाराचें रूप घेऊन दामाजीची रसीद बादशहाच्या दरबारीं पोंचती केली.

"काळी घोंगडी, काळी काठी, काळा दोरा कंठीं
बोली महाराची थेट मऱ्हाटी गांडिस लंगोटी ॥
पायीं वाहणा, मोठा शाहणा, पतितपावन नाम जयाचें ।
वारी संकट हरि दामाजीचें, कौतुक देवाचें ॥

परमेश्वराला महार होण्यांत कमीपणा वाटला नाहीं.

## अभक्त ब्राह्मणापेक्षां भक्तिमान अंत्यज श्रेष्ठ

व्यास जुन्या काळचे ब्राह्मण पण त्यांनीं लिहून ठेविलें आहे:—

**"विप्राद् द्विषड्-गुण-युताद् अरविंद-नाभ-पादारविंद्-विमुखाद् श्वपचं वरिष्ठम्"** "सहा दुणे बारा गुण पदरीं बाळगणारा ब्राह्मण, पण त्याला भक्ति नसेल तर त्यापेक्षां भक्तिमान् अंत्यज च श्रेष्ठ आहे."

## ज्ञानी खाटकाचें उदाहरण

महाभारतात व्यासांनीं एक गोष्ट सांगितली आहे. एक ब्राह्मण फकीर माझ्यासारखा तामसी व क्रोधी होता. भिक्षा मागण्याकरितां गांवात जाण्यास निघाला. एका घरासमोर येऊन बरा च वेळ उभा राहीला. त्या घरातील स्त्री अत्यंत पतिव्रता होती. पतीच्या शुश्रूषेंत गुंतल्यामुळें लवकर भिक्षा घालण्यास बाहेर येऊं शकली नाहीं. त्याबरोबर ब्राह्मणाचा क्रोध अनावर झाला. ज्ञानाचें क्रोधाशीं फार जमतें. ज्ञानाचा दिवा पेटला कीं क्रोधाचें काजळ आलें च. त्याचा क्रोध, हल्लीं म्हणतात त्याप्रमाणें ज्वालामुखीसारखा जहाल होता. त्याच्या प्रभावानें शेजारच्या झाडावरचे पक्षी जळून गेले. बाहेर आल्यावर त्या रागावलेल्या ब्राह्मणाला पाहून ती म्हणाली "आपल्याला राग आला, पण त्याचा माझ्यावर कांहीं परिणाम होणार नाहीं. मी काय पक्षी-बिक्षी आहे, कीं तुमच्या रागानें जळून जाईन? पतिसेवा माझा मुख्य धर्म आहे. गांवाबाहेरच्या खाटकाकडे जा, त्याच्यापाशीं ज्ञान आहे तो आपणांस ज्ञान सांगेल." ज्ञान नेहमीं गांवाच्या बाहेर च राहतें. गावाच्या आंत ज्ञान कधीं रहात नाहीं. हें मी आपल्या पदरचें सांगत नाहीं. व्यासांचें म्हणणें सांगतों आहे. खाटकाच्या घरीं ज्ञान आहे यावर ब्राह्मणाचा विश्वास बसेना. पण बाईवर श्रद्धा होती. एवढी पतिव्रता बाई म्हणते तर पाहून यावें. असें म्हणून तो त्या खाटकाकडे गेला. तो खाटीक एकीकडे आपल्या आईबापांची शुश्रूषा करीत आपला खाटकाचा धंदा करीत असे. खाटकानें विचारलें, "कां आलांत?" ब्राह्मण म्हणाला, "ज्ञानासाठीं. मला त्या बाईनीं आपल्याकडे ज्ञान आहे म्हणून सांगितलें, म्हणून मी आलों." पुढें त्या खाटकानें त्या ब्राह्मणाला ज्ञानाचा उपदेश केला, असें व्यासांनीं लिहून ठेवलें आहे. जुन्या ब्राह्मणाचें म्हणणें मीं तुम्हाला सांगितलें.

## आधुनिक ब्राह्मणाचें सांगणें

आता नव्या ब्राह्मणाचें सांगतों. मी येथें आल्यानें खरोखर पवित्र झालों. हें आम्हा लोकाना प्रायश्चित्त आहे. मी असें समजतों कीं ज्यांना तुमच्यापासून दूर राहावेसें वाटतें, त्यांना नीट समजत नाहीं. ते वेडे आहेत. कमी अधिक प्रमाणात आपण सर्व च वेडे आहोंत. मी दोन्ही कडचा भार सहन करतों. आमच्या विहिरीवर अस्पृश्यांना पाणी भरण्याची परवानगी आहे म्हणून ब्राह्मण माझ्यावर रागावतात. तर मेहतराना हि आमच्या विहिरीवर पाणी भरण्याची परवानगी आहे म्हणून महार आमच्या विहिरीवर पाणी भरत नाहींत. पण ह्यात बिचाऱ्या महाराचा दोष म्हणवत नाहीं. हें आमचें च पाप, त्यांच्यापर्यंत जाऊन पोचलें आहे.

तें पाप धुऊन काढण्यासाठीं च आज मी येथें आलों.

[ महाराष्ट्र-धर्म. ता. १-६-२५ ]

: ३२ :

# पंजाबची विभागणी

पंजाब ही पुरातन काळापासून संघर्ष-भूमि म्हणून गाजलेली भूमि आहे. बाहेरील संस्कृतींचा शिरकाव पूर्वी पंजाबांतून होत असे. आता समुद्र हें सोयीचें साधन झाल्यामुळें पंजाबचा तो मान कमी झाला आहे. ग्रीक लोक पंजाबांत येऊन परतले. कांहीं दिवस ग्रीकांची सत्ता पंजाबात होती. शक, हूण, मोगल, पठाण पंजाबांतून उतरले. या सर्वांचा परिणाम पंजाबवर झाला. आणि आज पंजाब एक मिश्र संस्काराची भूमि बनला आहे. तिथला हिंदु आणि तिथला मुसलमान दोघे हि संस्कारानें एकमेकांच्या पुष्कळ जवळ आले आहेत. मधल्या काळांत नानकाचा निर्गुण उपासक पंथ निघाला. साहजिक च हिंदु-मुसलमानांना तो जोडणारा होता. तसें शीख धर्मांत शास्त्रीय हिंदु धर्माहून वेगळें असें कांहीं नाहीं. परंतु लौकिक हिंदु-धर्म, अनेक परस्पर-विरोधी उपासनेनें खिळलेला होता, त्याहून तो वेगळा दिसून पडतो. अर्थात् तो एक हिंदु-धर्मांतला सुधारक पंथ म्हणतां येईल.

सुधारकाला दोन्ही बाजूचा मार खावा लागतो. तसा तो शीख पंथाला खावा लागला. पण सगुण-निर्गुणाचा विरोध मिटवण्याची युक्ति भक्ति-मार्गाला साधल्यामुळें शिखांचे आणि हिंदूंचें तसें फारसें वैमनस्य आलें नाहीं. जसें आधुनिक काळीं प्रार्थना-समाज, आर्य-समाज, ब्रह्म-समाज निघून थोडा वेळ त्यांनीं खळबळ केली, पुढें त्याची ती खळबळ शमली, तशी च हिंदु-धर्मापुरती शिखांची अवस्था झाली.

पण कट्टया मुसलमानांना राज्य-सत्तेचें पाठबळ मिळाल्यामुळें जोर चढला. त्यांच्या कडून शिखांची फार च छळणूक झाली. त्यामुळें मूळचा

समन्वय-वादी निर्गुण शीख-पंथ पुढें प्रतिकार-वादी आणि शक्ति-उपासक झाला. असामान्य त्याग-वृत्तीनें, धैर्यानें आणि शौर्यानें त्यांनीं जुलमी राज्य-सत्तेशीं सामना दिला. आणि हिंदुस्थानच्या इतिहासांतलें एक उज्ज्वल, रोमांचकारी, आणि गौरवयुक्त पृष्ठ शिखांकडून लिहिलें गेलें.

शीख हे सामान्यतः पंजाबांत च सीमित राहिले. कारण तिथें च त्याची गरज होती. ती त्यांची जन्म-भूमि, धर्म-भूमि, कर्म-भूमि, पराक्रम-भूमि ! म्हणून जेव्हां मुस्लीम-लीग पाकिस्तान चें नांव घेते, आणि 'पाकिस्ता-ना'तील 'प' कारांत पंजाबला पहिलें स्थान देते, तेव्हां त्यांची तीव्र-तम प्रतिक्रिया शिखांच्या हृदयांत उठते.

अलीकडच्या काळांत पंजाब ही आर्य-समाजाची प्रचार-भूमि झाल्या-पासून तिथल्या हिंदु समाजांत हि अस्मिता जागृत झाली. जालियनवाला-बाग मुळें सबंध हिंदुस्थान पेटलें, तर पंजाब पेटल्याशिवाय कसा राहणार ? त्या अग्नींतून हिंसा-वादी राजकारणाची हि एक फळी पंजाबांत निर्माण झाली. लागो-पाठ दोन महायुद्धात पंजाबचे शीख आणि मुसलमान रण-रंगांत दाखल होऊन हिंसेचे धडे शिकले. आणि इंग्रज सरकार कडून त्या कामांत त्यांना भरपूर उत्तेजन मिळालें.

अशा या ज्वालाग्राही-स्फोटक द्रव्यांच्या कोठाराला अग्नि स्पर्श न होऊं देण्याची कठिण कामगिरि पंजाबच्या यूनियनिस्ट सरकारला करावी लागली. आतां पर्यंत तें थोडें फार साधलें. परंतु तें सरकार मुस्लिम-लीगच्या दाबामुळें कोलमडत पडल्या नंतर त्या कोठाराला ठिणगी लागली आहे. आणि सबंध पंजाब भर हिंसेचें तांडव चाललें आहे. दडपशाहीनें लोक-क्षोभ थोडा वेळ दबूं शकतो पण अग्नीची ज्वाळा खालीं केली तरी वर जात च असते.

याला उपाय पांथिक किंवा धार्मिक, राज्य-सत्ता नसणें हा च आहे. पण मुस्लिम-लीगच्या चित्तांत तो ठसत नाहीं. त्यामुळें कांग्रेस-वर्किंग-

कमेटीनें नाइलाजानें पंजाबचे दोन भाग करण्याची सूचना केली आहे. पंजाबचे असे दोन भाग निसर्गानें हि केल्या सारखे आहेत. पूर्व पंजाब आणि पश्चिम पंजाब असे तुकडे सतलज नदीमुळें पंजाबचे पडतात. सामान्यतः पूर्व पंजाबांत हिंदु आणि शीख फार मोठ्या संख्येंत आहेत. पश्चिम पंजाबांत मुसलमान आहेत, असे विभाग पाडून कां होईना, जर भाऊ भाऊ शांतीने शेजाऱ्या सारखें राहूं लागले तर त्यांत कांहीं वावगें नाहीं. आज तर त्या शिवाय दुसरा अिलाज च नाहीं, असा वर्किंग कमेटीचा अभिप्राय दिसतो. एकूण परिस्थिति पाहता त्या वाचून गत्यंतर दिसत नाहीं. त्यांतून हि अनेक भानगडी निघूं शकतात. पण विवेकानें आणि निश्चयानें वागल्यास कालांतरानें त्या नाहींशा होतील.

हें तर होईल. पण मुख्य गोष्ट व्हायला पाहिजे आहे ती ही कीं, लोकांचा हिंसेवरचा विश्वास नाहींसा झाला पाहिजे. आणि अहिंसेवर तो स्थिर व्हावयाला पाहिजे. वादाचे मुद्दे केव्हां हि थोडे फार राहतील च. पण त्यांचा निर्णय विचारानें, चर्चेनें, लवादानें लावून घ्यायचा. आणि विरोध करावा च लागल्यास अहिंसेनें च तो करावयाचा. असे वळण जनतेला लागल्याशिवाय हिंदुस्थान सारखा बहुजिनसी आणि विशाल देश एकत्र राखण्याची भव्य आकांक्षा सिद्ध होऊं शकणार नाहीं. सर्व विचारकांनीं या संबंधीं नीट विचार केला पाहिजे. भिजास पूर्वेची आणि जान पश्चिमची असें जमणार नाहीं.

[ मराठी हरिजन, ता. १६-३-१९४७ ]

## : ३३ :

# साधन-विवेक

पंजाबच्या विभागणीची सूचना कॉंग्रेस समितीनें केली, तिला अनुमति देणारा एक लेख मीं लिहिला होता. तो आमच्या पुरोगामी मंडळींना आवडला नाहीं. त्यावर कुठें टीका हि आलेली आहे. मला त्याचें नवल वाटलें नाहीं. कारण तो लेख मला हि आवडला नव्हता. पण जगांत नेहमीं आपल्या आवडीचें च होत असतें असें नाहीं.

आणि आतां तर पंजाबच्या जोडीला बंगालच्या हि विभागणीचा सवाल आला आहे. भावाभावांनीं ऐके ठाई नांदावें हें कोणी हि पसंत करील. पण तें गोडीनें होत असेल तर च कामाचें. जबरीनें एके ठिकाणीं राहण्याचा काय उपयोग ?

एकूण विषय असा आहे:—मुस्लिम लीगच्या मागें अधिकांश मुस्लिम जनता आहे, हें कुणाला हि कबूल करावें लागणार आहे. हिंद देश अभंग रहावा ह्यात च हिंदूंचें आणि मुसलमानाचें हित आहे असें आम्हास वाटतें. पण मुस्लिम लीगला तें पटत नाहीं. म्हणजे मुसलमान जनतेला पटत नाहीं. त्यात मुस्लिम लीगच्या कडून विचार-दोष होत असेल, आमच्या हि वागणुकींत कांहीं चुका झाल्या असतील. पण तें कसें हि असले तरी, जनतेच्या मना विरुद्ध एखादी रचना तिच्यावर लादणें लोकशाहीला धरून नाहीं. शिवाय आतां लांबलचक वाटाघाटी करीत बसण्याला वेळ हि नाहीं. आणि वाटाघाटी लांबलचक झाल्या म्हणजे लाभदायी होतात च असें हि नाहीं. मनाचा दरवाजा च बंद असल्या नंतर वाटाघाटी ऐवजीं अनुभवावर च सोंपवणें बरें असतें. म्हणून आमच्यांत ज्यांना सामील

राहण्याची हौस नाहीं, ते हि शेवटीं आमचे च आहेत हें ओळखून त्यांची अलग सोय करून देणें वाजवी आहे.

पण ह्या पुढचा सवाल असा कीं, जो मुलुख ते अलग करून मागतात त्यांतील कांहीं भागांत जर मुस्लिमेतरांची अधिक संख्या असेल तर त्यांच्यावर तरी मुसलमानी अमलाखालीं राहण्याची जबरी काय म्हणून ? घेतांना माप एक आणि देतांना दुसरें, असें कसें चालेल ? पंजाबच्या आणि बंगालच्या विभागणीची ही अशी दलील आहे. आणि ती कोणाला हि टाळतां येणार नाहीं.

इंग्रजानें निघून जायला पाहिजे अशी आमची मागणी होती. तीं त्यानें कबूल केली आहे. आतां आमचीं भांडणें मिटवण्यासाठीं तूं इथें रहा असें तर त्याला आम्हीं सांगायचें नाहीं नां ? तसें जर सांगायचें नाहीं, तर आमचा आम्ही लवकर काय तो निकाल करून टाकला पाहिजे. त्या गरजेमुळें लोकशाहीच्या धोरणास धरून, विभागणीच्या योजनेला पोट-विभागणी सकट कॉंग्रेस समितीनें संमति देण्याची तयारी केली आहे. त्यासाठीं तिला कोण कसा दोष देऊं शकेल ?

पण विभागणी करा कीं एकवट रहा, हिंद एक आहे हें विसरूं नका. हिंद देशाची एकता ही साऱ्या जगाला गौरवाची चात्र आहे. युरोपच्या एकतेची आशा अजून किती दूर आहे सांगतां येत नाहीं. पण हिंद तर केव्हांचा च एक होऊन चुकला आहे. काश्मीर पासून कुमारी पावेतों हिंद भर एक च भावना भरलेली आहे. आमच्या वडिलांची ही कमाई आहे. तिच्या आधारावर च "जय हिंद" हा घोष निघाला, आणि देशभर दुमदुमला. साऱ्या जगाचे डोळे हिंदुस्थानकडे लागून राहिले आहेत हें एशिया-परिषदेनें दाखवून दिलें आहे. अजून हिंद आपल्या पायांवर उभा हि राहिलेला नाहीं. तेवढ्यांत एशियाचे मुखत्यार त्याची वंदना करूं लागतात. ही काय

जादू आहे ? ही हिंदुस्थानच्या एकतेची जादू आहे. ही एकता वैदिक काळापासून आज तागाईत लहान-थोर सर्वांनीं अतिशय आदरानें आणि उत्कंटेनें सेविली आहे. ती सबंध एशियाला आमच्याकडे ओढून घेत आहे. आणि जर तिची कास सोडली नाहीं तर साऱ्या जगाला ती आमच्याकडे ओढणार आहे.

आणखी हि एका कारणामुळें जगाची ओढ आमच्याकडे आहे. हिंदुस्थाननें अहिंसेचा मोडका तोडका कां होईना, जो सामुदायिक प्रयोग केला तो सबंध जगाला एक कौतुकाचा विषय झालेला आहे. आम्हांला त्याची तितकीशी कल्पना होत नाहीं. कारण आमची अहिंसा काय किमतीची आहे हें आम्ही जाणतों. पण आमची अहिंसा केवढ्या हि किंमतीची असो, अहिंसा स्वतः फार किंमतीची आहे. आणि तिनें जगावर आपली जादू चालविली आहे. स्वतंत्रतेसाठीं लढा, ही जगाला नवीन गोष्ट नाहीं. पण अहिंसेनें लढा ही नवीन गोष्ट आहे. आणि हिंसेनें गांजलेल्या जगाला हिंदुस्थानात आपल्या सोडवणुकीचें साधन तयार होऊन राहिलें आहे की काय अशी अभिरूप शंका येऊं लागलेली आहे.

म्हणून हिंदुस्थानवर मोटी जबाबदारी आहे. विभागणी करा की एकवट रहा. पण एकता विसरूं नका, अहिंसा सोडूं नका. विभागणी करायची च झाली तर सोईसाठीं करा आणि समतेनें करा. जगाचा भविष्यकाळ हिंदुस्थानपाशीं हें मागत आहे.

त्या दृष्टीनें, नुकती च गांधी आणि जिना ह्यांच्या सह्या निशी जी घोषणा जाहीर झाली आहे, ती फार महत्वाची आहे. ती लोकांनीं हृदयीं धरल्यास भविष्य उज्ज्वल आहे. सदर घोषणेंत राजकीय हेतूंच्या सिद्धीसाटीं हिंसक साधनाचा कायमचा निषेध केला आहे. तिचा अंमल झाला तर

आमचे सगळे सवाल सोपे होतील. हिंसक साधनें सोडलीं, म्हणजे एकमेकांची बाजू समजून घेणें, समता आणि सत्य राखून विरोधकांशी अधिकांत अधिक मिळतें घेणें, वाद-विषय लवादावर सोपवण्यास तयार होणें, हीं च साधनें उरतात. मला तर हा साधन-विवेक जितका महत्त्वाचा वाटतो तितके ते राजकीय हेतु हि महत्त्वाचे वाटत नाहींत. राजकीय हेतु देशकालमानानें बदलतील. पण साधन-विवेक कायमचा उपयोगी पडणार आहे.

गेले सात आठ महिने बंगाल, बिहार, पंजाब मध्यें जे अमानुष दंगे झाले त्यांतून एवढा साधन-विवेक जर आम्ही शिकलों तर ते दंगे हि सार्थकीं लागले असें च जग म्हणेल.

[ मराठी हरिजन, ता. २७-४-१९४७ ]

: ३४ :

# गीता आणि लोकशाही.

प्रोफेसर विजरी ह्यांनीं पश्चिमच्या लोकशाहीविषयीं आपला अनुभव सांगितला आहे.त्यांचें असें म्हणणें आहे कीं—"पश्चिमेकडे जरी वरून वरून लोकशाहीचा आकार उभा केला आहे तथापि आंतला प्रकार निराळा च आहे. लोकशाहीच्या तत्वज्ञानाविषयीं जें कांहीं वाङ्मय पश्चिमेकडे प्रसिद्ध झालें आहे त्या सर्वांपेक्षा लोकशाहीचा खरा अर्थ भगवद्गीतेमध्यें चांगल्या रितीनें पहावयास सांपडतो." प्रो. विजरी ह्यांचें हें मत विचारणीय आहे.

'मडक्यागणिक मत' हें हल्लींच्या लोकशाहीचें सूत्र आहे. 'सर्वांभूतीं एक आत्मा' हें गीतेचें सूत्र आहे. 'मडक्यागणिक मत आणि सर्वांभूतीं एक आत्मा' हीं दोन्ही तत्वें दिसायला वरुन वरुन सारखीं दिसतात. पण पहिलें सूत्र भेदाची उभारणी करतें आणि दुसरें भेदाची संहारणी करतें असा फरक आहे. एक 'पुष्कळांच्या सुखाकडे' पाहते आणि म्हणून 'थोड्यांच्या दु:खाची' परवा करीत नाहीं दुसरें 'सर्वांच्या हिताकडे' नजर देतें आणि म्हणून एकाचें हि हित विसरत नाहीं. एक मतामतांची लढाई लढवतें. दुसरें सर्वांच्या मतांचा मेळ घालतें. एक शिरगणती करतें दुसरें हृदय तपासतें. जुन्या प्लेगच्या दिवसांत, प्लेगच्या हवेंतून आलेल्या माणसांना सक्तीच्या सुतकामध्यें रहावें लागे. एकदां कांहीं माणसांना अशा च रीतीनें शिपायांनीं अडकवून ठेविलें असतां, त्या माणसांना विशेष काम असल्यामुळें ते शिपायाजवळ त्यांना सोडविण्याविषयीं विनवणी करूं लागले. शिपाई म्हणाला 'मीं सोडलें असतें पण अफसर शिरगणती करतो. त्यामुळें सोडतां येत नाहीं, ते म्हणाले ' आम्ही इतकीं च दुसरीं माणसें ठेवतों मग 'झालें. ना ?' शिपाई म्हणतो "झालें. आम्हांला काय 'नगसे नग' गिनती झाली म्हणजे झालें" हें लोकशाहीचें तत्व. गीतेंत ' देव बोलिले एक । जें दुजें नाहीं.'

म. धर्म वर्ष ३ । ४१ ता. १८-१०-२६

: ३५ :

# तीळगूळ घ्या आणि गोड बोला

गतवर्षी येशू खिस्ताच्या पुण्यतिथीला म्हणजे २५ डिसेंबरला मी येथें येऊन वसलों. या संपूर्ण वर्षांत मी येथें कांहीं च केलें नाहीं असें मला वाटतें. आम्ही हजारों वर्षांपासून हरिजनांवर जे अन्याय केले ते जर तराजूच्या एका पारड्यांत घातले आणि दुसऱ्या पारड्यांत आमची सेवा घातली तर ती शून्यवत् च भरेल.

आम्ही स्वतः भ्याड, क्षुद्र, असमर्थ आणि अत्याचारी आहोंत. आम्हांला तर आतां कोठें कार्याला प्रारम्भ करावयाचा आहे. म्हणून च आज संक्रांतीचा सण साजरा केला जात आहे. 'तीळगूळ घ्या आणि गोड बोला'. निदान गोड बोलणें तरी मनुष्य करूं शकतो. कांहीं देऊं नका पण प्रत्येकानें गोड तरी बोललें च पाहिजे. मी देखील वर्षभर गोड बोलण्या-शिवाय कांहीं च केलें नाहीं. महात्माजींनीं आम्हाला काय शिकविलें ? आम्हांला गोड बोलणें शिकविलें. 'हरिजन' हें गोड नांव शोधून काढून च त्यांनीं आपल्या गोड बोलण्याचा आरंभ केला. मंत्रानें सर्पविष उतरतें यावर माझी श्रद्धा आहे. 'हरिजन' या शब्दांत गुंफलेल्या मंत्रानें परिस्थितींत केवढा तरी पालट घडवून आणला ! सगळ्या प्रांतांत मागसलेल्या मद्रास-मध्यें की जेथें हरिजनाला २८ फूट दूर अंतरावर उभें करतात आणि त्याच्या सावलीचा देखील विटाळ मानतात तेथें हि या महान् मंत्राच्या गोडीचा प्रभाव दिसून येतो.

ज्या देशांतील पुरुष इतके मागासलेले आहेत त्या देशांतील स्त्रिया किती मागासलेल्या असतील ? पण जेव्हां गुरुवायूरच्या मंदिराचें द्वार

अस्पृश्यासाठीं खुलें करण्याबाबत मतें घेण्यांत आलीं, तेव्हां अेकहजार स्त्रियांनीं तें मंदिर हरिजनासाठीं खुले करावें म्हणून मत दिलें. हा च तर मंत्राचा प्रभाव होय.

जेव्हां आम्ही हृदयापासून गोड बोलायला शिकतों, तेव्हां आमचा व्यवहार देखील गोड व्हायला लागतो. अशा प्रकारें मी आतांपर्यंत कांहीं च केलें नाहीं. माझ्या सेवेचा श्रीगणेशा हि झाला नाहीं. तरी मी तुम्हांला खात्री पूर्वक सांगतों कीं माझें तुमच्यावर प्रेम आहे. मी भेदभाव ठेवला नाहीं. माझी आई जरी जुन्या काळांतली होती तरी तिला अस्पृश्यता रुचत नसे. माझा जन्म ब्राह्मण कुटुंबांत झाला आहे. आज ब्राह्मण होणें पापरूप झालें आहे. तरी मला लाज वाटत नाहीं. राम तर सर्व ठिकाणीं रमतो. भेदभाव न मानणें ही माझी कमाई नाहीं. हा तर गीताईचा प्रसाद आहे. आज हि मला काळें कांबळें घेतलेला, लंगोटी लावून विटेवर महाररूपांत उभा असलेला नारायण दिसतो आहे. इतकें च नव्हे तर गांवांतील लहान लहान हरिजन मुलें माझ्या झोपडीपाशीं येऊन गडबड करतात, दंगा करतात, तेव्हां मला वाटतें कीं साक्षात् विठोबा येऊन माझ्याशीं खोडकरपणा करतो आहे. त्या मुलांमुलींत मला प्रत्यक्ष देवाचें दर्शन होतें. तुम्हाला मी कसें दाखवूं तुम्ही मला किती आवडता म्हणून.

[ ह. से. फेब्रुवारी १९३५ ]

: ३६ :

# *सर्वेषां अविरोधेन

माझ्या प्रिय बंधू भागिनींनो,

दोन वर्षांपूर्वी महादेवभाईंच्या पुण्यतिथिप्रसंगीं मला येथें बोलण्याची संधि मिळाली होती. त्या दिवशीं आपण ईशावास्य उपनिषद् म्हटलें होतें. त्या च प्रसंगाकरितां आज आपण पुन्हा एकत्र होत आहोंत. आज आम्हीं स्वातंत्र्यप्राप्तीचा उत्सव साजरा करीत आहों. स्वराज्याकरितां अनेकांनीं आपलें बलिदान केल आहे. जणूं काय महादेवभाई त्या सर्वांचें प्रतिनिधित्व करीत आहेत. आजच्या मंगलप्रसंगीं आम्ही त्या सर्व पुण्यात्म्यांचें स्मरण करतों.

सर्वांच्या मनात आज उत्साह आणि उल्हास आहे. खेडयांतील लोकांनीं आपलीं गांवें साफ केलीं आहेत. ध्वजपताका लावल्या आहेत. पवनार गांवांत मी जाऊं शकलों नाहीं. म्हणून लोक रात्रीं एक वाजतां गांवचा कार्यक्रम पुरा करून माझ्याजवळ आले. तेथें हि झेंडावंदन केलें, गाणीं म्हटलीं. लोकांनीं सर्व रात्रभर उत्सव केला. गरीब, श्रीमंत सर्व च ह्या आनंदांत सामील होते.

गरीब लोकांना आज आनंदाचें काय प्रयोजन होतें? काय, आजपासून त्यांना रुपयाला दोन पायली ऐवजीं आठ पायली ज्वारी मिळूं लागली आहे? आम्हांला माहीत आहे कीं, तसें कांहीं झालेलें नाहीं.

---

★ [पंधरा ऑगस्ट १९४७ स्वातंत्र्यदिनानिमित्त खादी विद्यालय, सेवाग्राम येथें दिलेलें प्रवचन.]

त्याचीं दुःखें तर सर्व जशींच्या तशीं च कायम आहेत. मग ते एवढ्या आनंदात कां आहेत ? तर त्याना आशा वाटत आहे म्हणून च. त्यांना समजलें आहे कीं आजपर्यंत आम्हीं परतंत्र होतों, लाचार होतों. म्हणून च दुःखनिवारण हि होऊं शकत नव्हतें.

आतां स्वतंत्र झाल्यामुळें आमचीं स्थिति सुधारेल ह्या च आशेनें त्याना आज आनंद होत आहे. व ती लवकरांत लवकर सुधारण्याची जबाबदारी आम्हीं घेत आहों. परंतु ह्या करितां आम्हांला अधिक त्याग करावा लागेल. नवीन तपस्या करावी लागेल. कवीचें वचन आहे.

"क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते।" अर्थात् जेव्हां सज्जन पाहतात कीं आपली अेक तपस्या फलद्रूप झाली आहे तेव्हां ते दुसरी तपस्या सुरू करतात. आतांपर्यंत आम्ही जी तपस्या केली त्यामुळें आज आम्ही हा दिवस पाहत आहों. आम्ही स्वतंत्र झालों आहोंत. आता आम्हांला समृद्ध व्हावयाचें आहे. गरीबाचे कष्ट नाहींसे करावयाचे आहेत. ह्याकरितां पुन्हां आम्हाला व्रतबद्ध व्हावें लागेल. परंतु आम्ही जर असें समजलों कीं, आतां तपश्चर्येची समाप्ति झालेली आहे आणि आमच्या चैनीचे दिवस आलेले आहेत, तर आजचा दिवस आमच्या पुण्यक्षयाचा आरंभदिवस होअील. पुण्यानें स्वर्ग मिळतो. परंतु सुखोपभोगानें पुण्याचा क्षय होऊन मनुष्याला पुन्हां मृत्युलोकांत जावें लागतें.

लोक म्हणतात, आजचा आमचा आनंद दुःखमिश्रित आहे. आम्हांला स्वातंत्र्य तर मिळालें आहे परंतु जसें आम्हांला हवें होतें तसें तें गोड नाहीं. मला ह्याचें दुःख नाहीं. कुंतीची गोष्ट आहे ना ? देवानें कुंतीला विचारलें, 'तुला कोणता वर पाहिजे?' कुंती म्हणाली, 'मला नेहमीं विपदा द्या. त्यामुळें मला नेहमीं तुमचें स्मरण होत राहील.' मला हें माहीत आहे कीं, सर्व जनता कुंती बनूं शकत नाहीं. जनता तर देवाला सांगेल कीं, तूं आम्हांला

सुखांत ठेव, परंतु जनतेतर्फे मी ईश्वराजवळ इतकें तर मागेन कीं तूं आम्हांला सुखांत ठेव, परंतु त्या सुखात दुःखाचा कांहीं-ना-कांहीं अंश असूं दे. त्या दृष्टीनें आजचें आमचें सुख दुःखमिश्रित आहे ही चांगली गोष्ट आहे. त्यामुळें आम्ही सावध राहूं. आणि आमच्या दोषांचें आम्हांला भान राहील. ते दोष काढल्यानें आम्ही आपली उन्नति करूं शकूं.

हिन्दुस्थानचे तुकडे झाले म्हणून निराश होण्याची जरूर नाहीं. जो शिल्लक राहिला आहे तो हि कांहीं लहान देश नाहीं. जर मातीपासून धान्य निर्माण करणाऱ्या शेतकऱ्याचा पुरुषार्थ आमच्यात असेल तर इतक्या मोठ्या देशाला आम्ही सुखी, समृद्ध बनवूं शकूं. आणि जर आमच्या दोषाचें निवारण करूं शकलों तर ते तुकडे देखील पुन्हां एकत्र येतील. जग एकतेकडे जात आहे व त्याची गति थांबवणारा कोणी नाहीं.

आणि जेथें आम्ही एकतेचा विचार करतों तेथें आम्हांला हें हि समजून घेतलें पाहिजे कीं जितकें महत्त्व सांस्कृतिक एकतेला आहे तितकें राजनैतिक एकतेला नाहीं. हिंदुस्थानच्या इतिहासांत तुम्ही पहाल कीं येथें नेहमीं राजसत्ता च चालत होती अशी गोष्ट नाहीं. तरी सुद्धा हिंदुस्थानात जी एकता होती ती सांस्कृतिक होती. ती एकता जर आम्हांला हवी असेल तर आज हि राहू शकते. इंग्रजांनीं हिंदुस्थानला एकता दिली हें मी मानीत नाहीं. इंग्रजांच्यामुळें हिंदुस्थानांत एक च प्रकारचा जुलूम झाला व प्रतिकारा करितां जनता एक झाली. ह्या दृष्टीनें आम्ही इंग्रजांना जर कांहीं श्रेय दिलें तर गोष्ट निराळी. सांस्कृतिक एकता च आमची वास्तविक एकता आहे व ती फार च पुरातन कालापासून चालत आली आहे. आमचीं चार धामें त्याची च साक्ष आहे. वेदानें भारताला योग्याची उपमा दिली आहे. आणि श्वासनिश्वासाचें सूक्ष्म वर्णन केलें आहे. असें म्हटलें आहे कीं, येथें दोन बाजूंनी हवा येते आणि जाते. एक समुद्राच्या बाजूनें आणि दुसरी पर्वतांतील गुहांतून. "द्वौ इमौ वातौ वातः। आ सिंधोः आ परवतः।"

आमची एकता अशी आहे. आणि म्हणून च आज हिंदुस्थान राजनैतिक दृष्टीनें विभाजित झालेला असला तरी मी त्याचें दुःख मानणार नाहीं. मात्र आम्ही भावाभावांसारखें राहिले पाहिजे.

बऱ्याच देशांत अशी चाल आहे कीं लग्न झाल्यानंतर मुलाला वेगळें घर करावें लागतें. भाऊ भाऊ प्रेमानें वेगळे होतात. मला माहीत आहे कीं आज आमच्यांत तें वातावरण नाहीं द्वेषाची भावना पसरलेली दिसून येते. मला ह्यात मुळीं च शंका नाही कीं ती भावना वरवरची आहे.' समुद्रांत वादळ येतें आणि त्यावर लाटांचा संघर्ष चालतो. परंतु आंत अनंत पाणी भरलेलें असतें. वादळ शांत होतें आणि लाटांचा प्रीतिसंगम सुरू होतो. ती च परिस्थिति हिंदुस्थानची आहे. राज्यक्रांतीच्या वेळीं किती लढाया होत असतात. त्या हिशोबानें हिंदुस्थानात तर कांहीं विशेष झालें नाहीं असें च मानावें लागेल. आमच्या स्वातंत्र्याचा लढा केवळ शान्तिमय होता. त्या दृष्टीनें पाहतां जें झालें तें निःसंशय लज्जास्पद आहे परंतु भावी इतिहासकारांना ह्याचें आश्चर्य च वाटेल कीं हें सर्व इतक्या थोड्यात कसें आटोपलें.

हिंदुस्थानचें विभाजन होऊं दिलें, म्हणून कांहीं लोक आमच्या नेत्यांना दोष देतात. ह्यात त्यांची कांहीं चूक असणें शक्य आहे. परंतु चुका करण्याचा हक्क ही देखील स्वराज्याची एक व्याख्या आहे ना ! आजपर्यंत आम्हांला कोणता हि अधिकार च नव्हता. व आमच्या कांहीं चुका देखील होत नसत. चुकांच्या भीतीनें काम होऊं शकत नाहीं. जो घोड्यावर चढेल तो च पडेल. जो चढणार च नाहीं तो काय पडणार ! नेत्यांच्या दृष्टीनें पाहिलें तर असें दिसून येईल कीं त्यांनीं चूक केली नाहीं. समजूतदारपणें च काम केलें आहे. ज्याअर्थीं आम्ही लोकसत्तेचा सिद्धांत मानला आहे त्याअर्थीं जनतेच्या एका मोठ्या हिश्शावर आम्ही जबरदस्ती करूं शकत नाही. अधिकांश मुस्लिम जनता मुस्लिमलीगच्या मागें होती.

ज्यांनीं अहिंसेवर भरंवसा ठेवला आहे अशा आमच्यासारख्या सेवकांचें आता काय कर्तव्य आहे? आतापर्यंत तर आम्ही सत्तेच्या विरुद्ध काम करीत आलों आहोंत. कारण ती परकीय सत्ता होती, जुल्मी सत्ता होती. पण आतां तर जनतेच्या हातांत सत्ता आली आहे. आणि त्या सत्तेच्या द्वारें बरीचशी सेवा केली जाणार आहे. तर काय आम्ही देखील सेवेकरितां सत्तेचा आश्रय घ्यावा? मी म्हणेन 'नाहीं'. जर आम्ही अहिंसेचा विकास करूं इच्छित असलों आणि तिची पूर्ण शक्ति आम्हांला प्रगट करावयाची असेल तर आम्ही सत्तेचा आधार घेतां कामा नये. प्रेमाचा आधार आमच्याकरितां पुरेसा आहे. आजच्या परिस्थितींत सत्तेच्या आधारें अहिंसेचा पूर्ण प्रभाव प्रगट होऊं शकत नाहीं. परंतु जे सत्तारूढ होऊं शकत नाहींत व सत्तेच्या द्वारें जनसेवा करूं इच्छितात. त्यांच्या त्या कार्या विषयीं आमची वृत्ति काय असावी, ह्याचा आम्हांला विचार करावयाचा आहे. आमच्या पैकीं कांहीं लोक म्हणतात, अहिंसे करितां आता स्थान च कोठें आहे? आता तर लष्करी शिक्षण चालेल. माझ्या मतें अशा प्रकारें विचार करणे चूक आहे. हें संभवनीय आहे कीं लष्करी शिक्षण दिलें जाईल. परंतु आमचें सरकार हिंसा-परायण होईल काय? मी असें मानत नाहीं. आणि आता जर अहिंसेला स्थान नसेल तर काय ह्यापूर्वी म्हणजे इंग्रजी राज्यांत अहिंसेला स्थान होतें? वस्तुस्थिति तर अशी आहे कीं आमचें सरकार अहिंसेच्या बळावर च स्थापन झालेलें आहे आणि पंडित जवाहरलालजी सारखे आमचे नेते हृदयानें आणि बुद्धिनें अहिंसक च आहेत. ह्याची परीक्षा ते आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत कशा प्रकारें काम करीत आहेत आणि करणार आहेत, ह्या गोष्टींवरून होईल. दुनियेच्या निःशस्त्र करणाऱ्या पक्षांत आमचें सरकार आपलें पूर्ण वजन खर्च करील. हिंसा-परायण राष्ट्रें निःशस्त्रीय करणाची गोष्ट विचारांत घेत नाहींत. परंतु हिंदुस्थानचा तर तसा आग्रह राहील.

ह्यात कोणाला कांहीं शंका असूं शकत नाहीं. दुसऱ्या राष्ट्रांवर आक्रमण करण्याची तर तो कल्पना हि करणार नाहीं. हिंदुस्थानच्या इतिहासात त्यानें दुसऱ्यावर कधीं आक्रमण केलें असेल असें उदाहरण मिळत नाहीं. ही कांहीं आकस्मिक घटना नाहीं. परंतु हिंदुस्थानच्या संस्कृतीचें हें लक्षण आहे. दुसऱ्या देशाशीं आपल्या संस्कृतीची आणि संपत्तीची देवाणघेवाण हिंदुस्थान करीत राहिला आहे. सत्तेची गोष्ट च काय, आपली संस्कृति हि दुसऱ्यावर जबरदस्तीनें लादण्याचा प्रयत्न त्यानें कधीं केला नाहीं. तो च उत्तराधिकार आम्हांला आणि आमच्या नेत्यांना मिळाला आहे. म्हणून दुसऱ्या देशाना ताब्यात ठेवण्याची इच्छा आम्हांला होणार नाहीं. एवढें च काय, परंतु जर कोठें आक्रमण झालें तर त्याविरुद्ध आमचा आवाज उठेल. उदाहरणार्थ इंडोनेशियाच्या बाबतींत त्याच्या बाजूनें हिन्दुस्थाननें आवाज उठविला व त्याचा परिणाम हि झाला. तो परिणाम केवळ हिंन्दुस्थानच्या नैतिक शक्तीमुळें झाला. दुसरी तर हिंदुस्थान-जवळ कोणती हि शक्ति नव्हती. पुढें ह्या च नैतिक बलाच्या आधारावर हिंन्दु-स्थानचें काम चालेल. म्हणून च आमचें सरकार अहिंसा विमुख आहे किंवा भविष्यात होणार आहे असें मानणें उचित होणार नाहीं.

अन्तर्गत अशातीला थांबविण्याकरिता मात्र विशेष प्रसंगीं तो सेनेचा उपयोग जरूर करूं शकतो. प्राप्त परिस्थितीमध्यें ह्याकरिता त्याला दोष देता येणार नाहीं. अखेरीस दंडनीति आणि अहिंसा ह्यांत आम्हांला फरक करावा लागेल. लोकसत्तेवर आधार राखणाऱ्या सरकारनें गुंडांच्या पारिपत्याकरितां जर नाइलाजानें दंडशक्तीचा उपयोग केला तर त्याला मी अहिंसा-विरोधी मानणार नाहीं. आमच्यासारख्या सत्तेपासून अलग राहणाऱ्या अहिंसापरायण जनसेवकांचें हें काम आहे कीं त्यांनीं अहिंसेचा चमत्कार दाखवावा. 'स्वतः बलिदान देऊन हि अंतर्गत सुरक्षितता कायम ठेवावी, ज्यामुळें सरकारला दंडनीतीचा आश्रय घ्यावा लागणार नाहीं. सारांश ह्या विषयांत आम्हांला

सरकारचे पूरक बनावयाचें आहे. सरकार जें करूं शकत नाहीं तें करण्याचा आम्हांला प्रयत्न केला पाहिजे. आणि आमचें सरकार अहिंसेच्छु आहे असें निश्चित समजलें पाहिजे.

खादीच्या बाबतींत हि मी अशा च प्रकारें विचार करतों. नवीन गिरण्या उघडण्याच्या सरकारी धोरणाला मी जरा हि समजूं शकलो नाहीं. मी असें मानतों कीं, खादीच्या द्वारें आमच्या कपड्याचा प्रश्न फार लवकर सुटेल. परंतु आमच्या नेत्यांना तें अजून पटलें नाहीं ही दुःखाची गोष्ट आहे. तरी हि मी असें मानत नाहीं कीं ते खादीचे शत्रु आहेत. ते स्वतः खादी वापरणारे आहेत, खादीवर त्यांनीं प्रेम केलें आहे, परंतु खादी तावडतोब देशव्यापी होण्याची गोष्ट त्यांच्या विचाराला पटत नसेल तर त्यासाठीं मी त्यांना दोष देऊं शकत नाहीं. दोष तर मी आपला च मानीन. म्हणजे जे खादीचे प्रयोग करतात अशा माझ्यासारख्या कार्यकर्त्यांचा. आम्ही खादीचा दावा आतांपर्यंत सिद्ध केला नाहीं, इतका च त्याचा अर्थ आहे. परंतु आतांपर्यंत दावा सिद्ध झाला नसेल तर त्याकरितां आम्हांला अधिक प्रयोग केले पाहिजेत, अधिक सुधारणा केल्या पाहिजेत. तें तर आम्ही करूं च, पण आत्मविश्वासाच्या अभावामुळें आमचे पुढारी आता गिरण्या उघडत असतील तर एवढ्यावरून च त्यांना मी एकदम शत्रु मानणार नाहीं. मी पाहीन कीं, त्यांची नीति काय राहते. ते गिरण्या राष्ट्राच्या मालकीच्या करण्याचा विचार करीत आहेत काय ? जर असा विचार करीत असतील तर हा प्रयोग आमच्या प्रयोगापेक्षां भिन्न असला तरी मी त्यांना माझे मित्र मानीन. शेवटीं खादी एक धागा थोडा च आहे ? खादी एक विचार आहे. खादी म्हणजे गरीबांचें अशोषण. अशोषणाची दृष्टि ठेवून जर कोणी भिन्न प्रयोग करीत असेल तर त्याला मी आपला शत्रु का मानावें ? मी असें मानतों कीं, खादीशिवाय गरीबांचें अशोषण हिंदुस्थान-सारख्या खेड्यांच्या देशांत सिद्ध होणार नाहीं. आणि किसान-राज्य तर

अशा प्रकारें कदापि होणार नाहीं. तरी ही मला धीर ठेवला पाहिजे आणि नीष्ठापूर्वक आपलें कार्य नित्यनवीन स्फूर्तीनें करीत राहिलें पाहिजे.

## हिन्दी-हिन्दुस्थानी

तसा च राष्ट्रभाषेचा प्रश्न आहे. एका गृहस्थानें मला सांगितलें, आतां तर हिंदुस्थानी व उर्दू लिपी हि गेली. कां म्हणून विचारलें तर उत्तर मिळालें, विधान समिति कदाचित् हिंदीला राष्ट्रभाषा आणि नागरीला राष्ट्रलिपी म्हणून मान्यता देणार आहे. समजा असें झालें तर काय होईल ? त्यामुळें हिंदुस्थानी कशी जाईल ? ती तर इतकी व्यापक आहे कीं, हिंदीच्या हि आंत राहते. ती कशी जाईल ? एक गोष्ट आम्ही स्पष्टपणें समजून घेतली पाहिजे कीं, विधानसमिति जर हिंदी भाषा व नागरी लिपीचा स्वीकार करील तर तो मुसलमानांविषयींच्या द्वेषभावनेमुळें नव्हे. मी असे कित्येक मित्र जाणतों कीं ज्यांच्या मनांत मुसलमानांविषयीं द्वेष नाहीं आणि जे हिंदु-मुस्लिम एकतेची आमच्या इतकी च इच्छा करतात, तरी हि उर्दू लिपीची गोष्ट त्यांना बरी वाटत नाहीं. म्हणजे राष्ट्रलिपीकरितां उर्दूचा स्वीकार त्याना पसंत पडत नाहीं. त्यांच्यावर मुस्लिम द्वेषाचा आरोप करणें चूक होईल. त्यांच्या विचारसरणी मागें एक दृष्टि आहे. मी ती दृष्टि समजूं शकतों. आमच्यासारखे संस्कृतिसमन्वयाच्या दृष्टीनें प्रयत्न करणारे जर दोन्ही लीपींचा प्रचार करीत असतील तर त्यांना थांबवणारा कोण आहे ? मी तर दोन लीपींनीं हि संतुष्ट नाहीं. माझें मत असें आहे कीं, जर आम्हांला उत्तर आणि दक्षिण यांची एकता कायम ठेवायची असेल तर दक्षिणेकडची हि एखादी लिपी उत्तरवाल्यांनीं शिकली पाहिजे. द्रविडीस्थानचा आवाज तर आज च येत आहे. आम्हांला जर तो वाढूं द्यावयाचा नसेल तर आम्हांला हा प्रयत्न केला च पाहिजे. दक्षिणेकडच्या भाषा हि आम्हांला शिकाव्या लागतील. इतकें हि आम्हांला शक्य झालें नाहीं तर दक्षिणवाल्यांना

हि हिंदी भाषा का म्हणून शिकावी ? त्यांच्या भाषा आम्हांला कठीण आहेत तर काय आमच्या भाषा त्यांना सोप्या आहेत ? त्यांना तर दगडाचें पुल्लिंग होणें आणि विटेचें स्त्रीलिंग होणें कोणत्या हि प्रकारें समजूं शकत नाहीं. तरी हि ते राष्ट्रभाषेचा चांगला अभ्यास करीत आहेत. आम्ही हि त्यांची भाषा कां शिकूं नये ?

आम्हाला व्यर्थ मतभेद वाढवावयाचे नाहींत. कोणात्या हि बाबतींत चुकीचें मत बनवावयाचें नाहीं. प्रत्येक परिस्थितींत, जेथें डोक्यावरून इंग्रजांचे राज्याचा भार नाहींसा होत आहे, तेथें अेकमेकाच्या भाषा आणि अनेक भाषा शिकण्याला उत्तेजन, वेळ आणि सवलत मिळेल. इंग्रजीच्या ओझ्यामुळें आम्ही दुसऱ्या भाषा शिकूं शकलों नाहीं. परंतु आतां आम्ही शेजाऱ्यांची भाषा उत्साहानें शिकूं. आतांपर्यंत आम्ही जें कांहीं शिकत होतों तें इंग्रजीच्या द्वारें शिकत होतों. इंग्रजीमुळें आम्हांला तशी सवलत मिळत असे. तामिळ, कन्नड, वगैरे भाषांचा अभ्यास करतांना मला इंग्रजी भाषेचा च आश्रय घ्यावा लागला आहे. परंतु आतां तशी स्थिति राहणार नाहीं. आमच्या भाषेंत हि दुसऱ्यादुसऱ्या भाषा शिकण्याकरितां कोष, व्याकरण, वगैरे तयार होतील. वास्तविक एकीकडे इंग्रजी भाषा आम्हांला सवलत देत असे तर दुसरीकडे ती आम्हांला पुरुषार्थहीन हि बनवीत असे चीनविषयीं आम्हांला ज्ञान मिळवावयाचें असेल तर चीनपर्यंत जाण्याची कांहीं हि आवश्यकता नसे. चीनविषयीं एखादे इंग्रजी पुस्तक वाचलें म्हणजे आम्हांला चीनचें ज्ञान होऊन जाई. ही पराधीनता आतां राहणार नाहीं. आता आम्ही आपल्या डोळ्यानें दुनियेचें ज्ञान मिळवूं, दुनियेच्या भाषा शिकूं. हिंदुस्थानच्या तर शिकूं च शिकूं. म्हणून च हिंदी नागरी प्रस्तावामुळें आमचें कांहीं हि बिघडत नाहीं.

अहिंसा, खादी, राष्ट्रभाषा ह्यांचा उल्लेख मी दृष्टान्ताप्रमाणें केला. ह्यावरून माझी दृष्टि तुमच्या लक्षांत येईल. आमचें कार्य तर सरकारच्या

बाहेर आहे. त्यापेक्षा अधिक व्यापक आहे. त्यांच्या निर्णयामुळें आम्हाला कांहीं हि अडथळा येणार नाहीं. मी तर असें मानतों कीं त्यांच्या निर्णयामुळें आमचें कार्य अधिक च वाढेल.

परंतु ऐक धोका निश्चितपणें दिसतो आहे आणि आम्ही सर्वांनीं मिळून त्याला विरोध केला पाहिजे. तो धोका हा कीं जनतेमध्यें हिंसेची हवा पसरत आहे. मी असें मानतों कीं हा विश्वयुद्धाचा परिणाम आहे. परिणाम कोणत्या हि गोष्टीचा असला तरी आम्हांला भोगावें लागत आहे. हिंदुस्थानसारख्या विशाल आणि संमिश्रराष्ट्राला हिंसेची भावना अत्यंत हानिकारक आहे. आमच्या देशांत पक्षभेद तर राहतील च. आम्ही विशाल राष्ट्राची कल्पना केली आहे. त्यामुळें विचारभेद तर त्यांत राहणार च आहेत परंतु आपापल्या विचार प्रचारासाठीं आणि साध्यें सिद्ध करण्यासाठीं हिंसात्मक साधनें मान्य केलीं जातील, तर आमचा देश टिकूं शकणार नाहीं. हिंसेवर श्रद्धा ठेवल्यामुळें आम्ही आपल्या स्वातंत्र्याला हि मुकूं. म्हणून ह्याविषयीं आम्हाला लोकमत जागृत करावें लागेल. जर आम्ही लोकांना योग्य मार्गदर्शन केलें तर मला विश्वास आहे कीं आज हिंसेचा जो बोलबाला होत आहे तो लवकरच थंड पडेल. आमच्या जनतेचें हृदय त्याला अनुकूल नाहीं.

: २७ :

# रोज लिहीत चला

खेडेगांवच्या सेवेचें काम ठिकठिकाणीं थोडें फार चाललें आहे. व्हायला पाहिजे तितकें नाहीं. पण जें आहे त्यांत हि अनेक दोष दिसून येतात. त्यांतील एका दोषाकडे आज लक्ष वेधावयाचें आहे.

रामदासांनीं म्हटलें आहे, "दिसामाजि कांहीं तरी तें लिहावें." पण आमचे काम करणारे सहसा कांहीं लिहितांना दिसत नाहींत. लोकांसाठीं त्यांनीं लेख लिहावे अशी अपेक्षा नाहीं. आपल्या चित्ताचें निरीक्षण करण्यासाठीं, रोजच्या कामाचा आढावा घेण्यासाठीं, मिळालेलें ज्ञान, लाभलेला अनुभव, आलेल्या अडचणी, झालेल्या चुका नोंदण्यासाठीं रोज कामांतून थोडा अलग वेळ काढून दरेकानें थोडें टांचण करून ठेवलें च पाहिजे, असें माझें म्हणणें आहे.

विचार करण्याची हि एक संवय असते. लिहिण्याच्या जबाबदारीनें हि विचार होतो, अशी कांहीं जबाबदारी नसली तर विचार सुचत च नाहीं, असें अनेक लोकांच्या अनुभवावरून दिसून येत आहे. कांहीं काम करणारे तर एक पाऊल पुढें जाऊन म्हणतात रोज रोज विचार तो काय करायचा, आम्ही काम करीत च आहों. त्यांच्या मतें विचार करायचा रिकामटेकड्या लोकांनीं. ही च बुद्धीची जडता. जडते मुळें विचाराची गरज हि लक्षांत येत नाहीं.

एकदां एक विचार घेऊन कामाला लागले. पुढें काम करता करतां विचार मंदावला. विचार मंदावल्यामुळें काम रेंडकुंडीस आलें. असें होऊन

राहिलें आहे. बुद्धाचें वचन आहे, रोज घर झाडायला हवें, चित्त धुवायला हवें, रोज अभ्यास करायला हवा. ते म्हणतात, आम्ही विचार करून ठेवला च आहे, विचाराशिवाय काम थोडें च सुरू झालें ? पण जुन्या भांडवला-वर धंदा करणारा व्यापारी जसा धंद्याच्या चढाओढींत टिकूं शकत नाहीं तसें विचाराचे नवीन ओघ जगांत वाहत असतांना, जुन्या विचारावर सेवा करणाऱ्याची सेवा तेजोहीन बनते.

गांधीजी सारखीं माणसें नित्य नव्या उत्साहानें काम करतांना दिस-तात. याचें कारण नित्य नवीन चिंतन, दररोज चाळणा, हें च आहे. पण मी तर असें पाहतों, आमचे कार्यकर्ते गांधीजींचे हि लिखाण अभ्यासीत नाहींत. पण हें बरें नाहीं. विचारांचा अभ्यास सतत व्हायला पाहिजे आणि त्याचें टांचण रोज व्हायला पाहिजे.

कोणी कार्यकर्ते एखादी अडचण आली म्हणजे माझ्या सारख्याला अचानक सल्ला विचारून टाकतात. त्याच्या रोजच्या चालू कामाची आम्हाला कांहीं च माहिती नसते. जणूं सर्व गुपचुप कारभार चाललेला. एकदम च सल्ला तरी कसा द्यायचा ? अडचणीच्या वेळीं च विचारण्या ऐवजीं वेळोवेळीं केलेल्या टांचणांचा सारांश जर ते कळवीत राहतील तर प्रसंगीं सल्ला देणें हि सोपें जातें. या हि दृष्टीनें टांचण ठेवण्याचें अगत्य लक्षात येण्यासारखें आहे.

साऱ्या च कार्यकर्त्यांना उद्देशून मीं हें लिहिलें आहे, पण माझ्याशीं संबंध असणाऱ्या कार्यकर्त्यांकडे साहजिक च माझें अधिक लक्ष आहे. त्यांनीं आणि सर्वांनीं या सूचनेचा अंमल करून पहावा, कार्याला क्रांति आल्याशिवाय राहणार नाहीं.

[ मराठी हरिजन, ता. १९-१-४७ ]

: ३८ :

# ग्रामसेवेबाबत प्रश्नोत्तरी

प्रश्न—१. वस्त्र-स्वावलंबनाचा प्रचार खेड्यांत कोणत्या पद्धतीनें करावा ? त्यासाठीं साधनें कोणतीं वापरावीं ? लोकांनीं फावल्या वेळांत कांतावें कीं नित्य कांतण्याची संवय लावून घ्यावी ?

उत्तर— शेतांतून निवडक कापूस वेचून घेऊन, तुनाई, कताई, दुवटा करून गांवांतल्या गांवांत विणकरा कडून विणवून घ्यावें. किंवा आपण च विणावें. दुवटा झाल्यावर विणण्याचा त्राऊ नाहीं. साधनें सर्व-सुलभ आणि होता होईल तो जागेवर बनलेलीं असावींत. फावल्या वेळांत भरपूर कांतावें आणि नित्य कांतण्याची हि संवय लावून घ्यावी.

प्रश्न—२. जे शेतकरी खाऊन पिऊन सुखी आहेत त्यांना चरख्याचें महत्व वाटत नाहीं. त्यांना कांतण्याकडे कसें प्रवृत्त करावें ?

उत्तर— खाऊन पिऊन सुखी असणाऱ्यांनीं इतरांची चिंता वहाव-याची असते, हें पटवतां आल्यास असे लोक यज्ञार्थ कांतण्यास प्रवृत्त होतील.

प्रश्न—३. ज्यांची बागाईत जमीन आहे त्यांना फुरसत नसल्यामुळें कांतणें शक्य होत नाहीं. त्यांनीं काय करावें ?

उत्तर— त्यांनीं कांतण्यासाठीं एखादा सालदार पोटभर मजूरी देऊन राखून घ्यावा. आणि तें सूत विणवून घेऊन घरच्या मंडळींनीं त्या सालदारासकट आंगभर खादी वापरावी.

प्रश्न—४. खेडेगांवांत रस्त्यावरून वाहणाऱ्या घाण पाण्याची व्यवस्था कशी करावी ?

उत्तर— रस्ते नीट करणें, नाली बनवणें, सोख-खड्डा तयार करणें. या संबंधीं विशेष माहिती बालुभाई मेहता यांनीं लिहिलेल्या "ग्राम-सफाई" या पुस्तकांत आढळेल.

प्रश्न—५. हरिजनांची सेवा करण्याचा यत्न करीत असतां हि ती सेवा घ्यायला ते तयार नसतील तर काय करावें ?

उत्तर— जी सेवा ज्याला नको असेल ती त्यावर लादू नये. ज्याला ज्या सेवेची गरज आहे ती सेवा करावी. हरिजनांची खरी सेवा आपण हरिजन होण्यानें होत असते. ती आपल्या हातची गोष्ट आहे.

प्रश्न—६. दारूचें ज्यांना व्यसन जडलें आहे ते दारू सोडू लागले कीं आजारी पडतात. तर या बाबतींत कसें करावें ?

उत्तर— निसर्ग-उपचारानें त्यांना बरें करावें. तसें बरे झाल्यानंतर पुन: दारू पिण्याची इच्छा होऊं नये. झाल्यास दारू पिण्याची इच्छा हा च रोग आहे हें समजाऊन सांगावें.

प्रश्न—७. चोरून दारू तयार करणारांना तसें न करण्याविषयीं समजाऊन सांगितलें असतां हि ते ऐकत नसतील तर ग्राम-सेवकांनीं पोलिसांची मदत घ्यावी काय ?

उत्तर— सेवकानें सेवकाचें काम करावें. पोलिसानें पोलिसाचें. सेवकाला सत्याग्रहाची शक्ति अवगत असली पाहिजे.

प्रश्न—८. खेड्यांतील हॉटेल-बिडीवाले इत्यादींचें संघटन करून त्यांच्यासाठीं तंबाखू मिळवून देण्याची, तसें च तयार कपडा बनवून विकणाऱ्या शिंप्यासाठीं मिल कापड मिळवून देण्याची व्यवस्था ग्राम-सेवकानें करावी काय ?

उत्तर—. ग्राम-सेवकाच्या क्षेत्रांत तशा सर्व च गोष्टी येतात. पण गांववाल्यांचा बरा-वाईट संसार चालविणें हें ग्रामसेवकाचें काम नव्हे. त्यानें

आपल्या कांहीं मर्यादा ठरवून तदनुसार होईल ती सेवा करायची आणि संतोष मानायचा. उपचाराबाबत जसें आपण लांबलचक औषधांच्या भानगडींत न पडतां निसर्गोपचाराच्या मर्यादेंत राहून काम करतों तसें च सर्व बाबतींत समजावें.

प्रश्न--९. ग्राम-सेवकानें स्वतः शरीर-परिश्रम किती तास करावा? सेवा एकूण किती तास करावी?

उत्तर-- सेवकानें आठ तास विश्रांति आणि चार तास देहकृत्यें वगळून उरलेल्या बारा तासांचे तीन समान भाग करावे. चार तास उत्पादक शरीर-परिश्रमाकडे द्यावे. चार तास गांव-सेवा करावी. चार तास स्वाध्याय, प्रार्थना, आत्म-चिंतन इत्यादि आत्म-कृत्यें करावींत.

[ मराठी हरिजन, ता. ९-३-१९४७ ]

: ३९ :

# " धर्मध्वजित्वं "

तुम्हीं निशाणा बाबत प्रश्न विचारला आहे. त्या संबंधीं प्रथम च हें लक्षांत घ्यावयाचें कीं माझें उत्तर माझ्या व्यक्तिगत विचारांचें निदर्शक राहील. कांग्रेसच्या किंवा इतर कोणच्या हि पक्षाच्या विचाराचें तें निदर्शक मानता येणार नाहीं.

गणपति उत्सवाच्या किंवा तत्सम मिरवणुकींत कोणचीं निशाणें वापरलीं जावींत हा तुमच्या प्रश्नाचा भावार्थ आहे; राष्ट्रीय निशाण आणि भगवा झेंडा हा ह्यांत वाद आहे. त्या संबंधीं माझी दृष्टि अशी—राष्ट्रीय झेंडा तिरंगी, चरखा मुद्रांकित—"राष्ट्रीय" प्रसंगीं वापरणें योग्य. "राष्ट्रीय" प्रसंग म्हणजे ह्या ठिकाणीं "अखिल भारत निदर्शक" किंवा निराळ्या भाषेंत "विशिष्ट जाति, विशिष्ट धर्म ह्यांचें अन्य-व्यावर्तक सूचन ज्यांत नाहीं असा" प्रसंग. भगवा झेंडा हा पांथिक झेंडा आहे. तो हिंदुसभेच्या किंवा तत्सम समारंभांत वापरणें योग्य.

"राष्ट्रीय" आणि "पांथिक" ह्याहून "धार्मिक" ही वेगळी च वस्तु आहे. गणपति-उत्सव हा "धार्मिक" उत्सव मानला जातो. तो हिंदुमहासभेचा पांथिक नाहीं अथवा राष्ट्रीय नाहीं म्हणून त्या प्रसंगीं भगवा अथवा तिरंगा कोणचा च झेंडा नसलेला बरा.

हिंदुधर्म विश्वव्यापक आहे. कोणचा हि खरा धर्म असा च असतो. म्हणून धर्माचें निशाण ही वस्तू च मला रुचत नाहीं. हिंदु धर्मानें आपलें एक स्वतंत्र निशाण बनवलेलें नाहीं हि.

प. १६५

पण विशिष्ट तत्त्वाचें सूचन किंवा भेद-निदर्शन करण्याची दृष्टि नसून हौशीसाठीं झेंडे मिरवायचे अशी जिथें कल्पना असेल तिथें, ज्याच्या इच्छेस जो येईल तो झेंडा त्यानें खुशाल वापरावा. असे पाच पंचवीस झेंडे आनंदानें आणि हौशीनें—अर्थात् अविरोध पूर्वक एका च गणपति उत्सवांत मिरविण्यास हरकत नाहीं, प्रत्येकाचा वेगवेगळा पोशाख असतो च कीं नाहीं? तसें हें होईल.

सारांश, गणपति उत्सवांत कोणचा च झेंडा नसावा, अथवा तऱ्हे-तऱ्हेचे आणि ज्याच्या त्याच्या आवडीचे शें पन्नास झेंडे असले तरी चालतील असें मला वाटतें.

शेवटीं "दंभो-धर्म-ध्वजित्वं" दंभ म्हणजे धर्माचा ध्वज उभारणें ही शंकराचार्यांनीं केलेली व्याख्या आमच्या नेहमीं लक्षांत राहो, आणि "अविभक्तं विभक्तेषु" हें गीता-सूत्र हातचें न सुटो, एवढी च माझी प्रार्थना आहे.

[ ग्राम-सेवा-वृत्त, ता. ५-४-४० ]

: ४० :

# प्रार्थनेंतील विवेक

एक गृहस्थ लिहितात :

मी व माझे कांहीं मित्र, अलीकडे कांहीं वर्षें दर सोमवारीं व गुरुवारीं रात्रीं एकत्र होऊन प्रार्थना करीत असतों. प्रार्थनेंत आरंभीं गीताईतील 'स्थिरावला समाधींत' इत्यादि स्थित-प्रज्ञांचीं लक्षणें म्हणतों. आणि मग जमलेल्या प्रत्येकानें एकेक अभंग म्हणावयाचा, आणि शेवटीं "अहिंसा सत्य अस्तेय" इत्यादि व्रतांचे श्लोक, आणि आरती आदि करून प्रार्थना संपवावयाची. अशी पद्धति आमची चालू आहे. कांहीं सांप्रदायिक म्हणविणारे लोक अधून मधून येतात. त्यांना हि अभंग म्हणावयास सांगतों; परंतु एखादा त्यात "गवळण" म्हणतो, एखादा "असा कसा देवा चा देव बाई ठकडा" हें एकनाथांचें पद म्हणतो. अखादा "वैकुंठीची मूर्ति आली भीमा तीरीं" अशा सारखा तुकारामाचा अभंग म्हणतो. आमच्या दृष्टीनें "गवळणीं" त कामुकता व शृंगार-युक्त वर्णन येतें म्हणून ती नको. "असा कसा देवाचा देव?" यांत देवास फसवणारा लबाड म्हणून उल्लेखिलें आहे. "वैकुंठीची मूर्ति" या अभंगांत "गोकुळांत चोरी केली यानें फार" असलीं वर्णनें आहेत. त्या मुळें प्रार्थनेचें गांभीर्य कमी होतें असें आमचें म्हणणें. अुलट सांप्रदायिक म्हणतात—"हे अभंग काय आम्हीं केले? हे थोर संतांनीं रचलेले आहेत. त्यांत वरवर दिसणाऱ्या अर्थाहून गूढ आध्यात्मिक अर्थ असूं शकतो. केवळ वाच्यार्थ घेऊन चालायचें नाहीं." यावर आम्हांस वाटतें "यांत गहन अर्थ असला तरी तो आम्हा सामान्य माणसांना कुठून कळणार? म्हणून आमच्या प्रार्थनेंत आम्ही असे अभंग म्हणूं नये." अशा

प्रकारें आमच्यांत विचार-भेद आहेत. त्याचें समाधान आपल्या कडून व्हावें अशी आमची अपेक्षा आहे."

पृच्छकानें विचारलेला प्रश्न सार्वजनिक अुपयोगाचा असल्यामुळें त्याची नीट छाननी होणें जरूर आहे. अनेक ठिकाणीं हा प्रश्न असा च अुभा होत असतो. त्याची चर्चा अनेक वेळां मला करावी लागली आहे.

आधीं हें लक्षात घ्यायला पाहिजे कीं, आम्हीं प्रार्थनेंत जे काहीं म्हणत असतों तें आमच्या चित्त शुद्धीसाठीं असतें. संतांनीं निरनिराळ्या भूमिकेवरून अनेक प्रकारचे अभंग लिहून ठेवले आहेत. त्यांतून कोणची निवड करायची हें आम्ही आमच्या मनःस्थितीस अनुसरून ठरवावयाचें आहे, कारण ही प्रार्थना आमची आहे. आम्ही आमच्या शद्वांत ती करावयाची; परंतु आमची वाणी तोकडी पडते म्हणून आम्ही संताच्या वाणीचा अुपयोग करून घेतों. पण आमच्या प्रार्थनेंत आम्हीं जेव्हां असलीं भजनें म्हणतों तेव्हां त्या वेळेपुरतीं हीं आमचीं भजनें असतात. तीं त्या त्या कवींची किंवा संतांचीं नसतात. म्हणून आम्हांला सहज हृदयंगम होतील अशीं च पद्यें आम्हीं निवडलीं पाहिजेत. अितर पद्यें जीं आम्हीं स्वीकारणार नाहीं त्यांना आम्हीं टाकावू ठरवतों असें नव्हे, त्यांत गूढ अर्थ हि असूं शकेल अथवा नसेल हि. आम्हांला त्या वादात पडण्याचें च कारण नाहीं. दुसरी सरळ अर्थाची पद्यें अुपलब्ध असतांना आम्हांला गूढ पद्याची गरज च काय ?

पृच्छकाच्या प्रश्नाचें अुत्तर एवढ्यांत येअून जातें. पण सत्यशोधनाच्या दृष्टीनें या मुद्याचा आणिक खोल विचार केला पाहिजे. एक तर संतांच्या नांवावर असलेले अभंग इत्यादि सर्व त्यांचें च आहेत असें मानणें बरोबर नाहीं. तुकारामादिकांच्या जिवंतपणी च त्यांच्या नांवावर दुसरे लोक अभंग रचूं लागले होते. तुकारामानें स्वतः च अशांचा निषेध

केला आहे. पण असा कितीं तरी कचरा कुणाच्या हि निषेधाला न जुमानतां त्या त्या संताच्या नांवावर लावला गेला आहे. म्हणून सुवर्ण-मार्ग हा आहे कीं, जें हृदयास पटतें तें च ग्रहण करावें. जें पटत नाहीं तें नम्रता-पूर्वक सोडून द्यावें, मग तें कोणाच्या हि नांवा वर असो. पण आज भक्ति-मार्गी म्हणविणारे लोक इतके गचाळ झाले आहेत कीं, संतांच्या नावा वर असलेले कोणचे हि भजन मग तें कितीं हि रद्दी असो, जड श्रद्धेनें म्हणत राहतात. त्यांना अर्थ कळण्याची हि अपेक्षा नसते. त्यांच्या भक्तीचा आचरणाशीं तर संबंध च नसतो. ही भक्ति नव्हे, भक्तीची विटंबना आहे.

पण जे अभंग क्षेपक नाहींत, त्या त्या संतानीं च लिहिलेले आहेत, असें सिद्ध होओील ते हि सारे प्रमाण मानण्याची कल्पना सोडून दिली पाहिजे. हिंदुस्थानच्या मधल्या गुलामगिरीच्या काळांत साहित्यिकाचें मन कामुकतेनें आणि शृंगारानें इतकें भरलेलें दिसतें कीं तें जाणणारास हिंदुस्थानच्या पतनाची दुसरी अुपपत्ति लावण्याची गरज च पडत नाहीं. सर्व रसांत शृंगार-रस प्रधान करून त्याचें सूक्ष्म, अति सूक्ष्म, विश्लेषण करण्यांत पांडित्याचें साफल्य मानलें जात होतें. अशा विषयासक्त वातावरणांत अवतरलेल्या संतांना हि आपला भक्ति-रस शृंगाराच्या परिभाषेत मांडण्याचा मोह झाला असल्यास, किंवा तशानें च लोकांना भक्तीकडे वळवतां येओील असें त्यानीं मानलें असल्यास त्यांत नवल नाहीं. आज आम्ही अहिंसा-वादी अहिंसेचें लोकांना सुलभ ग्रहण व्हावें म्हणून सत्याग्रहाची "लढाओी," "आक्रमणकारी" अहिंसा, अहिंसक "सेना" अहिंसेचें "तंत्र", अहिंसात्मक "दाब" (प्रेशर), अहिंसक "बळजबरी" (कोअर्शन) इत्यादि शब्द-प्रयोग करतों कीं नाहीं? तसें च तें संतांचें ! दोन्हीकडे मोह अेक च, फलित हि अेक च. प्रचार वेगानें होतो, विचार दूषित होतो. म्हणून जें कांहीं ऐकायचें, वाचायचें मग तें सत्याग्रही साहित्य

असो, संतांचीं भजनें असोत, किंवा धर्म ग्रंथ असो, तें सारासार विवेक शाबूत राखून च ऐकलें किंवा वाचलें पाहिजे.

जस जसा काळाचा ओघ पुढें पुढें जातो तस तसा मनुष्याच्या मनाचा हि विकास होत असतो. म्हणून पूर्वजांच्या सर्वोत्तम कृतींतून नेमकें सार तेवढें वेचून घ्यायचें, असार दिसणारें काढून टाकायचें, ही हिंमत आम्हां त्यांच्या वंशजांना असली पाहिजे. मी या हिमतीला च श्रद्धा म्हणतों. नचिकेत्याच्या बापानें दिलेल्या दानांत दुबळ्या आणि भाकड गायी पाहून अुपनिषद् म्हणतें "नचिकेत्याच्या मनांत श्रद्धा शिरली" (श्रद्धा आविवेश), आणि तो बापाला म्हणाला " हें तुम्हीं काय दान आरंभिलें आहे !" ती च श्रद्धा आम्हाला हवी आहे. तदभावीं आमच्या प्रार्थना आणि भजनें आज वीर्यहीन आणि अकिंचित्कर बनलीं आहेत. एरव्ही आमच्याकडे गांवोगांव भजनें चाललीं आहेत. पण त्यांतून सामर्थ्य निर्माण होतांना दिसत नाहीं. त्याचें कारण त्यांत खरी श्रद्धा नाहीं हें च आहे.

[ मराठी हरिजन, ता. २२–१२–४६. ]

## : ४१ : अ

# अभिज्ञा

अभिज्ञेचा हेतु शरीर-परिश्रम ज्यांना नित्यधर्म वाटतो अशांचा समुदाय निर्माण करणें हा आहे. शरीरपरिश्रमाच्या निरनिराळ्या प्रकारांत भेद करायचा नाहीं च. पण गरजे प्रमाणें सूत कातणें हा सर्व परिश्रमांचा प्रतिनिधि, राष्ट्रांतील विचारकांनीं मानला आहे. ह्या मान्यतेप्रमाणें नित्य कातणारांचें एक लहानसें मंडळ येथें आहे. इतरत्र हि अशीं मंडळें कुठें कुठें आहेत. ह्या सर्वांचें कुठें अडत असेल तर उत्तम पेळूंच्या अभावात अडत असतें. कित्येक मंडळींना अनेक समर्थनीय कारणामुळें पिंजणें अशक्य-प्राय असतें. अशीं मंडळी गचाळ पेळू घेऊन त्यांतून कसा बसा धागा काढत असल्याचें दयाजनक पण क्षम्य दृश्य पहावयास मिळतें. पण पेळूंची व्यवस्था मुळीं च न करवल्या मुळें कांतणें खंडित झाल्याचीं हि अक्षम्य उदाहरणें सापडतात. ह्यात योजनाशक्तीचा उणेपणा तर स्पष्ट च आहे. अभिज्ञेच्या कल्पनेचें स्थूल उगमस्थान हें आहे.

पण मजुराकडून चांगले पेळू मजुरीनें पिंजवून घेऊन अशा मंडळींना पेळू कां पुरे पाडूं नयेत, असा प्रश्न विचारला जातो. ह्या प्रश्नाच्या उत्तरांत अभिज्ञेच्या कल्पनेचें सूक्ष्म उगमस्थान आहे.

सूत्रयज्ञाची तत्वतः पिंजण्यापासून फारकत करता येत नाहीं. मजुरां-कडून पिंजवून घेणें म्हणजे सूत्रयज्ञाची पिंजणापासून तत्वतः फारकत करणें होय. पण अनेकांना पिंजण्याची शक्यता दिसत नाहीं. त्याला काय करावें? त्यासाठीं उपाय हा च कीं आपल्या कुटुंबांतून पिंजलेलें वापरण्याची सवलत

ठेवायची. पण कुटुंब म्हणजे काय ? कुटुंब म्हणजे समानधर्मी गट. परिश्रम तत्व मानणाऱ्या दुसऱ्या व्यक्तीकडून पिंजलेले पेळू घेऊन मी कांतण्यांत माझ्या सूत्रयज्ञाची तत्वहानि झाली नाहीं असें मानता येईल. ह्याहून कुटुंबाचा वेगळा अर्थ आपल्याला करतां येणार नाहीं हें उघड असावें. म्हणून अभिज्ञेची कल्पना अशी "नित्य कांतणाऱ्या परिश्रमनिष्ठ अक्षम व्यक्तीनें दुसऱ्या परिश्रम-निष्ठ क्षम व्यक्तीचे पिंजलेले वापरावे". म्हणजे अभिज्ञा हा परिश्रम-देवतेचा करभार आहे. आमच्या चळवळींत यज्ञार्थ कातण्याचें विशिष्ट महत्व आहे. खादी उत्पत्ति वेगळी, वस्त्रस्वावलंबन वेगळें, आणि यज्ञार्थ कांतणें त्याहून वेगळें. यज्ञार्थ कातण्याचा म्हणजे च परिश्रमनिष्ठेचा प्रचार आपल्या हातून होईल तितका थोडा आहे. शास्त्रकारांनीं भिक्षेचा महिमा गाइला आहे. "परिश्रमनिष्ठा"–सर्वावलंबन–हा भिक्षेचा शास्त्रीय अर्थ आहे. तो समुदायांत सिद्ध झाला पाहिजे. अशा प्रकारच्या समुदायाची किंवा संघाची स्थापना अभिज्ञेंत गृहीत आहे. संघाविषयींच्या प्रेमानें आणि जबाबदारीचें इतके सुंदर प्रतीक आजच्या स्थितींत दुसरें नाहीं. "अभिज्ञा' म्हणजे प्रेमाची खूण. "भक्त्या मामभिजानासि" ह्या वाक्यात गीतेनें हा शब्द योजला आहे. अभिज्ञेचा पेळू हा ज्याच्या त्याच्या पिंजणाचा आणि व्यवस्थितपणाचा शेवटचा नमुना असला पाहिजे.

" कल्याणकारी शक्तिशाली सर्वलभ्य उपासना
चित्तीं मुरो विश्रांत पसरो ही च माझी वासना ॥"

ग्राम सेवा वृत्त २५।७।३७

: ४१ : ब

# अभिज्ञा

प्रत्यक्ष मजुरीचें कांहीं काम करून तें राष्ट्राला अर्पण करणें ही एक चांगली कल्पना आहे. त्यांतून श्रमनिष्ठा, श्रमिकांविषयीं आदर आणि सहानुभूति, सामाजिक समता, त्यागबुद्धि, राष्ट्रप्रेम इत्यादि अनेक सद्गुण निर्माण होणारे आहेत. कांग्रेसनें कांहीं वर्षे श्रम-वर्गणीची कल्पना चालवून पाहिली. पण ही महान् वस्तु कांग्रेसला जिरवतां आली नाहीं. चरखा-संघात ती अजून चालू आहे. चरखा-संघाचे सभासद चरखा-संघाला मासिक एक हजार गज सूत देतात. चरखासंघाच्या कार्यकर्त्यांना तें नियमानें द्यावयाचें असतें. त्याशिवाय इतर हि मंडळी सूत देणारी थोडी आहेत. पण ही कल्पना लोकप्रिय झालेशी नाहीं. मजुरांविषयीं वाचिक प्रेम प्रगट करणारे पुष्कळ आहेत. पण त्यांना हि श्रम देण्यापेक्षां पैसे देणे बरें वाटतें. मुळीं च काहीं न देणें हें सर्वांत उत्तम.

सूत कांतून अर्पण करण्याच्या कल्पनेप्रमाणें पिंजून उत्तम पेळू अर्पण करावे, ही कल्पना मला कांहीं वर्षांपूर्वी सुचली. कांतण्याच्या एकंदर प्रवृत्तीचा आधार पिंजण्यावर आहे. पिंजण्याची कला कार्यकर्त्याला चांगली अवगत नसते. त्यामुळें कांतण्याची प्रगति होत नाहीं हें मी पाहत होतों. नियमित कातणाऱ्या लोकांना हि पिंजण्याचें ज्ञान नसायचें. त्यांचें कांतणें पेळूवांचून अडायचें. मग जसले कसले मिळायचे तसले रद्दी पेळू घेऊन त्यांनीं सूत कांतीत रहायचें. आणि नियम पार पडल्याचें शाब्दिक समाधान मानून घ्यायचें. हा सर्व प्रकार असह्य होता. त्यांतून पेळू-वर्गणीची कल्पना

निघाली. अभिज्ञा हें तिला नांव दिलें गेलें. अभिज्ञा म्हणजे ओळखीची खूण, राष्ट्राविषयींच्या आपल्या कर्तव्याची आठवण. दर महिन्याला पांच तोळे ही अभिज्ञा ठरली. त्याप्रमाणें अभिज्ञा देणारे एक लहानसें मंडळ निघालें.

सार्वजनिक रीतीनें अभिज्ञेचा प्रचार केला नव्हता. परिचित मंडळींत सहज होऊं शकला तो केला. पेळू आश्रमांत जमा केले जात. पण ह्या मर्यादित क्षेत्रांत हि अभिज्ञेची ही कल्पना रुजावी तशी रुजली नाहीं. हें लिहिण्यास खेद वाटतो. पिंजण्याच्या कामाची पुष्कळांना झंझट वाटते. त्यामुळे अभिज्ञा त्यांना ग्रहण झाली नाहीं. वास्तविक त्यासाठीं च अभिज्ञा निघाली. ज्यानीं अभिज्ञा सुरु केली त्यांच्यापैकीं बहुतेकांचा त्यांत अनियमितपणा--जो आमचा राष्ट्रीय दुर्गुण आहे--दिसून आला. कांहीं थोड्यांनीं अभिज्ञा नियमित दिली. आणि त्याच्या जीवनावर तिचा चांगला परिणाम झाला. "धर्मो रक्षित रक्षितः" म्हणजे आपण धर्म राखला तर धर्म आपल्याला राखतो, असें मनूचें एक वचन आहे. अभिज्ञेचें ज्या थोड्यांनीं च पालन केलें त्याचें पालन अभिज्ञेनें हि चांगलें केलें असें अभिज्ञा नियमित देणारांनीं अनुभवलें आहे.

१९३८ आणि १९३९ सालीं अनुक्रमें १८५६ तोळे आणि २०१५ तोळे अभिज्ञा आली आहे. ह्यात एकूण ४१ स्त्रीपुरुषांनीं भाग घेतला आहे. त्यांत स्त्रिया १४ आणि पुरुष २७ आहेत. पेळू विकून ५०।।≈ जमा झाले आहेत. पेळू २० जणांनीं विकत घेतले आहेत. त्यांत कांहीं राष्ट्रीय पुढारी आणि कांहीं इतर कार्यकर्ते आहेत. बहुतेक नियमित कांतणारे आहेत. असा ह्या दोन वर्षांच्या अभिज्ञेचा थोडक्यांत अहवाल आहे.

पिंजण्याबाबत इतक्या दिवसांत पुष्कळ प्रगति झाली आहे. खांडणपिंचरण पद्धतीची पिंजण्यांत भर पडली आहे. खांडण करून पेळू देणारानें दरमहिना २ तोळे पेळू द्यावे, असा अभिज्ञेचा दुसरा प्रकार योजला आहे.

साध्या पिंजणाच्या ५ तोळयांना जेवढा वेळ लागतो तेवढ्या वेळांत खांडणाचे २ तोळे पेळू होऊं शकावे.

[ अग्निशेची ही कल्पना मंडळींनीं उचलून धरावी अशी माझी सूचना आहे. ह्याबाबत कोणी कांहीं सुचवूं इच्छितील तर त्यांनीं सुचवावें. ]

[ ग्राम-सेवा-वृत्त, आक्टोबर १९४० ]

: ४२ :

# सुट्टीची वेळ बदला

हिंदुस्थानात हजारो वर्षांपासून अध्ययन-अध्यापन चालू आहे. पण शाळांना दीर्घ काळ सुट्टी देण्याची योजना कुणाला सुचली नव्हती. इंग्रजी विद्या सुरु झाल्यापासून शिक्षणांत सुट्ट्या शिरल्या. पूर्वी साधारणपणें आठवड्यांतून एक दिवस अनध्याय असे. त्याशिवाय शिष्टागमन आणि विशिष्ट प्रसंग अपवादरूप समजले जात. पण आतां तर वर्षांतून जेम तेम सहा सात महिने शाळा चालते. आजच्या शाळांना कोंडवाड्याचें स्वरूप असल्यामुळें सुट्ट्याची गरज उघड च आहे. अर्थात् त्याबाबत शिकायत करण्याचें कारण च नाहीं.

पण लांब सुट्ट्या द्यायच्या च झाल्या तर केव्हा द्याव्या ह्या संबंधीं फेरविचार होणें जरुर आहे. त्या सुट्ट्या उन्हाळ्यांत देण्याची आज रीत आहे. इथला उन्हाळा साहेबाला सोसत नव्हता. म्हणून त्यानें उन्हाळ्यांत सुट्टी ठेवली. उन्हाळ्यांत तो थंड हवेच्या जागीं जाऊन राही. पण आता तो कांहीं सवाल नाहीं. आतां साहेब हिंदुस्थान सोडून इंग्लंडच्या थंड हवेंत रहायला कायमचा च जात आहे. म्हणून ह्या पुढें ही उन्हाळ्याची सुट्टी बदलून पावसाळ्यात देणें बरें होईल. पावसाळ्यात शेतकऱ्यांच्या शेतांत निंदाई होते, तेव्हां मुलांना शेतांत काम करतां येईल. एकदम दीड दोन महिने सुट्टी न देतां, निंदाईच्या वेळा पाहून, दरेक वेळा पंधरा-पंधरा दिवस सुट्टी देता येईल. उन्हाळ्यात दिवस मोठा असतो. त्या वेळीं शेतांत काम हि नसतें. त्या च वेळीं सुट्टी असली म्हणजे मुलांना उन्हांत उनाडणें अथवा घरीं झोंपा काढणें ह्या शिवाय गति उरत नाहीं. म्हणून एवढा बदल करणें अगत्याचें आहे. साहेबांचें राज्य गेलें, आणि शेतकऱ्यांचें राज्य आलें, हें सगळ्यांच्या लक्षांत येईल.

[ मराठी हरिजन, ता. २७-४-४७ ]

: ४२ :

# शाळेंतील सुट्ट्या

हल्लीं शाळांतील शिक्षणांत सुट्ट्यांचें महत्व विशेष मानलें जातें. शाळांची आजची जी स्थिति आहे त्या स्थितींत ह्या सुट्ट्यांची जरूर हि आहे. कारण तितके दिवस तरी मुलांना मोकळेपणा वाटतो. शाळा म्हणजे कोंडवाड्यासारखी च आहे. ही गोष्ट सरकारच्या लक्षांत आहेसें दिसतें. कारण इकडच्या बाजूला खेडेगांवच्या शाळेंतील मुख्य शिक्षकांच्या ताब्यांत गुरांच्या कोंडवाड्यांचा हि चार्ज दिलेला असतो. शाळेच्या कामाबद्दल वीस रुपये पगार असला, तर गुरांच्या कोंडवाड्यांच्या व्यवस्थेबद्दल पांच रुपये जास्त दिले म्हणजे भागते. नाहीं तर स्वतंत्र व्यवस्था करावयाची म्हणजे जास्त खर्च लागेल. शिवाय दोन्ही कामें एका च जातीचीं असल्यामुळें कामांत काम होऊन जातें ! बहुधा शाळेच्या शेजारीं च कोंडवाड्याची हि इमारत असते. एका इमारतींत पोरें आणि दूसरींत ढोरें. अशा स्थितींत सुट्ट्यांमुळें मुलांना जरा हायसें वाटतें. पण राष्ट्रीय शाळांनीं सरकारी शाळांतील सुट्ट्यांचें अनुकरण करण्याचें कांहीं च कारण नसावें. स्थिति मात्र उलट दिसते. सरकारी शाळांतील बहुतेक सुट्ट्या तर इकडे असतात च. त्याशिवाय कॉंग्रेसची सुट्टी, टिळक पुण्यतिथि, गांधी जयंति, वगैरे राष्ट्रीय सुट्ट्या जादा मिळून सुट्ट्या च शिक्षणाला खाऊन टाकतात. असें होणे बरें नाहीं. आपल्या जुन्या शिक्षण पद्धतींत “ शिष्टागमने अनध्यायः ” वगळतां सर्व सामान्य विद्यार्थीना पौर्णिमा, अमावास्या आणि दोन अष्टम्या एवढे महिन्याला अनध्याय चार च असत. त्याशिवाय कोणच्या हि सुट्ट्या नव्हत्या.

उन्हाळ्याची सुट्टी सुद्धां नवीन च आहे. ह्या जुन्या पद्धतीप्रमाणें जरी करतां न आलें तरी बऱ्या च सुट्ट्या काढून टाकता येतील. रामनवमी सुरू झाल्यापासून आपण मत्स्यजयंति सोडली च कीं नाहीं ? नवीन च सुट्ट्या दाखल करावयाच्या तर जुन्यांपैकीं कांहीं कमी करतां आल्या पाहिजेत. आणि एकंदरीत सर्व च सुट्ट्या कमी करण्याकडे लक्ष दिलें पाहिजे.

[ महाराष्ट्र-धर्म, १४ सप्टेंबर, १९२५ ]

: ४४ :

# अनर्थकारी विद्या

बंगालमधील कॉलेजें आणि युनिव्हर्सिटया ह्यांत काम करणाऱ्या अध्यापकांची एक परिषद भरली होती. आचार्य पी. सी. रॉय ह्या परिषदेचे अध्यक्ष होते. त्यांनीं आपल्या भाषणांत "उच्च" शिक्षणासाठीं म्हणून राष्ट्रीय संपत्तीचा कसा अपव्यय होत आहे ह्याची कल्पना दिली आहे. बंगालमध्यें ९०० शाळा मिळून सुमारें १५,००० मॅट्रिक होतात. त्यांपैकीं ९,००० कॉलेजमध्यें उच्च शिक्षणासाठीं जातात. पैकीं ५०० एम्. ए. होतात. त्यांतिले फक्त ५० उच्च अध्यापनाच्या कामीं येतात. बाकीचे ४५० कोठें तरी कारकुनी वगैरे करून सरासरी ५० रु. महिना मिळवितात. ह्याशिवाय ९,००० पैकीं कांहीं वकील, डॉक्टर, एन्जिनियर वगैरे होतात. परंतु ह्या सर्व धंद्यात आतां अगदीं गर्दी झाली असून त्यांना नीटसें काम मिळत नाहीं. म्हणून ९, ००० च्या ऐवजीं ९०० च विद्यार्थी कॉलेजांत गेले म्हणजे तेवढ्यानें उच्च अध्यापनाचे आणि उच्च धंद्याचें काम पुरें होईल. असा आचार्य रॉय ह्यांचा अभिप्राय आहे. बाकीचे ८,१०० विद्यार्थी कॉलेजांत जाऊन दरसाल सुमारें ३० लाख रुपयांचा अपव्यय मात्र करतात असा त्यांनीं हिशोब काढला आहे. ह्या हिशोबांत विद्यार्थ्यांमागें शिक्षणासाठीं रोजीं रुपया खर्च होत असला पाहिजे असा त्यांनीं बेताचा आकार घेतला आहे. दरसाल ३६० रु. भांडवलावर, मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण मिळविलेले विद्यार्थी इच्छा करतील तर किफायतशीर धंदा करूं शकतील—मात्र मजुरीची प्रतिष्टा त्यांनीं पटवून घेतली पाहिजे—असें आचार्य रॉय ह्यांचें म्हणणें आहे.

प. १७९

पण हें मात्र मोठें विकट होऊन बसलें आहे. ज्या मुलाला मॅट्रिक-पर्यंतचा संस्कार लागला तो मजुरीची प्रतिष्ठा च काय, पण स्वतःच्या आत्माची हि प्रतिष्ठा गमावून बसतो. असा ह्या उदार शिक्षणाचा महिमा आहे. इतकें असून पुनः ह्या शिक्षणाचा शक्य तितका "फायदा" घ्यावा असें म्हणणारे लोक आहेत च. जिथें गुरु-शिष्य-भाव नाहीं, त्याग किंवा सेवा-वृत्ति ह्यांचें नांव नाहीं, नैतिक वातावरण नाहीं, स्वधर्माचा अभ्यास नाहीं, मायभाषेला मान नाहीं, मजुरीची किंमत नाहीं, स्वतंत्र विचाराची किंमत नाहीं, तिथें जाऊन "फायदा" कसला घ्यायचा ? आणि तिथल्या अर्थ-नाशाचे रुपये-आणे-पैंत हिशोब तरी कसले काढायचे ? जीं बोलूनचालून आत्म-नाशाचीं यंत्रें उभीं केलीं आहेत, तिथें अर्थ-नाशाचा काय पाड ? पण पैसा हा च गुलाम लोकांचा परमात्मा असल्यामुळें अर्थ-नाशाचा हिशोब त्यांना पटण्यासारखा असतो अशा समजुतीनें आचार्य रॉय ह्यांनीं हे आंकडे मांडले आहेत. ते पाहून तरी डोळे उघडोत एवढें च म्हणावयाचें.

[ महाराष्ट्र-धर्म : ता. २७-९-१९२६ ]

: ४५ :

# गोऱ्या-काळ्यांचा संबंध

ह्या विषयावर टांगानिका येथील एका ख्रिस्ती धर्ममूर्तींनीं प्रवचन दिलें, तें वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालें आहे. हें सर्व प्रवचन त्यांनीं बायबला-तील ''नवीन-दर्शना'' च्या आधारावर रचलें आहे, त्यांच्या प्रवचनांत तीन महावाक्यें आहेत:—

(१) धर्मशास्त्रांत समतेचें तत्त्व असलें तरी तें तारतम्यानें च वापरा-वयाचें आहे. समतेच्या तत्त्वानें काळया-गोऱ्यांमधील भेदाला बाध येत नाहीं.

(२) गुन्ह्याबद्दल योग्य शिक्षा झाली पाहिजे, असें ईश्वराचें च मत आहे. ''योग्य'' शिक्षा म्हणजे ''शाहण्याला शब्दाचा मार आणि मूर्खाला टोणप्याचा मार.'' शाहणा गोरा, आणि मूर्ख काळा, हें तर उघड च आहे.

(३) शास्त्रदृष्ट्या गुलामगिरी गौण असली तरी सक्तीनें मजुरी करवून घेणें गैर नाहीं. ''मजुरी न करणाऱ्याला खाण्याचा अधिकार नाहीं.'' असें शास्त्रवचन आहे. म्हणून सक्तीनें मजुरी करवून घेण्यांत पाप नाहीं.

हे तिन्ही महासिद्धांत आम्हांला नवीन नाहींत. स्पृश्यास्पृश्यांच्या संबंधांत आमच्याकडील धर्ममूर्ति असे च सिद्धान्त सांगत असतात. भगवद्गीतेंत ''पंडिताः समदर्शिनः'' म्हटलें असलें तरी एक तर ते ब्रह्मज्ञानी पुरुषाला लागू आहे. इतरांनीं आपापले व्यवहार भेदबुद्धि राखून च केले पाहिजेत. शिवाय ''सम-दर्शिनः'' म्हटलें आहे, ''सम-वर्तिनः'' म्हटलेलें नाहीं. ज्ञानी झाला तरी पाहतांना सम-दृष्टि राखतो, पण आचरण करतांना योग्य भेद राखतो च. आणखी असें कीं, ब्राह्मणांत आणि अंत्यजांत समता पहावयाची, पण

त्यांत ब्राह्मण आणि अंत्यज सम होत नाहींत. ब्राह्मणांत आणि अंत्यजांत समता पहावयाची म्हणजे त्यांच्यांत चैतन्याची हालचाल सारखी आहे हें ओळखावयाचें. पण तेवढ्यानें ब्राह्मण आणि अंत्यज सारखे कसे होतील? गाय आणि गाढव एक च का? म्हणून "व्यवहारांत अस्पृश्यता चुकीची नाहीं" वगैरे बाष्कळ कोट्या आम्हांला साक्षात् शंकराचार्यांची "गादी" चालविणाऱ्या धर्माध्यक्षाकडून हि ऐकावयास सांपडतात. "योग्य" शिक्षेचा, सदर खिस्ती धर्ममूर्तींनीं केलेला अर्थ च "चांभाराच्या देवाला खेटराची पूजा" ह्या आमच्या म्हणींत प्रगट झालेला आहे. भंग्याच्या कडून पायखाने साफ करविण्याचें काम जबरदस्तीनें करविण्यांत हि पाप नाहीं. कारण तसें न झालें तर समाजव्यवस्था बिघडून जाईल असें म्हणणारे आमच्यांत आहेत च. अशा तऱ्हेचीं उदाहरणें हि मधूनमधून घडलेलीं आहेत. प्रत्यक्ष भंग्यांनीं कामाचा इनकार करावा आणि त्यांच्यावर सक्ती व्हावी हीं "नैमित्तिक" जुलमाचीं उदाहरणें झालीं. पण भंग्यांच्यावर अस्पृश्यता लादून त्यांच्याकडून सफाईचीं कामें करवून घेणें ही जबरदस्ती च आहे आणि ती तर नित्य चाललेली आहे. ह्या सर्वांला आमच्यापाशीं शास्त्राधार असतो च. भागवताच्या आधारा शिवाय भुताचें भागत नाहीं. खिस्ती भूत खिस्ती भागवताचा आधार घेते. हिंदी भूत हिंदी भागवताचा आधार घेते, एवढा च फरक. बाकी भूत म्हटलें कीं इथून तिथून जात एक च.

[ महाराष्ट्र-धर्मः ता. २०।९।१९२६ ]

: ४६ :

# अस्पृश्यता-निवारणाचें व्रत

माणसासारखा माणूस, आणि त्याचा दुसऱ्या माणसानीं विटाळ मानावयाचा, ही अमंगळ रुढी नाहींशी करण्यासाठीं अस्पृश्यता-निवारणाचें व्रत संतानीं निर्माण केलें आहे. हें व्रत प्रायश्चित्तासारखें आहे. ह्या व्रतानें आजपर्यंत जोडून ठेवलेला पापांचा पुंज जाळून टाकावयाचा आहे. व्रताच्या आचरणानें आपण कोणावर उपकार करीत नाहीं. आपलें कर्तव्य आपण करतों. म्हणून अस्पृश्यता-निवारणांत कमीत कमी काय येतें, असल्या कंजुष भावनेनें व्रताचा विचार करून चालणार नाहीं. ह्याचा संपूर्ण अर्थ काय होतो हें उदार मनानें पाहिलें पाहिजे. कोणा हि माणसाचा विटाळ मानतां कामा नये एवढ्यानें अस्पृश्यता-निवारणाची समाप्ति होत नाहीं. भंग्याच्या शरीराचा विटाळ मानणें हें जसें पाप तसें त्याच्या कामाचा विटाळ मानणें हें हि पाप. कोणचें हि समाजोपयोगी काम नीच नाहीं, हें मनांत ठसलें पाहिजे. तें करण्याची तयारी पाहिजे. सेवा-धर्माची अस्पृश्यता दूर झाली पाहिजे. कामाचा विटाळ नाहींसा झाला पाहिजे. जेवणाचें काम अमंगळ नाहीं. आणि पायखाना साफ करण्याचें काम अमंगळ, हें कसें? दोन्ही कर्तव्यरूप असलीं तर दोन्ही सारखीं च पवित्र ठरतील. पण जेवणें हें नेहमीं कर्तव्यरूप असतें काय? पंगत बसली आहे, 'आग्रहानें' जेवण चाललें आहे. वाटींत तूप कीं तुपांत वाटी? ह्याचा निर्णय होत नाहीं. हा सगळा देखावा पवित्र म्हणावयाचा कां? जेवणाचें कर्तव्यरूप जाऊन त्याला भोगाचें रूप आलेलें आहे. उलट भंग्याचें काम हें कायमचें कटु कर्तव्य आहे. ब्राह्मणाचा मुलगा भांडीं घासून कमाई करतो आणि त्या कमाईवर अभ्यास करतो हें दृश्य बरें दिसत नाहीं. त्यापेक्षां वार लावून अभ्यास करणें बरें असें वाटतें. ही अस्पृश्यतेची भावना आहे. भांडीं घासण्याचें काम अस्पृश्य मानलेलें आहे. असली अस्पृश्यता सोडून देणें हें हि अस्पृश्यता-निवारणाच्या व्रतांतलें एक महत्त्वाचें अंग आहे.

[ महाराष्ट्र-धर्म, प्रासंगिक मधून, ता. ३ आगष्ट, १९४५ ]

: ४७ :

# "सर्व धर्म हरिचे पाय"

इस्लामचे अभ्यासी मि. महंमद अली ह्यांचें 'कुराणाचा अभ्यास' ह्या विषयावर मुंबईत व्याख्यान झालें. त्यांत त्यांनीं प्रगट केलेले विचार हल्लींच्या असहिष्णुतेच्या काळांत क्वचित् च ऐकूं येतात. ते म्हणाले:—
" कुराणाच्या उपदेशाविषयीं हिंदु किंवा ख्रिस्ती लोकांत विपरीत भावना असल्या, तर त्याची जबाबदारी मुसलमानांची आहे. परधर्माविषयीं कुराणाची म्हणून जी वृत्ति मानली जाते तिच्याबद्दल कुराण जबाबदार नसून, कुराणाच्या उपदेशाविरुद्ध कित्येक मुसलमानांनीं आचरण चालविलें आहे ते जबाबदार आहेत. कुराणाचा नीट अभ्यास केल्यास असें दिसून येईल कीं, कुराणाच्या दृष्टीनें जेथें जेथें ईश्वरशरणता आहे, तेथें तेथें इस्लाम आहे. मी स्वत: एका काळीं नास्तिक आणि वरवरचा--म्हणजे हिंदु-विरोधी अथवा ख्रिस्ति-विरोधी अशा अर्थाचा—मुसलमान होतों. पण कुराण पाहिल्यानंतर इस्लामचा खरा अर्थ समजलों; आणि आज मी प्रत्येक खऱ्या हिंदूंत आणि खऱ्या ख्रिस्त्यांत मुसलमान पाहूं शकतों. "

ही दृष्टि बरोबर आहे. खऱ्या हिंदूंत मुसलमान आहे, आणि खऱ्या मुसलमानांत हिंदु आहे. ओळखतां मात्र आलें पाहिजे. विठ्ठलाचा उपासक विठ्ठलाची उपासना कधीं हि सोडणार नाहीं. जन्मभर विठ्ठलोपासक च राहील. पण त्याचा रामोपासनेशीं विरोध असणार नाहीं. तो विठ्ठलांत राम पाहूं शकतो. ही च स्थिति रामोपासकाची. त्याला रामाच्या मूर्तींत विठ्ठल दिसतो. धर्माचरण ही हि उपासना आहे. उपासनेंत विरोधाला

जागा च नाहीं. ज्याप्रमाणें "राम" "विठ्ठल" ह्या एका च परमेश्वराच्या मूर्ति आहेत, आणि म्हणून त्यांत विशिष्टता असली तरी विरोध नाहीं. त्याप्रमाणें हिंदु-धर्म, मुसलमान-धर्म इत्यादि एका च सत्य-धर्माच्या मूर्ति आहेत. आणि म्हणून त्यांत विशिष्टता असली तरी विरोध नाहीं. हें जो पाहतो तो पाहतो. रामकृष्ण परमहंसांनीं निरानिराळ्या धर्मांच्या साधना स्वतः करून पाहून सर्व धर्मांची एकरूपता पटवून घेतली. तुकारामानें स्वतःच्या उपासनेशिवाय दुसरी कोणची हि उपासना न आचरतां सर्व उपासनांची एक-वाक्यता ओळखली. जो स्वधर्माचें निष्ठा-पूर्वक आचरण करील त्याला परधर्माविषयीं आदर स्वाभाविकपणें च वाटेल. ज्याला परधर्माविषयीं अनादर वाटतो, तो स्वधर्माचें आचरण करीत नाहीं, असें च समजलें पाहिजे. धर्माचें रहस्य ओळखण्यास कुराण हि पहायला नको, व पुराण हि पहायला नको. "सर्व धर्म हरिचे पाय" एवढी गोष्ट ओळखली म्हणजे बस आहे.

[ महाराष्ट्र- धर्म : २४-१-१९२७ ]

: ४८ :

# "सहनाववतु" चें विवरण.

## ( एका पत्रांतील उतारा )

सहनाववतु सह नौ भुनक्तु सह वीर्यं करवावहै ।
तेजस्वि नावधीतमस्तु मा विद्विषावहै ॥

" सह नाववतु " ह्या मंत्राचा भोजनाशीं संबंध नाहीं असा आक्षेप मी हि पुष्कळ वेळां ऐकला आहे. पण तो आक्षेप मला योग्य वाटला नाहीं. म्हणून त्यांत फरक करण्याची मला जरूर वाटत नाहीं.

**ह्या मंत्राचें थोडक्यांत विवरण करतों**

(१) ह्यांत द्विवचनाचा प्रयोग आहे, तो हेतु-पूर्वक आहे. समाजांत गरीब-श्रीमंत, शिक्षित-अशिक्षित, स्त्री-पुरुष, आई-बाप आणि मुलें, गुरु-शिष्य, मजूर-मालक इ० द्विविध विभाग सर्वत्र पाहण्यांत येतो. त्याला अनुलक्षून हें द्विवचन आहे. दोघे मिळून ईश्वराच्या जवळ सहभावाची, परस्पर अद्वेषाची प्रार्थना करीत आहेत.

(२) ह्या प्रार्थनेचीं तीन अंगें आहेत.— (अ) "ईश्वर आम्हां दोघांचें ( अन्नादि द्वारा ) बरोबर पोषण करो" अशी ही पोषणाची आणि सह-पोषणाची प्रार्थना झाली. (आ) त्याला अनुलक्षून " आम्ही दोघे (वर्ग) बरोबर पुरुषार्थ करूं, बरोबर कर्म करूं, बरोबर उद्यम करूं." (इ) अशा सह-पुरुषार्थांमधून "आम्हां दोघांना तेजस्वी ज्ञान मिळो."

(३) वरील तीन अंगें मिळून एक जीवनविषयक संपूर्ण प्रार्थना होते. आणि म्हणून ती सार्वभौम आहे. म्हणून बहुतेक प्रत्येक सामुदायिक

प्रसंगांत तिचा उपयोग होऊं शकतो. मनुष्य एकांतात किंवा एकाकी असला तरी मानसिक समुदाय तर आहे च. गायत्री मंत्र जो विशेषतः एकांत-जपाचा मानलेला आहे त्यांत सुद्धा सामुदायिक दृष्टि सोडलेली नाहीं. आणि "धीमहि" असा बहुवचनी प्रयोग केला आहे. गायत्री मंत्रांत समुदायाची एकता कल्पून च घेतली आहे. "सह नाववतु" मध्यें प्रत्यक्ष दिसून येणारा अथवा संभवणारा वर्ग-विद्वेष घालविण्याची प्रार्थना आहे.

विभाग (अ) च्या द्वारें तो भोजनादि प्रसंगीं लागू पडतो, (आ) च्या द्वारें तो उद्योगादीमध्यें वापरतां येतो आणि (इ) च्या द्वारें अध्ययनादीमध्यें उपयोगी होतो.

[ ग्राम–सेवा–वृत्त : १५–२–१९४१ ]

: ४९ :

# हिमालय विभूति कां ?

## ( एका पत्रांतून )

भगवंतांनीं हिमालयाची गणना विभूतींत कां केली आहे हें आतां तुमच्या प्रत्यक्ष अनुभवांत येत असेल. कांहीं विभूति त्या त्या काळापुरत्या असतात, आणि तशा हि गीतेमध्यें आल्या आहेत च. पण कांहीं विभूति, ज्या विशेषतः निसर्गात्मक आहेत त्या, चिरंतन म्हणतां येतील. तसें खरो-खर ह्या जगांत एक आत्मतत्व च चिरंतन आहे. आणि विभूति सांगताना " अहमात्मा गुडाकेश " इथून च सुरवात केली आहे. ह्या महाविभूतींत बाकीच्या सर्व विभूतींचा सहज च समावेश होतो.

बाह्य विभूतींच्या दर्शनानें आनंद होतो त्याचें कारण हि आत्म्याचा एखादा गुण त्यांत प्रगट झालेला असतो हें च आहे. समुद्र पाहून आत्म्याची गंभीरता, कमळ पाहून आत्म्याची अलिप्तता, रात्र पाहून आत्म्याची अव्यक्तता, सूर्य पाहून आत्म्याची तेजस्विता, हिमालय पाहून आत्म्याची स्थिरता, इत्यादि आत्मभावांचा किंवा आत्मगुणांचा अल्पसा अनुभव येतो म्हणून च आनंद-लब्धि होते. ज्या ज्या ठिकाणीं यत्किंचित् हि आत्मोप-लब्धि होते तेथें तेथें आनंद राहतो.

सृष्टि-दर्शनानें बहुशः सर्वांस च आनंद होतो. परंतु सृष्टींतील आत्म-स्वरूप ज्याला पारखतां येते तो कवि म्हणायचा. हिमालयाच्या संनिधींत राहून अनेकांनीं तपस्या केली आहे. त्या तपस्येची पवित्रता हिमालयाच्या शुभ्र शरीरावर उमटली आहे. अनेक ऋषींनीं त्याच्या गुहेंत बसून जनतेच्या

हिताची चिंता केली आहे, ती त्यांची विश्वकल्याण-चिंता गंगादि नद्यांच्या प्रवाहरूपानें अजून वाहत आहे. अनेक योग्यांनी हिमालयाची शिखरें शरीरानें आणि उन्नत विचारानें आक्रमिलीं आहेत. तेथून वाहणारे त्यांच्या विचारांचे पवित्र वारे हिंदुस्थानांतल्या प्रत्येक मनुष्याच्या हृदयाला मिठी मारून जागवीत असतात.

रात्रीं निजतांना उत्तर दिशेचें दर्शन घेऊन आणि ध्रुव ताऱ्याच्या निश्चलतेचें ध्यान करून निजणारा मनुष्य शेंकडों मैल दूर राहून हि हिमालयाचे सांनिध्य अनुभवूं शकतो. सप्तर्षींचे तारे उत्तर दिशेकडे पहायला सापडतात. त्यांच्या आकारावरून अनेकांनीं अनेक कल्पना केल्या आहेत. परंतु हिंदुस्थानच्या उत्तर भागाच्या नकाशाची आकृति—काश्मीर आणि हिमालय मिळून—जशी होते तशी मला ती सप्तर्षींची आकृति दिसते.

[ ग्राम-सेवा-वृत्त, जुलै १९४० ]

: ५० :

# गरिबांचे मुखत्यार

गरीब लोकांचे मुखत्यार गरीब च असले पाहिजेत, असें न म्हटलें तरी निदान त्यांचें हृदय गरिबांच्या दुःखानें रडणारें, गरिबांच्या सुखानें सुखी होणारें, गरिबांशीं सहानुभूति राखणारें असलें पाहिजे. त्यांना गरिबांची आवड असली पाहिजे इतकें तरी म्हणता येईल च.

आम्ही मजुरांचे मुखत्यार म्हणविणार, आणि आमचा हुजूरपणा हि कायम राखूं पाहणार, ह्या दोन्ही गोष्टी जमावयाच्या नाहींत. द्वारकेचे राणे जेव्हां पांडवांचे मुखत्यार म्हणून दुर्योधनाकडे मसलत करण्यासाठीं गेले होते, तेव्हां दुर्योधनानें त्यांना आपल्या राजमहालांत उतरण्याविषयीं परोपरीनें विनविलें. पण भगवंतांना ती गोष्ट मानवली नाहीं, त्यांनीं विदुराची झोंपडी च पसंत केली, आणि त्या झोंपडीहून वैकुंठ ठेंगणें बनविलें. त्यांनीं विदुराच्या घोंगडीवर आपला देह पसरला. पण ती घोंगडी शेषाच्या बिछान्याहून मऊ मानली. त्यांनीं विदुराची आंबिल पिऊन ढेकर दिला. आणि त्या आंबिली पुढें अमृताला हि लाजविलें. असें त्यांनीं का केलें? कारण त्यांना ह्या गोष्टीचा विसर पडला नव्हता कीं "बारा वर्षें वनवासांत आणि एक वर्ष अज्ञात-वासांत हाल-अपेष्टा भोगून ज्यांनीं देह झिजविला त्या पांडवांचा मी प्रतिनिधि आहे. पांडवांच्या राहणीशी माझ्या राहणीचा मेळ राखणें माझा धर्म आहे. एकीकडे राजवाड्यांतले पाहुणचार भोगावे आणि दुसरीकडे पांडवांची दुःखें रडण्याचा देखावा करावा हें नुसतें नाटक होईल." भगवंताचा हा वखला बोध घेण्यासारखा आहे. मुलाची भूक जशी आईला लागते तशी प्रजेची भूक ज्याला लागत असेल तो च प्रजेचा मुखत्यार होऊं शकेल. उपाशी मुलांची आई तुपाशी जेवते, असें होईल काय?

[ महाराष्ट्र-धर्म, ता. २५-६-१९२४ ]

संक्षेप करून

पृ. १९०

: ५१ :

# भ्याड व क्रूर एक च

परवा कलकत्त्याजवळ बकरीदच्या दिवशीं हिंदु-मुसलमानांचा दंगा झाला. निमित्त अर्थात् गोवधाचें होतें. मुसलमान मूठभर होते. हिंदूंची संख्या मोठी होती. त्याचा फायदा घेऊन हिंदूंनीं क्रूरपणा गाजविला. गांधीजींनीं त्याचा निषेध केला. त्यासंबंधानें एक कोडें उत्पन्न झालें आहे. कोहटच्या प्रसंगीं हिंदु प्रतिकार न करतां पळून गेले तर गांधीजींनीं त्याना भ्याड म्हटलें. आतां कलकत्त्याला प्रतिकार केला, तर अत्याचारी म्हणतात. करावें कसें? हें कोडें सोडवणें कठीण नाहीं. भ्याडपणाच्या दोषांतून मुक्त होण्यासाठीं क्रूर बनणें, म्हणजे आगींतून निघून फुफाट्यांत पडण्यासारखें आहे. भ्याड आणि क्रूर हीं एका च गुणाचीं दोन नांवें आहेत. मूठभर लोकाना चिरडण्याची वृत्ति जशी क्रूर तशी च भ्याड हि आहे. आणि भयभीत होऊन पळत सुटण्यांत जसा भ्याडपणा तसा क्रूरपणा हि आहे. कारण भ्याड मनुष्य मनानें हिंसा करीत च असतो. अर्जुनाचें दर्शन झालें म्हणजे पळ काढावा, आणि द्रौपदीच्या निजलेल्या मुलांवर सुरी चालवावी ह्या दोन्ही गोष्टी एक च अश्वत्थामा करूं शकला होता. शौर्य हें भ्याडपणापासून जितकें दूर तितकें च क्रूरपणापासून हि दूर आहे. शूर पुरुष निर्भय आणि म्हणून च अक्रूर असतो. कोहटपासून कलकत्त्यापर्यंत मजल न मारतां मधल्या एखाद्या कुरुक्षेत्रांत मुक्काम करावयास पाहिजे. पृथ्वीच्या पसरलेल्या नकाशांत जीं स्थानें जास्तींत जास्त अंतरावर आहेत असें दिसतें तीं अगदीं जवळ असतात. तसें च भ्याडपणा व क्रौर्य ह्यांत कोहट-कलकत्त्याच्या इतकें अंतर आहे असें भासतें, तरी वास्तविक त्यांत कांहीं च अंतर नाहीं.

( महाराष्ट्र-धर्म, ता. २०-७-१९२५ )

पृ. १९१

## : ५२ :

# तरुणांनीं लक्ष द्यावें.

रात्रंदिवस काम, काम आणि काम, ह्याशिवाय दुसरा विचार च न करणारे तळमळीचे लोक पुढें आल्याशिवाय विधायक कार्यक्रम झेंपणार नाहीं, ही गोष्ट आतां आम्हीं नीट लक्षांत घेतली पाहिजे. दुनिया विसरून, अहंकार मारून, खेडें गांवांत कोंडून घेण्याची तयारी पाहिजे. आई मुलां-साठीं खस्ता खाते, त्याबद्दल मुलखांत आपली टिमकी वाजावी अशी तिला अपेक्षा नसते. पण मुलानें पुढें मागें आपली चाकरी करावी अशी कदाचित् तिला आशा असेल. आपल्याला तर ह्याहून अधिक निरपेक्ष वृत्ति राखली पाहिजे. ज्या लोकांत आपण काम करणार, ज्यांची फिकीर करण्यांत आपण आयुष्य खपविणार, त्यांच्याकडून हि एखाद्या बऱ्या बोलाची अपेक्षा आप-णांस राखतां येणार नाहीं. सेवा करून मोबदल्यांत लाथा खावयाच्या आहेत, असें च धरून चाललें पाहिजे. महारांची सेवा करतों म्हणून ब्राह्मण रुसले, आणि भंग्यांची सेवा करतों म्हणून महार रुसले. ही स्थिति सहन केली पाहिजे. आजपर्यंत निराळें होतें. एका च बाजूनें मार सहन करावयाचा होता. राजकीय काम करणारांना सरकारचा मार आणि सामाजिक काम करणारांना लोकांचा मार अशी वांटणी होती. आतां दोन्ही ताटें एकदम वाढून ठेवलीं आहेत; दोन्ही मार एकदम सहन करावयाचे आहेत. इतक्या सहनशक्तीचे, टणक, चिवट-लोचट म्हणा पाहिजे तर— लोक हवे आहेत. अशांच्या शिवाय आमचें काम सरकणार नाहीं.

[ महाराष्ट्र-[धर्म]. ता. १२-११-१९२४ ]

संक्षेप करून

पृ. ११२

: ५३ :

# अकरणात्मक त्याग

परवां देशबंधूंच्या श्राद्ध-दिनानिमित्त आमच्याकडील एका खेड्यांत संपूर्ण हरताळ पाळला गेला. संपूर्ण हरताळ म्हणजे नांगर वखरासकट सर्व कामें बंद. पेरणीच्या ऐन दिवसांपैकीं एक दिवस काम बंद करण्यांत त्याग आहे. पण आमच्या त्यागांत एक गोम दिसून येते: "अमुक करूं नका" अशा स्वरूपाचा त्याग आम्हीं करूं शकतों. पण "अमुक करा" अशा स्वरूपाचा त्याग आम्हांस जड जातो. रामनवमीनिमित्त उपवास करणें आम्हांला इतकें कठिण नाहीं. पण हनुमानजयंतीनिमित्त व्यायाम करणें कठिण वाटते. "पेरणीचें काम बंद करा" हें हि आम्ही नुकसान सोसून करूं शकतों. पण "दोन तास सूत कांता" म्हटलें म्हणजे मात्र जिवावर येते. दोन्ही गोष्टींत त्याग आहे पण एक अकरणात्मक आहे. आणि दुसरा कर्तव्यात्मक आहे. दोहोंची किंमत आहे. पण आपल्या राष्ट्राला आज दुसऱ्या प्रकारच्या त्यागाची अधिक जरूरी आहे. खादीच्या चळवळीला हा कर्तृत्वाच्या बाजूचा त्याग पाहिजे.

[ महाराष्ट्र-धर्म : ता. १३-७-१९२५ ]

: ५४ :

# दास-नवमी-चिंतन

"अती लीनता सर्व-भावें स्वभावें
जनां सज्जनालागि संतोषवावें
देहे कारणीं सर्व लावीत जावें
सगूणीं अती आदरेंसीं भजावें."

१. सगळ्या बाबतींत अतिशय नम्रतेनें वागावें. पण नम्रता कृत्रिम कामाची नाहीं. सहज पाहिजे.

२. जनतेची सेवा करून सज्जनांना संतोष द्यावा. जन-सेवेनें सज्जनांना संतोष होत असतो.

३. कोणत्या ना कोणत्या चांगल्या कामांत देहाला राबवून त्याचें सार्थक करावें. देहाला आळसांत ठेवूं नये.

४. भगवंताची आदरानें भक्ति करावी. त्याच्या शुभ गुणांचे सदा चिंतन करावें, म्हणजे त्या गुणांचा अंश हळूं हळूं आपल्यांत उतरेल.

[ मराठी हरिजन. ता. २३-२-४७. ]

# पू० विनोबांचें प्रकाशित वाङ्मय

| | लेखक | रु. आ. |
|---|---|---|
| १ मधुकर | विनोबा | १– ८ |
| २ जीवन-दृष्टि | ,, | १–१२ |
| ३ सर्वोदय-विचार | ,, | १– ४ |
| ४ क्रांत-दर्शन | ,, | १– ४ |
| ५ गीताओी (ठळक) | ,, | ०– ८ |
| ६* ,, (लोक नागरी) | ,, | ०– ४ |
| ७ ,, | ,, | ०– ३ |
| ८ गीता-प्रवचनें | ,, | १– ८ |
| ९ गीताध्याय-संगति | ,, | ०-१-६ |
| १० स्थितप्रज्ञ-दर्शन | ,, | १– ८ |
| ११ गीताई शब्दार्थ कोष | ,, | ४– ८ |
| १२ ,, ,, ,, पक्की बांधणी | ,, | ५– ० |
| १३ अुपनिषदांचा अभ्यास | ,, | २– ० |
| १४ औशावास्य वृत्ति | ,, | १– ८ |
| १५ स्वराज्य-शस्त्र | ,, | ०–१० |
| १६ ज्ञानदेवाची भजनें | ,, | १– ८ |
| १७ नामदेवाचीं भजनें | ,, | ०–१० |
| १८ अेकनाथाची भजनें | ,, | ०–१२ |
| १९ अेकनाथाचीं भजनें, प्रस्तावना खंड | ,, | ०– ८ |
| २० लोकनागरी लिपि | ,, | ०– ५ |
| २१ राम-नाम | ,, | ०– ८ |
| २२ तेरा दिवस | ,, | ०– ८ |
| २३ वेडछी आश्रमांत | ,, | ०– ८ |
| २४ संतांचा प्रसाद | ,, | १– ० |
| २५ अभंग व्रतें | ,, | ०– ६ |
| २६ मूल अुद्योग कांतणें | ,, | ०–१२ |
| २७ विचार-पोथी | ,, | १– ८ |